

माझा देश, माझी माणसं

जागतिक कीर्तीचे धम्मगुरू

दलाई लामा

यांचे आत्मकथन

अनुवाद
सुरूचि पांडे



माझा देश, माझी माणसं

जागतिक कीर्तीचे धम्मगुरू

दलाई लामा

यांचे आत्मकथन

अनुवाद
सुरूचि पांडे

माझा देश, माझी माणसं
जागतिक कीर्तीचे धम्मगुरू
दलाई लामा
यांचे आत्मकथन

अनुवाद । सुरुचि पांडे

मनोविकास
प्रकाशन

मनोविकास
प्रकाशन

MAZA DESH, MAZI MANASA l DALAI LAMA

TRANSLETED BY l SURUCHI PANDE

माझा देश, माझी माणसं । दलाई लामा
अनुवाद । सुरुचि पांडे

प्रकाशक । अरविंद घन:श्याम पाटकर
मनोविकास प्रकाशन
फ्लॅट नं. 3-ए/4,शक्ती टॉवर,
672, नारायण पेठ, पुणे 411 030.
फोन : 020-65262950

Website : www.manovikasprakashan.com

Email : manovikaspublication@gmail.com

© मराठी आवृत्तीचे हक्क मनोविकास प्रकाशनाकडे
ISBN -978-93-82468-68-4

मूल्य । 200 रुपये

अनुक्रमणिका

प्रस्तावना
मनोगत
शेतकऱ्याचा मुलगा
ज्ञानप्रकाशाचा शोध
मनाची शांती
आमचा शेजारी - चीन
परचक्र
साम्यवादी चीनमध्ये
दडपशाही आणि चीड
भारताची तीर्थयात्रा
उठाव
ल्हासामधील संकट
सुटका
हद्दपार
वर्तमान आणि भविष्य
परिशिष्ट 1 : तिबेटमधल्या बौद्ध धर्माची रूपरेखा
परिशिष्ट 2 : तिबेटच्या परम पावन दलाई लामांनी संयुक्त राष्ट्रसंघाला केलेले विनंती अर्ज

मनोगत

तिबेटबद्दलचं कुतूहल, परमपावन दलाई लामा यांच्याबद्दलचं गूढरम्य आकर्षण, तिबेटच्या मुक्तीसाठी त्यांनी सातत्यानं चालवलेला संघर्ष त्याचबरोबर जागतिक शांतीसाठी असलेला त्यांचा ठाम आग्रह... अशी कितीतरी कारणं मनात दडलेली होतीच. वर्षानुवर्षांपासून! म्हणूनच 'माय लँड अँड माय पिपल' हे परमपावन दलाई लामांचं स्मृतिकथन मराठीत अनुवादित करावं असं वाटलं.

चौदावे दलाई लामा म्हणून त्यांना विलक्षण आदर तर जगभरातून दिला जातोच; पण त्यांच्या आयुष्यातले कितीतरी खडतर टप्पेदेखील आपल्याला ठाऊक असावेत. अनेकदा त्यांचा धर्मगुरू पंतप्रधान म्हणून कस लागलेला दिसतो. मुत्सद्देगिरीची परीक्षा होते. या सार्‍याशिवाय असलेले परमपावन दलाई लामा हे अतिशय सभ्य, विलक्षण मृदू अन् सुसंस्कृत, प्रामाणिकपणे सुधारक आणि करुणामय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची प्रज्ञा अतिशय तीव्र आहे म्हणूनच तर विविध क्षेत्रात विशेष ठसा उमटवलेल्या नोबेल पारितोषिक विजेत्या विचारवंतांशी त्यांचा संवाद होतो.

हे पुस्तक अनुवादित करताना मला, प्रोफेसर पेमा तेनजिन, प्रोफेसर समतेनजी (दोघेही 'सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ हायर तिबेटन स्टडीज' सारनाथ, वाराणसी); श्री. तेनजिन गेशे टेठाँग (परमपावन दलाई लामांचे सचिव, आता निवृत्त); श्री. छिमे रिगझिंग (परमपावन दलाई लामांचे सचिव); आदरणीय लामा दोबुम टुल्कू (तिबेट हाऊस, दिल्ली), या सर्वांची अतिशय मदत झाली. पुस्तकासाठी 'तिबेट म्युझियम व डिपार्टमेंटल ऑफ इन्फर्मेशन अँड इंटरनॅशनल रिलेशन्स' गव्हर्नमेंट इन एक्साइल, धरमशाला या विभागाने तत्परतेनं छायाचित्रं उपलब्ध करून दिली. पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्याची अनुमती धरमशाला येथील कार्यालयातून मिळाली. या सर्वांबद्दल मी कृतज्ञ आहे. या सर्वांच्या मदतीशिवाय अनुवाद योग्य रितीनं पूर्ण करणं शक्य झालं नसतं.

मार्च 2007 मध्ये पुण्यामध्ये खुद्द परमपावन दलाई लामा यांच्याशीच थेट संवाद साधला आला. ही तर फारच आनंदाची गोष्ट ठरली. त्यावेळी मराठी हस्तलिखिताचं बाड त्यांनाच अर्पण केलं. त्यांचे आशीर्वाद घेतले.

या अनुवादातून परमपावन दलाई लामा यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू मराठी वाचकांसमोर यावेत आणि एका स्नेहशील अंत:करणाच्या, सार्‍यांच्या कल्याणाची चिंता करणार्‍या श्रेष्ठ बौद्ध भिक्षूच्या आत्मिक सामर्थ्याची सार्‍यांनाच जाणीव व्हावी, हीच नम्र अपेक्षा.

- सुरुचि पांडे

प्रस्तावना

1950 मध्ये जेव्हा चीनच्या साम्यवादी लष्करानं तिबेटमध्ये प्रवेश केला आणि तिबेटचा पूर्वेकडील भाग व्यापून टाकला, तेव्हा माझी आणि माझ्या जनतेची परिस्थिती पारच असहाय आणि निराशाजनक झाली. जगातल्या अनेक पुढारलेल्या देशांना आणि संयुक्त राष्ट्रांना आमच्या वतीनं या प्रश्नाची दखल घ्यायची विनंती केली, परंतु आमच्या मदतीसाठी केलेल्या विनंत्या नाकारल्या गेल्या. अनेक शतकांपासून तिबेटकडे लष्करी सामर्थ्य होतं. हजारो वर्षांपूर्वी भारतातून आमच्या देशात भगवान बुद्धाचं ज्ञान आणलं गेलं तेव्हापासून आमचा शांती सलोख्यावर विश्वास आहे आणि त्याचंच अनुसरण करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. आमचं राष्ट्रीय जीवन हे धर्माला वाहिलेलं होतं आणि आमच्याकडे ऐहिक साधनसामग्री कमी होती. इतर देशांनी मदत देणं नाकारलं आणि लवकरच चीनच्या लष्करी सामर्थ्यानं आम्ही स्तंभित होऊन गेलो. एखादा सन्माननीय तह करता यावा म्हणून आम्ही पेकिंगला प्रतिनिधी मंडळ पाठवलं; पण त्या मंडळाला, आमची स्वायत्तता घालवली जाईल अशा मसुद्यावर, धाकधपटशा दाखवून जबरदस्तीनं सह्या करायला भाग पाडलं गेलं. आमच्यावर लादल्या गेलेल्या कराराला आमच्या सरकारनं अजिबात मंजुरी दिली नाही; पण जर आम्ही तो करार नाकारला तर आणखी रक्तपात आणि विध्वंस हे अपरिहार्यपणे येणारच हे स्पष्ट दिसत होतं. माझ्या लोकांना आणखी दुर्दशेपासून वाचवावं म्हणून, मी आणि माझ्या सरकारनं करार निभावण्याचा प्रयत्न केला, तो करार अन्याय्य होता तरीसुद्धा प्रयत्न केला; पण त्यात दिलेलं वचन चिन्यांनी मोडलं.

न्यायतज्ज्ञांच्या आंतरराष्ट्रीय समितीच्या वृत्तांमध्ये तिबेटमध्ये घडत गेलेल्या भयंकर शोकांतिकेबद्दल खूप सविस्तरपणे सांगितलं गेलं आहे. या पुस्तकात, तिबेटमधील आमचं जीवन आणि ज्या दु:खद घटनांनी आज त्या जीवनावर घाला घातला गेला आहे, त्याबद्दलचा माझा व्यक्तिगत वृत्तांत देण्याचा प्रयत्न केला आहे. काही बौद्ध सिद्धान्त आणि दु:खाकडून आनंदाच्या मार्गाकडे नेणारा धार्मिक क्रम याचाही मी उल्लेख केला आहे; कारण आमच्या धर्माची कल्पना आल्याशिवाय कुणालाही तिबेट कळणार नाही.

मी अहिंसा तत्त्वाचा ठाम अनुयायी आहे. ह्या तत्त्वाचा भगवान बुद्धानं पहिल्यांदा उपदेश दिला. त्याचं दैवी ज्ञान हे पूर्ण आणि अचूक आहे; आणि आमच्याच काळातल्या एका भारतीय संतानं आणि नेत्यानं - महात्मा गांधींनी या तत्त्वाचं पालन केलं. त्यामुळं स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी शस्त्रास्त्रांचा आधार घेण्याच्या उपायाला पहिल्यापासून माझा कडवा विरोध होता. या सर्व काळामध्ये मी चीनबरोबर न्याय्य आणि शांतीपूर्ण तडजोड शोधण्यासाठी मला शक्य ते प्रयत्न केले आणि माझ्या स्वत:च्याच काही जवळच्या माणसांना नाराज करण्याचा धोका पत्करून मी हिंसाचार टाळण्याचे आटोकाट प्रयत्न केले आहेत. तिबेट सरकारच्या अधिपत्याखाली अजूनही असलेल्या त्या माझ्या लोकांनी, चीनच्या दडपशाहीविरुद्ध शस्त्र हातात घेऊ नये, यासाठी त्यांचं मन वळवायचा मी नऊ वर्ष प्रयत्न केला. कारण शस्त्राचा मार्ग अनैतिक होत जाणार आणि दोन्ही बाजूंना त्यामुळं अनर्थ माजणार असं मला खात्रीपूर्वक वाटत होतं. पण देशाच्या पूर्वेकडल्या भागात, जिथं आधीच आक्रमण झालं होतं, तिथं लोकांवर

आमचा प्रभाव पाडता येऊ शकेल यासाठी माझ्याकडे किंवा माझ्या सरकारकडे संवादाचं कुठलंही साधन नव्हतं; आणि तिथले लोक चिन्यांविरुद्ध बंड करून उठले. अखेरीस, आक्रमकांनी देशभर केलेली दडपशाही असह्य बनली आणि माझ्या लोकांचा संयम तुटला.

प्रत्येकाला सहज समजेल अशा पद्धतीनं मी ही सारी कथा सांगण्याचा कसून प्रयत्न केला आहे; आणि वाचकांनी आपापला निष्कर्ष काढावा, असंच मला सांगावसं वाटतं. पण मला पुढं जाऊन असं सांगावसं वाटतं, की जरी तिबेटमधल्या चीनच्या प्रतिनिधींनी आम्हाला अतिशय रानटीपणानं वागवलं, तरी अफाट अशा चिनी जनतेबद्दल आम्हा तिबेटी लोकांच्या मनात अजूनही तिरस्काराची भावना नाही. आमचं आयुष्य आम्हाला शांतपणे आणि चीनसहित आमच्या सर्व शेजाऱ्यांबरोबर मैत्रीच्या नात्यानं जगता यावं, एवढीच आमची एकमेव इच्छा आहे; त्यासाठी, जगभरच्या साऱ्या स्त्री-पुरुषांना, ज्यांना सहिष्णुता आणि मार्दव यांची मातब्बरी कळते, अशा जगभरच्या सर्व स्त्री-पुरुषांना आम्ही त्यासाठी विनवीत आहोत.

या पुस्तकाच्या तयारीत सल्ला आणि मदत दिल्याबद्दल मी डेव्हिड हॉवर्थ यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो; आणि त्याचबरोबर श्री. हॉवर्थ आणि माझ्यात अतिशय कुशलतेनं, दुभाषी म्हणून संवाद साधून दिल्याबद्दल सोनम तोबग्यल काजी यांच्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

- दलाई लामा

शेतकऱ्याचा मुलगा

तगसेर नावाच्या लहानशा खेड्यात माझा जन्म झाला. हे खेडं आहे तिबेटच्या ईशान्य भागात. तिबेटी पंचांगानुसार तो दिवस होता काष्ठ वराह वर्षातला, पाचव्या महिन्याचा पाचवा दिवस - म्हणजेच साल होतं 1935. तगसेर आहे दो-खम नावाच्या जिल्ह्यात. जिल्ह्याचं हे नाव मोठं वर्णनात्मक आहे. दो म्हणजे दरीचा खालचा भाग जो सपाटीमध्ये मिसळून जातो आणि खम म्हणजे तिबेटचा पूर्वेकडचा भाग. तिबेटी लोकांमधले, खांपा या वैशिष्ट्यपूर्ण वंशाचे लोक इथं राहतात. अशा प्रकारे दो-खम हा तिबेटचा असा भाग आहे, की जिथं पूर्वेच्या सपाटीला, चीनच्या दिशेनं आमच्या पर्वतांची उतरण सुरू होते. तगसेर हेच मुळी समुद्रसपाटीपासून 9,000 फूट उंचीवर आहे.

किती सुंदर भाग होता तो! लहानसर पठारावर आमचं खेडं वसलेलं होतं. त्याला चहूबाजूंनी गहू आणि जवाच्या सुपीक शेतांनी वेढलेलं होतं आणि पठाराला वेढा होता, दाट अन् झळझळीत गवतानं झाकलेल्या टेकड्यांचा.

आमच्या खेड्याच्या दक्षिणेला बाकी सगळ्यांपेक्षा उंचसर असा पर्वत होता. त्याचं नाव होतं अमे-चिरि, पण स्थानिक लोक त्याला म्हणायचे 'आकाशाला भेदणारा पर्वत'. हा पर्वत म्हणजे रक्षणकर्त्या ग्रामदैवताचं निवासस्थान मानला जाई. त्याचा उतरणीचा भाग जंगलांनी झाकलेला होता; थोड्या वरच्या भागात गवत फोफावलेलं दिसायचं; त्याच्याही थोडं वर पाहिलं तर खडक दिसायचा; आणि मग शिखरावर एक बर्फाळ तुकडा असायचा. तिथला बर्फ कधीच वितळत नसे. पर्वताच्या उत्तरेकडच्या बाजूला ज्यूनिपरची झुडपं आणि पॉपलर, पीच, प्लम आणि अक्रोडाची झाडं होती. अनेक प्रकारची लहान लहान बेरींची फळं आणि सुगंधी फुलं होती. स्वच्छ पाण्याचे झरे धबधब्यातून कोसळायचे. पक्षी आणि हरणं, जंगली गाढवं, माकडं, थोडेसे चित्ते, अस्वलं आणि कोल्हे असे वन्य प्राणी, माणसाची जरासुद्धा भीती न बाळगता हिंडायचे. कारण आम्ही बौद्ध होतो आणि कुठल्याही सजीवांची हत्या करणे आम्हाला मान्य नव्हते.

या देखण्या निसर्गसौंदर्याच्या मधोमध 'कर्मा शर-चोङ् रि-डो' नावाचा मठ होता. तिबेटच्या धार्मिक इतिहासातले हे एक प्रसिद्ध स्थळ. याची स्थापना केली होती कर्मा-रोलपई-दोर्जे यांनी. कर्मापाचा हा चौथा अवतार समजला जातो; तसंच तिबेटमध्ये मान्यता मिळालेला हा पहिलाच अवतार आहे. ख्रिस्ती काळानुसार चौदाव्या शतकात, आमचा महान सुधारक चौङ्खा-पा याला याच मठात संन्यासधर्माची दीक्षा मिळाली. त्याच्या थोडंसं खाली, पर्वताच्या पठारी भागावर भव्य असा 'अम्दो ज़ाक्युङ्' नावाचा दुसरा मठ होता. त्याची उतरती छपरं आणि धर्मचक्राचं बोधचिन्ह, दोन्ही बाजूंनी त्याला आधार देणारी तांब्याची अन् सोन्याची हरणं - यांच्यामुळं त्या निसर्गरम्यतेत नुसतीच रंगांची भर पडली असं नव्हे, तर एकूणच आसपासच्या वातावरणात एक पावित्र्य भरून राहिलं होतं. खेड्यातल्या घरांच्या छपरांवर असलेल्या, प्रार्थना सूचित करणाऱ्या पताकांनी (ध्वजांनी) ते पावित्र्य, गांभीर्य वाढवलं होतं.

तगसेरमध्ये सारे शेतकरीच होते. इथल्या लोकांचं मुख्य अन्न होतं गव्हाचं पीठ आणि जवापासून बनवलेला चम-पा नावाचा प्रकार, मांस आणि लोणी; तसंच लोणी घातलेला चहा आणि छंङ् नावाची जवापासून बनवलेली बियर हे त्यांचं पेय. मांसाहाराबद्दल बौद्ध

लोकांमध्ये वेगवेगळी मतं आहेत, पण मांसाहार ही बहुतांशी तिबेटी लोकांची गरज होती. तिबेटच्या बऱ्याचशा भागात खडतर हवामान होतं; आणि जरी अन्न मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतं तरी त्यात फारशी विविधता नव्हती. त्यामुळे मांस न खाता निरोगी राहणं अशक्यच होतं. देशामध्ये बौद्ध धर्म येण्याच्या आधीपासून ही पद्धत रूळलेली होती. एखाद्या प्राण्याला मारणं हे तिबेटी लोकांच्या मतानुसार पाप ठरेल, मग कारण अगदी कुठलंही असो; पण बाजारात जाऊन, आधीच मारून ठेवलेल्या एखाद्या प्राण्याचं मांस विकत आणणं हे मात्र त्यांच्या लेखी पाप नाही. प्राण्यांची कत्तल करणाऱ्या खाटकांना पापी आणि जातिभ्रष्ट समजलं जायचं.

तगसेरमध्ये पिकवलेल्या जव आणि गहू या धान्याचा जास्ती झालेला भाग हा जवळच्या कुमबुम आणि सायनिंग या शहरांमध्ये विकला जाई. धान्याच्या बदल्यात चहा, साखर, सुती कापड, दागिने आणि लोखंडी भांडीकुंडी घेतली जात. लोकांचे कपडे अगदी खास तिबेटी असत. पुरुष लोकरीच्या टोप्या आणि उंच असे कातडी बूट घालत. त्यांचा एक विशिष्ट मोठा अंगरखा असे. तिबेटभर याचे वेगवेगळे प्रकार असायचे. जरासा कंबरेच्या खालीच याचा पट्टा बांधला जाई आणि त्याच्या चुण्या, घड्या यांचा खिशासारखा उपयोग होई. बायका बिनबाह्यांचे पायघोळ लोकरी कपडे आणि आकर्षक रंगांची सुती किंवा रेशमाची ब्लाऊज वापरत. प्रत्येक खास प्रसंगी, लांब आणि सुंदर अशा टोप्या त्या वापरत. या नटवलेल्या टोप्या पाठीवर कंबरेपर्यंत रूळत असत. हिवाळ्यात सारेजणच लोकरी कोट आणि जाड लोकरीचं अस्तर असलेले कपडेच घालत असत. जगभरच्या साऱ्याच बहिणींप्रमाणं तगसेरच्या बायकांनाही रत्न आणि मौल्यवानं खड्यांच्या दागिन्यांचा सोस होता; पण बायकांनी सुगरण असणं ही खेड्यातल्या पुरुषांच्या दृष्टीनं अभिमानाची बाब होती.

आमच्या खेड्याच्या जवळपास इतरही अनेक मठ आणि देवळं होती. तिथं कुणीही जाऊन प्रार्थना करू शकायचं, काही दान करायचं असेल तरी करता यायचं; मग तो माणूस भिक्षू असो किंवा नसो. खरंच, त्या भागाचं सारं जगणं धर्मावर आधारलेलं होतं. तिबेटमध्ये निष्ठावान बौद्ध नसलेला क्वचितच सापडला असता. अगदी एवढ्या एवढ्या, जेमतेम शब्द फुटायला लागलेल्या मुलांनाही 'बुद्ध, धर्म आणि संघ' या त्रिरत्नांची प्रतीकं ठेवलेल्या धर्मस्थळांना भेटी द्यायला मजा यायची. खेळताना देखील लहान मुलं मातीची मंदिर बांधायची, त्यांच्यापुढे काहीतरी नैवेद्य अर्पण करायची आणि पूजा केल्यासारखे हावभाव करायची. त्यांना हे काही कुणी शिकवलं नव्हतं, पण आतून आलेलं जणू उपजत असं काहीसं ते ज्ञान होतं. सारेजण, गरीब असोत वा श्रीमंत असोत, स्वत:च्या भौतिक गरजांसाठी पैसा खर्च करून वर शिल्लक राहिलेला जो पैसा असेल तो धर्मस्थळं बांधणं, मंदिरांना मदत करणं, त्रिरत्नांसाठी दान करणं, गरीबांना भिक्षा घालणं आणि खाटकांकडून जनावरं विकत घेऊन त्यांचे प्राण वाचवणं, अशा गोष्टींसाठी खर्च करत असत. (अर्थात, काही कंजूष याला अपवाद असतात.)

सुखवस्तू अशी मंडळी असायची त्यांच्या घरी प्रार्थना मंदिर असायचं. तिथं अखंड प्रार्थनेचं पठण चालू असायचं आणि असंख्य भिक्षूंना त्याच्याकडे जेवू-खाऊ घातलं जाई. कधी कधी तर असा माणूस शेकडो भिक्षूंना एखाद्या पवित्र ग्रंथांचं पारायण करण्यासाठी अनेक दिवसांसाठी म्हणून निमंत्रण देई. हे करण्यासाठी तो त्यांना दक्षिणा आणि जेवण देई. अगदी गरीबातल्या गरीब माणसाच्या झोपडीमध्येही छोटीशी वेदी

आणि भगवान बुद्धाची प्रतिमा असे. तिथं कायम निरांजन तेवत असे.

दो-खमचे बहुतेक सारे लोक उंच नि धिप्पाड, स्वभावानं काटक आणि शूर होते. त्यांच्या ह्या गुणवैशिष्ट्यांना त्यांच्या श्रद्धेमुळं एक मृदुता आलेली होती. त्यांचा विश्वास, श्रद्धा यांच्यामुळे कुठल्या सद्गुणांना उत्तेजन मिळालं असेल तर लीनता आणि दानत, मवाळपणा, दयाळूपणा, स्नेह आणि सर्व प्राणिमात्रांचा सहानुभूतीपूर्ण विचार यांना.

अशा मनमिळाऊ लोकांच्यात, अगदी शुद्ध तिबेटी घराण्यात माझा जन्म झाला. जरी माझं कुटुंब दो-खममध्ये येऊन स्थिरस्थावर झालेलं असलं, तरी माझे पूर्वज मध्य तिबेटमधून आले होते. ते सारेजण पूर्व तिबेटमध्ये राहायला कसे आले त्यामागे एक साधी कथा आहे. शेकडो वर्षांपूर्वी मङ्सोङ् मङ्चन या राजाची त्या भागात कारकीर्द होती. त्या काळात सरहद्दीचं संरक्षण करण्यासाठी तिबेटच्या ईशान्य भागात तिबेटी सैन्य ठेवलेलं होतं. दो-खमच्या आमच्या भागात मध्य तिबेटमधल्या फेम-पो येथील शिबंदी ठेवलेली होती. माझे पूर्वज या शिबंदीबरोबर आले, असं माझी कुलपरंपरा सांगते. आमच्या कुटुंबाच्या बोलीभाषेत पूर्व भागातल्यापेक्षा फेम-पो जिल्ह्यातले अनेक शब्द आम्ही अजूनही वापरतो. म्हणजे वाडग्याला छेने आणि चमच्यासाठी खेन-बु हे शब्द वापरतो. मागच्या दोन पिढ्या वगळता माझ्या कुटुंबातला कुणी ना कुणी सदस्य खेड्याचा प्रमुख असायचा. त्याला 'छिजा नङ्सो' ही पदवी असायची. छिजा म्हणजे 'जागेचं नाव' आणि नङ्सो म्हणजे 'अंतर्गत पहारेकरी'. एका कष्टाळू आणि सुशील अशा शेतकरी कुटुंबातून मी आलो आहे याचा मला नेहमीच आनंद वाटतो. मी लहान असताना माझं खेडं सोडलं, बाकी मी नंतर सांगणार आहेच; पण बऱ्याच वर्षांनंतर चीनहून परत येताना मी तगसेरला धावती भेट दिली. तेव्हा माझं वाडवडिलांचं खेडं आणि माझं घर पाहिलं तेव्हा माझ्या मनात अभिमान दाटून आला. जर मी श्रीमंत किंवा अमीर-उमरावाच्या कुटुंबात जन्मलो असतो तर मला गरीब, साध्या-भोळ्या तिबेटी लोकांच्या भावभावना आणि विचार आपुलकीनं जाणवले नसते, असं मला नेहमीच वाटत आलं आहे; पण अगदी साध्याशा घरात जन्म घेतल्यामुळं मी त्यांना समजू शकतो आणि त्यांचं अंतरंग वाचू शकतो. म्हणूनच मला त्यांच्याबद्दल तीव्रतेनं सहानुभूती वाटते. मी आयुष्यभर सीध्या-साध्या लोकांचं आयुष्य सुधारावं म्हणून प्रयत्न करत आलो आहे.

आमचं कुटुंब चांगलं प्रशस्त होतं. म्हणजे मला दोन बहिणी आणि चार भाऊ होते. आमच्या साऱ्यांच्यात वयाचं तसं बरंच अंतर होतं. माझ्या आईला सोळा मुलं झाली, पण त्यातली नऊजण लहान असताना वारली. माझं सारं कुटुंब प्रेम आणि दयाळूपणा यांच्या घट्ट धाग्यांनी बांधलेलं होतं. माझे वडील अतिशय स्नेहशील होते. ते जरा तापट होते, पण त्यांचा राग फारसा टिकत नसे. त्यांची ठेवण उंचीपुरी किंवा धिप्पाडही नव्हती. तसे ते खूप शिकलेले नव्हते, पण त्यांच्यात उपजत शहाणपण आणि तरतरीत बुद्धी होती. त्यांना घोड्यांची फार आवड होती आणि ते खूपदा घोड्यावरून रपेट करायचेही. त्यांना घोड्यांची चांगली पारख होती; आणि घोडे आजारी पडले तर त्यांना त्यांच्यावर औषधोपचारदेखील करता यायचे. माझी आई अगदी दयाळू आणि प्रेमळ स्वभावाची होती. तिला प्रत्येकाबद्दल माया वाटे; तिचं स्वतःचं जेवणही ती भुकेलेल्याला वाढून मोकळी होई आणि स्वतः मात्र उपाशी राही. जरी ती अशी मृदु असली तरी कुटुंबावर तिचं राज्य चाले. माझी आई तरी कुठल्याही परिस्थितीला जुळवून घ्यायची. ती दूरदर्शी

होती. त्यामुळे माझी खास पदासाठी नेमणूक झाल्यावर तिच्यासाठी कामाच्या मोठ्या दिशा मोकळ्या झाल्या. तेव्हाही आपली इतर मुलं व्यवस्थित शिक्षण घेत आहेत ना, याकडं तिनं जाणीवपूर्वक लक्ष दिलं.

आमचं उपजीविकेचं मुख्य साधन शेती हेच असलं तरी आम्ही गाईगुरं आणि घोडे बाळगले होते, तर बागेमध्ये आम्ही भाजीपालाही लावायचो. साधारणपणे शेतावर काम करायला आमच्याकडे पाच कामगार होते आणि बरंचस काम आम्ही कुटुंबीयच करायचो; पण लावणीच्या आणि कापणीच्या वेळी मात्र आम्ही पंधरा ते चाळीस लोक कामाला ठेवायचो. त्यांना वस्तूंच्या रूपात मोबदला द्यायचो. जर एखाद्या कुटूंबाला मदत लागली तर सारेजण पुढे यायचे किंवा कुणी एखाद्या संकटात सापडलं तर सारे हात द्यायचे. ही आमच्या गावची रीतच होती. मी तान्हा असताना, इतरांच्या शेतावर मदतीला जाताना माझी आई मला पाठंगुळीला घेऊन जायची. शेताच्या कोपऱ्यात एका बाजूला जमिनीत रोवलेल्या खुंटीला छत्री बांधून, तिच्याखाली मला झोपवायची.

आमचं घर चौकोनी होतं आणि मधे अंगण होतं. घराला एकच मजला होता. खालचा भाग दगडी तर वरचा भाग मातीचा होता. सपाट छताच्या टोकाला कडेकडेने निळ्या फरशा बसवलेल्या होत्या. घराचं मुख्य दार अमे-चिरिच्या दिशेनं दक्षिणेला होतं. दार तिबेटमधल्या परंपरेनुसार भाले आणि ध्वजपताकांनी सजवलेलं होतं. अंगणात मध्यभागी असलेल्या उंच खांबावर प्रार्थनाध्वज फडफडत असायचे. घराच्या पाठच्या बाजूला असलेल्या अंगणात आमचे घोडे, खेचरं आणि गाई-गुरं ठेवलेली असायची आणि आल्या-गेल्या आगंतुकांना रोखण्यासाठी दारासमोर एक दांडगा तिबेटी कुत्रा बांधून ठेवलेला असायचा.

गाईगुरांपैकी गाई आठ होत्या आणि सात ज़ोमो होते. ज़ोमो ही याक आणि गाईपासून झालेली संकरित प्रजाती आहे. (बैल हा जसा शब्द आहे तसंच याक या शब्दानं नर कळतो. याकची मादी म्हणजे ड्रि). माझी आई स्वत:च ज़ोमोचं दूध काढायची. मला जसे पाय फुटले तसतसं मी तिच्या मागे मागे गोठ्यात जायचो. झग्याच्या चुण्यांमध्ये दुधाची वाटी असायची. मग आई मला ज़ोमोचं धारोष्ण निरस दूध द्यायची. आमच्याकडे कोंबड्याही होत्या. खुराड्यामध्ये जाऊन अंडी गोळा करायची मला परवानगी होती. अगदी लहानपणच्या आठवणींपैकी ही एक आठवण असावी. मला आठवतं, खुराड्यातल्या एखाद्या पेटीत मी चढून बसायचो आणि तिथं बसून कोंबडीसारखं कलकलायचो.

दलाई लामा आईसमवेत

आमचं कौटुंबिक आयुष्य साधं होतं, पण अगदी आनंदी आणि समाधानी होतं. अनेक वर्ष तिबेटचा धार्मिक आणि लौकिक सत्ताधीश राजा म्हणजे - तेरावा दलाई लामा थुबतेन ग्याछो - त्याला कौटुंबिक समाधानाचं श्रेय जातं. त्याच्या कारकीर्दीत त्यानं स्पष्टपणे आणि निश्चितपणे तिबटेला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा दिला. लोकांच्या भल्यासाठीही त्यानं बरीच काही कामं केली. आम्ही राहत होतो तो पूर्वेकडचा जिल्हा लौकिकदृष्ट्या चीनच्या राजवटीखाली होता; पण तेरावा दलाई लामा हा आध्यात्मिक असा नेता होता आणि तो तिथं वर्षभर राहिलाही होता, त्यामुळं लोक अगदी थेट त्याच्या प्रभावाखाली आले होते. त्यानं त्याच्या निवेदनात लोकांना उद्देशून म्हटलं होतं, "मी एकदा आध्यात्मिक आणि लौकिक व्यवस्थापनाची कर्तव्यं स्वीकारल्यानंतर माझ्याकडे फावला वेळ नव्हता, मौजमजेसाठी वेळ नव्हता. दिवसरात्र मला धर्म आणि राज्य यांच्या प्रश्नांचं काळजीपूर्वक चिंतन करावं लागे. दोन्ही शाखांची भरभराट व्हावी असं धोरण ठरवावं लागे. शेतकरीवर्गाचं सुख, भवितव्य ध्यानात घेऊन त्यांचं दु:ख कसं दूर होईल हा विचार तसंच दक्षता किंवा तत्परता, नि:पक्षपातीपणा आणि न्याय या तिन्हींची दारं कशी मोकळी राहतील याचं भान राखावं लागत असे."

त्याच्या भक्तीमुळं तिबेटच्या लोकांना शांतता आणि भरभराट यांच्या मोठ्या काळाचा आनंद घेता येऊ लागला. त्यानं स्वत:च म्हटलं होतं, " 'जल वृषभ' वर्षापासून

सध्याच्या 'जल कपि' वर्षापर्यंत तिबेटची ही भूमी समाधानी आणि समृद्धीची झालेली आहे. जणू काही तिचा पुनर्जन्मच झाला आहे. सारे लोक आरामात आहेत आणि आनंदात आहेत."

परंतु 'जल खग' वर्षामध्ये, म्हणजे 1933 साली, थुबतेन ग्याछो यांनी या जगाचा निरोप घेतला. तिबेटमध्ये ही बातमी पसरली आणि सारी जनता जणू पोरकी झाली. माझ्या वडिलांनी ही दु:खद बातमी आमच्या गावात दिली. ते कुमबुम इथल्या बाजारात गेले होते आणि तिथल्या मोठ्या मठात ही बातमी त्यांनी ऐकली. तेराव्या दलाई लामानं तिबेटच्या शांतीसाठी, समृद्धीसाठी इतकं काही केलं होतं, की लोकांनी उत्स्फूर्तपणे त्यांना मानाचा मुजरा देण्यासाठी तसंच आदर व्यक्त करण्यासाठी भव्य अशी सोनरी छत्री किंवा स्मृतिचिन्ह बांधायचं ठरवलं. जुन्या परंपरेप्रमाणं ही दिमाखदार स्मृती तिबेटच्या राजधानीत ल्हासामध्ये - पोताला राजवाड्यात उभारली गेली.

तेराव्या दलाई लामाच्या मृत्यूनंतर त्याच्या पुनरावताराचा शोध घेण्यास सुरुवात झाली. कारण प्रत्येक दलाई लामा हा मागच्या दलाई लामाचा अवतार असतो. ख्रिश्चन काळानुसार 1391 मध्ये जन्मलेला पहिला दलाई लामा हा 'चन-रे-सिग'चा म्हणजे करुणारूपी बुद्धाचा अवतार होता. त्यानं सारया जीवमात्रांचं संरक्षण करण्याची शपथ घेतलेली होती.

नवीन पुनरावतार घेतलेल्या मुलाचा शोध लागेपर्यंत, तसंच तो मुलगा समजंस वयाचा होईपर्यंत, देशाचा कारभार चालविण्यासाठी पहिल्यांदा राष्ट्रीय सभेला एका राजप्रतिनिधीची नेमणूक करावी लागली. नंतर परंपरागत चालीरितीप्रमाणं राज्यातील दैवज्ञ (देववाणी जाणणारी तज्ज्ञ माणसं) आणि विद्वान लामा यांच्याशी सल्लामसलत केली गेली. पुनरावतार म्हणून कोण आणि कुठे जन्माला आलं आहे याचा शोध घेण्याच्या मोहिमेची ही पहिली पायरी होती. ल्हासाच्या ईशान्येला ढगांचे चित्रविचित्र, कुतूहलकारक आकार पाहण्यात आले होते. दलाई लामाचा मृत्यू झाल्यानंतर नोर्बूलिङ्गा इथं त्याचा मृतदेह सिंहासनावर बसत्या अवस्थेत ठेवलेला होता. नोर्बूलिङ्गा ही त्याची उन्हाळ्यात राहण्याची जागा होती. मृतदेहाचा बसत्या स्थितीतला चेहरा दक्षिणेकडं होता; पण काही दिवसांनी त्याचा चेहरा पूर्वेकडं वळला आहे, असं दिसून आलं. या घटनेची सारयांना आठवण झाली. जिथं हा देह ठेवला होता तिथं मंदिराच्या ईशान्य बाजूस एक लाकडी खांब होता. त्याच्यावर अचानक चांदणीच्या आकाराची अळंबी दिसून आली. अशा सर्व घटना आणि इतरही काही पुराव्यांवरून, नवीन दलाई लामाचा कोणत्या दिशेला शोध घेतला जावा हे सूचित होऊ लागलं.

पुढे, 1935 मध्ये, तिबेटी 'काष्ठ वराह' वर्षात, ल्हासाच्या आग्नेय दिशेला 90 मैलांवर असलेल्या छो-खोरग्यल इथल्या 'ल्हामोइ ल्हछो' या पवित्र तळ्याकडे राजप्रतिनिधी गेला. या तळ्याच्या पाण्यात भविष्यसूचक दृष्टान्त दिसतात असा तिबेटमधल्या लोकांचा विश्वास आहे. अशा प्रकारची अनेक पवित्र तळी तिबेटमध्ये आहेत, पण ल्हामोइ ल्हछो हे त्या सर्वांच्यात जास्त प्रसिद्ध आहे. कधी कधी हे दृष्टान्त अक्षरांच्या रूपात दिसतात तर कधी ठिकाणं आणि भविष्यातील घटनांच्या चित्रांच्या रूपात दिसून येतात. अनेक दिवस प्रार्थना आणि ध्यान चिंतनात घालवल्यावर राजप्रतिनिधीला अ, क आणि म या तीन तिबेटी अक्षरांचा दृष्टान्त मिळाला. त्याच्यापाठोपाठ जेडसारख्या हिरव्यागार आणि सोनेरी छपरांच्या मठाचं तसंच निळ्या फरशा असलेल्या घराचं चित्र

त्याला दिसलं. या दृष्टान्ताचं, चित्राचं सविस्तर वर्णनही खाली लिहिलेलं होतं; आणि ते काळजीपूर्वक गुप्त ठेवण्यात आलं.

नंतरच्या वर्षी, श्रेष्ठ लामा आणि काही सन्मान्य लोक या सार्‍यांना, दृष्टान्ताचं रहस्य सांगून तिबेटच्या सर्व भागांमध्ये पाठवलं गेलं. राजप्रतिनिधीला पाण्यामध्ये जी जागा दिसली होती अशा जागेचा शोध घेण्याचं काम त्यांना होतं.

पूर्व दिशेनं गेलेली जाणकार माणसं हिवाळ्यात आमच्या दो-खमच्या भागात पोहोचली. कुमबुमच्या मठाची हिरवी आणि सोनेरी छपरं त्यांच्या दृष्टीस पडली. तगसेर खेड्यात निळ्या फरशा लावलेलं घरही त्यांनी निरखलं. या घरातल्या कुटुंबात किती मुलंबाळं आहेत याची गटप्रमुखानं चौकशी केली. तेव्हा त्यांना कळलं, की जवळ जवळ दोन वर्षांचा एक मुलगा या घरात आहे.

ही महत्त्वाची माहिती मिळाल्यानंतर त्या गटातले दोघेजण वेश बदलून घरात गेले. त्यांच्याबरोबर एक सेवक आणि दोन स्थानिक मठाधिकारी, त्यांचे मार्गदर्शक म्हणून गेले होते. मुख्य गटातल्या लोसङ् छेवङ् नावाच्या लहान मठाधिकार्‍यानं, तो स्वतः प्रमुख असल्याची बतावणी केली. तर सेरा मठाचे लामा क्युत्संग रिंपोचे यांनी अगदी हलक्या दर्जाचे कपडे घालून सेवकाची भूमिका वठवली. घराच्या दाराशीच या सार्‍या पाहुण्यांशी माझ्या आई-वडिलांची गाठ पडली. अर्थातच लोसङ्‌ला मुख्य समजून त्यांनी घरी बोलावलं. लामा आणि बाकीच्या इतरांची सेवकांच्या खोल्यांमध्ये व्यवस्था करण्यात आली.

घरातला लहानसा मुलगा तिथंच होता. ज्या क्षणी त्या मुलानं लामाला पाहिलं त्या क्षणी तो त्याच्याकडे गेला. त्याला लामाच्या मांडीवर बसायचं होतं. मेंढीच्या लोकरीचं अस्तर असलेला झगा घालून लामानं स्वतःला लपवलं होतं, पण त्याच्या गळ्यात तेराव्या दलाई लामाची जपमाळ घातलेली होती. त्या लहान मुलाला जपमाळेची ओळख पटते आहे असं दिसलं. तो ती जपमाळ मागू लागला. लामानं एका अटीवर जपमाळ द्यायचं कबूल केलं. 'तो कोण होता' हे त्या मुलानं सांगायचं होतं. मुलानं लगेच उत्तर दिलं, की 'तो सेरा-अगा आहे'. स्थानिक भाषेत या शब्दाचा अर्थ होतो 'सेराचा लामा'. लामानं त्याला 'मालका'चं नाव विचारलं आणि मुलानं लोसङ् हे नाव सांगितलं. त्या मुलाला अ ँमदो कासांग हे खर्‍या सेवकाचं नावसुद्धा ठाऊक होतं!

अगदी अख्खा दिवस, त्या मुलाला रात्री अंथरुणात झोपवायची वेळ येईपर्यंत लामानं कुतूहलानं, बारकाईनं त्याचं निरीक्षण केलं. रात्री सार्‍यांनी तिथंच मुक्काम केला. दुसर्‍या दिवशी सारेजण जायला निघाले तेव्हा तो मुलगा अंथरुणातून उठून आला आणि त्या गटाबरोबरच जायचा त्यानं हट्ट धरला.

मीच तो मुलगा होतो.

अजूनपर्यंत माझ्या आई-वडिलांना, त्यांनी ज्या प्रवाशाचं आगत-स्वागत केलं होतं त्यांच्या खर्‍या उद्देशाची कामना आली नव्हती; पण नंतर थोड्याच दिवसात शोधमोहिमेतील सर्वच ज्येष्ठ लामा आणि उच्च, सन्मान्य माणसं तगसेरमध्ये आमच्या घरी आली. हा सर्व नामांकित माणसांचा गट आलेला पाहताक्षणीच माझ्या आई-वडिलांना कळून चुकलं, की बहुधा मी म्हणजे एखादा पुनरावतार असावा. कारण पुनर्जन्म घेतलेले अनेक लामा तिबेटमध्ये आहेत आणि माझा भाऊ त्यांच्यापैकीच एक आहे, हे आधीच सिद्ध झालेलं होतं. कुमबुम येथील मठात नुकताच एका अवतारीत अशा लामाचा

मृत्यू झाला होता. त्यामुळं त्यांना असं वाटलं, की त्या लामाचा पुनरावतार कुठं आहे याचा शोध घेण्याचं काम हे पाहुणे करत आहेत; परंतु मी खुद्द दलाई लामाचाच पुनरावतार असू शकेन हा विचार मात्र त्यांच्या मनाला मुळी शिवलाच नव्हता.

पूर्वजन्मातील वस्तू आणि परिचित माणसं यांची ओळख, पुनरावतार म्हणून जन्म घेतलेल्या लहान मुलांना साधारणपणे असतेच. काही मुलं तर शिकवलं गेलं नसतानाही धर्मग्रंथांचं पठण करू शकतात. मी लामाला जे काही सांगितलं त्यावरून कदाचित, ज्या पुनरावताराचा तो शोध घेत होतो तो पूर्ण झाला आहे असं सूचित होत होतं. त्यामुळे आणखी काही परीक्षा घेण्यासाठी सारी मंडळी आली होती. त्यांनी त्यांच्याबरोबर दोन अगदी हुबेहूब दिसणाऱ्या काळ्या जपमाळा आणल्या होत्या. त्यातली एक जपमाळ तेराव्या दलाई लामाची होती. दोन्ही जपमाळा त्यांनी मला दिल्या. त्यातली जी तेराव्या दलाई लामाची जपमाळ होती तीच मी उचलली. ती मी माझ्या गळ्यात घातली, असं तिथं हजर असलेले लोक सांगतात. पिवळ्या जपमाळांच्या सहायानं अशीच चाचणी घेतली गेली. नंतर त्यांनी मला दोन पडघम दिले. एक पडघम अगदी लहानसा होता. पूर्वीचा दलाई लामा त्याच्या मदतनिसांना बोलावण्यासाठी त्याचा उपयोग करायचा. दुसरा पडघम मोठा, अलंकृत आणि सोनेरी पट्टे असलेला असा अगदी आकर्षक होता. मी त्यातल्या लहानशा पडघमची निवड केली आणि प्रार्थनेच्या वेळी वाजवतात अगदी त्याच पद्धतीनं वाजवायला सुरुवात केली. शेवटी चालताना आधाराला घ्यायच्या दोन काठ्या त्यांनी मला दिल्या. मी एका चुकीच्या आधारकाठीला स्पर्श केला, पण लगेच थांबलो आणि थोडावेळ काठीकडे पाहिलं. नंतर दलाई लामाची जी काठी होती तीच मी घेतली आणि हातात धरून ठेवली. नंतर जेव्हा त्यांनी 'मी का बरं अडखळलो असेन' याचा विचार केला तेव्हा, पहिली जी काठी मी निवडली होती ती एकदा दलाई लामानं वापरली होती. नंतर त्यानं ती एका लामाला दिली. या लामानं नंतर ती क्यूत्संग रिपोचे याला देऊन टाकली होती; ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली.

या बाकीच्या चाचण्यांमुळं पुनरावताराचा शोध लागला आहे याची त्यांना खात्री पटली. त्याचप्रमाणं राजप्रतिनिधीला तळ्याच्या पाण्यात ज्या तीन अक्षरांचा दृष्टान्त झाला होता, त्यावरूनही हा विश्वास दृढ झाला. अ हे अक्षर अम्दो या जिल्ह्याच्या नावाला सूचित करणारं आहे हे त्यांचं मत होतं. क हे अक्षर कुमबुमसाठी चाललं असतं. कारण आसपासच्या परिसरातला हा एक मोठा मठ होता आणि त्याचं चित्रही राजप्रतिनिधिला दृष्टान्त म्हणून दिसलं होतं. किंवा क आणि म ही दोन्ही अक्षरं खेड्याजवळ डोंगरावर असलेल्या कर्मा रोलपई दोर्जे याच्या मठाचा निर्देश करणारीही ठरू शकली असती.

त्यात लक्षात घेण्यासारखी आणखीही एक महत्त्वाची घटना होती. चीनहून परत येताना तेराव्या दलाई लामानं कर्मा रोलपई दोर्जे याच्या मठात वास्तव्य केलं होतं. मठाचा अवतारीत असा जो लामा होता, त्यानं त्याचं स्वागत केलं आणि खेड्यातल्या लोकांकडूनही त्यांना आदरपूर्वक मान मिळाला होता. या लोकांच्यात माझे वडीलही होते. तेव्हा त्यांचं वय नऊ वर्षांचं होतं. त्याच मठात दलाई लामाचा बुटांचा किंवा जच्छेनचा जोड राहिला आहे, याचंही साऱ्यांना स्मरण झालं.

ज्या घरात माझा जन्म झाला त्या घराकडं त्यांनी थोडावेळ निरखून पाहिलं होतं आणि 'ती फार सुंदर जागा आहे!' असे उद्गार काढले होते.

या सर्व घटनात्मक पुराव्यांमुळं शोधगटाची आता निश्चित खात्री पटली होती, की पुनरावताराचा शोध लागला आहे. त्यांनी तार करून ल्हासाला सर्व बारकाव्यांनिशी माहिती कळवली. ल्हासापासून भारतापर्यंत तारयंत्रणेसाठी एकच वाहिनी होती. त्यामुळे सायनिंगहून सांकेतिक भाषेत चीन व भारताच्या द्वारे हा निरोप पाठवावा लागला. त्याच मार्गानं आदेश आला, की मला एकदा पवित्र शहरात आणलं जावं.

अर्थात, आम्ही तिबेटमध्ये ज्या ईशान्येकडच्या भागात राहत होतो, तो त्या वेळी चिन्यांच्या ताब्यात होता. त्यामुळं तिथल्या मुख्य चिनी अधिकाऱ्याशी बोलणं करावं लागलं. शोधमोहिमेतल्या सदस्यांनी त्याला सांगितलं, की 'ते नवीन दलाई लामाचा शोध घ्यायला आले आहेत. त्यासाठी संभाव्य उमेदवारांना ल्हासाला नेण्यासाठी त्याच्या मदतीची गरज आहे', त्या अधिकाऱ्यानं काही अडचणी आणू नयेत म्हणून 'शोध पूर्ण झाला आहे, मोहिम फत्ते झाली आहे', असं काहीच त्याला सांगितलं नाही. खरोखरीच तसं झालं. त्यानं काही उत्तरच दिलं नाही. साधारणपणे कुठल्या कुठल्या मुलांची निवड केली आहे हे त्याला सांगितल्यावर त्यानं दोन वेळा साऱ्या मुलांना बोलावलं. तो स्वत: जरी मुसलमान होता तरी त्यानं स्वत: एक चाचणी घ्यायचं ठरवलं. ही चाचणी अगदी साधी होती. त्यानं आम्हा सगळ्यांसमोर गोळ्यांचं खोकं ठेवलं. काही मुलांना एखादी गोळी घ्यायचीसुद्धा भीती वाटली. तर काही मुलं एवढी हावरट होती, की त्यांनी चांगल्या मुठभर गोळ्या उचलल्या पण मी मात्र एक गोळी उचलली आणि ती शहाण्यासारखी खाल्ली, असं मला नंतर सांगितलं गेलं ही चाचणी आणि काही प्रश्न विचारल्यावर त्याचं समाधान झालं आणि त्याला अंदाज आला, की मीच बहुधा निवडला जाऊ शकतो. कारण त्यानं इतर मुलांना त्यांच्या त्यांच्या घरी पाठवून दिलं. त्यांच्या पालकांना भेट म्हणून कापड दिलं; पण माझ्या पालकांना मात्र त्यानं आदेश दिला, की मला कुमबुमच्या मठात घेऊन जावं आणि तिथं माझ्या भावाच्या ताब्यात मला द्यावं. माझा भाऊ आधीच तिथं भिक्षू-विद्यार्थी म्हणून होताच.

मला जाऊ देण्याआधी म्हणे त्या अधिकाऱ्यानं तिबेटी सरकारच्या प्रतिनिधींकडे एक लक्ष चिनी डॉलर खंडणी म्हणून मागितले. ही रक्कम फारच मोठी होती आणि तसंही त्याला ती मागण्याचा अधिकार नव्हता. त्याला ते पैसे मोजलेही गेले; पण त्यानं परत तीन लक्षची आणखी मागणी केली. सरकारी प्रतिनिधींनी त्याला सांगितलं, की मी खरोखर पुनरावतार आहे किंवा नाही हे फारच अनिश्चित आहे. कारण तिबेटच्या इतर भागातूनही अन्य उमेदवार होते. माझी दलाई लामा म्हणून निवड निश्चितपणे होणार आहे हे कळलं तर तो त्याची खंडणी आणखी चढवून मागेल, दिरंगाई करेल, अशी त्यांना काळजी वाटू लागली. तिबेटवर अधिकार प्रस्थापित करण्यासाठी चिनी सरकार ही संधी वापरेल, हा धोकाही त्यांना वाटू लागला होता.

ल्हासापर्यंत या अडचणींची माहिती पोहोचणं गरजेचं होतं. चीनमार्गे तारा पाठवून त्यांची चर्चा करणंही वेडेपणाचं होतं. म्हणून राजधानीमध्ये हाती निरोप पाठवावे लागले. उत्तर मिळायला कित्येक महिने लागले. शोधमोहिमेला सुरुवात केल्यापासून चिनी अधिकाऱ्याशी वाटाघाटींचा शेवट होईपर्यंत जवळजवळ दोन वर्षं उलटली.

या सर्व काळात, एकूणच साऱ्या घडामोडींबाबत काटेकोरपणे मौन पाळण्यात आलं. त्याला दोन कारणं होती. एक म्हणजे, चिनी अधिकारी काय करेल याची भीती आणि दुसरं म्हणजे, तिबेटच्या राष्ट्रीय सभेपुढं अधिकृत स्वीकृतीसाठी हा शोध सादर केला गेलेला

नव्हता. शोधमोहिमेच्या सदस्यांची त्यांच्या निवडीबद्दल जी निःसंशय खात्री होती, ते त्यांचं मत अगदी माझ्या आई-वडिलांनाही सांगण्यात आलं नव्हतं. मधला जो एवढा मोठा प्रतीक्षेचा काळ गेला तेव्हासुद्धा त्यांना चुकूनही संशय आला नाही किंवा विचार शिवला नाही, की सर्वश्रेष्ठ लामाचाच मी पुनरावतार असेन! असं होतं तरी मी मोठा झाल्यावर माझ्या आईनं सांगितलं, की माझं विलक्षण प्रारब्ध सूचित करणाऱ्या अशा काही सूचक घटना घडलेल्या होत्या. जिथं एखादा श्रेष्ठ लामा पुनर्जन्म घेणार असतो त्या भागाला, जिल्ह्याला आधी एखाद्या आपत्तीला तोंड द्यावं लागतं अशी एक अंधश्रद्धा तिबेटमध्ये प्रचलित आहे.

मी जन्म घेण्याच्या चार वर्ष आधीची गोष्ट. तगसेरमधली उभी पिकं एकदा गारांच्या वर्षावानं झोडपली गेली, तर दुसऱ्या वेळी अगदी कोवळी असताना अवर्षणानं कोळपली. त्यामुळं गावकरी म्हणतच होते, की बहुतेक आपल्यापैकीच एखाद्या ठिकाणी अवताराचा जन्म होणार आहे. खुद्द माझ्या कुटुंबावरसुद्धा हालअपेष्टा काढण्याची वेळ आली होती. आमची जी मौल्यवान संपत्ती होती ती म्हणजे आमची गुरं आणि घोडे मरून गेले; आणि माझ्या वडिलांना त्याच्या कारणाचा अजिबात उलगडा झाला नाही. माझा जन्म होण्याआधी, काही महिने आधी, माझे वडील अतिशय आजारी पडले होते. अंथरुणातून उठणंही त्यांना कठीण झालं होतं, पण तरीही माझ्या जन्माच्या दिवशी सकाळी ते उठले. त्या दिवशी त्यांना खूपच हुशारी वाटत होती. त्यांनी प्रार्थना केली. आमच्या देवघरातील वेदीवर तुपाची निरांजनं लावली. हे सारं पाहून माझी आई वैतागली. तिचं मत झालं, की एवढं बरं वाटत असताना ते आळशीपणामुळं अंथरुणात पडून राहिले होते! पण माझ्या वडिलांनी ठामपणे सांगितलं, की आजारातून ते आता बरे झाले आहेत. माझा जन्म झाला. आईनं त्यांना सांगितलं, "मुलगा आहे." त्यावर ते फक्त म्हणाले, "छान! मला त्याला भिक्षू करायला आवडेल."

अधिकाऱ्याशी बोलणं-चालणं, चर्चा चालू होत्या, तेव्हा मी मठात होतो. त्यावेळी मी जवळपास तीन वर्षांचा असेन. आणि अर्थातच माझ्या आई-वडिलांपासून दूर ठेवण्यात आल्यानं मी नाराज होतो. थुबतेन जिग्मेद् नोर्बू या माझ्या मोठ्या भावाशिवाय, माझा पाच वर्षांचा तिसरा भाऊ लोसङ् समतेन देखील तिथंच होता, पण त्याच्या अभ्यासास सुरुवात झाली होती. त्यामुळे तो जेव्हा त्याच्या शिक्षकाबरोबर असे तेव्हा माझ्याबरोबर खेळायला कुणीच नसे. मला अजूनही आठवतं, मी किती अधीरपणे त्याच्या वर्गाबाहेर वाट पाहत थांबायचो; आणि कधी कधी त्याच्या शिक्षकांच्या दृष्टीस न पडू देता, त्याचं लक्ष वेधून घ्यायला मी दारातल्या पडद्यामागून उत्सुकतेनं डोकावायचो. पण शिक्षक मात्र एकदम कडक होते आणि त्यामुळं समतेन अगदी असहाय होता.

आमचे काकाही तिथंच होते. पोरकटपणाच म्हणायला हवा की, मला आणि समतेनला ते अजिबात आवडायचे नाहीत मला हे सांगायला, अगदी खेद होतो. मला वाटतं, त्याचं कारण त्यांच्या चेहऱ्यावर गडद ठिपके होते आणि काटेरी असावी अशी काळी दाढी (अशी दाढी तिबेटी लोकांमध्ये क्वचितच आढळते) आणि वारंवार चरबी लावून काळजीपूर्वक राखलेली त्यांची मिशी! शिवाय ते बरेचदा आमच्यावर खार खाऊन असायचे. निष्कारण नव्हे बरं! त्यांची विशेष मोठ्या आकाराची आणि डौलदार अशी जपमाळ मला आठवते. सततच्या वापरामुळं तिचे मणी काळपट पडले होते. त्यांचा पोथीसारखा सुट्या पानांचा धर्मग्रंथ तर मला अगदी आवर्जून आठवतोच आठवतो.

कारण मी एकदा तो ग्रंथ पाहायचा प्रयत्न केला आणि सगळी सुटी पानं वेडीवाकडी मिसळून ठेवली. या कामाबद्दल अर्थातच मला चिडलेल्या काकांकडून थोड्याशा चापट्यांची कमाई झाली. अशी घटना घडल्यामुळं मी आणि समतेन पळून जाऊन लपून बसायचो. मग आमचे काका तासन्तास आम्हाला धुंडाळत राहायचे. अधिकाऱ्यानं जी मोठी जबाबदारी माझ्यावर टाकली होती, तिचं महत्त्व लक्षात घेता, काकांच्या मनाला आम्ही किती काळजीचा घोर लावत असू हे तेव्हा आम्हांला कळलं नाही; परंतु ही अशी पलायनं प्रभावी ठरत. कारण आम्ही त्यांना सापडलो, की भविष्यात चांगले नातेसंबंध राहावेत म्हणून आमच्यात चर्चा, तहाची बोलणी होत. नशिबानं ते आम्हाला खाऊ, गोळ्या देऊन समजावणी करत; आम्ही अगदी शहाण्यासारखं वागायचो तेव्हा मात्र त्यांनी कधीही आम्हाला हा खाऊ दिला नाही.

दलाई लामा वय वर्षे 4

एकंदरीत पाहता माझ्या बालपणीचा हा टप्पा तसा एकाकी आणि जरा दु:खाचाच होता. कधीकधी समतेनचे शिक्षक मला त्यांच्या मांडीवर बसवायचे. त्यांच्या घोळदार झग्यात मला गुंडाळून सुकामेवा द्यायचे. माझ्या आठवणीप्रमाणं तो एकमेव असा विसाव्याचा क्षण असायचा. माझी बहीण मला आठवण सांगते, की मी एकटा असा जे काही खेळ खेळायचो, त्यांच्यापैकी एक असायचा 'प्रवासाला निघण्याचा' : सामानाची बांधाबांध करून, सामान घेऊन मी माझ्या खेळातल्या घोड्यावरून कुठेतरी जायला निघायचो.

अखेरीस 'पृथ्वी-शश' वर्षाच्या सहाव्या महिन्याच्या सुरुवातीला, म्हणजे 1939 च्या सुमारास, माझा खरा प्रवास सुरू व्हायची वेळ आली. सरकारच्या प्रतिनिधींना तीन लाख डॉलर सारेच्या सारे काही रोख देता आले नव्हते; पण सुदैवानं काही चिनी मुसलमान व्यापारी मक्केच्या यात्रेला निघाले होते. ल्हासाला जाणं हा त्यांच्या प्रवासातला पहिला टप्पा होता. उरलेली रक्कम त्यांनी उधार म्हणून द्यायचं कबूल केलं.

या रकमेची ल्हासामध्ये त्यांना परतफेड केली जाणार होती. चिनी अधिकाऱ्यानं मला जाऊ द्यायचं ठरवलं; पण सोनेरी अक्षरात लिहिलेल्या धर्मग्रंथांचा संच आणि तेराव्या दलाई लामाच्या कपड्यांचा संच यासाठी एक वरिष्ठ अधिकारी ओलीस म्हणून ठेवला जावा, या एका अटीवर. मी ल्हासामध्ये सुरक्षितपणे पोहोचलो की हे संच कुमबुमला पाठवले जातील, असं त्यांचं म्हणणं होतं. हे सारं मान्य करण्यात आलं. पण मला सांगायला आनंद वाटतो, की मी ल्हासाला पोहोचल्यानंतर दो-खममध्ये काही राजकीय कटकटी सुरू झाल्या आणि ती अस्थिरता असताना, ओलीस म्हणून ठेवलेला अधिकारी सटकला आणि तोही सुरक्षितपणे ल्हासाला येऊन पोहोचला.

माझ्या चौथ्या वाढदिवसानंतर, आठवड्याभरात आम्ही एका प्रवासास निघालो. हा प्रवास तीन महिने अन् तेरा दिवस चालला. तगसेर, स्वत:चं घर, शेत, मित्रमंडळी हे सारं सोडून येणं माझ्या आई-वडिलांना फार जड गेलं. कारण भविष्यात काय वाढून ठेवलंय याची अजूनही त्यांना कुणकुण नव्हती. प्रवासाला निघालेल्या काफिल्यात साधारणपणे पन्नास लोक तसंच तीनशे पन्नास घोडे आणि खेचरं होती. यात शोधमोहिमेतील सदस्य, माझं स्वत:चं कुटुंब आणि मोठ्या यात्रेला निघालेल्या मुसलमान लोकांचा गट, एवढे होते. माझ्या आई-वडिलांनी माझ्या दोन मोठ्या भावांना बरोबर घेतलं होतं. ग्यलो दोन्डुब हा होता नऊ वर्षांचा आणि लोसङ् समतेन तेव्हा होता सहा वर्षांचा. त्याकाळी तिबेटमध्ये चाकांच्या गाड्या किंवा वाहनं नव्हती आणि त्यांच्यासाठी रस्तेही नव्हते. समतेन आणि मी ट्रेल-जम नावाच्या वाहनावर बसलो. हे वाहन दोन खांबांना जोडलेलं होतं आणि दोन खेचरांच्या पाठीवरून हे वाहिलं जायचं. खडबडीत आणि धोकादायक रस्ता असेल तर शोधमोहिमेतलं कुणी ना कुणी आळीपाळीनं मला उचलून घ्यायचं. दररोज आम्ही पहाटेपासून दुपारपर्यंत प्रवास करायचो. तिबेटमध्ये साधारणपणे याच पद्धतीनं प्रवास केला जातो. रोज रात्री आम्ही तंबू ठोकून मुक्काम करायचो. कारण त्या रस्त्यावर अगदी तुरळक वस्ती होती. खरंच, प्रवासाच्या पहिल्या काही दिवसांमध्ये आठवडेच्या आठवडे गेले तरी आम्ही कुणाला पाहिलं नाही. अगदी नाही म्हणायला क्वचित काही भटके लोक माझा आशीर्वाद घ्यायला आले तेवढेच.

चिनी राजवटीतून मी सुरक्षितपणे बाहेर पडल्या पडल्या ल्हासातील राष्ट्रीय सभेशी जाहीरनाम्याच्या मान्यतेसाठी संपर्क साधला गेला. राजप्रतिनिधीनं अनुभवलेले दृष्टान्त, मी कोणकोणत्या चाचण्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत आणि तेराव्या दलाई लामानं स्वत:च त्याला कुठं पुनर्जन्म घ्यायला आवडेल त्याबद्दल दिलेले पूर्वसंकेत - अशा सर्व बाबींबद्दल सविस्तर वृत्त सभेला सादर करण्यात आलं. सर्व शोध आणि तपासण्या हा मार्गदर्शक दैवज्ञ आणि लामा यांच्या सल्ल्यानुसारच केला गेला आहे हे देखील आवर्जून सांगण्यात आलं. सभेत, मीच दलाई लामाचा पुनरावतार आहे, हे अखेर निश्चित करण्यात आलं. त्यामुळं वाटेत मला भेटण्यासाठी वरिष्ठ अधिकारी रवाना झाले.

प्रवासाला निघाल्यापासून जवळजवळ तीन महिने झाल्यानंतर त्यांपैकी पहिला अधिकारी आम्हाला थुतोब - छु नावाच्या नदीजवळ भेटला. त्याच्याबरोबर दहाजण होते. आम्हाला आणि आमचं सामान-सुमान नदीपलीकडे नेता यावं म्हणून त्याच्याबरोबर साहित्यसामग्रीची शेकडो ओझी आणि कातडं वापरलेली चार होडकी होती. अशा रीतिनं काफिला मोठा होऊ लागला.

काही दिवसांनी आम्ही ट-छङ् ला नावाची खिंड ओलांडली आणि बुमछेन या शहराला पोहोचलो. इथपासून ल्हासा पंधरा दिवस चालीच्या अंतरावर राहिले. तिथं सरकारच्या आणखी एका दूताकडून आमचं स्वागत झालं. त्यानं मला तिबेटी पद्धतीनं स्कार्फ (उत्तरीय) हे प्रतीक देऊन अभिवादन केलं. एवढंच नव्हे, तर 'मण्डल तेनसुम' हा तिहेरी उपहारही दिला. सद्भावना आणि निरतिशय आदराचं हे प्रतीक आहे. त्या क्षणी मात्र माझ्या आई-वडिलांना, त्यांचं शेंडेफळ म्हणजे दलाई लामाचा पुनरावतार आहे हे निश्चितपणे कळलं. त्यांचं मन मोठ्या आनंदानं, आदरमिश्रित धाकाच्या भावनेनं आणि कृतज्ञतेनं भरून गेलं. अपार मोठी आणि आनंदाची बातमी मिळाल्यावर जसा क्षणक्षर अविश्वास वाटतो, तसंच त्यांना झालं.

थोडंसं पुढे, ल्हासापासून दहाव्या टप्प्यावर आम्हांला शंभर जणांचा गट भेटला. त्यांच्याबरोबर अनेक घोडे आणि खेचरं होती. तिबेटी मंत्रिमंडळातला एक मंत्री या गटाचा मुख्य होता. गटात अनेक अधिकारी आणि ल्हासाच्या तीन प्रथितयश मठांचे प्रतिनिधी होते. या सर्वांनी मला परंपरागत असा स्कार्फ आणि मण्डल तेनसुम अर्पण करून अभिवादन केलं. राजप्रतिनिधी, मंत्रिमंडळ आणि तिबेटची राष्ट्रीय सभा यांनी अधिकृतपणे तयार केलेला जाहीरनामा घेऊन ते आले होते. 'मी चौदावा दलाई लामा' आहे यावर शिक्कामोर्तब करण्यात आलेलं होतं. नंतर मी माझे गावातल्या शेतकऱ्यासारखे असलेले कपडे बदलले आणि मला भिक्षूचे कपडे घालण्यात आले. संस्कारपूर्वक इतमामानं माझ्या मदतीसाठी सहायक नेमले गेले आणि त्यानंतर मला सोनेरी पालखीतून नेण्यात आलं. या पालखीला आम्ही तिबेटी लोक 'फेब-जम' म्हणतो.

इथपासून मात्र ही मिरवणूक आणखी आणखी मोठ्या प्रमाणावर पुढं जावू लागली. ज्या ज्या प्रत्येक खेड्यातून आणि शहरातून आम्ही पुढे जात होतो, तिथं प्रतीकचिन्ह, ध्वज, सुशोभित पताका घेतलेल्या लामांच्या आणि भिक्षूंच्या मिरवणुका आम्हाला सामोऱ्या आल्या. त्या त्या भागातले इतर लोकही मिरवणुकीत सामील झाले होते. शिंगं, तुताऱ्या आणि पडघम तसंच झांजा दुमदुमत होत्या; धूपदाण्यांमधून धुराचे ढग लोटले जात होते. प्रत्येकजण, मग तो साधा माणूस असो वा भिक्षू असो, अगदी सुंदर कपडे घालून आलेला होता. मी गर्दीतून पुढं जात होतो तसतसं प्रत्येकजण हात जोडून माझं स्वागत करत होता. साऱ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडत होता. मी पालखीतून डोकावत होतो, तेव्हा मला आठवतं, लोकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळत होते. प्रत्येक ठिकाणी नृत्य-गायनानं माझी साथ केली गेली होती.

आमच्या प्रवासातली दुम-उमा-थाङ् ही पुढची महत्त्वाची जागा होती. तिथं राजप्रतिनिधी आणि तिबेटच्या अधिकृत मठाधिपतीनं माझं स्वागत केलं. तिथं आम्ही आमचा प्रवास खंडित केला; आणि राठरेङ्च्या मठात तीन दिवस मुक्काम ठोकला.

पण दोगु-थङ् इथं पोहोचेपर्यंत मात्र अधिकृत स्वागताचा परमोत्कर्ष गाठला गेला नव्हता. इथं उरलेले सर्वच्या सर्व वरिष्ठ अधिकारी माझ्या स्वागतासाठी जातीनं उपस्थित होते. त्यात पंतप्रधान, मंत्रिमंडळाचे सदस्य आणि डेपुङ् सेरा आणि गादन या मठाचे प्रतिष्ठित महंत हे सारे होते. या तीन जागा म्हणजे तिबेटमधल्या बौद्ध धर्माचे तीन आधारस्तंभ होते. ल्हासामधल्या ब्रिटिश मिशनचा मुख्य श्री.ह्यूज रिचर्डसन यानंदेखील माझं स्वागत केलं. आम्ही आता ल्हासाच्या अगदी जवळ येऊन ठेपलो होतो. किंचित पुढं गेल्यावर भूतान, नेपाळ आणि चीनचे प्रतिनिधी आम्हाला भेटले. आता

आमचा काफिला प्रचंड झाला होता. मोठ्या मिरवणुकीनं आम्ही पवित्र शहराकडं जाऊ लागलो. आमच्या रस्त्याच्या दुतर्फा हजारो भिक्षू रंगीत झेंडे, पताका घेऊन ओळीनं उभे होते. लोकांचे अनेक गट स्वागतपर गीत गात होते आणि वाद्यं वाजवत होते. तिबेटी लष्कराच्या सर्व पलटणींमधील सैनिक मला खडी सलामी देण्यासाठी थांबले होते. ल्हासामधील यच्चयावत सारी जनता, स्त्री-पुरुष, तरुण किंवा वृद्ध - सारेजण मला घ्यायला आणि स्वागत करायला, सजूनधजून दाटीवाटीनं जमले होते. मला जाताना पाहून 'आज आमच्या आनंदाचा दिवस उगवला आहे' किंवा 'सण सुरू झाला आहे' अशा त्यांच्या घोषणा मला ऐकू येत होत्या. मी स्वप्नातच आहे की काय असं मला तेव्हा वाटलं. मी एका विस्तीर्ण बागेत आहे, आसमंत देखण्या फुलांनी व्यापून गेला आहे, बागेत मंद, मृदू अशा वाऱ्याच्या झुळका वाहत आहेत आणि अतिशय डौलदारपणे मोर माझ्यापुढे नाचत आहेत, असंही त्यावेळी वाटू लागलं होतं. त्यावेळी अविस्मरणीय असा रानफुलांचा गंध होता आणि हवेमध्ये मुक्ततेचं आणि स्वातंत्र्याचं गीत मिसळलेलं होतं. शहरात पोहोचेपर्यंत जणू मी या स्वप्नातून बाहेर पडूच शकलो नाही. मला मंदिरात नेण्यात आलं. तिथल्या पवित्र मूर्तींना मी नम्रपणे नमस्कार केला. नंतर सारी मिरवणूक नोर्बूलिङ्गाकडे गेली. ही जागा म्हणजे दलाई लामाचं उन्हाळ्यातलं घर होतं. मी अजूनही स्वप्नात रेंगाळत होतो; तेव्हाच माझ्या पूर्वाधिकाऱ्याच्या भव्य अशा दालनांची मला ओळख करून दिली गेली.



ल्हासा येथील पोताला पॅलेस

माझ्या आगमनानंतर लवकरच सेर-ठिर-ङ्सोलचा कार्यक्रम करायचा असं ठरवलं गेलं होतं. मला सिंहासनावर बसवून सर्वोच्च अधिकार द्यायचा हा समारंभ होता. 1940 मधला म्हणजे 'लोह ड्रॅगन' वर्षाच्या पहिल्या महिन्याचा चौदावा दिवस ठरवला गेला. राजज्योतिषांच्या सल्ल्यानुसार, राष्ट्रीय सभेशी चर्चा करून राजप्रतिनिधीनं ही तारीख ठरवली होती. या अधिकारप्रदानाची तारीख तार करून चीन सरकार, भारतातील ब्रिटिश सरकार, नेपाळ नरेश त्याचप्रमाणं भूतान आणि सिक्कीमच्या महाराजांना

कळवण्यात आली.

पोताला राजवाड्याच्या पूर्वेकडील भागात असलेल्या सि-शि-फुन्छोग इथं समारंभ आयोजित केला गेला. (ही जागा म्हणजे आध्यात्मिक आणि लौकिक जगांमधल्या सर्व चांगल्या, श्रेयस्कर गोष्टींचं दालन होतं.) शेजारी देशांचे राजप्रतिनिधी, तिबेटी सरकारचे अधिकारी (यात प्रशासकीय आणि धार्मिक अधिकारी) पुनरावतारी असलेले लामा, डेपुङ, सेरा आणि गादन या तीनही मठांचे महंत आणि त्यांचे सहायक महंत आणि माझ्या कुटुंबाचे सदस्य इथं जमले होते. मी दालनात प्रवेश केला तेव्हा माझे राजनियुक्त पालक आणि माझे कनिष्ठ शिक्षक, मंत्रिमंडळाचे सदस्य, प्रमुख अधिकृत महंत आणि वरिष्ठ असे खासगी कारभारी यांनी मला सहाय्य केलं. तिथं मास्टर ऑफ रोबज् म्हणजे गृहशिष्टाचार प्रमुख, धार्मिक कार्यक्रमांचे प्रमुख म्हणजे राजशिष्टाचार प्रमुख आणि तिबेटच्या प्राचीन भागांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. मी प्रवेश केल्याबरोबर सारेजण उठून उभे राहिले. प्रमुख महंत आणि मंत्रिमंडळाचा वरिष्ठ सदस्य असे दोघं मला सोबत करीत सिंहासनाकडे घेऊन गेले. तोवर ज्येष्ठ कारभाऱ्यांनी मिरवणुकीचं नेतृत्व केलं.

तिबेटी धर्मग्रंथांमधील सूचनांना अनुसरून सेङ-ठ्रि (सिंहासन) बांधलं गेलं होतं. ते चौकोनी आकाराचं होतं. सोन्याचा मुलामा दिलेलं लाकूड वापरून बांधलेलं होतं. लाकडातच कोरलेल्या आणि प्रत्येक कोपऱ्यात दोन अशा एकूण आठ सिंहांनी त्याला आधार दिलेला होता. त्यावर पाच चौकोनी गाद्या होत्या. वेगवेगळ्या रंगाच्या जरीची, किनखाबाची प्रत्येक गादीला खोळ होती. त्यामुळे त्यांची उंचीच मुळी सहा ते सात फूट होती. त्याच्यासमोर असलेल्या मेजावर दलाई लामाच्या कार्यालयाचे सर्व शिक्के ठेवलेले होते.

पोतालामध्येच राहणाऱ्या भिक्षू लोकांच्या गटानं केलेल्या खास प्रार्थना-पठणानं समारंभाला सुरुवात झाली. सर्व धार्मिक समारंभामध्ये त्यांनी दलाई लामाच्या सेवकांची भूमिका बजावणं ही विशेष जबाबदारी त्यांच्याकडे सोपवलेली होती. त्यांनी मंगलसूचक अशी काही प्रतीकं अर्पण केली आणि हे करताना त्यांचं महत्त्व सांगणाऱ्या प्रार्थनांचं पठणही केलं.

नंतर राजप्रतिनिधी समोर आला आणि त्यानं मला मण्डल तेन सुमची भेट सादर केली. तीन प्रतीकात्मक भेटवस्तू दिल्या - चिरंजीवी अशा बुद्धाची सोनेरी प्रतिमा, या बुद्धाबद्दलचा धर्मग्रंथ आणि एक लहानसं छोतेन - तिबेटमधल्या प्रवाशांना ठाऊक असलेल्या परंपरागत अशा स्मृतिचिन्हाची छोटीशी प्रतिकृती. या प्रतिकांमधून पुढील गोष्टी सूचित होत होत्या - 'मला दीर्घायुष्य मिळू देत, आमच्या धर्माचं विवरण मला करू देत आणि बुद्धांसारखे माझे विचार असू देत.'

त्यानंतर राजप्रतिनिधी, माझे कनिष्ठ शिक्षक आणि पंतप्रधान यांनी मला उत्तरीय (स्कार्फ) भेट म्हणून दिले. राजप्रतिनिधी आणि माझे शिक्षक यांच्या कपाळाला माझ्या कपाळाचा स्पर्श करून मी आशीर्वाद दिला; पंतप्रधान हा संसारी सामान्य व्यक्ती असल्यानं मी त्याच्या डोक्याला दोन्ही हातांनी स्पर्श करून आशीर्वाद दिला.

मग खाजगी कारभाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तिथं पदरी असलेल्या लोकांची मिरवणूक आली. त्यांनी माझ्यासाठी लहानशा, सोन्याच्या कप-बशीतून ड्रोमा ही गोडसर चवीची वनस्पती आणली होती. नंतर दालनात असलेल्या प्रत्येकाला या मिरवणुकीतल्या इतरांनी ड्रोमा दिली. तिबेटमधल्या प्रत्येक समारंभात 'ड्रोमा देणं' हा अविभाज्य

घटक असतो; कारण ते सुदैवाचं चिन्ह मानलं जातं. हे झाल्यावर चहा देण्याचा कार्यक्रम झाला (अर्थात आधी मला, मग इतर सर्व लोकांना) आणि त्यानंतर गोड भात आणला गेला. अर्पण करायचे हे सर्व सोहळे चालू असताना मठातील दोन पंडित, धर्मातील मूलभूत प्रश्नांबद्दल वाद-चर्चा करत होते. हे संपल्यावर मुलांच्या एका गटानं संगीताची जोड असलेलं मूकनाट्य सादर केलं. मग पुन्हा धर्म-प्रश्नांबद्दलची वाद-चर्चा झाली. हा वाद चालू असताना दालनामध्ये ताजी आणि सुकी फळं, खब्से नावाचा तिबेटी केक या अर्पणवस्तूंची मांडामांड करण्यात आली.

यानंतर राजप्रतिनिधीनं तिबेटी सरकारच्या वतीनं 'मण्डल तेनसुम' अर्पण केलं. ते म्हणजे विश्वाचं मोठं प्रतीक चिन्ह होतं. एका बाजूनं मंत्रिमंडळाच्या एका सदस्यानं आणि दुसऱ्या बाजूनं अधिकृत मठाधिपती किंवा महंतानं ते धरलं होतं. या भेटवस्तूचा अर्थ, महत्त्व राजप्रतिनिधीनं स्पष्ट करून सांगितलं आणि जाहीर केलं, की बऱ्याच काळाच्या शोधानंतर दैवज्ञ आणि श्रेष्ठ लामा यांच्याशी सल्लामसलत होऊन तिबेटी सरकार आणि जनतेने राज्याचा आध्यात्मिक आणि लौकिक राज्यकर्ता-स्वामी म्हणून संस्कारपूर्वक निवड करून माझी स्थापना करण्यात आली आहे. शेवटी, तिबेटी लोकांच्या उत्कर्षासाठी आणि धर्मप्रसारासाठी मी दीर्घकाल जगावं यासाठी त्यानं मला प्रार्थना केली. नंतर तिबेटी सरकारच्या वतीनं माझ्यासाठी भेटवस्तू घेऊन संसारी जनांची तसंच अधिकारी भिक्षूंची एक मोठी मिरवणूक आली. पहिल्यांदा एक सोन्याचं चक्र आणि पांढरा शंख यांची भेट देण्यात आली. ह्या दोन्ही वस्तू आध्यात्मिक आणि ऐहिक शक्तीची प्रतीकं होती. त्यानंतर समृद्धी आणि आनंदसूचक अशी आठ प्रतीकं त्याचप्रमाणं राजपदाची सात चिन्हं दिली गेली. इतर अनेक भेटवस्तू अर्पण करून ही मिरवणूक संपली.

आता सभेला आशीर्वाद देण्याची माझी पाळी आली. पहिल्यांदा शुद्ध आध्यात्मिक पद्धतीनं मी तिबेटी सरकारच्या अधिकाऱ्यांना आशीर्वाद दिले. परदेशी प्रतिनिधींनी येऊन मला उत्तरीयं अर्पण केली. वरिष्ठ दर्जाच्या प्रतिनिधींना मी ती व्यक्तिशः पुन्हा देऊ केली आणि खाजगी कारभाऱ्यांनी इतरांना दिली. दालनात माझ्यासमोर जी फळं ठेवली गेली होती ती आता मला अर्पण करण्यात आली. मग दालनातील इतरांना ती फळं वाटली गेली. नंतर आणखी एका नाटकाचा प्रयोग झाला. तो झाल्यावर, समुद्र आणि स्वर्गातील देवदेवता सूचित करणारे कपडे आणि मुखवटे घातलेल्या माणसांची मिरवणूक आली. हे सर्वजण आमच्या देशाची स्तुती करणारी गाणी गात होते. यांच्यामागून भारतीय आचार्यांची आठवण करून देणारे मुखवटे घातलेले चार नर्तक आले आणि तिबेटच्या इतिहासाची आणि धर्माची गौरवगीतं म्हणत दोन भिक्षू अधिकारी आले. मग पुन्हा एका नाटकाचा प्रयोग झाला. दोन भिक्षूंनी रचलेल्या श्लोकांच्या पठणानं समारंभ संपला. दलाई लामाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करणारे, जगभरात धर्माचा विजय व्हावा म्हणून आणि दलाई लामाच्या सरकारच्या अधिपत्याखाली सर्व प्राणिमात्रांचा उत्कर्ष व्हावा म्हणून हे श्लोक म्हटले गेले. त्या दोन विद्वान भिक्षूंचा मी विशेष आशीर्वाद देऊन सत्कार केला आणि त्यांनी रचलेल्या श्लोकांचं गुणग्रहण, कौतुक म्हणून त्यांना उत्तरीय दिले.

यानंतर समारंभ संपला. एकूणच कार्यक्रम बराच वेळ चालणारा होता. त्यावेळी जरी मी लहान होतो तरी माझी भूमिका मी किती योग्य अशा परिपक्वतेनं आणि शांत चित्तानं

केली, हे पाहून तिथं उपस्थित प्रत्येकजण अतिशय संतुष्ट झाला होता, हे मला पुढे सांगण्यात आलं. हे झाल्यावर मला फुन्छोग-दोई-ख्यिल (म्हणजे प्रतीकरूपानं 'इच्छापूर्तीसाठी केलेल्या चांगल्या कामांची खोली') इथं नेण्यात आलं. राज्याभिषेक जिथं झाला होता तिथं मला ज्या ज्या अधिकाऱ्यांनी सोबत केली होती ते पुन्हा माझ्या सेवेसाठी हजर होते. कार्यालयाचे सर्व शिक्के मला आदरपूर्वक देण्यात आले आणि अधिपत्य सूचित करणारी पहिली कृती मी केली : मठांना आदेश पाठवायच्या कागदपत्रांवर मी शिक्के मारले.

अशाप्रकारे मी साडेचार वर्षांचा असताना औपचारिकपणे, चौदावा दलाई लामा - तिबेटचा आध्यात्मिक आणि लौकिक राज्यकर्ता - म्हणून माझी ओळख करून दिली गेली. सगळ्या तिबेटी लोकांना त्यांचं भविष्य आनंदी आणि सुरक्षित वाटत होतं.

ज्ञानप्रकाशाचा शोध

मी सहा वर्षांचा झालो तेव्हा माझं शिक्षण सुरू झालं. मला पूर्णपणे तिबेटच्या परंपरागत रीतिरिवाजांनुसार शिकवलं गेलं, त्यामुळं त्या शिक्षणाच्या पद्धती आणि हेतू हे सारं मला स्पष्ट करून सांगायला हवं. आमच्या शिक्षणपद्धतीची स्थापना जरी अनेक शतकांपूर्वी झाली असली तरी एकूणच तिबेटी लोकांचा नैतिक आणि बौद्धिक दर्जा उच्च राखण्यात ती पद्धत चांगलीच यशस्वी ठरली आहे. आधुनिक निकष लावला तर गेल्या काही शतकांमधल्या शास्त्रीय ज्ञानाकडं, अभ्यासाकडं त्या शिक्षण पद्धतीत पूर्ण दुर्लक्ष केलं गेलं - हा दोष आहे, पण त्याला कारणही आहे. अगदी आता आतापर्यंत तिबेट हा तसा जगापासून बाजूला, दूरच राहिलेला होता.

ज्ञानाच्या वेगवेगळ्या प्रकारांनी मनाला मोठं आणि सुसंस्कृत करणं हा तिबेटी पद्धतीतील मूलभूत हेतू आहे. लौकिक ज्ञानाचा दर्जा चांगला राखता यावा म्हणून अभ्यासक्रमात नाट्य, नृत्य आणि संगीत, ज्योतिषशास्त्र, काव्य आणि ग्रंथरचना या विषयांचा समावेश असतो. यांना तिबेटमध्ये 'पाच गौण विषय' म्हणून समजलं जातं. त्यांचा अभ्यास फक्त इतर विद्यार्थ्यांसाठी राखीव नसतो, तर धर्मशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही त्यातून एक किंवा अधिक विषय निवडता येत. असे बहुतेक विद्यार्थी ज्योतिषशास्त्र आणि ग्रंथरचना हे विषय निवडत.

उच्च शिक्षणासाठी, चिकित्सेची-रोगनिरसनाची कला, संस्कृत, न्यायशास्त्र किंवा तर्कविद्या, कला आणि हस्तकला आणि आत्मतत्त्वविद्या तसंच धर्माचं तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश केलेला असतो. यांना 'पाच उच्च विषय' असं म्हटलं जातं; आणि शेवटचा विषय सगळ्यात जास्त महत्त्वाचा आणि मूलभूत आहे. तर्कविद्येबरोबर पाच शाखांमध्ये तो विभागलेला असतो. त्यांची संस्कृत नावं अशी आहेत : प्रज्ञापारमिता-ज्ञानाची किंवा बुद्धिची पूर्णावस्था; माध्यमिक - मध्यम मार्ग, ज्याच्यामध्ये सर्व प्रकारचा अतिरेक टाळण्याचा आग्रह असतो; विनय - संन्यस्त धर्माचे नियम, अभिधर्म - आत्मतत्त्वविद्या; आणि प्रमाण - तर्कशास्त्र न्यायशास्त्र. स्पष्टपणे सांगायचं तर, शेवटचा विषय हा काही ज्ञानाच्या शाखा किंवा धर्मग्रंथांपैकी नव्हे; परंतु पाच श्रेष्ठ अभ्यासविषयांमध्ये त्याचा समावेश केला आहे तो, मनाची शक्ती वाढवण्यात तर्काचं किती महत्त्व असतं हे ठासून कळावं म्हणून. महायानातील तांत्रिक भागाचाही त्या अभ्यासविषयामध्ये समावेश केलेला नाही; त्याचं स्वतंत्रपणे शिक्षण घेतलं जातं.

तिबेटमधील भिक्षू हे प्रामुख्यानं धर्माचं शिक्षण घेतात. हा अतिशय गंभीर अभ्यास असतो आणि अवघड अशा अभ्यासाच्या विषयांचं आकलन होण्यासाठी कष्टांचीही गरज असते.

विद्यार्थ्याला माहिती देण्याबरोबर तिबेटी पद्धतीत त्याच्या मानसिक शक्ती, सामर्थ्य वाढण्यासाठीही वेगवेगळ्या रीती सांगितलेल्या आहेत. सुरुवात करताना, मुलं त्यांच्या शिक्षकांचं अनुकरण करत वाचायला आणि लिहायला शिकतात. अर्थात, ही तर नैसर्गिक रीतच आहे आणि आयुष्यभर तिचा उपयोग केला जातो. स्मरणशक्तीला वळण लागावं म्हणून धर्मग्रंथ कसे मनापासून शिकावेत, लक्षात कसे ठेवावेत यासाठी कडक असे

नित्यक्रम असतात. स्पष्ट करून सांगण्याची पद्धत तर जगभर वापरली जाते आणि आमच्यापैकी काही मठवासी महाविद्यालयंदेखील या पद्धतीचा विद्यार्थ्यांना शिकवायला उपयोग करतात. पण बऱ्याचशा मठांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक किंवा विद्यार्थ्यांमध्ये आपापसात घडणाऱ्या वादविवाद-चर्चा यांना प्राधान्य दिलं जातं. अखेरीस, ध्यान आणि चित्ताची एकाग्रता हे जमावं म्हणून काही पद्धती आहेत. उच्च अभ्यास करताना आणि धर्माचे आचरण करण्यासाठी मनाला वळण-शिक्षण देण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो.

बहुतेक सर्व मुलांप्रमाणे मीही वाचणं, लिहिणं शिकायला सुरुवात केली. मला वाटतं, त्या वयाच्या साधारणपणे सर्वच मुलांमध्ये शिकण्यासंबंधी जी एक विशिष्ट नाखुशी आणि आडमुठेपणा असतो, तोच माझ्यामध्ये होता. पुस्तकांशी गाठ घातली जाणं आणि शिक्षकांचा सहवास हे काही फारसं मनोरंजक नव्हतं. ते काही असो, माझ्या शिक्षकांना समाधान वाटेल असा अभ्यास मी करत होतो. आणि जेव्हा मी अभ्यासक्रमाच्या कडक शिस्तीत चांगला रूळलो तेव्हा त्यांना माझ्यात झपाट्यानं प्रगती होते आहे, असंही जाणवलं.

तिबेटी लिपीचे चार वेगवेगळे प्रकार आहेत. माझ्या ज्येष्ठ आणि कनिष्ठ शिक्षकांकडून छपाईसाठी जी लिपी वापरली जाते ती लिपी पहिली दोन वर्षं मी शिकलो. या प्रकाराला उ-च्छेन म्हणतात. त्याचवेळी मी पूर्ण लक्ष देऊन, धर्मग्रंथातील श्लोक रोज शिकायचो. धर्मग्रंथ वाचण्यासाठी एक तास लागायचा. नंतर, जेव्हा मी आठ वर्षांचा झालो तेव्हा, उ-मे नावाची सर्वसाधारणपणे लिहिली जाणारी तिबेटी लिपी शिकायला सुरुवात केली. खेनराब तेनझिन हा जो माझा जुना सहकारी, सहचर होता त्यानं ही लिपी मला शिकवली. हा पूर्वी शोधमोहिमेच्या गटात होता आणि माझ्याबरोबर दो-खमहून ल्हासाला परत आला. तो भिक्षू अधिकारी होता आणि अत्यंत चरित्र्यवान होता. लहान मुलांना सुंदर पद्धतीनं शिकवायच्या कलेची खास देणगी त्याला मिळालेली होती. तिबेटमध्ये नेहमी प्रचलित असणारी पद्धत तो शिकवण्यासाठी वापरायचा- खडूची पूड टाकलेल्या लाकडी फळ्यावर तो शाईशिवाय तिबेटी अक्षरं लिहायचा. मग ती अक्षरं मी शाईनं गिरवायचो. सुरुवातीला मोठी मोठी अक्षरं काढायचो. मग नंतर प्रगती होत गेली तसतसं मला छोटी अक्षरं जमायला लागली. नंतर फळ्यावर त्यानं लिहिलेल्या अक्षरांचा कित्ता मी गिरवायला लागलो. जवळजवळ आठ महिने, ही लिपी योग्य प्रकारे यावी म्हणून मी लाकडी फळ्यावर लिहिलं. मग खेनराब तेनझिननं मला हळूहळू कागदावर लिहायची परवानगी दिली. नंतर ठ्रिजङ् रिनपोछे या माझ्या कनिष्ठ शिक्षकानं मला व्याकरण आणि शुद्धलेखन शिकवलं. एकंदरीत मी पाच वर्षं तिबेटी लेखनात घालवली. अर्थात मला रोजचा धर्मग्रंथाचा अभ्यास सकाळ-संध्याकाळ असायचा, त्याच्या भरीला म्हणून हे शिक्षण होतं. कारण धर्माचं शिक्षण हा तर माझ्या शिक्षणाचा मुख्य हेतू होता. त्यामुळं वाचणं, लिहिणं आणि व्याकरण ही सारी त्या ध्येयाकडं जायची साधनं होती.

मी बारा वर्षांचा होईपर्यंत माझं वाद-विवादाचं शिक्षण तसं फारसं काही सुरू झालं नव्हतं. सुरुवातीस हे तसं सोपं नव्हतं. सहा वर्षांपूर्वी (शिक्षण सुरू करताना) मला जो अनुभव आला होता तसाच एकप्रकारचा मानसिक अडथळा मला याही वेळी जाणवला होता; पण लवकरच हे अडथळे दूर झाले आणि मला हे विषय आवडायला लागले. 'उच्च

विषयां'वरचे ग्रंथ मला काळजीपूर्वकपणे अभ्यासावे, शिकावे लागत आणि त्यावरच्या चर्चांमध्ये भाग घ्यावा लागे. अनेकदा अतिशय उच्चशिक्षित विद्वानांबरोबरही वाद-विवाद करावा लागे. मी प्रज्ञापारमितेचा (ज्ञानाची पूर्णावस्था) अभ्यास करायला सुरुवात केली. या ग्रंथावर टीकांचे तीसच्याही वर एवढे खंड आहेत आणि प्रत्येक पीठ त्यातून आपापले अभ्यासविषय निवडतात. ग्रंथांच्या मूळ तत्त्वांबरोबर मी त्यावरील दोन टीकांची माझ्या स्वत:साठी निवड केली. एक होती महान भारतीय पंडीत सिंहभद्र यांची टीका आणि दुसरी टीका होती - 302 पानांची, पाचव्या दलाई लामाची. त्यामुळं इथून पुढं यातलं एकतृतीयांश पान पाठ करावं लागणार होतंच. आणखीही बरंच वाचावं आणि समजून घ्यावं लागणार होतं. त्याच सुमारास प्राथमिक तर्कशास्त्रानं मला तात्त्विक वादविवादाचं प्रशिक्षण द्यायला सुरुवात झाली. डेपुङ्, सेरा आणि गादन या मठांच्या सात महाविद्यालयांमधील सात विद्वान शिक्षकांची, मला या कामी मदत करण्यासाठी निवड करण्यात आली.

मी जेव्हा जेमतेम तेरावं वर्ष पार केलं तेव्हा 'अग्नि वराह' वर्षातल्या आठव्या महिन्यात, डेपुङ् आणि सेरा इथल्या मोठ्या मठात मला औपचारिकपणे दाखल करण्यात आलं. त्या प्रसंगी, या दोन मठांच्या पाच महाविद्यालयांमध्ये झालेल्या वादसभांना मला उपस्थित राहवं लागलं. महत् ग्रंथांवरील अशा सार्वजनिक वादसभांमध्ये मी पहिल्यांदाच भाग घेतला होता, त्यामुळे साहजिकच मला संकोच वाटला, मनात खळबळ माजली आणि किंचित ताणही जाणवला. माझे वादातले विरोधक होते अतिशय ज्ञानी असे महंत. वादामध्ये अगदी धास्ती वाटावी असे ते स्पर्धक होते. सभेला शेकडोनी धार्मिक क्षेत्रातील मान्यवर ज्ञानवंत व्यक्ती आणि हजारो भिक्षू उपस्थित होते. नंतर विद्वान अशा लामांनी मला सांगितलं, की ज्या पद्धतीनं मी वादसभेत वागलो, बोललो त्यामुळे जमलेल्या सर्व श्रेष्ठींना समाधान वाटलं होतं.

इतर धर्मांचे अनुयायी असलेले असे जे माझे वाचक आहेत त्यांना, मी पुढं जो काही बौद्ध विचारांचा अभ्यास केला त्याचं अनुसरण करावं, असं मी सांगणार नाही. कारण बौद्ध तत्त्वज्ञान बुद्धिप्रधान आहे. भावनाप्रधान फारसं नाही. त्यावर हजारो खंड भरतील एवढं वाङ्मय आहे, ज्यापैकी मी फक्त शेकडोंचाच अभ्यास केला आहे. या पुस्तकाच्या परिशिष्टात मी तिबेटमधल्या बौद्ध धर्माचं थोडं स्पष्टीकरण दिलं आहे. जेव्हा आत्मतत्त्वविद्या आणि तत्त्वज्ञान या विषयांची ओळख मला, तेरा वर्षांचा झालो तेव्हा करून दिली गेली. मी तेव्हा त्यांनी माझं जणू मन:स्वास्थ्य घालवलं, हे कबूल करणं मला आवश्यक वाटतं. मला घेरी आल्यासारखं झालं. जणूकाही माझ्या डोक्यावर कुणीतरी आघात केला आहे असं वाटलं; पण पहिले काही दिवस वगळता ही मनोवस्था फार काळ टिकली नाही. मग मात्र पूर्वीच्या अभ्यासप्रमाणंच नवीन अभ्यास सोपा आणि स्पष्ट वाटू लागला. एका भारतीय द्रष्ट्यानं म्हटलं आहे, की 'सवयीनं सर्वच गोष्टी साहजिक वाटतात'. आणि माझ्या शिक्षणामध्ये मला त्या वचनाचा खरेपणा पुरेपूर पटला. माझ्या अभ्यासक्रमात एकेका विषयाची भर पडत गेली आणि उत्तरोत्तर हे सर्व शिकून घेताना माझा अवघडपणा कमी कमीच होत गेला. उलट आणखी आणखी जाणून घ्यावं अशी जिज्ञासाच वाढत गेली. मला नेमून दिलेल्या अभ्यासाच्या पल्याड माझी शिक्षणातली रुची वाढत गेली आणि मला पुढची प्रकरणं वाचण्यात समाधान वाटू लागलं. माझ्या वयाच्या क्षमतेच्या दृष्टीनं हे जरा अतीच होतं, तरीही शिक्षकांकडून माहिती जाणून

घेण्यात मला आनंद वाटू लागला.

अशा प्रकारे झालेली बौद्धिक शक्तीची वाढ ही आध्यात्मिक वाढीशी संलग्न असते. प्रशिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर उच्च तत्त्वांच्या तयारीसाठी माझ्या मनावर आणि शरीरावर विशेष संस्कार करण्यात आले. मी आठ वर्षांचा होतो तेव्हा माझ्यावर पहिला संस्कार म्हणजे दीक्षा झाली आणि मला ते सारं ठसठशीतपणे आठवतं. त्यामुळे किती अपार शांतीचा आणि आनंदाचा अनुभव मला आला होता, तेही आठवतं. नंतर प्रत्येक संस्काराच्या वेळी त्या त्या संस्कारांशी निगडित असा आध्यात्मिक अनुभव मला आला. माझा माझ्या धर्मावरचा विश्वास आणि श्रद्धा गंभीर, सखोल होत गेली. मी योग्य त्याच मार्गावर आहे हा मनातला भरवसा, उमेद आणखीनच दृढ झाली.

मी पंधरा वर्षांचा झालो तोवर हे अनुभव माझ्या अंगवळणी पडू लागले आणि भगवान बुद्धाबद्दल विलक्षण कृतज्ञतेची भावना माझ्या मनात दाटून येते आहे, हे मला जाणवू लागलं. त्या गुरूंबद्दल - ज्यांपैकी बहुतेक सारे भारतीय होते - ज्यांनी तिबेटी लोकांना अमूल्य अशी धर्म-तत्त्वं दिली आणि ज्यांनी त्यांचा अर्थ स्पष्ट करून सांगितला तसंच आमच्या भाषेत त्याची जपणूक केली, त्या तिबेटी विद्वान लोकांबद्दल मला कमालीचं ऋण वाटू लागलं. मी स्वत:बद्दल कमी कमी आणि इतरांचा जास्त विचार करू लागलो तेव्हा करुणेचा अर्थ मला उमगायला लागला.

आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत झाल्याचा हा जो भाव होता, त्याच्या जोडीला मानसिक पातळीवर बुद्धीची प्रगतता, अधिक तीव्र स्मरणशक्ती, वादविवादात आलेले अधिक नैपुण्य, व्यत्पन्नता आणि वाढलेला आत्मविश्वास यांची भर पडली.

ज्यांनी आपलं आयुष्य धार्मिक आणि आत्मिक ज्ञान तसंच साक्षात्काराच्या ध्येयास वाहिलेलं आहे, त्यांच्याप्रमाणे मी अभ्यासास वाहून घेऊ शकलो नव्हतो. याला जी राजकीय परिस्थिती आणि इतर काही घटना कारणीभूत ठरल्या त्याबद्दल पुढं मी लिहिणार आहेच. पण तेरा वर्षांमधला तसा बराच काळ मी या गंभीर अभ्यासाकडे लक्ष देऊ शकलो. आणि जेव्हा मी चोवीस वर्षांचा झालो तेव्हा मी तीनही मठांच्या विद्यापीठांच्या प्राथमिक परीक्षा दिल्या.

या परीक्षा नेहमी वादसभांच्या स्वरूपातच असतात. त्याच्या प्रक्रियांचे नियम साधेसे पण सन्माननीय असतात. प्रत्येक विद्यार्थ्याला मोठ्या संख्येने असलेल्या विरोधकांना तोंड द्यावं लागतं. प्रतिवाद करायला असलेले लोक त्यांना हवा असलेला कोणताही विषय निवडतात, प्रतिस्पर्ध्याला हटविण्यासाठी कोणताही वादाचा मुद्दा निवडू शकतात. भारतीय तसंच तिबेटी विद्वानांचे प्रमाणभूत मानले गेलेले सर्व ग्रंथ आणि भगवान बुद्धाची सूत्ररूप वचनं, हे सगळं विरोधकांचा मुद्दा, म्हणणं खोडून काढण्यासाठी संदर्भ म्हणून दिलं जातं. माझ्या प्रत्येक प्राथमिक परीक्षेत मला अशा वादसभांमध्ये पंधरा विद्वान पंडितांशी सामना करावा लागला. पाच श्रेष्ठ ग्रंथांपैकी, एकेका ग्रंथासाठी तिघे विद्वान प्रतिस्पर्धी! मला माझा निबंध सिद्ध करावा लागला आणि त्यांचे मुद्दे खोडून काढावे लागले. मग मला विलक्षण विद्वान अशा दोन महंतांसमोर उभं राहवं लागलं. पाच मुख्य विषयांपैकी एका विषयावर वादात्मक चर्चेला प्रारंभ करावा लागला. या सर्व वादसभांमध्ये प्रत्येक मुद्दा ठसवून सांगण्यासाठी आक्रमक वाटतील असे औपचारिक हावभाव केले जातात. त्यामुळे सर्व वाद, कारणमीमांसा हे सारं बौद्धिक युद्धाप्रमाणं दिसतं. खरं तर ते तसं असतंही!

एका वर्षांनंतर मी माझी शेवटची परीक्षा दिली. ती ल्हासामध्ये वार्षिक मोनलम सणाच्या सुमारास होती. त्यावेळी हजारो भिक्षू खास बौद्ध प्रार्थनाउत्सवाला उपस्थित राहण्यासाठी शहरात जमतात. दरवर्षीच्या पहिल्या महिन्यात हा उत्सव होतो. माझी परीक्षा तीन सत्रांमध्ये होती. सकाळच्या वेळी तीस विद्वानांनी सभांमधील चर्चेमध्ये आळीपाळीनं प्रमाण किंवा तर्कशास्त्र या विषयाची माझी परीक्षा घेतली. दुपारच्या वेळी 'माध्यमिक' (मध्यम मार्ग) आणि 'प्रज्ञापारमिता' (ज्ञानाची पूर्णावस्था) या विषयांवरच्या वादात पंधरा विद्वान माझे विरोधक म्हणून होते. संध्याकाळच्या वेळी 'विनय' - भिक्षूधर्माची तत्त्वं आणि 'अभिधर्म' - आत्मविद्येचा अभ्यास या विषयांमधलं माझं ज्ञान तपासण्यासाठी पस्तीस पंडित होते. ही सर्व सत्रं चालू असताना आमच्या भोवती, झळझळीत लाल आणि पिवळे कपडे घातलेले शेकडो विद्वान लामा, त्यांच्यातच हूरहूर-काळजी वाटत असलेले माझे शिक्षक आणि हजारो भिक्षू बसलेले होते. सारे जण अतिश उत्सुकतेनं आणि चिकित्सकपणं ऐकत होते. या परीक्षा अत्यंत कठीण आहेत हे मला जाणवलं, कारण मी ज्या विषयाबद्दल बोलत आहे त्यावर मला विलक्षण कठीण अशा एकाग्रतेनं लक्ष केंद्रित करावं लागतं होतं. त्याचबरोबर कुठल्याही प्रश्नाला चलाख तत्परतेनं उत्तर द्यावं लागत होतं. कित्येक तास चाललेला हा परीक्षेचा काळ मला काही क्षणांसारखा वाटला. अर्थात भगवान् बुद्धाच्या थोर उपदेशांचा इतकी वर्ष अभ्यास केल्यानंतर मी शेवटची परीक्षा दिली आणि आत्मतत्त्वविद्येत पारंगत ही पदवी मिळवली याचा मला अभिमान वाटतो अन् आनंदही वाटतो. पण मला हे सुद्धा ठाऊक आहे, की आध्यात्मिक जाणीवेची किंवा ज्ञानाची सर्वश्रेष्ठ अवस्था गाठेपर्यंत सातत्यानं शिकत राहण्याला अंत नाही.

माझ्या मते, अशा प्रकारच्या धार्मिक प्रशिक्षणानं मनाला विशिष्ट प्रकारचा समभाव प्राप्त होतो. जेव्हा दुःख किंवा वेदना सहन करण्याचे प्रसंग येतात तेव्हा आपल्या आचाराची प्रत्यक्ष परीक्षा होते. ज्या माणसाचं मन अभ्यासात आणि धर्माच्या आचरणात रंगलेलं असतं, असा माणूस दुःखद प्रसंगांना धीरानं आणि संयमानं तोंड देतो. जो माणूस 'धर्म' आचरणात उतरवत नाही तो माणूस, त्याला जी काही संकटं वाटतात, त्यांच्या प्रभावानं मोडून पडतो आणि स्वतःला निराशेच्या खाईत लोटतो किंवा दुसऱ्यांना दुःख भोगायला लागेल असे उद्योग करतो. धर्माच्या गाभ्याची जाणीव असेल तरच त्यातून मानवतावाद आणि सर्व प्राणिमात्रांसाठी प्रेम यांचे अंकुर फुटतात. एखादा धर्म कुठल्याही नावानं का ओळखला जाईना, त्याची यथार्थ समज आणि आचरण हेच शांत-स्थिर मनाचं आणि पर्यायानं शांतताप्रिय जगाचं सार आहे. मुळात तुमच्या मनालाच जर शांतता नसेल तर तुम्ही दुसऱ्याबद्दल जो दृष्टिकोन ठेवता त्यात शांतपणा येणार नाही आणि यामुळेच मग माणसा-माणसांमध्ये किंवा देशा-देशांमध्ये शांत, समंजस नातं राहू शकत नाही.

इथं मला आमच्या श्रद्धा, विश्वास आणि 'दलाई लामा' म्हणून माझ्या पदाचं महत्त्व या बाबी जरा स्पष्ट करायला हव्यात. कारण जेव्हा आमच्यावर संकटांची वेळ येऊन ठेपली, तेव्हा मी जे काही केलं आणि आमच्या लोकांनी जे काही केलं त्याच्यावर या श्रद्धांचाच खोल प्रभाव होता. बौद्धतत्त्वांची क्लिष्टता, घडण ही काही दोन-चार ओळींमध्ये स्पष्ट करून सांगता येण्यासारखी नाही, हे इथं मला मान्य करायला हवं. ज्या लोकांना त्याचा अजिबातच परिचय नाही, त्यांच्यासाठी, सर्वसाधारणपणे जे सांगितलं

जातं त्यापेक्षा जास्त मी बोलणार नाही.

सर्व सजीव, त्यात माणसं ही आलीच, हे मृत्यूनंतर पुन्हा जन्माला येतात असा आमचा रास्त विश्वास आहे. पुन्हा मिळणाऱ्या प्रत्येक आयुष्यात अनुभवायला लागणाऱ्या दुःख आणि सुखाचं परिमाण हे मागच्या जन्मात त्यांनी केलेल्या चांगल्या किंवा वाईट कर्मांनुसार ठरत असतं. पण अर्थात त्यांच्या सध्याच्या असणाऱ्या जन्मात दुःख-सुखांचं परिमाण स्वतःच्या कष्टांनी ते बदलू शकतात. याला कर्मवाद म्हटलं जातं. प्राणिमात्र किंवा जीव हे त्यांच्या कर्मानुसार वेगवेगळ्या योनींमध्ये फिरतात, म्हणजे काय, तर पशुपासून माणसाच्या योनीत किंवा त्याउलट. शेवटी, सदाचरण आणि ज्ञान यांच्यामुळं, जिथून पुनर्जन्म होणार नाही, अशी निर्वाण अवस्था ते प्राप्त करू शकतात. निर्वाणातही ज्ञानाच्या पायऱ्या असतात. सर्वश्रेष्ठ अशी ज्ञानाची जी पूर्णावस्था असते ती म्हणजे बुद्धत्व.

पुनर्जन्मावरच्या विश्वासामुळं विश्वप्रेम निर्माण व्हायला हवं कारण सर्वच जिवंत प्राणिमात्र आणि जीवजंतू हे सारेजण त्यांच्या त्यांच्या आणि आपल्या स्वतःच्या असंख्य जन्मांमध्ये आपलेच प्रिय आई-वडील, मुलं-बाळं, भाऊ, बहिणी, मित्र असू शकतात. वैश्विक प्रेमातूनच निर्माण होणाऱ्या नीतितत्त्वांना आमच्या पंथानं प्रोत्साहन दिलं आहे. ही नीतितत्त्व कोणती तर - सहिष्णूता, संयम, औदार्य आणि उदात्तता, दयाळूपणा आणि करुणा.

ज्यांनी एकतर निर्वाणाच्या विविध टप्प्यांची प्राप्ती करून घेतलेली असते किंवा निर्वाणाच्या खालची पण सर्वश्रेष्ठ अवस्था प्राप्त केलेली असते असे जीव म्हणजे पुनरावतार. त्याला बुद्ध, बोधिसत्व आणि अर्हत् मानता येऊ शकतं. निर्वाणाच्या दिशेनं उन्नती करावी म्हणून इतर जीवांना मदत करण्याकरिता त्यांनी पुनरावतार घेतलेला असतो आणि असं करत करतच बोधिसत्व हे स्वतःला बुद्धत्वाकडे उंचावतात आणि 'अर्हत्' अवस्थादेखील शेवटी बुद्धत्वाला जाऊन मिळते. म्हणजे ज्यांनी आधीच सर्व पातळ्यांवरची श्रेष्ठता प्राप्त करून घेतलेली असते, त्यांनी कोणत्याही स्वतःच्या अशा सक्रिय संकल्पानं पुनरावतार घेतलेला नसतो; वस्तुतः अशा कुठल्याच सक्रिय मानसिक प्रक्रियेला 'अहं'काराला 'निर्वाण' अवस्थेत स्थानच नाही. त्यांनी स्वतः ज्यातून बुद्धत्व मिळवलं त्यातून निर्माण होणाऱ्या आंतरिक करुणेनं, इच्छेनं ते खरं तर पुनरावतार म्हणून येतात. जिथं परिस्थिती सुयोग्य असेल तिथं ते येतात. त्यांचं असणं निर्वाणात संपतं असं नव्हे. उपमा किंवा दाखला द्यायचा झाला तर असं म्हणता येईल, की चंद्राचं प्रतिबिंब हे पृथ्वीवरच्या संथ तळ्यात काय किंवा सागरात काय, योग्य त्यावेळी दिसू शकतं. तसं असताना स्वतः चंद्र मात्र आकाशात त्याच्या त्याच्या जागीच राहतो. तीच उपमा पुढे नेली म्हणजे असं म्हणता येईल, की त्याच त्या एका चंद्राचं एकाच क्षणी पण वेगवेगळ्या अनेक ठिकाणी प्रतिबिंब पडू शकतं. अगदी तसंच बुद्धसुद्धा एकाचवेळी पण वेगवेगळ्या देहांमधून आविर्भूत होऊ शकतो. पुनरावतार घेणारे असे सर्व जीव, मी पूर्वीच सूचित केलं होतं त्याप्रमाणे, त्यांच्या स्वेच्छेनं, ते पुनर्जन्म कुठल्या जागी अन् कोणत्या वेळी घेतील हे ठरवू शकतात; आणि प्रत्येक जन्मानंतर पूर्वजन्माची स्मृती त्यांच्यामध्ये रेंगाळत असते. तिच्यामुळेच तर इतर लोक त्यांना ओळखू शकतात. पूर्वीच्या अवताराशी त्यांची तद्रूपता इतरांना कळू शकते.

माझ्या पोरवयात माझ्या धर्माच्या शिक्षणासाठी मी खरोखरच खूप कष्ट घेतले; पण

माझं आयुष्य म्हणजे काही फक्त काम आणि काम नव्हतं. माझ्या असं ऐकण्यात आलं आहे, की इतर देशांमधल्या काही लोकांना दलाई लामा म्हणजे पोताला राजवाड्यातल्या कैद्यासारखे वाटत असत.

माझ्या अभ्यासामुळे मी बऱ्याचवेळा बाहेर जाऊ शकत नसे हे खरं. पण माझ्या कुटुंबासाठी पोताला आणि ल्हासा शहर यांच्यामध्ये घर बांधलं गेलं होतं; आणि मी माझ्या कुटुंबीयांना कमीत कमी दर महिन्याला किंवा सहाएक आठवड्यांच्या अंतराने भेटू शकत असे. त्यामुळे कौटुंबिक आयुष्यापासून मला पूर्णपणे तोडलं गेलं होतं असं नाही. मी माझ्या वडिलांना बरेचदा भेटायचो. कारण (एक तर पोतालामध्ये किंवा नोर्बूलिङ्गा या उन्हाळ्यातल्या घरात) रोजच्या सोपस्कारांपैकी किंवा छोट्या समारंभवजा गोष्टींपैकी एक म्हणजे सकाळच्या चहापानाचा कार्यक्रम असायचा. यावेळी सर्वच भिक्षू अधिकारी चहासाठी एकत्र भेटायचे. मी आणि माझे वडील या सभेला बहुतेक वेळा उपस्थित राहायचो. आमची परिस्थिती आता पालटली होती तरी त्यांना घोड्यांमध्ये रस होताच. अजूनही स्वत: जेवण घेण्याआधी ते रोज सकाळी आपल्या घोड्यांना चारायला जात. आता त्यांना जरा परवडायला लागलं होतं, त्यामुळं घोड्यांना शक्ती मिळावी म्हणून ते त्यांना अंडी आणि चहा देत. मी जेव्हा माझ्या उन्हाळ्यातल्या घरात असे, तिथं दलाई लामाचा तबेला होता. माझे वडील जेव्हा मला तिथं भेटायला यायचे, तेव्हा मला वाटतं ते नेहमी मला हाक मारण्याआधी माझ्या घोड्यांनाच आधी हाळी द्यायचे.

आम्ही ल्हासामध्ये आल्यानंतर एक वर्षानं माझी मोठी बहीण आली. नंतर माझा मोठा भाऊसुद्धा कुमबुमचा मठ सोडून ल्हासाला आला. त्यामुळे आम्ही पुन्हा सगळे एकत्र आलो. माझी मोठी बहीण आल्यानंतर काही दिवसातच माझ्या धाकट्या बहिणीचा जन्म झाला. तिच्यानंतर एक मुलगाही झाला. या बाळाचा आम्हाला सगळ्यांनाच फार लळा होता. मला छोटा भाऊ आहे याचा मला फार आनंद व्हायचा; पण आमच्यासाठी दु:खाची गोष्ट म्हणजे तो जेमतेम दोन वर्षांचा असतानाच गेला. या दु:खाचा आणि माझ्या आई-वडिलांचा आधीच जवळून परिचय झालेला होता, कारण त्यांची आणखीही काही मुलं काळानं हिरावलेली होती. पण या बाळाच्या मृत्यूनंतर मात्र एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. अंत्यसंस्कारांपूर्वी लामा आणि ज्योतिषांचा सल्ला घ्यायचा तिबेटमध्ये रिवाज आहे. या प्रसंगी त्यांनी असा सल्ला दिला, की त्याचा देह हा पुरला जाऊ नये पण आहे तसा राखला जावा, कारण एखादेवेळीस तो त्याच घरात पुनर्जन्म घेऊ शकेल. त्याचा पुरावा मिळावा म्हणून त्याच्या देहावर लोणी माखून एक छोटीशी खूण उठवावी. असं केलं गेलं. यथावकाश माझ्या आईनं आणखी एका बाळाला - तिच्या शेवटच्या मुलाला जन्म दिला. तो जेव्हा जन्मला तेव्हा, ज्या ठिकाणी पहिल्या बाळाच्या देहावर लोणी माखलं होतं, अगदी बरोबर त्याच जागी या नवीन बाळाच्या शरीरावर फिकटशी खूण होती. तोच तो जीव होता. पुन्हा एकदा नव्यानं आयुष्य सुरू करायला त्यानं नव्या शरीरात पुन्हा जन्म घेतला होता.

या सर्व कौटुंबिक घडामोडींमध्ये मी थोडाफार सहभागी व्हायचो; पण मला हे कबूल केलं पाहिजे, की माझ्या बालपणाचा बराचसा काळ मोठ्यांच्या संगतीतच गेला. आईचा आणि इतर मुलांचा सहवास न मिळलेलं असं जे बालपण असतं त्यात नक्कीच काहीतरी उणीव राहत असली पाहिजे. तरी पोताला हा माझ्याकरता समजा बंदिवास असता तरी

तो अतिशय प्रशस्त आणि मोहक, आकर्षक असा बंदिवास होता. जगातल्या सर्वात मोठ्या इमारतींपैकी पोतालाची इमारत एक होती. त्या वास्तूत वर्षानुवर्षे राहिलं तरी त्यातली सर्वच्या सर्व रहस्यं उलगडली नसती. एका टेकडीचा वरचा सर्व भाग त्या इमारतीनं व्यापलेला आहे; पोताला म्हणजे एक शहरच आहे. 1,300 वर्षांपूर्वी तिबेटच्या राजानं ध्यानधारणेसाठी लहान इमारत म्हणून बांधायला घेतली. ख्रिस्ती काळानुसार सतराव्या शतकात पाचव्या दलाई लामानं ती इमारत अवाढव्य स्वरूपात वाढवली. सध्याच्या इमारतीचा तेरा मजली मध्यभाग त्याच्या आदेशानुसार बांधला गेला. पण या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचं काम पुरं होता होता त्या दलाई लामांचा मृत्यू झाला. जेव्हा त्यांना कळलं की आता आपला मृत्यू निश्चित आहे तेव्हा त्यांनी त्यांच्या प्रधानमंत्र्याला, 'त्यांचा मृत्यू हे गुपित ठेवलं जावं' असं सांगितलं. त्यांनी अशी काळजी वाटत होती, की जर ते मरण पावले आहेत हे कळलं तर या इमारतीचं बांधकाम थांबेल. या लामांसारखाच हुबेहूब दिसणारा एक भिक्षू प्रधानमंत्र्यानं शोधला आणि काम संपेपर्यंत तेरा वर्ष त्यानं दलाई लामांच्या मृत्यूचं गुपित लपवून ठेवलं. पण त्यानं गुपचूपपणे, लामानं पुनरावतार घ्यावा म्हणून प्रार्थना कोरलेला एक दगड तयार करवून घेतला आणि तो या इमारतीच्या भिंतींमध्ये बांधून, बसवून घेतला. अजूनही दुसऱ्या मजल्यावर तो दगड पाहायला मिळू शकतो.

इमारतीच्या मध्यभागात समारंभांसाठी मोठमोठी दालनं होती. अतिशय सुंदरपणे कोरलेली अन् रंगवलेली पस्तीस प्रार्थनागृहं होती. ध्यानासाठी छोट्या खोल्या त्याचप्रमाणं सात दलाई लामांच्या स्मरणछत्र्या होत्या. त्यांच्यापैकी काही छत्र्या 30 फूट उंच होत्या आणि सोन्याचा पत्रा आणि मौल्यवान खडे त्यावर जडवलेले होते.

इमारतीच्या पश्चिमेकडचा भाग नंतरच्या काळात बांधला गेला. या भागात 175 भिक्षू राहतील एवढी व्यवस्था होती. पूर्वेकडच्या भागात सरकारी कार्यालयं, भिक्षू अधिकाऱ्यांसाठी विद्यालय आणि राष्ट्रीय सभेची - तिबेटच्या पार्लमेंटची सभागृहं होती. माझं स्वतःचं घर कार्यालयांच्या वर, अगदी वरच्या मजल्यावर म्हणजे शहरापासून 400 फूट इतक्या उंचावर होतं. तिथं मला चार खोल्या होत्या. ज्या खोलीत मी बहुतांश काळ असायचो, ती साधारण 25 चौरस फुटांची खोली होती. तिच्या भिंती भरून पाचव्या दलाई लामाचं जीवन चित्रित केलेली रंगचित्रं होती. त्या चित्रांमध्ये इतके बारकावे टिपलेले होते, की त्यातल्या व्यक्ती साधारणपणे एका इंचाइतक्या छोट्या होत्या. यावरून ही चित्रं केवढी होती त्याची कल्पना येईल. जेव्हा मी वाचन करून थकायचो, तेव्हा मी माझ्या सभोवर पसरलेल्या त्या प्रचंड आणि अतिशय सविस्तर अशा भित्तीचित्रांमधल्या कथानकाचा मागोवा घेत बसायचो.

कार्यालय, मंदिर, विद्यालय आणि वसतिस्थान या सर्व उपभोगांबरोबरच पोताला हे एक अवाढव्य कोठार होतं. इथं अनमोल असे हजारो गुंडाळीचे पट (डलीश्रश्र) होते; त्यातले काही तर हजारो वर्षांपूर्वीचे होते. अशा पटांनी भरलेल्या खोल्या होत्या. पूर्वीच्या तिबेटच्या राजांचं हजारो वर्षांचं सगळं राजेशाही वैभव, सोन्याची राजचिन्हं; चिनी किंवा मंगोलच्या बादशहांकडून त्यांना मिळालेल्या थाटामाटाच्या शाही भेटवस्तू आणि राजांनंतरच्या दलाई लामांची संपत्ती, खजिना हे सारं भरलेल्या तिजोऱ्या इथं होत्या.

तिबेटच्या संपूर्ण इतिहासातील चिखलतं आणि तोफखाना इथं साठवलेला होता. ग्रंथालयांमध्ये तिबेटची संस्कृती आणि धर्म यांच्या नोंदी, 7,000 अजस्र खंड होते.

त्यापैकी काही खंडांचं वजन तर ऐंशी पौंड होतं असं म्हणतात. हजारो वर्षांपूर्वी भारतातून मागवलेल्या तालपत्रांवर काहींचं लेखन होतं. धर्मग्रंथांची दोन हजार एवढी अतिशय चमकदार हस्तलिखितं होती. सोनं, चांदी, लोखंड, तांबं, शंखचूर्ण, नीलमणी आणि प्रवाळ यांची चूर्ण वापरून तयार केलेल्या शाईनं ती लिहिली होती; आणि प्रत्येक ओळ वेगळ्या शाईत होती.

इमारतीच्या खाली असंख्य भूमिगत कोठारं आणि तळघरं होती. तिथं लोणी, चहा आणि कापड यांचे सरकारी साठे होते. ह्या वस्तू मठ, सैन्य आणि सरकारी अधिकारी यांना पुरवल्या जायच्या. पूर्वेकडे अगदी शेवटी, वरिष्ठ दर्जाच्या असलेल्या पण अपराधी लोकांसाठी तुरुंग होता - हे थोडं टॉवर ऑफ लंडनसारखं होतं. इमारतीच्या चोहोबाजूंना संरक्षक असे टेहेळणीसाठी मनोरे होते. तिथं तिबेटचं सैन्य पहारा द्यायचं.

अशा या वैशिष्ट्यपूर्ण आणि निरुपम वातावरणात मी शिकलो आणि माझे बालहट्टही पुरवले. मला नेहमीच यांत्रिक गोष्टींनी भुरळ पडायची, पण त्यांच्याबद्दल मला सांगणारं मात्र कुणीच नव्हतं. मी लहान असताना ज्या ज्या प्रेमळ लोकांना माझी ही आवड माहीत होती ते कधी कधी माझ्यासाठी गाड्या, जहाजं आणि विमानं अशी यांत्रिक खेळणी पाठवायचे; पण मला त्यांच्याशी बराचवेळ खेळूनसुद्धा समाधान व्हायचे नाही, कारण ही खेळणी कशी काम करतात ते पाहण्यासाठी मला त्यांचे सगळे भाग सोडवावे लागत. सर्वसाधारणपणे मला सारे भाग पुन्हा जुळवायला जमत असे, पण तरी काहीवेळा मात्र अपेक्षेनुसार भयंकर प्रसंग ओढवत असे. माझ्याकडे मेकॅनोचा संच होता आणि प्रत्यक्षात बघण्याअगोदर मी यारी आणि रेल्वे बनवल्या. नंतर मला एक जुना चित्रपट प्रक्षेपक मिळाला होता. एका दांड्यानं तो फिरवून चालवावा लागे. जेव्हा मी त्या प्रक्षेपकाचे सारे भाग सोडवले तेव्हा मला त्याच्या विद्युत प्रकाश देणाऱ्या बॅटरी सापडल्या. विद्युतशास्त्राशी ही माझी नवीनच ओळख होत होती. मला ती सगळी जोडणी पाहून पार गोंधळायला झालं. मी एकटाच होतो, पण मला ते कसं चालतं याचा उलगडा झाला. मला त्यात यश आलं. नंतर माझ्या मनगटी घड्याळावरचा प्रयोगही यशस्वी झाला. ते कुठल्या तत्त्वांवर चालतं याचा अभ्यास करण्यासाठी मी अक्षरशः घड्याळ अख्खं सोडवून ठेवलं. नंतर मी ते पुन्हा जुळवून ठेवलं आणि ते अजूनपर्यंत चालत होतं.

पोतालामध्ये, दर वर्षाची सुरुवात सर्वात उंच असलेल्या मजल्यावर, छतावर नवीन वर्षाचा सूर्योदय होण्याआधी एका समारंभात होत असे. (तेव्हा अगदी कडाक्याची थंडी असे अन् सकाळी नंतर होणाऱ्या चहापानाच्या कार्यक्रमाची आतुरतेनं वाट बघणाऱ्या लोकांमध्ये मी एकटाच होतो असं नाही!) वर्षभर रोज काही ना काही कार्यक्रम चालू राहत असत. नवीन वर्षाच्या सायंकाळी लामांचे महानृत्य (ऋीशरीं ऊरपलश ेष ींहश ङरारी) होईपर्यंत कार्यक्रमांची धामधूम असे; पण वसंत ऋतूत मी स्वतः, माझे शिक्षक आणि काही परिचारक तसंच काही सरकारी कार्यालयं हे सारं नोर्बूलिङ्गा इथं हलविण्यात येत असे. तेव्हा मिरवणुकीनं जायचो. त्यावेळी ल्हासातले सारे लोक मला पाहायला यायचे. मला नोर्बूलिङ्गा इथं जायला नेहमीच आनंद व्हायचा. संस्कृती आणि कलाकुसर यांच्या परंपरेनं पोतालाचा मला अभिमान वाटायचा, पण नोर्बूलिङ्गा हे जास्त घरासारखं वाटायचं. छोटे छोटे राजवाडे आणि लहान लहान देवळांची मालिका तिथं होती. भोवताली मोठी सुंदर आणि नेटकं कुंपण घातलेली बाग होती. नोर्बूलिङ्गाचा अर्थ

‘रत्नांचं उपवन’.

अठराव्या शतकात सातव्या दलाई लामानं याची सुरुवात केली आणि नंतर क्रमाक्रमानं पुढच्या दलाई लामांनी, आजपर्यंत त्यात आपापल्या घरांची भर घातली. मी पण माझ्यासाठी तिथं एक घर बांधलं. या जागेची पायाभरणी करणाऱ्यानं खरंच फार सुपीक जागा निवडली होती. नोर्बूलिङ्गा इथल्या बागांमध्ये आम्ही वीस पौंड वजन भरेल एवढा एकेक मुळा पिकवायचो आणि हातांमध्ये मावणार नाहीत एवढे मोठमोठे फुलकोबी यायचे. पॉपलर, विलो, ज्युनिपर शिवाय अनेक प्रकारची फुलं; सफरचंद, पेअर, पीच, अक्रोड आणि जर्दाळूसारखी अनेक फळझाडं तिथं होती. मी तिथं होतो तेव्हा प्लम आणि चेरीच्या झाडांची नवीन भर आम्ही घातली.

तिथं माझ्या अभ्यासवगार्ंच्या मधल्या वेळात मी फुलाफळांच्या बागांमधून चालायचो आणि मोर तसंच पाळलेल्या कस्तुरी हरणांच्या मधून पळापळ करायचो. तिथल्या तळ्याच्या काठी खेळायचो; आणि दोन वेळेस मी पार बुडता बुडता वाचलो. याच तळ्यातल्या माशांना मी खायला घालायचो; आणि माझ्या पावलांचा आवाज ऐकला की हे मासेही मोठ्या अपेक्षेने वर वर यायचे. पोतालामधल्या ऐतिहासिक, देखण्या आश्चर्याचं आता काय झालं आहे हे मला माहीत नाही. त्यांबद्दल विचार करता करता मला कधी कधी वाटून जातं, त्या माझ्या माशांनी, चिनी सैनिकांच्या बुटांचा आवाज ऐकून पाण्याच्या वरती येण्याचा वेडेपणा केला असला तर? जर त्यांनी असं केलं असेल, तर त्यांना बहुतेक त्या सैनिकांनी खाऊन टाकलं असेल.

नोर्बूलिङ्गा इथली आणखी एक मजेशीर गोष्ट अशी होती, की तिथं एक विद्युत जनित्र होतं. ते बरेचदा नादुरुस्त असायचं. त्यामुळं ते सारं खिळखिळं करून खोलून बघायला मला चांगलीच सबब मिळायची. त्या यंत्रामुळं, अंतर्गत ज्वलनशील यंत्रं कशी चालतात हे मला कळलं. तसंच विजेचं यंत्र फिरवल्यावर कसं काय चुंबकीय क्षेत्र निर्माण होतं, हेही माझ्या लक्षात आलं. ते दुरुस्त करण्यात मी बहुतेक वेळा यशस्वी झालो होतो, हे सांगणं इथं मला आवश्यक वाटतं.

ल्हासामध्ये ज्या काही तीनच मोटारगाड्या होत्या, त्यांच्यावर या ज्ञानाचा प्रयोग करण्याचा मी प्रयत्न केला. 1927 च्या दोन बेबी ऑस्टिन गाड्या होत्या, एक लाल आणि दुसरी पिवळी होती; आणि 1931 ची केशरी रंगाची मोठी डॉज गाडी होती. माझे जे पूर्वाधिकारी होते त्यांना त्या गाड्या भेट म्हणून मिळाल्या होत्या. हिमालयावर त्यांचे भाग सुटे करून आणले गेले आणि मग पुन्हा सगळी जोडणी करण्यात आली. पण त्या पूर्वाधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्यापासून गाड्यांचा वापरच कधी झाला नव्हता, त्या तशाच ठेवलेल्या होत्या आणि पर्यायानं गंजायला लागल्या होत्या. या गाड्या चालू झाल्या पाहिजेत असं मला तीव्रतेनं वाटायचं. शेवटी मला एक तरुण तिबेटी माणूस मिळाला. त्याला भारतात गाडी चालवायचं प्रशिक्षण मिळालेलं होतं. माझ्या उत्साही मदतीनं त्यानं डॉज गाडी दुरुस्त केली. एका ऑस्टिन गाडीचे सुटे भाग ‘उधारी’वर वापरून दुसरी ऑस्टिनही चालू केली. माझ्यासाठी ते अतिशय आनंदाचे आणि उत्साहाचे क्षण होते.

तिबेटबाहेरच्या जगात काय चाललं आहे याच्याबद्दलही मला उत्सुकता असायची, पण साहजिकच माझ्या कुतूहलाचं फारसं समाधान होतच नसे. माझ्याकडे नकाशाचं पुस्तक होतं आणि मी दूरदूरच्या देशांचे नकाशे मन लावून बघायचो. तिथलं आयुष्य कसं बर असेल? म्हणून कल्पना करत राहायचो. पण हे देश पाहिलेला असा कुणी मात्र

माझ्या माहितीत नव्हता. मी पुस्तकाच्या मदतीनं स्वत:हूनच इंग्रजी शिकू लागलो. कारण आमच्या सख्ख्या शेजारी देशांशिवाय आमचे फक्त ब्रिटन या देशाशीच मैत्रीपूर्ण संबंध होते.

भारतातल्या कालिंगपाँग इथून प्रकाशित होणाऱ्या तिबेटी वर्तमानपत्रात माझ्या शिक्षकांनी दुसरे महायुद्ध व त्याच्या प्रगतीबद्दल वाचलं. मला जेव्हा ल्हासाला नेण्यात आलं त्याच वर्षी युद्ध चालू झालं होतं. त्यांनी हे वाचल्यावर त्याबद्दल मला सांगितलं होतं. युद्ध संपेपर्यंत अशा बातम्या माझ्या मला वाचता येऊ लागल्या होत्या. काही थोड्याफार जागतिक घडामोडींचे ल्हासामध्ये आमच्यावर पडसाद उमटले. एव्हरेस्ट पर्वत सर करण्यामध्ये, ब्रिटिशांच्या प्रयत्नांमध्ये आम्हाला रस आहे का ते मलाही काहीवेळा विचारलं जायचं. आम्ही काय केलं ते काही मला सांगता येणार नाही. बहुसंख्य तिबेटी लोकांना इतके खंडीभर पर्वत आणि खिंडी चढाव्या लागत, की आणखी उंच चढायलाच हवं अशी काही इच्छा त्यांना होणं कठीण होतं. ल्हासातले काही लोक जेव्हा गंमत म्हणून हौसेखातर पर्वतारोहण करायचे ते बेतशीर उंचीच्या टेकड्या निवडायचे. माथ्यावर चढून गेल्यावर ते उदबत्त्या लावायचे, प्रार्थना करायचे आणि सहल साजरी करायचे. मला संधी मिळते तेव्हा मलासुद्धा ही गंमत करायला मजा येते.

म्हणजे एकंदरीत पाहता माझं बालपण काही दु:खी वगैरे अजिबात नव्हतं. माझ्या शिक्षकांनी मला ज्या दयाळूपणानं वागवलं त्याची स्मृती माझ्या हृदयात नेहमीच तेवत राहील, फुलत राहील. मला कायमच आनंद आणि स्फूर्ती देईल असं धर्माचं शिक्षण त्यांनी मला दिलं. इतर गोष्टींमधलं माझं निरोगी कुतूहल, प्रश्न यांचं समाधान करायचा त्यांच्या परीनं त्यांनी नेहमीच आटोकाट प्रयत्न केला. परंतु मोठा होताना जागतिक घटना, घडामोडी यांचं ज्ञान मला क्वचितच मिळालं याची मला जाणीव आहे. अशा परिस्थितीत, जेव्हा मी सोळा वर्षांचा झालो तेव्हा साम्यवादी चीनच्या आक्रमणाविरुद्ध देशाचं नेतृत्व करण्यासाठी मला पुढं व्हावं लागलं.

मनाची शांती

तिबेटवर जे काही संकट कोसळलं, ते सांगण्यापूर्वी, आधीच्या सुखा-समाधानाच्या आमच्या जीवनाचं चित्रण करणं मला आवश्यक वाटतं.

तिबेटला अनेक शेजारी आहेत; पूर्वेकडे आणि उत्तरेकडे चीन, मंगोलिया, पूर्व तुर्कस्तान आणि भारत, ब्रह्मदेश त्याचबरोबर नेपाळ, सिक्किम आणि भूतानची राज्यं दक्षिणेला आहेत. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि सोविएत युनियन हे देखील आमच्या जवळ आहेत. गेली अनेक शतकं यातल्या अनेक शेजाऱ्यांशी आमचं नातं आहे. त्यातही विशेषत: भारताबरोबर, गेल्या हजारो वर्षांपासून आमचे दृढ धार्मिक बंध आहेत; खरं तर आमचं अक्षर हेच मुळी संस्कृतातून आलं. कारण, जेव्हा बौद्ध धर्म भारतातून तिबेटमध्ये आणला गेला तेव्हा तिबेटी लिपीच नव्हती. त्यामुळे धर्मग्रंथ अनुवादित होऊन तिबेटी लोकांकडून वाचले जावेत यासाठी लिपीची गरज निर्माण झाली. मंगोलिया आणि चीनबरोबरही आमचे धार्मिक आणि राजकीय संबंध आहेत. खूप पूर्वीच्या काळात आमचे पर्शिया आणि तुर्कस्थानबरोबरही संबंध होते, त्यामुळं अजूनही इराणच्या आणि तिबेटच्या कपड्यांमध्ये एक प्रकारचे साधर्म्य आहे. त्या मानानं अलीकडच्या काळात, विसाव्या शतकाच्या सुरुवातीला रशियाबरोबर आमचे राजकीय संबंध होते आणि त्यानंतर दीर्घकाळपर्यंत ब्रिटनबरोबर होते.

असे शेजारसंबंध असले तरी तिबेटी हा पूर्णपणे वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण वंश आहे. आमचं रूप, ठेवण, एकूणच दिसणं, आमची भाषा आणि चालीरिती या आमच्या कुठल्याही शेजारी देशापेक्षा भिन्न आहेत. आमच्या बाजूच्या कुठल्याही आशियाई देशाशी आमचं मानववंशीय नातं नाही.

इतरांपासून जाणीवपूर्वक दुरावा हीच नजीकच्या भूतकाळातील तिबेटची ओळख होती. बाहेरच्या जगात ल्हासाला बरेचदा 'फॉरबिडन सिटी' म्हणजे 'प्रवेशाला मज्जाव असलेलं शहर' म्हटलं जायचं. जगापासून तुटकपणा, वेगळेपणा स्वीकारण्यामागे दोन कारणं होती. हा देश निसर्गत:च वेगळा म्हणून बाजूला काढल्यासारखा आहे हे पहिलं कारण. गेल्या दशकापर्यंत भारत किंवा नेपाळच्या सरहद्दीपासून ल्हासाला जायला दोन महिन्यांचा प्रवास करावा लागत होता.

हिमालयातल्या अनेक उंच खिंडींमधून हा मार्ग जायचा आणि वर्षातला बहुतांश काळ तो बंदच झालेला असायचा. तिबेट आणि चीनच्या सीमारेषेच्या इथं असलेल्या माझ्या जन्मठिकाणापासून ल्हासाचा रस्ता आणखीनच लांब होता. मी मागे सांगितलंच आहे, की ती सीमाच मुळी समुद्रकिनारा आणि चीनमधील बंदर यापासून हजारो मैल लांब होती.

त्यामुळं 'दूर असणं' हे जणू आमच्या रक्तातच होतं. कमीत कमी परदेशी लोकांना आमच्या देशात यायची परवानगी देऊन आम्ही आमच्या नैसर्गिक 'दूरत्वा'त भरच घातली होती. कारण अगदी साधं होतं, आम्हाला संघर्षाचा -खास करून चीनबरोबर संघर्षाचा अनुभव आला होता आणि त्यामुळं शांततेनं राहणं आणि आमची स्वत:ची संस्कृती आणि धर्म टिकवणं याशिवाय आम्हाला कुठली महत्त्वाकांक्षाच नव्हती. अगदी शांत आणि सुस्थितीत राहायला मिळावं म्हणून जगापासून आपल्याला स्वत:ला

अलिप्त ठेवणं हाच सर्वोत्तम मार्ग आहे असं आम्हांला वाटलं. असं धोरण म्हणजे मोठी चूक होती हे मला खरोखरच मान्य केलं पाहिजे. भविष्यात जगातल्या सर्व भागांमधल्या पाहुण्यांसाठी तिबेटचे दरवाजे सताड खुले राहावेत हाच माझा उद्देश असून, तो साध्य होईल अशी मला आशा आहे.

तिबेटला जगातला सर्वात जास्त धार्मिक देश असं म्हटलं जातं. त्यात कितपत तथ्य आहे याचा मला निर्णय असा काही करता येणार नाही, पण निश्चितपणे सर्वसाधारण तिबेटी माणूस ऐहिक गोष्टींपेक्षा आध्यात्मिक गोष्टींना कमी लेखत नाही. तिबेटमध्ये प्रचंड प्रमाणात असलेले मठ हे तिबेटचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणता येईल. निश्चित आकडे उपलब्ध नाहीत, पण बहुधा एकूण लोकसंख्येपैकी दहा टक्के माणसं भिक्षू किंवा भिक्षूणी होते. आमच्या समाजरचनेचं दुपदरी स्वरूप यातून लक्षात येतं. खरं तर मी दलाई लामा म्हणून अधिकारात असताना गृहस्थ आणि संन्यस्त अधिकाऱ्यांना एकत्र आणलं गेलं. मला दोन प्रधानमंत्री होते - एक धर्मगुरू आणि एक सामान्य प्रशासक आणि त्याच्या खालची बरीचशी कार्यालयं अशीच दुपदरी होती.

क-शग किंवा मंत्रिमंडळात साधारणपणे चार सदस्य होते, त्यांच्यापैकी एक भिक्षू आणि इतर तीन जण सामान्य नागरी अधिकारी होते. मंत्रिमंडळात पदानं खालची अशी दोन कार्यालयं होती : यिग-छुङ् (म्हणजे सचिवालय) ज्याचे मुख्य अधिकारी चार भिक्षू असायचे; आणि हे थेट दलाई लामांना उत्तराधिन होते तसंच ते धार्मिक घटनांचेही प्रमुख होते. त्याच्या जोडीला छे-खङ् (अर्थविभागीय कार्यालय) हे कार्यालय होतं. चार सामान्य नागरिक याचे मुख्य होते आणि ते राज्याची अन्य खाती सांभाळायचे.

सरकारला आवश्यक असे जे अन्य विभाग असतात, म्हणजे परराष्ट्र खाते, कृषी विभाग, कर आकारणी, टपाल व डाक विभाग, संरक्षण खाते, सैन्य इ. अशा विभागांना दोन किंवा तीन सभापती असायचे. दोन प्रमुख न्यायमूर्ती असायचे आणि शहरी न्यायालयात दोन न्यायाधीश होते. आणि शेवटी म्हणजे तिबेटच्या अनेक प्रभागांमध्ये दोन-दोन राज्यपाल होते.

राष्ट्रीय सभा तीन प्रकारांनी बोलावली जाई. त्याचं जे सर्वात छोटं रूप होतं, ते बहुतांश वेळा भरवलं जायचं. त्यात 'यिग-छुङ्' आणि 'छे-खङ्'चे आठ अधिकारी असायचे. त्यांच्याबरोबर इतर वरिष्ठ अधिकारी, ल्हासाच्या जवळच्या तीन मोठ्या मठांचे प्रतिनिधी, असे मिळून एकूण वीस प्रतिनिधी व्हायचे. हा गट मूलभूत होता आणि एखाद्या विशिष्ट प्रश्नाची चर्चा करण्यासाठी तीस सदस्यांची बैठक तो बोलवू शकत असे. यात अन्यही महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे उदाहरणार्थ, दलाई लामाच्या पुनरावताराच्या शोधाची शहानिशा करणं, खात्री पटवणं अशासाठी सरकारी आणि बिनसरकारी पातळ्यांवरच्या चारशे सदस्यांची पूर्ण मोठी बैठक बोलावली जाऊ शकत असे.

मठांच्या बाहेर आमची समाजरचना जहागिरदारीची होती. जमीनदार अमीर-उमराव एका टोकाला आणि अतिशय गरीब शेतकरी दुसऱ्या टोकाला अशी मोठी आर्थिक तफावत होती. बड्या, श्रीमंत वर्गात जाणं अवघड होतं, पण अशक्य नव्हतं. उदाहरणच द्यायचं झालं तर, एखाद्या सैनिकाला शौर्यासाठी मानाचे पद आणि जमीन बहाल केली जाई आणि या दोन्ही गोष्टी पिढीजात असत.

पण दुसऱ्या बाजूला, मठांमध्ये आणि भिक्षू अधिकाऱ्यांमध्ये जी पदोन्नती होत असे

ती लोकशाही पद्धतीनं असे. समाजाच्या कुठल्याही गटातून एखादा मुलगा मठात प्रवेश घेऊ शकत असे आणि तिथली त्याची प्रगती ही त्याच्या स्वत:च्या कुवतीवर अवलंबून असे. आणि खरोखरच असं म्हणायला हरकत नाही, की श्रेष्ठ अशा ज्या ज्या लामांचे पुनरावतार आहेत त्यांच्यावर या लोकशाहीचाच प्रभाव होता. कारण या पुनरावतारी लामांनी बहुतेकदा अतिशय साध्या कुटुंबामध्ये पुनर्जन्म घेतला आहे. तेराव्या दलाई लामाच्या बाबतीत असंच घडलं. माझ्याप्रमाणेच जी माणस अगदी सामान्य वातावरणातून आली ती भिक्षूंच्या विश्वामध्ये अगदी वरिष्ठ पदांवर गेलेली आढळून आली.

(मी नाखुषीनंच भूतकाळ वापरतो आहे, कारण तिबेटवर आक्रमण झालेलं आहे आणि या क्षणी आमची कुठली संस्था टिकून राहिल आणि कुठली नष्ट होईल हे कुणीच सांगू शकणार नाही.)

मठांमध्ये त्यांच्या गरजा भागवण्यासाठी त्यांचे त्यांचे भिक्षू कारागिर असायचे आणि ते काही एका प्रमाणात उद्योगही करायचे. काही भिक्षूंना अनुदान म्हणून मोठ्या जमिनी मिळालेल्या होत्या आणि काही जणांकडे देणग्या होत्या त्यांची त्यांनी गुंतवणूक केलेली होती. पण काहीजणांकडे यांपैकी कुठलीच मालमत्ता नसे. ते व्यक्तिगत भेटी स्वीकारत. काहीजण सावकारीही करायचे आणि त्यातले काहीजण, मी मान्यच करू शकणार नाही असे मोठे व्याजदर ठेवायचे; पण एकंदरीत सामान्यपणे पाहता ते आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण काही नव्हते. त्यांच्यापैकी बरेच जण कमी-अधिक प्रमाणात सरकारी मदतीवर, त्यातही विशेष करून अन्नाच्या पुरवठ्यासाठी सरकारच्या सहाय्यावर अवलंबून असत. याच कारणासाठी पोतालातील तळघरं आणि अन्यत्र ठिकाणी, सरकार हे धान्य, चहा आणि लोणी त्याबरोबर कापडाचेही साठे राखून ठेवत असे. अर्थात, पर्यायानं हा निधी कुणाकडून जमा होत असे, तर सामान्य लोकांकडून भाड्याची रक्कम यातून किंवा करातून.

मी सैनिकांचा उल्लेख केला आहेच. आमच्याकडे सैन्य होतं पण ते अगदी छोटं होतं. त्यांचं मुख्य काम होतं सरहद्दीवरच्या चौक्यांवर माणूसबळ ठेवणं आणि देशात येणाऱ्या अनधिकृत अशा परदेशी नागरिकांना थोपवणं. याच सैन्याकडे पोलीस बळाचंही काम असे. फक्त ल्हासामध्ये त्याची गरज नसे, कारण तिथं व मठात त्यांचे स्वत:चे पोलीस दल असे. ल्हासामध्ये हे सैन्यदल समारंभांना लष्करी रंग आणत असे. मी राजवाड्यातून जिथं भेट द्यायला जायचो तिथं ते मानवंदना देण्यासाठी उभे असत. यामागे एक रंजक इतिहास आहे. पन्नास वर्षांपूर्वी आमचा जेव्हा चीनबरोबर संघर्ष चालू होता तेव्हा माझ्या पूर्वीच्या अधिकाऱ्यानं लष्कर अगदी अद्ययावत करायचं ठरवलं. त्या कामासाठी थोड्या काळाकरिता काही परदेशी प्रशिक्षकही नेमले. कुठल्या परदेशी लष्करदलाला सर्वोत्कृष्ट म्हणावं आणि कुणाच्या धर्तीवर प्रशिक्षण देणं उत्तम हे सांगणारं कुणीच नव्हतं. त्यामुळं झालं काय, की एक पलटण प्रशिक्षित झाली रशियाच्या प्रशिक्षकाकडून, एक जपानी तर दुसरी ब्रिटिश प्रशिक्षकाकडून! ब्रिटिश पद्धत ही सर्वात जास्त सोयीस्कर वाटली. त्यामुळं मग संपूर्ण लष्कराची ब्रिटिश पद्धतीनुसार व्यवस्था लावली गेली. ब्रिटिश प्रशिक्षक जवळजवळ एका पिढीपूर्वीच तिबेट सोडून गेले, पण 1949 पर्यंत सैन्य त्याचे कवायतीचे आदेश देण्यासाठी ब्रिटिश शब्दच वापरत होते. आमच्या भाषेत लष्करी म्हणून असे शब्दच नव्हते आणि तिबेटी संचलनात लष्कराची बँडपथकं 'इटस् अ लाँग वे टू टिपेररि', 'आउल्ड लँग साइन' आणि 'गॉड सेव्ह द किंग' यांची धून वाजवत असे;

परंतु या सुरावटींचे शब्द फार पूर्वीच विसरले गेले. एखाद्या तरी तिबेटी माणसाला ते कधी नीटसे ठाऊक तरी होते का याबद्दल शंका आहे. मला, आमचं लष्कर कालविपर्यास करणारं किंवा असमंजस होतं असं चित्र मात्र बिलकूल उभं करायचं नाही. ते तसं कधीच नव्हतं. आजपर्यंत त्याच्यात कधी यांत्रिकीकरण केलं गेलं नव्हतं कारण ते सारं अशक्यच होतं. आमच्या प्रचंड देशाचं एखाद्या आक्रमणापासून रक्षण करावं या दृष्टीनं आमचं लष्कर फारच लहान होतं; पण त्याचं जे मर्यादित कार्यक्षेत्र होतं त्या हेतूसाठी ते अगदी परिणामकारक होतं आणि त्यातली माणसंही शूर होती.

मला असं वाटतं, की ज्या कुणाला तिबेटमध्ये रस आहे त्यानं ल्हासातील आयुष्याबद्दल वाचलं असावं. कारण बऱ्याचशा परदेशी प्रवाशांनी तिबेटला भेट देताना ल्हासा हेच त्यांचं ध्येय ठेवलं आणि त्याबद्दल पुस्तकं लिहिली. त्यामुळं मला त्याची पुनरावृत्ती करायची नाही. या लेखकांनी बहुतांशी सर्व सतत चालणाऱ्या उत्सवांवर, वर्षभर चालत राहणारे समारंभ, श्रीमंत माणसांनी दिलेल्या साग्रसंगीत मेजवान्या, लिंग-कोर नावाचा वर्तुळाकार रस्त्याला घातलेली प्रदक्षिणा, उन्हाळ्याच्या दिवसातल्या नदीकाठच्या सहली म्हणजे सगळ्यांचा आवडता कार्यक्रम - या साऱ्यांची त्यांनी वर्णनं केली आहेत. खरं तर या सगळ्या कार्यक्रमांबद्दल, सण-समारंभाबद्दल प्रवाशांनाच बारीकसारीक तपशीलांनिशी वर्णनं करायला माझ्या अनुभवापेक्षा जमलं असेल, कारण त्यातल्या बऱ्याचशा कार्यक्रमांमध्ये व्यक्तिशः मी काही सहभागी झालो नव्हतो. मी जेव्हा जेव्हा समारंभामध्ये भाग घेतला, तेव्हा तेव्हा साहजिकच त्या कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी मीच असायचो आणि एकूणच साऱ्याचं मर्म म्हणजे माझ्याबद्दल लोकांना असलेला नितांत आदर हे होतं. त्यामुळं, ज्या कार्यक्रमांमध्ये माझा सहभाग नसायचा ते मी पडद्याआडून पाहायचो. हे कार्यक्रम म्हणजे पोतालातील धार्मिक नृत्य किंवा नोर्बूलिङ्गाच्या बागेतील नाटकांचे प्रयोग. मी कुणालाही न दिसता मला ते सारं पाहता यायचं. पण मला प्रवासी लोकांच्या कथांबाबत एक सर्वसामान्य टिप्पणी द्यायला मात्र आवडेल. आम्ही तिबेटी, धार्मिक असो किंवा करमणुकीचा, कुठलाही समारंभ आणि कार्यक्रम समरसून पाहतो. आम्हाला रुबाबदार कपड्यातली माणसं आणि तसे कार्यक्रम आवडतात, तसंच सगळ्यात महत्त्वाचा राष्ट्रीय गुणधर्म म्हणजे विनोदाची आवड. आम्ही पाश्चात्यांसारखे त्याच त्याच गोष्टींना सारखं हसू की नाही ते माहीत नाही, पण आम्ही जमेल ते कारण शोधून हसत असतो. पाश्चात्त्य लोक म्हणूनच आम्हाला विशेषणं वापरतात - 'आरामशीर' किंवा 'खुशालचेंडू' स्वभावाचे! अगदी कठीण, बिकट प्रसंग ओढवला तरच आमची विनोदबुद्धी काम करत नाही.

ल्हासा ही एकच अशी जागा होती, की जिथं सामाजिक जीवन आणि सण-समारंभ इतक्या साग्रसंगीत साजरे व्हायचे. या शहराबाहेर आणि इतर काही नगरांमध्ये तसंच मठांमध्ये लोकांचं लौकिक जीवन किंवा सामान्य दिनक्रम हा अन्य ठिकाणच्या शेतकरी वर्गाप्रमाणेच असे. फक्त शांतपणाच्या, एकांताच्या प्रमाणात थोडाफार फरक असायचा इतकंच. अंतरं प्रचंड होती आणि पायपीट करत किंवा घोड्यावर स्वार होऊन टपालाची ने-आण करणाऱ्या माणसांशिवाय एकमेकांशी संपर्काचं साधन नव्हतं. डोंगराळ भाग, त्यामुळं हवामान अत्यंत खडतर आणि मातीचा दर्जा अगदी बेताचा. त्यामुळं लोकसंख्या तुरळक असायची आणि आयुष्यही शांत, संथ आणि अतिशय साधं-सरळ. तिबेटमधली अशी दूर-दूर राहणारी बरीचशी माणसं ल्हासाला कधी गेलेलीही नसायची किंवा तिथलं

कुणी त्यांना भेटलं असेल असंही क्वचितच घडायचं. वर्षानुवर्ष ते जमीन कसायचे आणि इतर प्राणी यांचं संगोपन, पालन करायचे आणि त्यांच्या स्वत:च्या क्षितिजापलीकडे असलेल्या जगाबद्दल ना त्यांनी कधी ऐकलं, ना कधी हे जग पाहिलं. माझं मत आहे, केवळ तिबेटमध्येच नव्हे, तर जगातल्या सर्वच गरीब देशांमध्ये असे अनेक लोक असतात; मग त्याचं सरकार कोणत्याही पद्धतीचं का असेना.

प्रत्येक तिबेटी माणूस हा सभ्य आणि दयाळू माणूस असतो, असं मला ढोंगीपणानं मात्र अजिबात म्हणायचं नाहीये. अर्थात, आमच्यातही आमचे गुन्हेगार आणि पापी लोक होतेच की. एखादं उदाहरण द्यायचं तर सांगता येईल, की आमच्याकडे अनेक भटके लोक होते, त्यांच्यापैकी बरेचसे लोक जरी शांतताप्रिय होते, तरी त्यांच्यापैकी काही टोळ्या डाकूंच्या टोळ्यासारख्या होत्या. त्याचा परिणाम म्हणून काय व्हायचं, की काही भागात वस्ती करून स्थायिक झालेल्या लोकांना सशस्त्र राहून स्वत:ची काळजी घ्यायला लागायची; आणि या भागांमध्ये जाणारे प्रवासी स्वत:च्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं मोठ्या गटांमधून जाणं पसंत करायचे. माझा जिथं जन्म झाला त्या पूर्वेकडच्या भागात राहणारे लोक, त्यात मग 'खांपा'ही येतात, हे सारे एकंदरीत पाहता कायदा पाळणारे होते; पण समर्थ आणि स्वतंत्र अशा पुरुषार्थाचं लक्षण म्हणून या सारया मंडळींना, अन्य कुठल्याही मालमत्तेपेक्षा बंदूक बाळगणं हे सगळ्यात जास्त महत्त्वाचं वाटायचं.

असं असलं तरीसुद्धा अगदी सगळ्यात जास्त रानटी अशा ठिकाणी आणि सर्वात जास्त रासवट अशा हृदयांमध्ये देखील 'धर्म' हा भाव व्यापून असायचा. भटक्या लोकांच्या दरिद्रीतल्या दरिद्री तंबूत त्याची प्रतीकं दिसायची : एक वेदी आणि तिच्यापुढं तुपाचा दिवा तेवत असायचा.

माझ्या शिक्षणाच्या काळात फक्त आमच्या समाजरचनेबद्दलच ऐकलं होतं; आणि सर्वसाधारण तिबेटी लोकांना हेच नैसर्गिक वाटायचं. त्यांनी सरकारविषयक इतर कुठल्या विचारप्रणालीचा विचारही केला नाही. पण जसा मी मोठा होऊ लागलो तसतसं मला त्याच्यातल्या उणिवा जाणवू लागल्या. आमच्या इथली संपत्तीची विषम वाटणी ही खचितच बौद्ध शिकवणुकीला धरून नव्हती. नंतरच्या काही वर्षात मला जेव्हा तिबेटमध्ये प्रभाव टाकेल अशी सत्ता मिळाली, तेव्हा मी काही मूलभूत सुधारणा घडवून आणल्या. मी पन्नास सदस्यांची एक सुधारणा समिती नेमली. यात गृहस्थ, भिक्षू अधिकारी आणि विविध मठांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता; आणि आणखी एक लहान स्थिर समिती नेमली. ज्या सुधारणा आवश्यक वाटतात त्यांच परीक्षण करणं, मोठ्या समितीला आणि पर्यायानं मला त्याबद्दलचं वृत्त तिला द्यावं लागायचं.

कर गोळा करण्यात साधीसोपी सुधारणा केली गेली. प्रत्येक जिल्ह्याकडून होणारया वसुलीची रक्कम सरकारनं निश्चित केलेली होती. अनंत काळापासून जिल्ह्यातील जबाबदार अधिकारयांनी त्यांचे स्वत:चे खर्च किंवा पगार भागवण्यासाठी जितका जास्त पैसा, जितक्या जास्त प्रमाणात वसूल करता येईल तो करावा ही जणू समजूतच रूढ झाली होती. कायद्यानं याला परवानगी होती, त्यामुळं लोकांना रक्कम अदा करावीच लागे. जेव्हा यातून अन्यायालाच झुकतं माप मिळतं आहे, हे मला जाणवलं तेव्हा मी फारसा मोठा नव्हतो. त्यामुळं मंत्रिमंडळ आणि सुधारणा समिती यांच्याशी सल्लामसलत करून मी संपूर्ण रचनाच बदलून टाकली. जिल्ह्यातील अधिकारयांनी

त्यानुसार, जेवढी ठरवली आहे तेवढीच अचूक रक्कम गोळा करावी आणि संपूर्ण रक्कम खजिन्याच्या स्वाधीन करावी. सरकारकडून त्यांना एक निश्चित पगार द्यावा अशी योजना केली. यामुळं काही जिल्हाधिकारी वगळता सार्‍यांनाच समाधान वाटलं. काहींना ते खटकलं, कारण पूर्वी ते त्यांना हवा तेवढा पैसा कमावू शकत होते!

जमीन मालकीच्या पद्धतीमध्ये आमच्याकडे जास्त पायाभूत सुधारणा होणं गरजेचं होतं. तिबेटमधील संपूर्ण जमीन ही राज्याची मालमत्ता होती आणि बहुतेक सर्व शेतकर्‍यांना कसायला त्यांची जमीन राज्याकडून मिळत असे. त्यांच्यापैकी काही जण वस्तूरूपात त्यांचं भाडं भरत. हे भाडं त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात असे. सरकारकडून मठांना, लष्कराला आणि अधिकार्‍यांना ज्यातून या वस्तू वाटल्या जात, त्या सरकारी साठ्याचा मूळ स्रोत अशा रीतीनं जमणार्‍या वस्तू हा होता. काहीजण शारीरिक श्रमांच्या रूपात मोबदला द्यायचे तर काहीजण सरकारी अधिकार्‍यांना, काही वेळा मठांना नेहमी प्रवासाची साधन मोफत पुरवायचे. माझे पूर्वाधिकारी, जे तेरावे दलाई लामा होते, त्यांनी ही मोफत प्रवासाची साधन पुरवायची पद्धत बंद केली. कारण त्यानं गरीबांवर अन्याय्य ओझं पडायचं. त्यांनी घोडे, खेचरं आणि याक यांच्या वापरावर निश्चित रक्कम किंवा भाडं ठरवून दिलं होतं. पण त्यानंतरच्या काळात, सगळ्या किमती वाढल्या होत्या, ठरवलेले भाडं अपुरं पडायला लागलं होतं आणि प्रवासाची साधनं मागण्याचा हक्क अनेकजणांना मिळाला होता. म्हणून मग मी आदेश काढला, की आता पुढं भविष्यात मंत्रिमंडळाच्या खास परवानगीशिवाय दळणवळणाची साधनं मागता येणार नाहीत. त्याचबरोबर मी त्याकरिता द्यावी लागणारी रक्कमही वाढवून दिली.

हे शेतकरी कुळं होते किंवा भाडोत्री होते हे म्हणणं कदाचित दिशाभूल करणारं ठरेल. जमीन ही राज्याच्या मालकीची होती ही केवळ संकल्पनाच होती. शेतकर्‍याची जमीन ही वंशपरंपरेनं पुढं जाणारी होती, तो इतरांना ती भाड्यानं देऊ शकत असे, गहाण ठेवू शकायचा किंवा अगदी तिच्यावरचा त्याचा हक्क विकून टाकू शकत असे. अर्थात, जमिनीवरचा हक्क क्वचितच विकला जात असे, कारण आपल्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे जमीन आहे तशी सोपवणं हे शेतकर्‍याचं पहिलं कर्तव्य होतं. त्यानं जर त्याच्या उत्पन्नाच्या किंवा कष्टांच्या मोबदल्यात त्याचं देणं चुकतं केलं नाही तर त्याचा मालकी हक्क गमावला जाई. चुकती करण्याची रक्कम तशी काही अतिरेकी प्रमाणात नसे. त्यामुळं वास्तवात त्याला खर्‍या, मुक्त मालकाचेच हक्क असत आणि त्याचं वस्तूरूपातलं देणं हे एका अर्थी जमिनीवरचा कर भरणंच होतं; भाडेपट्टी नव्हे.

अनेक वर्षांपासून, जेव्हा जेव्हा अडचणीची वेळ येई तेव्हा सरकार या शेतकर्‍यांना कर्ज देत असे. माझ्या असं लक्षात आलं, की ही कर्जाऊ रक्कम किंवा व्याज पुन्हा वसुली करण्याबद्दल काही प्रयत्नच केले गेले नाहीत. मग ही रक्कम एवढी फुगली होती, की शेतकरी तिचा भरणा करूच शकणार नाहीत हे स्पष्टच दिसत होतं. माझ्या समितीनं सविस्तर चौकशी केली आणि आम्ही तीन गटांमध्ये शेतकर्‍यांची विभागणी करायचं ठरवलं. जे साठलेलं व्याज किंवा भांडवल अजिबात परत करू शकणार नाहीत अशांना कर्जातून पूर्णपणे मुक्त केलं. काहीजण असे होते, की त्यांना वार्षिक उत्पन्नातून व्याज भरणं शक्य झालं नसतं, पण भांडवलाची परतफेड करता येईल एवढी साठवणूक केली होती. आणि मग अशांना हप्त्याहप्त्यानं परतफेड करायला सांगितलं गेलं. मात्र काहीजण कर्ज मिळाल्यानंतर चांगल्यापैकी श्रीमंत झाले होते, त्यांना व्याज आणि

भांडवल असं दोन्हीही हप्त्याहप्त्यानं परत करावं लागलं. या उपायाचं शेतकऱ्यांनी स्वागत केलं. बऱ्याच जणांना त्यांच्या डोक्यावर लोंबकळत राहणाऱ्या कर्जामुळं चिंता वाटू लागली होती, त्यामुळे आपापली नेमकी परिस्थिती काय आहे हे कळल्यानं त्यांना हायसं वाटलं.

ज्या मोठमोठ्या खाजगी मालमत्ता होत्या त्याबाबतीत तातडीनं सुधारणा करणं हे आमच्या समाजव्यवस्थेत अतिशय गरजेच होतं. अमीर-उमरावांच्या कुटुंबांना कित्येक वर्षांपूर्वी या मालमत्ता देणगीदाखल मिळाल्या होत्या. ही मालमत्ता आनुवंशिक होती आणि तिच्या बदल्यात अशा प्रत्येक कुटुंबाला त्यांच्यातील एका मुलाला शिकवून-सवरून सरकारी अधिकारी म्हणून काम करायला पाठवायला लागायचं. काही कुटुंब ही राज्याला पैसेही चुकते करत असत. मालमत्तेच्या उरलेल्या उत्पन्नातून अधिकाऱ्यांचे पगार दिले जात. अशाप्रकारे बाहेरचे लोक अधिकारी म्हणून नेमले जायचे. या स्थावर मालमत्तांच्या जागी अमीरांच्यासाठी शेतकरी काम करायचे. त्या परिस्थितीवर सरकारचा कुठलाही थेट वचक नसायचा; आणि जमीनदार न्यायाचा जहागिरदारी हक्क वापरायचे. हे करण्यासाठी त्यांना दिवाणजी किंवा कारभारी प्रतिनिधी नेमावे लागत, कारण त्यांच्यापैकी बहुतेकजण राज्याची कामं, जबाबदारी पार पाडण्यासाठी वर्षातला बहुतांश काळ ल्हासामध्येच असत.

माझ्या समितीनं आणि मंत्रिमंडळानं या जुन्या व्यवस्थेचा सर्वांगीण अभ्यास केला. जेव्हा त्यांच्याकडून शिफारशी आल्या तेव्हा मी ठरवलं, की या मोठमोठ्या मालमत्तांचा मोठा भागही पुन्हा राज्याच्या मालकीत आला पाहिजे आणि ज्या कुटुंबांच्याकडे ही मालमत्ता असेल त्यांना त्याबद्दल भरपाई दिली जावी. त्याबरोबरच अधिकाऱ्यांनाही रोख पैशांच्या स्वरूपात पगार दिले जावेत. त्यामुळं जे शेतकरी जमीन कसत होते त्यांच्यात या जमिनीचं नंतर वाटप केलं जावं. त्यामुळं काय झालं असतं, की सारेच शेतकरी हे राज्याची कुळं या तत्त्वावर समान पातळीवर आणले गेले असते आणि न्यायव्यवस्थेत सुसूत्रता आणणंही शक्य झालं असतं. अगदी हीच सुधारणा, मठांना ज्या जमिनी मिळालेल्या होत्या त्यांच्याबाबतीतही करणं गरजेचं होतं, पण आम्ही खाजगी मालकीच्या मालमत्तांपासून सुरुवात करायचं ठरवलं.

असं असूनही, या सुधारणांचा टप्पा गाठण्यापूर्वीच आमच्यावर चिनी लोकांचा अंमल सुरू झाला होता आणि त्यांच्या संमतीशिवाय हे दूरगामी बदल आम्ही राबवू शकत नव्हतो; पण ते जमीन वाटपाबद्दलच्या ज्या साम्यवादी कल्पना घेऊन आले होते, त्या कल्पनांचा तिबेटी लोकांना विलक्षण तिटकारा होता. अशा परिस्थितीत जर आम्ही ही लोकप्रिय होऊ शकणारी सुधारणा घडवून आली असती तर चिनी सुधारणा या जास्त अप्रिय, अमान्य झाल्या असत्या. त्यामुळे, आम्ही कितीही नेटानं आग्रह लावून धरला तरी ते आमच्या योजनेला 'हो' म्हणत नव्हते अन् 'नाही' पण म्हणत नव्हते. आणि अखेरीस आमच्यावर असे कठीण प्रसंग कोसळले, की ती योजनाच बासनात गुंडाळून ठेवावी लागली.

अशाप्रकारे मध्ययुगीनपासून आधुनिकेपर्यंत आम्ही आमच्या समाजरचनेमध्ये बदल घडवून आणायला सुरुवात तर केली होती, परंतु आमचा ज्यावर ताबा नव्हता अशा घटनांनी आमची प्रगती खुंटवली गेली. सर्वसामान्य अशा तिबेटी माणसांचा जो मोठा वर्ग तिबेटमध्ये होता त्याच्या सुधारणेसाठी खूप काही करणं बाकी होतं. पुढच्या

प्रकरणात, मला आणि माझ्या सरकारला भविष्यात काय काय करायचं आहे, ते मी लिहिणारच आहे. आमची समाजरचना, आमच्या देशाचं हवामान याचा विचार करून देखील तिबेट आनंदी भूप्रदेश होता असं मला वाटतं. तिथल्या समाजाच्या पद्धतीत खरोखरच अन्यायाला वाव होता, पण एकंदरीत पाहता तिबेटी लोक अन्यायी वृत्तीचे नव्हते. पूर्वी असलेल्या जहागिरदारी पद्धतीतही जे काही संघर्ष घडायचे त्यात माणसा-माणसातलं क्रौर्य फारच कमी होतं, आणि सर्व प्रकारच्या स्थित्यंतरांमध्ये धर्म हा नियामक असा प्रभावी घटक होता आणि सातत्यानं सुख-शांतीचा आणि आधार वाटेल असा स्रोत होता.

पुनर्जन्माबद्दलचा विश्वास - कर्मसिद्धांत - यांच्यामुळे माणूस नशिबातली विषमता मान्य करतो - कदाचित विनासायास मान्य करतो, असं इतर धर्माच्या लोकांकडून नेहमीच म्हटलं जातं, पण हे अर्धसत्यच आहे. अगदी गरीब असा तिबेटी शेतकरी त्याच्या श्रीमंत तिबेटी माणसाचा फारसा द्वेष करत नाही किंवा राग राग करत नाही. त्याचा तसा फारसा कल नसतो, कारण त्याला ठाऊक असतं, की त्यांच्यापैकी प्रत्येकजणच मागच्या जन्मात पेरलेल्या बीजाची फळं भोगतो आहे. पण दुसऱ्या बाजूनं पाहिलं तर माणसानं त्याचं वर्तमान आयुष्य सुधारायचं असेल तर त्याला नाऊमेद करेल असं काहीच कर्मसिद्धान्तात नाही. अर्थात, इतरांचंही आयुष्य सुधारावं म्हणून आमचा धर्म प्रोत्साहन देतो. सर्व प्रकारचा खरा परोपकार हा दुहेरी फायद्याचा आहे - जो मदत घेतो त्याला वर्तमान आयुष्यात मदत होते आणि जो मदत देतो त्याला वर्तमान आयुष्यात किंवा त्याच्या पुढच्या आयुष्यात उपकारक होतो. या दृष्टिकोनातून तिबेटी लोक आमची समाजरचना कुठलाही प्रश्न न करता स्वीकारतात.

आमची समाजरचना जरी सामंतशाहीची होती तरी अन्य सामंतशाहींपेक्षा वेगळी होती, कारण त्याच्या अग्रस्थानी होता - चन-र-सिग, म्हणजे असं अस्तित्व, की ज्याच्याबद्दल शेकडो वर्षांपासून सर्व लोकांनी सर्वश्रेष्ठ, उत्कट असा आदरभाव बाळगलेला आहे. लोकांना जाणवायचं, की राज्याच्या या चिल्लर अशा अधिकाऱ्यांपेक्षा न्यायाची दाद मागता येईल अशी वरिष्ठ जागा आहे, ती विश्वासार्ह आहे; आणि खरं तर परंपरांचा वारसा सांगणारा आणि प्रशिक्षित असलेला व दलाई लामाची कृपादृष्टी असणारा असा माणूस क्वचितच जुलमी राज्यकर्ता झाला असता.

अशाप्रकारे आम्ही आनंदी होतो. अपेक्षा या, इच्छा आणि असमाधान घेऊन येतात; शांत स्थिर मनातून आनंद झुळझुळत येतो. असंख्य तिबेटी लोकांसाठी, लौकिक आयुष्य खडतर होतं, पण ते लोक इच्छांचे, तृष्णेचे बळी मात्र ठरलेले नव्हते; आणि आमच्या डोंगरामधल्या साधेपणात आणि गरिबीत, जगातल्या बहुतेक सर्व शहरांपेक्षा जास्त अशी मनाची शांती वसत होती.

आमचा शेजारी – चीन

तिबेटमध्ये जेव्हा माझं सक्रिय राज्य होतं त्या काही वर्षांच्या काळात 'राष्ट्र' म्हणून आम्हाला असलेला कायदेशीर दर्जा आमच्यासाठी आत्यंतिक महत्त्वाचा विषय झाला. त्याआधी आम्हाला अशी चिंता फारशी कधी वाटली नव्हती. त्यामुळे आता यावेळी जगातलं आमचं जे स्थान आहे त्याचा वस्तुनिष्ठ इतिहास मला सांगायचा आहे.

इतिहासपूर्व काळात तिबेट हा जंगलं आणि बर्फाळ पर्वत यांनी वेढलेला निर्मनुष्य असा (खपश्ररपव) मध्यसमुद्र म्हणून समजला जायचा. जेव्हा इथं माणसं आली त्यांच्यापैकी काहीजणांना इतरांनी नेता, प्रमुख म्हणून मान्यता दिली आणि या प्रमुखांनी आपापल्या टोळ्यांच्या आयुष्याला दिशा दिली.

'ञ-ठ्रि-चन-पो' ह्या पहिल्या राजाबरोबर 'काष्ठ-व्याघ्र' वर्षामध्ये, जवळजवळ 2000 वर्षांपूर्वी एकात्मिक तिबेट राष्ट्र म्हणून या टोळ्या एकत्र आल्या. हा काळ होता साधारण ख्रिस्तपूर्व 127 किंवा (भारतीय कालगणनेनुसार) 418 म्हणजे भगवान बुद्धांच्या मृत्यूनंतरचा. त्याच्यानंतर राजांच्या चाळीस पिढ्या गेल्या. पहिल्या सत्तावीस राजांच्या कारकीर्दीत 'बोन' नावाचा धर्म देशात भरभराटीस आला. त्याबरोबर अनेक चमत्कारिक श्रद्धाही होत्या.

जो अठ्ठाविसावा राजा होता, त्याचं नाव होतं 'ल्ह-थो-रि-ञन-चन' त्याच्या राज्यकालात तिबेटच्या इतिहासातली पुढची सगळ्यात महत्त्वाची घटना घडून आली. भगवान बुद्धाच्या शिकवणुकीचा एक खंड त्याच्या हातात पडला आणि तिबेटमध्ये बौद्ध धर्माच्या प्रसाराला सुरुवात झाली.

'सोङ्चन गम्पो' या तेहतिसाव्या राजानं नवीन धर्म अधिक घट्टपणे रुजावा, स्थिरावावा यासाठी प्रयत्न केले. 'पृथ्वी-वृषभ' वर्षात (म्हणजे ख्रिस्तोत्तर 629, भगवान बुद्धांच्या मृत्यूनंतर 1,173 वर्षांनी) त्याचा जन्म झाला, आणि जेव्हा तो लहान होता तेव्हा त्यानं त्याच्या 'थुमि सम्भोट' नावाच्या मंत्र्याला भारतात शिक्षणासाठी पाठवलं. त्यानं परत तिबेटमध्ये आल्यानंतर सध्या प्रचलित असलेलं तिबेटी मुळाक्षर घडवलं. राजानं आध्यात्मिक आणि व्यावहारिक आयुष्यासाठी नीतिनियम घालून दिले. धार्मिक सेवेसाठी दहा नियम आणि नागरिकांसाठी वर्तनाचे सोळा नियम तयार केले. ल्हासामधल्या जोरवांगसकट मंदिरं आणि लहान देवळं आणि पोतालाच्या इमारतीचं काम त्याच्या राजवटीत चालू झालं. त्याला तीन तिबेटी बायका होत्या. तरी त्यानं चिनी आणि नेपाळी राजकन्यांशी विवाह केला. कदाचित त्यांच्या प्रेरणेमुळं नेपाळ आणि चीनमधून भगवान बुद्धाच्या दोन प्रतिमा आणवल्या गेल्या. मी चार वर्षांचा असताना जेव्हा पहिल्यांदा ल्हासाला पोहोचलो तेव्हा यातल्या एका मूर्तीला मी प्रणाम केला होता. 'सोङ्चन गम्पो' राजाच्या राजवटीत भारत, चीन आणि नेपाळकडून वेगवेगळी व्यापारकौशल्ये शिकण्यात आली, त्यामुळं तिबेटची आर्थिक व्यवस्था सुधारली. लोक अधिक समृद्ध आणि आनंदी बनले आणि देशाच्या सत्तेतही वाढ झाली.

'ठ्रि-दे चुगतन' नावाच्या छत्तिसाव्या राजाच्या कारकीर्दीत चीन आणि तिबेटच्या युद्धाचा काळ ओढवला आणि 'त-र-लु-गोङ्' नावाच्या राजाच्या मंत्र्यानं अनेक चिनी सुभे जिंकले. या मंत्र्याच्या विजयाचं स्मृतीचिन्ह म्हणून पोतालासमोर उभारलेला एक

दगडी खांब अजूनही दिसतो.

'ठ्रिझोङ् देउचन' या सदतिसाव्या राजाचा जन्म 'लौह-अश्व' वर्षात (ख्रिस्तोत्तर 790, भगवान बुद्धाच्या मृत्यूनंतर 1,334 वर्षांनी) झाला. त्याच्या राजवटीत त्यानं उपाचार्य बोधिसत्व आणि आचार्य पद्मसम्भव या भारतीय विद्वान पंडितांना तिबेटमध्ये यायचं निमंत्रण दिलं. अनेक भारतीय पंडित आणि संस्कृतचे जाणकार असलेले तिबेटी लोक यांनी भगवान बुद्धाची शिकवण तिबेटी भाषेत अनुवादित करायचं काम केलं. याच सुमारास 'सम-ये' मठाची स्थापना झाली आणि तिबेटमध्ये पहिल्या सात भिक्षूंना दीक्षा मिळाली. देशाच्या राजकीय सत्तेत देखील वाढ झाली आणि तिबेटच्या आधिपत्याखाली अनेक दूरदूरचे भाग आले.

'ङ्-दग-ठ्ररल' या चाळीसाव्या राजाच्या राजवटीत तिबेटमधल्या भिक्षूंची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली. या राजाचा जन्म होता 'अग्नि-श्वान' वर्षातला (म्हणजे ख्रिस्तोत्तर 866, भगवान बुद्धाच्या मृत्यूनंतर 1,410 वर्षांनी). त्याच्या कारकीर्दीत तिबेट आणि चीनमध्ये पुन्हा युद्ध झालं. पुन्हा याही वेळी तिबेटनं चीनचा बराच मोठा भाग व्यापला. परंतु तिबेटी लामा आणि हशङ् म्हणून ओळखले जाणारे चिनी भिक्षू या दोघांनी शांतता प्रस्थापित करायला मध्यस्थाचं काम केलं. साइनो-तिबेटी सरहद्दीवर ज्या भागाला खुङ्-खु मेरू असं म्हटलं जातं, त्या सरहद्दीवर दगडी खांबांची खूण आहे आणि असेच खांब चिनी सम्राटाच्या राजवाड्यासमोर आणि ल्हासामध्ये जोरवांग समोर उभारले आहेत. या तीन खांबांवर सामंजस्याची एक प्रतिज्ञा चिनी आणि तिबेटी अक्षरांमध्ये कोरलेली आहे. त्यावर म्हटलेलं आहे, की चिन्हांकित केलेल्या सरहद्दीपुढं तिबेटनं आणि चीननं आक्रमण करू नये.

तिबेटच्या इतिहासात तेहतिसावा, सदतिसावा आणि चाळीसावा असे जे तीन राजे होऊन गेले, त्यांना श्रेष्ठतम म्हणून गणलं जातं आणि आजही लोक त्यांचा गौरव करतात.

'लौह-खग' वर्षात (ख्रिस्तोत्तर 901, भगवान बुद्धाच्या मृत्यूनंतर 1,445 वर्ष) लङ् दरमा नावाचा एकेचाळीसावा राजा राज्यावर बसला आणि त्याची राजवट म्हणजे त्याच्या पूर्वाधिकाऱ्यांनी जे जे काही केलं त्यावर पाणी फिरवणारी ठरली. त्यानं, त्याच्या मंत्र्यांनी तिबेटच्या चालीरिती आणि बौद्ध धर्म पार नष्ट करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. सहा वर्षांच्या अत्यंत दुष्ट, जुलमी राजवटीनंतर त्याचा खून झाला.

तिबेटच्या पहिल्या राजाच्या राजवटीपासून एकेचाळिसाव्या राजाच्या मृत्यूपर्यंत हजारो वर्षं उलटली आणि या पहिल्या हजारो वर्षांमध्ये राष्ट्राची धीम्या गतीनं लौकिक आणि आध्यात्मिक प्रगती शक्ती वाढली होती. पण 'लङ् दरमा' याच्या मृत्यूनंतर राज्याचं विभाजन झालं. राजाला दोन राण्या आणि दोन मुलगे होते. त्यापैकी एक त्याचा मुलगा नव्हता. राण्यांच्यात भांडणं झाली. मंत्र्यांनी वेगवेगळ्या बाजू घेतल्या आणि शेवटी दोन्ही राजकुमारांच्यात तिबेटची विभागणी झाली. यानंतर तिबेटचे आणखी तुकडे पडले. यामुळं अनेक छोट्या छोट्या राज्यांची भूमी बनून गेला. 347 वर्ष हे असंच राहिलं.

ख्रिस्ती कालगणनेनुसार तेराव्या शतकात श्रेष्ठ अशा साक्य मठातील 'छोग्यल फग-पा' नावाचा थोर लामा, चिनी सम्राट से-छेन याचा धार्मिक अध्यापक होण्यासाठी चीनमध्ये गेला. आणि मग 'जल-वृषभ' वर्षात (म्हणजे ख्रिस्तोत्तर 1253, भगवान

बुद्धाच्या मृत्यूनंतरचं 1,797 वं वर्ष) तो परत आला आणि तिबेटच्या तीनही प्रांतांचा म्हणजे छोल-खा यांचा राज्यकर्ता बनला. आमच्या देशातला तो पहिला धर्मगुरू राजा होता. नंतरची शहाण्णव वर्ष साक्य इथल्या वीस लामांनी या देशावर राज्य केलं आणि त्यानंतरची शहाऐंशी वर्ष - 1349 पासून 1435 ख्रिस्तोत्तर काळ - 'फगमो डुब-पा' वंशातल्या अकरा लामांनी ओळीनं राज्य केलं. नंतर पुन्हा निधर्मी राजसत्ताक पद्धतीची पाळी आली. 1435 ते 1565 या काळात रिन पुङ् राजाच्या चार पिढ्यांनी राज्य केलं आणि 1566 ते 1641 एवढी वर्ष तीन 'चङ् पा' राजांनी राज्य केलं.

'जल-अश्व' वर्षात (म्हणजे ख्रिस्तोत्तर 1642 किंवा भगवान बुद्धाच्या मृत्यूनंतर 2,186 वं वर्ष) संपूर्ण देशाची लौकिक सत्ता दलाई लामानं घेतली. सध्या जे तिबेटी सरकार 'गा-दन फोड्रङ्' म्हणून ओळखलं जातं, त्याची रचना झाली. तेव्हापासून जवळजवळ तीनशे वर्षांपेक्षा जास्त काळ क्रमानं दहा दलाई लामा हे तिबेटचे आध्यात्मिक किंवा पारलौकिक आणि लौकिक सत्ताधीश झाले; आणि त्यांच्या अनुपस्थितीत किंवा त्यांचं वय कमी असेल तेव्हा सामान्य आणि भिक्षू राजकारभाऱ्यांनी त्यांच्या नावे सरकार चालवलं.

पाचव्या दलाई लामान ही लौकिक सत्ता ताब्यात घेतली. पहिला दलाई लामा हा गेलुग-पा पंथाचा संस्थापक गेलुग-पा पंथाचा शिष्य होता. हे दोन्हीही अवतार हे अगदी अपवादात्मक म्हणावेत असे विद्वान होते. पहिला आध्यात्मिक बाबतीत प्रवीण आणि पाचवा आध्यात्मिक आणि ऐहिक बाबतीत निष्णात. ख्रिस्तोत्तर 1652 मध्ये चीनचा पहिल मांचू सम्राट शून झेत्से यानं त्याचा स्वत:चा धार्मिक अध्यापक म्हणून पाचव्या दलाई लामाला चीनला भेट द्यायचं निमंत्रण दिलं. त्यानं त्याचं 'तिबेटचा राजा' म्हणून सन्मानानं स्वागत केलं.

दलाई लामाच्या अडीच शतकांच्या राजवटीत, म्हणजे ख्रिस्ती एकोणीसावं शतक संपेपर्यंत दलाई लामा आणि चीनचे सम्राट यांच्यात अन्योन्य असं व्यक्तिगत नातं होतं; एका बाजूला धार्मिक नेतृत्वाचं नातं आणि दुसऱ्या बाजूनं तसं म्हटलं तर अंधुकपणे निधर्मी म्हणता येईल असं नेतृत्व होतं. सम्राटानं त्याचे प्रतिनिधी -ज्यांना अम-बन असं म्हटलं जायचं - त्यांना ल्हासामध्ये नेमलं. त्यांना काही अधिकार होते; पण ते त्यांचे अधिकार दलाई लामाच्या सरकारमार्फत चालवायचे. नंतर काळाच्या ओघात त्यांचे अधिकार विरत गेले.

माझे पूर्वाधिकारी असे जे तेरावे दलाई लामा होते, त्यांच्या राज्याच्या कारकीर्दीत तिबेटनं पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय संबंध वाढवायला सुरुवात केली. तेराव्या दलाई लामानं आमच्या लोकांचं जीवनमान कसं सुधारलं आणि त्यानं लष्कराची पुनर्रचना कशी केली त्याबद्दल मी आधी सांगितलं आहेच. त्यानं विद्यार्थ्यांना परदेशात शिकायला पाठवलं; छोटे जलविद्युत प्रकल्प आणि उद्योग यांची त्यानं उभारणी केली; डाकसेवा आणि तार यांची सुरुवात केली; तिकिटं, सोन्याचांदीची नवी नाणी आणि चलनी नोटा वापरात आणवल्या. गेलुग-पा मठाच्या धार्मिक अभ्यासातील पाठ्यक्रमामध्ये त्यानं बदल घडवले. आणि त्याच्या राज्यकालात तिबेटनं अनेक आंतरराष्ट्रीय करार केले.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी भारतातल्या ब्रिटिश सरकारला तिबेटबरोबर व्यापार करायचा होता आणि हिमालयातील तिबेटी आणि ब्रिटिश भागामध्ये सीमाप्रश्नाबद्दल अनेक लहान वाद झाले. याबाबतीत तिबेटबरोबर बोलणी करायची की

चीनबरोबर, याबद्दल ब्रिटिशांना धोरण ठरवावं लागलं. 1247 मध्ये तिबेट आणि चीनने सही केलेला तहाचा एकमेव दस्तऐवज वगळता, 822 या वर्षात शिलालेख कोरलले स्तंभ उभारल्यापासून निवड करण्यासाठी ब्रिटिशांना काही मार्गदर्शन मिळेल, असा दुसरा कुठलाच आधार नव्हता. 1893 मध्ये त्यांनी सीमा ठरवण्याबाबत चीनबरोबर एका करारावर सही केली आणि त्यानुसार तिबेटच्या दक्षिण भागात ब्रिटिशांना काही विशिष्ट असे व्यापाराचे हक्क मिळाले.

परंतु तिबेटी सरकारनं हा करार साफ धुडकावला. जेव्हा ब्रिटिश आणि चिनी आयुक्तांनी सीमेच्या खुणा उभारल्या, तेव्हा ते सारे जाईपर्यंत तिबेटी लोकांनी वाट पाहिली आणि मग त्यांनी त्या खुणा काढून टाकल्या. नंतर जेव्हा ब्रिटिशांनी व्यापार सवलतींसाठी अर्ज केला तेव्हा सरकारनं त्यांना स्वच्छ सांगितलं, की करारावर फक्त चीननं सही केलेली आहे आणि तिबेटमध्ये वगैरे त्याचा जोर चालत नाही. आरामशीर राहणाऱ्या तिबेटी लोकांमध्ये पिढ्यान्पिढ्या राहणारे चीनी अम-बन होते. तिबेटबरोबर एखाद्या सत्तेला आंतरराष्ट्रीय करार करावयाचा आहे असं पहिल्यांदाच घडत होतं आणि केवळ 'अम-बन यांची ल्हासामधील उपस्थिती' एवढ्यावरून चीनचं सरकार तिबेटच्या वतीनं करारावर सही करून टाकण्याचा अधिकार दाखवेल, असं तिबेटी लोकांच्या ध्यानी-मनीही नव्हतं. चिन्यांनी त्यांचं स्वातंत्र्य हिरावून घेईपर्यंतही त्यांनी कधी असा विचार केलाच नाही.

व्यापाराच्या हक्कांना प्रतिसाद मिळत नाही आणि त्यांच्या सीमादर्शक खुणाही गायब झाल्यामुळं ब्रिटिशांना जास्त जास्त चीड येऊ लागली. भारताचा ब्रिटिश व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन याने म्हटलं, त्याच्या मते- "तिबेटवरचं चीनचं अधिराज्य हे केवळ घटनात्मक कपोलकल्पना आहे - केवळ फुकाचा दंभ आहे. दोन्ही बाजूंना सोयीस्कर म्हणून केवळ त्याची राखण केली आहे." 1903 मध्ये त्यानं ल्हासाला लष्करी फौज पाठवली. वाटेत बराच काळ हे सैन्य थांबलं. तेव्हा अम-बन यांनी ब्रिटिश सेनापतीला निरोप पाठवला, की 'त्यानं भेट घेण्यासाठी यावं'; पण तिबेटी सरकार अम-बन याला ल्हासा सोडण्याची परवानगी देईना. ब्रिटिश सैन्याशी तिबेटी लष्करानं लढा दिला आणि त्यांचा पराभव झाला. दलाई लामा पूर्वेकडे सटकला. ब्रिटिशांनी 1904 मध्ये ल्हासाच्या दिशेनं आगेकूच केली आणि तिबेटी सरकारबरोबर करारावर सही केली.

दलाई लामाच्या अनुपस्थितीत, दलाई लामाचा शिक्का वापरून राजप्रतिनिधीनं सही केली त्याचबरोबर मंत्रिमंडळ, राष्ट्रीय सभा आणि डेपुङ सेरा आणि गा-दन येथील मठांनीही शिक्कामोर्तब केलं. वस्तुतः एक स्वतंत्र सत्ता म्हणून तिबेटनं औपचारिकरित्या आंतरराष्ट्रीय करार केला होता. त्यानं सीमा आणि व्यापारी हक्क निश्चित केले आणि इतर काही गोष्टींबरोबर हेही पक्कं केलं, की ब्रिटिशांच्या संमतीशिवाय कोणतीही परकीय सत्ता तिबेटच्या कामकाजात दखलअंदाजी करणार नाही. या सर्व कागदपत्रांमध्ये चीनचा अजिबात नामोल्लेखही नव्हता आणि त्याला वगळलं म्हणजेच अन्य सर्व परकीय सत्तांमध्ये त्याचा समावेश केला गेला होता. ज्या क्षणी करारपत्रांवर सह्या झाल्या, त्यानंतर लगेच ब्रिटिश सैन्य तिबेटमधून बाहेर पडलं आणि नंतर पुन्हा कधीही त्यांनी आम्हाला धाक दाखविला नाही.

या तहाबद्दल चीनच्या सरकारनं कधी आक्षेप घेतला नाही. दोन वर्षानंतर म्हणजे 1906 मध्ये ब्रिटिशांना धास्ती वाटू लागली, की त्यांच्या व्यापार सवलतींमध्ये चीन

ढवळाढवळ करेल की काय? आणि म्हणून त्यांनी असा करार केला, की ज्यामुळे चीन सरकारनं औपचारिकपणे 'अँग्लो-तिबेटी' तह स्वीकारला. या आंतरराष्ट्रीय कराराला जी काही किंमत द्यायची असेल त्यानुसार तिबेटमध्ये चीनची जी काही उरली-सुरली सत्ता होती ती देखील संपुष्टात आली होती.

असं असूनही, ब्रिटिशांचं वागणं विसंगत होतं. आशियातील 'प्रभावशाली घटक' म्हणून रशिया आणि ब्रिटन यांमध्ये या काळात शत्रुता होती. 1907 मध्ये त्यांनी करार केला, की त्या दोघांनीही तिबेटमध्ये ढवळाढवळ करायची नाही आणि चीनच्या मध्यस्थीनंच तिबेटबरोबर बोलाचाली कराव्यात. हा करार पूर्वीच्या कराराशी विरोधाभास दाखवणारा होता. आमच्या देशावर चीनची व्यवहारतः कुठलीही सत्ता नाही याचा ब्रिटिशांना अनुभव असतानाही त्यांनी तिबेटवरती चीनच्या अधिराज्याला मान्यता देऊन टाकली.

आधिराज्य ही एक संदिग्ध आणि जुनाट कल्पना आहे. कदाचित 1720 ते 1890 या काळातले तिबेट आणि चीनमधले नातेसंबंध वर्णन करण्यासाठी म्हणून वापरलेली किंवा त्या अर्थाच्या जवळ जाणारी पाश्चात्त्य राजकीय संज्ञा म्हणूनही असेल. ते काहीही असलं तरीपण ती फारच अयोग्य होती. या संज्ञेच्या वापरामुळं पाश्चात्त्य मुत्सद्यांच्या पिढ्यान्पिढ्यांची दिशाभूल झालेली आहे. परस्परांमधलं आध्यात्मिक नातं त्यांनी कधी विचारातच घेतलं नाही किंवा दलाई लामा आणि मांचू सम्राट यांच्यातलं नातं ही व्यक्तिगत बाब होती, हेही त्यांनी कधी लक्षात घेतलं नाही. अशी अनेक प्राचीन पौर्वात्य नातीगोती आहेत ज्यांचं वर्णन उसन्या अशा पाश्चात्य राजकीय शब्दांमधून करता येणार नाही.

ब्रिटिशांच्या विसंगत वागण्यामागचं एक स्पष्टीकरण असं, की तिबेटमध्ये त्यांनी स्वतःला पुरेपूर फायदेशीर असं स्थान मिळवलं होतं, त्यावर नव्या कराराचा कुठलाही परिणाम झालेला नव्हता. त्यांना तिबेटशी थेट बोलणी करायचे हक्क सोडायचे होते, पण त्याचवेळी रशियानं हे करू नये हाही डाव साधायचा होता. पण दुसरं स्पष्टीकरण असं असू शकतं, की पहिले दोन तह हे भारतातील ब्रिटिश सरकारनं केले होते आणि तिसरा मात्र लंडनमधल्या ब्रिटिश सरकारनं केला होता; आणि या एकमेकांना आपापसातील व्यवहार फारसे ठाऊक नसावेत. चीन आणि तिबेटमधलं जे वैशिष्ट्यपूर्ण, अगदी पौर्वात्य म्हणता येईल असं जे नातं होतं, त्याचा अर्थ इंग्लंडपेक्षा भारतातच जास्त कळला असता; परंतु या सर्व घडामोडींमध्ये नव्या करारावर सही करताना तिबेटला काय किंवा चीनला काय, विचारलंच गेलं नव्हतं. त्यामुळं चीनची आधिसत्ता तिबेटनं मानावी याची लेशमात्रही गरज नव्हती.

ल्हासामधल्या ब्रिटिशांच्या मोहिमेचा एक दुष्परिणाम झाला. तो म्हणजे 'आपली सत्ता नष्ट होतं आहे' या वस्तुस्थितीचं चीनला भान आलं. तिबेटी लष्कराला अतोनात जखमी करून ब्रिटिशांनी जेव्हा काढता पाय घेतला, तेव्हा चीननं काही केलं असतं तरी त्याला तिबेटींनी विरोध करण्याची शक्यता अगदीच कमी होती. रशियाई करारामुळं चीनला तर तिबेटमध्ये मोकळं रानच मिळालं होतं. त्याचवेळी ढवळाढवळ न करण्याचं बंधन ब्रिटिशांवर होतं. त्यामुळं ब्रिटनबरोबर करार असूनही चीननं तिबेटवर आक्रमण केलं. यावेळी भारतातील ब्रिटिश संरक्षणासाठी दलाई लामाला पुन्हा परागंदा व्हावं लागलं आणि 1910 मध्ये चीनचं सैन्य ल्हासाला पोहोचलं.

पण मांचू साम्राज्य डळमळीत होतं. 1911 मध्ये चीनमध्ये क्रांतीला तोंड फुटलं. तिबेटमधल्या चिनी पथकांचे पगार आणि रसद थांबली, त्यामुळं त्यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध उठाव केला आणि 1912 मध्ये 'अम-बन' यांच्याबरोबर, त्यांच्यापैकी उरल्यासुरलेल्यांनाही तिबेटी लोकांनी देशाबाहेर हाकलून लावलं. त्याचवेळी तिबेट पूर्णपणे स्वतंत्र झाला. 1912 पासून 1950 मध्ये चीनच्या आक्रमणापर्यंत चीन काय किंवा अन्य कुठल्याही राज्याची, कसलीच सत्ता तिबेटमध्ये नव्हती.

चिनी सैन्याची हकालपट्टी झाल्याच्या काळात दलाई लामा भारतातून परतला आणि त्यानं तिबेट हे स्वतंत्र राष्ट्र आहे म्हणून जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यानंतर, फार पूर्वी चिनी सत्तेनं दलाई लामाला भेट म्हणून जे शिक्के दिले होते त्याऐवजी तिबेटी लोकांनी भेट म्हणून दिलेले शिक्के वापरले गेले होते. काही प्राचीन तिबेटी दस्तऐवजांवर शब्द होते : 'चिनी सम्राटाच्या आज्ञेनं दलाई लामा हा बौद्ध धर्माचा मुख्य अधिकारी आहे'. परंतु तेराव्या दलाई लामानं हे शीर्षस्थान बदलून : 'भगवान बुद्धाच्या आज्ञेनं...' असं केलं.

अशाप्रकारे स्वातंत्र्य मिळवून आणि त्याची घोषणा करून झाल्यावर, या सर्व संघर्षांना कंटाळून जाऊन, आम्ही आमच्या प्राचीन अशा एकांतवासात, शांततेत शिरलो. आम्ही चीनबरोबर लेखी करार केला नाही आणि त्याचा परिणाम म्हणून आमच्या स्वतंत्र अस्तित्वाला आंतरराष्ट्रीय कायदेशीर दर्जा मिळाला नव्हता. 1913 मध्ये भारतातील सिमला येथील परिषदेत चीनच्या आणि तिबेटच्या प्रतिनिधींना निमंत्रण करून ब्रिटिशांनी हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. तीनही प्रतिनिधी समान पातळीवर भेटले आणि बऱ्याच मोठ्या चर्चेनंतर त्यांनी कराराचा मसुदा तरी तयार केला. या ठिकाणी चीनच्या आधिसत्तेची त्यांची कल्पना मान्य करण्यासाठी ब्रिटिशांनी तिबेटचं मन वळवलं, त्याचप्रमाणं तिबेटच्या स्वायत्ततेला मान्यता देण्यासाठी चीनचं मन वळवलं. ब्रिटन आणि चीननं तिबेटच्या प्रादेशिक स्वतंत्रतेच्या अबाधितपणाचा आदर राखणं, तिबेटमध्ये सैन्य न पाठवणं आणि तिबेट सरकारच्या व्यवस्थापनात ढवळाढवळ न करणं अपेक्षित होतं.

पण जरी चिनी प्रतिनिधींनी हा करार करण्यात पुढाकार घेतला होता, तरी चिनी सरकारनं यावर सही करायला नकार दिला आणि त्यामुळं फक्त तिबेट आणि ब्रिटननं सह्या केल्या; आणि एक स्वतंत्र जाहीरनामा करून, चीननं सही करायला नकार दिल्या कारणानं करारानुसार कुठलीही सोय-सवलत मिळण्यातून चीनला रद्द केलं गेलं. चीननं सही केली नाही आणि अशा कायदेशीर मार्गानं आधिसत्ताही सांगितली नाही.

साऱ्या गोष्टी तशाच राहिल्या होत्या. जेव्हा जेव्हा कुठला प्रश्न उभा राहिला तेव्हा तेव्हा चीनच्या सरकारनं आग्रहपूर्वक सांगितलं, की 'तिबेट हा चीनचा भाग आहे.' पण दरम्यानच्या काळात कुठलाही अधिकार असलेली चिनी माणसं तिबेटमध्ये नव्हती आणि अडतीस वर्ष तिबेटनं आपला स्वतंत्र मार्ग चोखाळला.

तिबेटनं चिनी-जपानी युद्धात भाग घेतला नाही आणि दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीही तिबेटनं तटस्थ राहण्यावर भर दिला. त्याचबरोबर तिबेटच्या भूभागातून भारतामधून चीनला युद्धसामग्री नेऊ द्यायला परवानगी नाकारली. या संपूर्ण काळात बाहेरच्या जगासमोर आपलं स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्याच्या दृष्टीनं तिबेटनं कोणतेही सक्रिय प्रयत्न केले नाहीत, कारण त्याची कधी फारशी गरजही वाटली नाही. पण एक मात्र

होतं, की वेळोवेळी इतर देशांची सरकारं अशा पद्धतीनं वागत होती की त्यांना हे स्वातंत्र्य मान्य होतं, हेच सिद्ध होत होतं. अशाप्रकारे 1947 मध्ये, जेव्हा दिल्लीत सर्व आशियाई देशांची परिषद भरली, तेव्हा तिबेटी प्रतिनिधी मंडळ इतरांप्रमाणेच समान पातळीवर उपस्थित राहिलं आणि इतर देशांच्या ध्वजांबरोबर तिबेटचा ध्वजही फडकला. त्याच वर्षी, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, भारतीय सरकारनं या शब्दांमध्ये तिबेटला संदेश पाठवला : "नवीन करार होऊन दोन्ही बाजूंना मान्य होईपर्यंत सध्या आहे त्या पायावर तिबेट सरकारशी संबंध चालू राहावेत असा आमचा हेतू आहे, त्याला दुजोरा मिळाल्यास भारत सरकारला आनंद वाटेल. ब्रिटिश सरकार भारतात असल्याच्या काळापासून ज्या ज्या देशांबरोबर भारताचे तहाचे संबंध परंपरेने चालत आले आहेत त्या सर्वांनी ही व्यवस्था स्वीकारली आहे." 1948 मध्ये तिबेट सरकारच्या वतीनं व्यापारी प्रतिनिधी मंडळानं भारत, चीन, फ्रान्स, इटली, युनायटेड किंगडम आणि अमेरिकेचा दौरा केला; आणि तिबेटच्या सरकारनं, प्रतिनिधींना जी पारपत्रं मंजूर केलेली होती, त्यांचा सर्व देशांच्या सरकारांनी स्वीकार केला होता.

आमच्या स्वातंत्र्याची पहिली बावीस वर्ष तिबेटमध्ये कुठल्याही प्रकारचे चिनी अधिकारी नव्हते; पण 1934 मध्ये तेराव्या दलाई लामाच्या मृत्यूनंतर धार्मिक भेटवस्तू देण्यासाठी चिनी प्रतिनिधी मंडळ ल्हासाला आलं. भेटवस्तू अर्पण केल्यानंतर हे प्रतिनिधी मंडळ ल्हासामध्येच थांबलं. यासाठी त्यांनी सबब सांगितली, की साइनो-तिबेटी सीमेबद्दल अपूर्ण राहिलेली काही बोलणी पूर्ण करायची आहेत. असं असलं तरी या चिनी लोकांचा दर्जा नेपाळी आणि ब्रिटिश लोकांप्रमाणंच आणि नंतर ल्हासामध्येच असलेल्या भारतीय मंडळाप्रमाणंच होता. नंतर 1949 मध्ये या उरलेल्या चिनी लोकांनाही देशाबाहेर हाकलण्यात आलं.

अशाप्रकारे या थोडक्यात सांगितलेल्या इतिहासातून असं सारांशरूपानं म्हणता येईल, की तिबेट हे एक वैशिष्ट्यपूर्ण असं प्राचीन राष्ट्र आहे आणि अनेक शतकं त्याचे चीनशी सौहार्दाचे संबंध होते, हे खरं आहे. चीन बलाढ्य होता आणि तिबेट दुर्बळ होता आणि चीननं तिबेटवर आक्रमण केलं असे प्रसंग आले. तसंच इतिहासात अजून मागे दृष्टिक्षेप टाकला तर लक्षात येतं, की तिबेटनं चीनवर आक्रमण केलं होतं. तिबेट हा चीनचा भाग आहे असा निर्देश करण्यासाठी इतिहासात कुठलंही ठोस कारण नाही. 1912 पासून दुर्दैवी अशा 1950 सालापर्यंत तिबेटनं इतर राष्ट्रांप्रमाणंच संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगलं. आणि जसा 1912 मध्ये होता तसाच -अगदी तसाच कायदेशीर दर्जा आम्हाला या काळात होता. न्यायपंडितांच्या आंतरराष्ट्रीय मंडळानं या दर्जाचा अगदी अलीकडच्या वर्षांपर्यंत अगदी बारकाईनं ऊहापोह केला आहे. माझं स्वत:चं मत उद्धृत करण्यापेक्षा या मान्यवर आणि नि:पक्षपाती मुत्सद्यांच्या समितीनं जो सारांश मांडला तोच मी उद्धृत करतो. हा सारांश संयुक्त राष्ट्र समितीला सादर करण्यात आला होता आणि 1959 मध्ये 'द क्वेश्चन ऑफ तिबेट अँड द रूल ऑफ लॉ' ('तिबेटचा प्रश्न आणि कायद्याचे राज्य') या त्यांच्या वृत्तात प्रकाशितही झाला.

1912 मध्ये चीनची हकालपट्टी करण्यावरून तिबेटची जी भूमिका आहे तिचे नक्कीच स्वातंत्र्य अबाधित राखण्याची कृती म्हणून योग्य वर्णन करता येईल. तिबेट कुठल्याही प्रकारे चीनचा अंकित भाग नव्हते आणि गुलाम राष्ट्रही नव्हते हे कायदेशीर मार्गाने स्पष्ट होतं. त्यामुळे 1911-12 मधील घटनांनुसार तिबेट हे चीनपासून व्यावहारिक आणि

कायदेशीररित्या स्वतंत्र असल्याचे स्पष्ट होते.

परचक्र

1948 मध्ये, मी अजूनी विद्यार्थीच होतो तेव्हा सरकारच्या कानावर आलं, की देशात चिनी साम्यवादी गुप्तहेर आहेत. आमचं लष्कर कितपत समर्थ आहे आणि कुठल्या परकीय सत्तेकडून आम्हाला लष्करी मदत वगैरे मिळत आहे काय, याचा शोध घेण्यासाठी ते आले होते.

त्यांना हवी असलेली माहिती काढून घ्यायला त्यांना फारसे कष्ट पडले नसतील. माझ्या माहितीनुसार तिबेटमध्ये आमच्या इथं फक्त सहा युरोपीय माणसं होती. त्यांच्यापैकी तीन जण - एक धर्मोदिशक आणि दोन रेडिओचालक हे लोक ब्रिटीश होते. उरलेल्या तिघांपैकी दोन ऑस्ट्रियाचे आणि एक श्वेत रशियाई होता. हे कसली लष्करी मदत करणार? युद्धकाळात भारतातील, नेमून दिलेल्या हद्दीतील नजरबंदीच्या ब्रिटिश छावण्यांमधले हे सारे निर्वासित होते. लष्कराशी संबंधित कुठल्याही गोष्टीशी त्यांचं काही घेणं-देणंच नव्हतं.

लष्कराबद्दल बोलायचं तर, अधिकारी आणि सैनिक मिळून 8,500 एवढं संख्याबळ होतं. त्यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त बंदुका होत्या. 50 वेगवेगळ्या प्रकारच्या तोफा, अडीचशे उखळी तोफा आणि दोन एकशे मशिनगन एवढी हत्यारं त्यांच्याजवळ होती. अनधिकृत प्रवाशांना थांबवणं आणि पोलीस दळाचं काम करणं, ही त्यांची कामं होती, हे मी आधी सांगितलं आहेच. युद्धाच्या दृष्टीनं हे सारं फारच अपुरं होतं.

जसजशा भावी संकटाच्या छाया पसरू लागल्या, त्या सुमारासच तिबेटच्या पूर्वेकडच्या भागांमधून जास्तच गंभीर बातमी कानावर आली. पूर्व तिबेटच्या राज्यापालाचं नाव होतं ल्ह-लु. त्याला छुमदो शहरात नेमलेलं होतं. ही जागा सरहद्दीजवळ होती; आणि एक ब्रिटिश रेडिओचालक त्याच्याबरोबर होता आणि दुसरा ल्हासामध्ये होता. लवकरच या राज्यपालाकडून सांकेतिक इशारे येऊ लागले. चिनी लष्कर मोठ्या बळानं हालचाली करत आहे आणि आमच्या पूर्व सरहद्दीजवळ त्यांची सैन्याची जमवाजमव सुरू झाली आहे, हे वृत्त त्यात येऊ लागलं. यावरून अगदीच उघड होतं, की हल्ला करण्याचा तरी किंवा आम्हाला भेडसावण्याचा तरी त्यांचा हेतू होता.

धोक्याची घंटा वाजवणारी ही बातमी पोहोचताच मंत्रिमंडळानं राष्ट्रीय सभेची बैठक बोलावली. गेल्या अनेक शतकांमध्ये आलेल्यापेक्षाही मोठा गंभीर धोका पूर्वेच्या बाजूनं तिबेटसमोर उभा राहिला होता हे उघडच होतं. चीनमध्ये साम्यवादाचा जय झाला होता अन् गेल्या अनेक पिढ्यांमध्ये नव्हती अशी लष्करी ताकद त्या देशाला मिळाली होती. त्यामुळं हा धोका आमच्यासाठी नुसताच बलाढ्य होता असं नव्हे, तर पूर्णपणे वेगळ्याच स्वरूपाचा होता. गेली अनेक शतकं, आम्हा दोन्ही देशांमध्ये काही ना काही तरी धार्मिक सहानुभाव होता. परंतु आता मात्र केवळ लष्करी धोका नव्हता तर एका वेगळ्याच परक्या, उपभोगवादी पंथाच्या वरचष्म्यालाही आम्हाला तोंड द्यायचं होतं. हा जो काही नवा पंथ होता, तो तिबेटमध्ये कोणालाही घृणास्पद वाटावा असाच होता.

राष्ट्रीय सभेत एकमतानं ठरवलं, की तिबेटमध्ये कुठलीही साधनसामग्री नाही, ना लष्कर, ना एखाद्या गंभीर आक्रमणाला तोंड देऊन स्वातंत्र्याचं रक्षण करावं एवढं माणूसबळ; त्यामुळं फार उशीर होण्याअगोदर चीननं आहे तिथं थांबावं याकरिता त्याचं

मन वळविण्याच्या अपेक्षेनं इतर देशांना तातडीनं कळकळीची विनंती करावी. ब्रिटन, अमेरिकी संघराज्य, भारत आणि नेपाळ या देशांना मदतीची विनंती करण्याच्या हेतूनं भेट देण्यासाठी चार प्रतिनिधी मंडळांची नेमणूक करण्यात आली. या मंडळांनी ल्हासा सोडण्याआधी या चारही देशांना तारा पाठवण्यात आल्या. आमच्या स्वातंत्र्याला स्पष्टपणे असलेला धोका आणि प्रतिनिधी मंडळ पाठवण्यामागची आमच्या सरकारची भूमिका याबद्दल या तारसंदेशात सांगितलं होतं.

या तारांना मिळालेली उत्तरं फारच नाउमेद करणारी होती. ब्रिटिश सरकारनं तिबेटच्या लोकांसाठी त्यांची गाढ सहानुभूती व्यक्त केली; आणि तिबेटची भौगोलिकता आणि भारताला दिलं गेलेलं स्वातंत्र्य ही कारणं दाखवून मदत देऊ शकण्यात असमर्थतता दाखवली. अमेरिकी संघराज्यांनीही साधारण अशाच स्वरूपाचं उत्तर पाठवलं आणि आमच्या प्रतिनिधी मंडळाचं स्वागत करायला नकार दिला. भारत सरकारनंही लष्करी मदत देऊ शकत नसल्याचं स्पष्ट करून आम्हाला सल्ला दिला, की 'आम्ही लष्करी विरोध करू नये पण सिमला कराराच्या आधारावर शांततापूर्ण मार्गानं मध्यस्थी व्हावी, तोडगा निघावा याकरिता चर्चेचा मार्ग मोकळा ठेवावा.' त्यामुळं लष्करी बाबतीत आम्ही पार एकाकी आहोत हे आम्हाला कळून चुकलं.

ल्ह-लु यांचा पूर्व तिबेटचा राज्यपाल म्हणून कार्यकाळ संपला आणि अशा अटीतटीच्या वेळी त्याच्या जागी ङ्वो ङ्वङ् जिग्मेद् या दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी लागली. ङ्वो यानं पूर्वभागात जाण्यासाठी ल्हासा सोडलं आणि परिस्थिती अतिशय नाजूक असल्यामुळं मंत्रिमंडळानं ल्ह-लु याला, आहे त्या ठिकाणी थांबून त्याच्या जागी आलेल्या पुढच्या व्यक्तिला मदत करावी आणि त्याच्याबरोबर जबाबदारी वाटून घ्यावी असं सांगितलं. पण 'मी सर्व जबाबदारी स्वीकारायला तयार आहे' असं लवकरच ङ्वो यानं सांगितलं आणि त्यामुळं ल्ह-लु याला परत बोलावून घेतलं गेलं. त्यानंतर नजिकच्याच काळात, कुठलीही औपचारिक सूचना न देता साम्यवादी चीनच्या लष्करानं तिबेटवर आक्रमण केलं.

थोड्याफार काळापर्यंत, क्वचित काही भागात तिबेटच्या लष्करानं त्याला यशस्वीपणे पतरवलं. त्यांना स्थानिक खांपा जमातीच्या स्वयंसेवकांची मदत मिळाली; पण आमच्या सैन्याची, संख्याबळ आणि तयारीच्या बाबतीत त्यांच्याशी तुलनाच होऊ शकत नव्हती. राज्यपालाच्या बदलामुळं व्यवस्थापनात गोंधळ झाला आणि ङ्वो यानं त्याचं मुख्य केंद्र छुमदोपासून मागे मागे पश्चिमेकडे हलवायला सुरुवात केली. जेव्हा तिबेटी गट सरहद्दीपासून मागे आले, छुमदोमध्ये पोहोचले, तेव्हा त्यांच्या लक्षात आलं, की त्यानं आधीच ती जागा सोडून दिली आहे. यामुळं त्यांना युद्धसामग्री, दारूगोळा यांचं शस्त्रागार जाळून टाकावं लागलं आणि त्याच्याबरोबर माघार घ्यावी लागली.

परंतु माघार घेण्याचा काहीच उपयोग झाला नाही. आपली संदेशवहन यंत्रणा तुटली आहे हे आणि त्याचप्रमाणं अधिक सपाट्यानं हालचाली करणाऱ्या चिनी दळानं आपल्यावर विजय मिळवला आहे हे ङ्वो याच्या लक्षात आलं. त्यामुळं त्याला आणि अनेक तिबेटी पथकांना शरणागती स्वीकारणं भाग पडलं.

छुमदो रेडिओ ट्रान्समीटर आणि त्याचा ब्रिटिश चालक हेही त्यांच्या हाती लागले; त्यामुळे काय काय घडतं आहे याची बातमी काही काळ सरकारपर्यंत पोहोचलीच नाही. चिनी सेनापतीच्या परवानगीनं ङ्वो यानं पाठवलेले दोन अधिकारी नंतर ल्हासाला आले.

‘ङ्वो कैदी आहे, शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून सत्ताधिकाऱ्यांनी बोलाचाली सुरू कराव्यात’ हे मंत्रिमंडळाला सांगण्यासाठी ते आले होते. त्याबरोबर चिनी सेनापतीनंही मंत्रिमंडळाला आश्वासन दिलं होतं, की चीन तिबेटच्या भूभागावर आणखी ताबा मिळवणार नाही.

दूरवरच्या तिबेटच्या पूर्वभागात या दुर्दैवी घटना, संकटं कोसळत असताना ल्हासातील सरकार दैवज्ञ आणि श्रेष्ठ लामा यांच्याशी सल्लामसलत करत होतं आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार मंत्रिमंडळ कळकळीची गंभीर विनंती घेऊन मला भेटायला आलं; ‘मी सरकारची जबाबदारी स्वीकारावी’ ही ती विनंती होती.

यामुळं मी विलक्षण चिंतेत पडलो. मी फक्त सोळा वर्षांचा होतो. माझं धार्मिक शिक्षणदेखील अजून पूर्ण झालं नव्हतं. त्याला कितीतरी अवधी होता. मला जगाबद्दल काही ठाऊक नव्हतं आणि राजकारणाचा अनुभव नव्हता; पण ‘मी किती अज्ञानी आहे आणि मला अजून कितीतरी शिकायचं शिल्लक आहे’ हे मला कळत होतं. ‘मी अजून खूपच लहान आहे’ असं म्हणून मी पहिल्यांदा हरकत घेतली. कारण राजप्रतिनिधीकडून सक्रिय रीतीनं ताबा घेण्यासाठी दलाई लामाचं अठरा हे वय ठरवलेलं होतं. दैवज्ञ आणि इतर लामा यांना अशी विनंती कोणत्या गंभीर कारणानं करावी लागली हे मला नक्कीच कळत होतं. एका दलाई लामाच्या मृत्यूनंतर राज्यकारभाराची बरीच रिक्त वर्ष, ही आमच्या सरकारच्या पद्धतीतील एक अपरिहार्य दुर्बलता होती. माझ्या अज्ञानदशेत, सरकारच्या पक्षांमध्ये दुफळी, कलह माजले होते आणि एकूणच देशाच्या कारभाराचा दर्जा खालावला होता. बहुतेक लोकांचा कल साधारणपणे जबाबदारी स्वीकारण्यापेक्षा टाळण्याकडेच होता. पण आताच्या घडीला मात्र आक्रमणाच्या धोक्यामुळं कधी नव्हती इतकी आम्हांला एकात्मतेची गरज निर्माण झाली होती. अशावेळी देशातल्या जनतेनं दलाई लामाचं म्हणणं विनातक्रार मान्य केलं असतं, म्हणजे ही जबाबदारी माझीच होती.

माझ्या मनात यामुळं प्रचंड खळबळ माजली. मी साशंक बनलो. दरम्यान राष्ट्रीय सभेची भेट झाली आणि त्यांनीही मंत्रिमंडळाच्या बरोबर त्यांची विनंती जोडली. आमच्या इतिहासातल्या अशा गंभीर क्षणी, मला माझी जबाबदारी झटकून चालणार नाही. मला माझं पोरवय मागे टाकून त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. मला जेवढं शक्य आहे तितकं बळ एकवटून साम्यवादी चीनच्या प्रचंड शक्तीविरुद्ध माझ्या देशाचं नेतृत्व करण्यासाठी मला सज्ज झालं पाहिजे, हे मला जाणवलं.

म्हणून परंपरागत सोहळ्यानं माझ्यावर सोपवण्यात आलेल्या सार्वभौम सत्तेचा काहीशा धास्तावलेल्या मनानंच मी स्वीकार केला. सर्वप्रथम मी एका माफीच्या जाहीरनाम्यानुसार तिबेटमधल्या तुरुंगातल्या प्रत्येक गुन्हेगाराला मुक्त केलं.

अगदी याच सुमारास, पूर्वेच्या भागातून माझा सर्वात मोठा भाऊ ल्हासात आला. जिथं आमचा जन्म झाला होता तिथल्या कुमबुमच्या मठात महंत म्हणून तो परत आला होता. चीनच्या आधिपत्याखालच्या या भागात महंत म्हणून असताना, चेङ काई शेकच्या अमदानीत राज्यपालाचा पाडाव कसा झाला आणि नवीन साम्यवादी सरकारच्या सैन्याची आगेकूच कशी झाली, या साऱ्यांचा तो साक्षीदार होता. गोंधळ, जुलूम आणि दहशत हे त्यानं वर्षभर पाहिलं होतं. या वातावरणात चिनी साम्यवाद्यांचं म्हणणं काय होतं, तर ते म्हणे लोकांना संरक्षण द्यायला आले होते आणि लोकांना त्यांचा

धर्म पाळण्याचं स्वातंत्र्य देणार होते. असं असून, त्याच वेळी दुसऱ्या बाजूनं त्यांनी पद्धतशीरपणे धार्मिक परंपरा मोडून काढायला आणि धार्मिक जीवन उद्ध्वस्त करायला सुरुवात केली होती. त्याला स्वत:ला कडक नजरकैदेत ठेवण्यात आलं होतं, त्याच्यावर साम्यवादी विचारांचा सतत मारा केला गेला होता आणि शेवटी चिनी लोकांनी त्याला सरळ सांगितलं होतं, की त्यांना संपूर्ण तिबेटवर पुनर्हक्क प्रस्थापित करायचा होता. त्यांचा हाच आग्रह होता, की तिबेट हा चीनचाच भाग होता आणि त्याचं पूर्णपणे साम्यवादी प्रांतात रूपांतर करायचा त्यांचा विचार होता. त्यांचं वर्चस्व, मी आणि माझ्या सरकारनं मंजूर करावं, यासाठी मन वळवण्याकरिता त्यानं त्यांचा गुप्त दूत म्हणून ल्हासाला जावं यासाठी त्याचं मन वळवायचा त्यांनी प्रयत्न केला. तो जर या कामात यशस्वी झाला तर त्याला तिबेटचा राज्यपाल करायचं वचनही त्यांनी दिलं होतं. अर्थात त्यानं असलं काही करायला साफ नकार दिला. तो जर सातत्यानं नकार देत राहिला तर त्याचं आयुष्य धोक्यात येईल, हे त्याच्या लक्षात आलं. तसंच त्यानं हाही विचार केला, की या निमित्तानं चिन्यांच्या कारस्थानांची माहिती देऊन मला सावध करता येईल. त्यामुळं त्यानं सर्व काही मान्य केल्याचं नाटक केलं आणि चिन्यांच्या देखरेखीतून सटकायची संधी साधली. आम्हाला असलेल्या सर्व धोक्यांची सविस्तर माहिती घेऊन तो ल्हासाला पोहोचला.

तोपर्यंत, आमच्या मंत्रिमंडळानं आमची परिस्थिती संयुक्त राष्ट्रांसमोर मांडण्याच्या दृष्टीनं पावलं उचलली होती. याचा विचार, निर्णय काय होतो आहे याची वाट पाहताना भारत सरकारचा सल्ला घेणं आणि आणखी हिंसाचार घडण्यापूर्वी चिन्यांशी सामोपचारानं काही बोलणी करता येतील का हे पाहणं, प्रयत्न करणं, हे मी माझं कर्तव्य समजलं. म्हणून मग छुमदो इथं असलेल्या लष्कराच्या नायकाच्या करवी चिनी सरकारला मी पत्र लिहिलं. त्यात मी म्हटलं, की 'मी सज्ञान नाही या काळात आपल्या देशांमधले संबंध ताणले गेले आहेत; पण आता मी सर्व जबाबदारी घेतली आहे आणि पूर्वीचे मैत्रीसंबंध पुनर्प्रस्थापित व्हावेत असं मला प्रामाणिकपणे वाटतं.' 'ज्या तिबेटी लोकांना त्यांच्या लष्करानं पकडलं होतं त्यांना परत करावं आणि तिबेटच्या ज्या भागावर त्यांनी जबरदस्तीनं कबजा केला आहे त्या भागातून त्यांनी परत फिरावं' ही विनंतीही मी त्यांना केली.

याच सुमारास, आमच्यासमोर असलेल्या धोक्याबद्दल जनमताची चाचपणी करावी यासाठी, माझ्या मंत्रिमंडळानं पुन्हा राष्ट्रीय सभा आयोजित केली. माझ्या दृष्टीनं या सभेतून निघालेला एक निर्णय मला आवडलेला नव्हता. चीनी लष्करानं ल्हासावर हल्ला करून ल्हासा ताब्यात घेण्याची शक्यता गृहीत धरून मी ल्हासा सोडावं असा हा निर्णय होता. मी ल्हासा सोडून ठरवलं, की 'मी शहर सोडावं. यतुंग शहरात जावं. हे शहर भारताच्या सीमेजवळ आहे आणि त्यामुळं मी वैयक्तिक धोक्यापासून बचावेन.' मला अजिबात जायचं नव्हतं. मी जिथं होतो तिथंच मला राहायचं होतं आणि माझ्या लोकांना जी होईल ती मदत करायची होती; परंतु मंत्रिमंडळानंही मला जायची विनंती केली आणि शेवटी मला त्यांचं म्हणणं मानावं लागलं. हा संघर्ष नंतर बरेचदा उद्भवणार होता, त्याबद्दल मी नंतर सांगेनच. मी तरुण आणि सशक्त होतो, माझ्या लोकांना जे जे धोके होते त्यात मी सहभागी व्हावं असं वाटणं ही माझी नैसर्गिक इच्छा होती; पण तिबेटी लोकांच्या लेखी 'दलाई लामा' ही व्यक्ती मात्र अतीव मौल्यवान होती. आणि जेव्हा

जेव्हा संघर्ष उद्‌भवत असे तेव्हा तेव्हा मी माझी काळजी घेण्याचा काय विचार करेन त्यापेक्षा माझे लोकच मला तळहातावरच्या फोडाप्रमाणं जपत, ही गोष्ट मला स्वीकारावी लागे.

म्हणून मी निघण्याची तयारी केली. निघण्याआधी दोन प्रधानमंत्र्यांची नेमणूक केली. त्यापैकी एक होता वरिष्ठ दर्जाची भिक्षू अधिकारी लोसङ्टाशी आणि दुसरा होता कसलेला अनुभवी असा नागरी अधिकारी. त्याचं नाव होतं लु-खङ्वा. मी त्यांना पूर्ण अधिकार दिले आणि दोघांत मिळून जबाबदारी दिली; आणि त्यांना सांगितलं, की जेव्हा सर्वात अत्यंत महत्त्वाची अशी एखादी बाब असेल तेव्हा त्यांनी माझ्याशी सल्ला-मसलत करावी.

अगदी वाईटातलं वाईट जरी काही घडलं तर कदाचित मला आश्रयासाठी भारतात जाता येईल, असं माझ्या मंत्र्यांना वाटत होतं. चाळीस वर्षांपूर्वी चिन्यांनी आक्रमण केलं तेव्हा माझ्या पूर्वाधिकाऱ्यांना असं करावं लागलं होतं. माझ्या खजिन्याचा लहानसा भाग मी तिथं पाठवून द्यावा असा मला सल्ला देण्यात आला. म्हणून काही सुवर्णकण (ऋृश्रव र्वीर्ीं) आणि चांदीच्या लगडी ल्हासातून नेऊन सिक्कीमच्या सीमेपलीकडे सुरक्षित ठेवण्यात आल्या. पुढची नऊ वर्ष त्या तिथं पडून होत्या. त्यानंतर त्यांची आम्हांला खूप गरज भासली.

नंतरचा एक अत्यंत कठोर असा फटका आम्हाला बसला तो एका बातमीच्या रूपात! संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेनं तिबेटच्या प्रश्नाची दखल घ्यायची नाही असं ठरवल्याची ती बातमी होती. त्यामुळं आम्ही पारच चिंतातूर झालो. 'संयुक्त राष्ट्र' ही एक न्याय मिळण्याची जागा म्हणून आम्ही विश्वास बाळगून होतो; आणि ब्रिटिशांच्या पुढाकारानं आमचा प्रश्न बाजूला सारला गेला हे ऐकल्यावर आम्ही विस्मयचकित झालो. ब्रिटिशांबरोबर दीर्घ काळपर्यंत आमचे मैत्रीचे संबंध होते; आणि ब्रिटिश राज्यातल्या अनेक सेवकांच्या बुद्धिमत्तेचा आणि हुशारीचा आम्हाला मोलाचा फायदा झालेला होता. अन् याच ब्रिटिशांनी एक स्वतंत्र शक्ती म्हणून आमच्याबरोबर करार करून आमच्या स्वातंत्र्याला मान्यता दिलेली होती. असं असूनसुद्धा ब्रिटिश प्रतिनिधीचं म्हणणं होतं, की तिबेटचं कायदेशीर स्थान फारसं स्पष्ट नाही. त्याला बहुतेक हे सुचवायचं होतं, की आमच्या देशात चिनी नाहीत अशी अडतीस वर्ष जरी झाली असली, तरी कदाचित आम्ही चीनच्या आधिपत्याखालचा घटक असू शकतो. भारतीय प्रतिनिधीचा दृष्टिकोनही अशाच पद्धतीनं नाऊमेद करणारा होता. त्याचं म्हणणं होतं, की शांततापूर्ण तडजोड करता येणं शक्य आहे आणि तिबेटच्या स्वायत्ततेचं रक्षणही करता येऊ शकतं. सर्वसाधारण सभेपुढं याची चर्चा घडून यावी याचा नाद सोडून देणं हा सर्वोत्तम मार्ग आहे.

कुणीही आम्हाला लष्करी मदत देऊ शकत नाही या पूर्वीच्या बातमीपेक्षा सुद्धा, ही अगदी निराशादायक बातमी होती. न्यायासाठी विनंती मांडण्यामध्येदेखील आता आमचे दोस्त मदत करणार नव्हते. चिनी लष्कराच्या टोळ्यांपुढं आम्हाला एकाकी पडल्यासारखं झालं.

अर्थात, आता आमच्याच इतिहासाकडे नजर टाकली तर आमच्याच धोरणांमुळे या दारुण परिस्थितीत आम्ही ढकलले गलो, हे कळणं सोपं आहे. 1912 मध्ये जेव्हा आम्ही संपूर्ण स्वातंत्र्य जिंकलं तेव्हा एकांताच्या कोशात जाताना आम्ही अगदी समाधानी होतो.

आमचं स्वातंत्र्य - जे आम्हाला अगदी सरळ वस्तुस्थिती वाटत होतं - ते बाहेरच्या जगापुढं सिद्ध होण्यासाठी कायदेशीर पुराव्याची जरूरी आहे, हा विचारच कधी आम्हाला शिवला नाही. संकट कोसळण्याआधी जर आम्ही 'लीग ऑफ नेशन्स' किंवा संयुक्त राष्ट्रांमध्ये सामील झालो असतो किंवा काही शक्तीशाली सत्ता असलेल्या देशांमध्ये राजदूत नेमले असते, तर स्वातंत्र्याच्या या खुणा कुठल्याही प्रश्नाशिवाय सहज स्वीकारल्या गेल्या असत्या. वेगवेगळ्या प्रसंगी केल्या गेलेल्या जुन्या करारांवर आधारित क्लिष्ट, बारकाव्यांच्या चर्चामुळं आज जे घडतं आहे तसं संशयाचं धुकं आमच्या न्यायाच्या सरळ मागणीवर पसरलं नसतं. कुणीही माणसं त्यांच्या निरूपद्रवी अशा एकांतात राहू शकणार नाहीत इतकं जग आता लहान झालेलं आहे, हा कडवट धडा आम्हाला शिकावा लागला.

जितकं शक्य आहे तिथपर्यंत नेटानं आमची बोलाचाली, चर्चा पुढं चालू ठेवणं एवढंच आम्ही करू शकत होतो. ङ्वो याला ज्या अधिकाराची गजर होती ते अधिकार त्याला द्यायचं आम्ही ठरवलं. त्यानं ल्हासाला जे दोन अधिकारी पाठवले होते, त्यांच्यापैकी एकजण माझा आणि माझ्या मंत्रिमंडळाचा निरोप घेऊन निघाला. या निरोपात आम्ही ङ्वो याला सांगितलं, की चिनी लष्कर तिबेटमध्ये आता जरासुद्धा पुढं सरकणार नाही या ठाम अटीवर त्यानं चर्चेला सुरुवात करावी. आम्हाला असं वाटलं होतं, की चर्चा कदाचित ल्हासा किंवा छुमदो इथं घडेल, जिथं चिनी लष्कर तळ ठोकून आहे तिथं होईल; पण भारतातील चीनच्या राजदूतानं, आमच्या प्रतिनिधी मंडळानं पेकिंगला जावं असा प्रस्ताव ठेवला. मी ङ्वो याला मदतनीस म्हणून अजून चार अधिकाऱ्यांची नेमणूक केली. हे सारेजण 1951 च्या सुरुवातीला पेकिंगमध्ये पोहोचले.

हे सारे ल्हासाला परतले पण्हते. कितीतरी काळानंतर त्यांच्या बाबतीत नक्की काय घडलं हे आम्हाला कळलं. त्यांनी जे वृत्त त्यावेळी सादर केलं त्यानुसार, ते सारे पोहोचले. मग चाऊ इन लाइ या चीनच्या विदेशमंत्र्यानं साऱ्यांना मेजवानीसाठी बोलावलं; आणि चिनी प्रतिनिधींशी त्यांचा औपचारिक परिचय करून दिला. परंतु पहिली बैठक सुरू होताच, मुख्य चिनी प्रतिनिधीनं आधीच तयार केलेला दहा कलमी मुद्यांचा आराखडा समोर केला. त्यावर अनेक दिवस चर्चा झाली. आमच्या प्रतिनिधी मंडळानं ठासून सांगितलं, की तिबेट स्वतंत्र आहे, आणि आपल्या मुद्यांच्या पुष्टीसाठी त्यांनी अनेक पुरावे सादर केले, पण चिनी लोकांनी त्यातलं काहीही मान्य केलं नाही. अखेरीस चिन्यांनी दुसरा एक सतरा कलमी सुधारित असा आराखडा तयार केला. हा आराखडा त्यांनी अंतिम निर्णय म्हणूनच सादर केला. त्यात काही बदल करण्याची किंवा सुधारणा सुचवण्याची परवानगी आमच्या प्रतिनिधींना नाकारण्यात आली. त्यांचा अपमान करण्यात आला. त्यांना शिवीगाळ केली गेली आणि व्यक्तिगत पातळीवर इजा करण्याचीही भीती घातली गेली. त्याचबरोबर तिबेटच्या लोकांवर आणखी लष्करी कारवाई करण्याची दहशत दाखवली. अधिक सूचनांसाठी त्यांना माझ्याशी किंवा माझ्या सरकारशी संपर्क करण्याची परवानगीही चिन्यांनी दिली नाही.

तिबेट हा चीनचाच घटक आहे, हे गृहीत धरूनच हा आराखडा, करार तयार करण्यात आला होता. हा तर निखालस खोटेपणा होता. धाकदपटशा, दहशत नसती तर माझ्याशी आणि माझ्या सरकारशी सल्लामसलत केल्याशिवाय माझ्या प्रतिनिधी मंडळानं कराराचा हा आराखडा मुळीच स्वीकारला नसता. पण ङ्वो हा बऱ्याच काळापासून

चिन्यांचा कैदी म्हणून होता आणि इतर प्रतिनिधीही वस्तुत: कैदीच होते. शेवटी, कुठल्याही सल्ल्यापासून दूर, एकाकी पाडलं गेल्यामुळं, जुलूम जबरदस्तीमुळं त्यांचा नाईलाज झाला आणि त्यांनी कागदपत्रावर सह्या केल्या. असं होऊन देखील त्या कागदपत्रांना कायदेशीर बळकटी आणण्यासाठी आवश्यक ते शिक्के मारण्यास त्यांनी नकार दिला; पण चिनी लोकांना पेकिंगमध्ये तिबेटी शिक्क्यांच्या दुसऱ्या प्रती, बनावटी घडवून घेतल्या आणि कागदपत्रांवर हे शिक्के, आमच्या प्रतिनिधींना जबरदस्तीनं मारायला लावले.

मला किंवा माझ्या सरकारला, करारावर सह्या करण्यात आल्या आहेत हे अजिबात सांगितलं गेलं नाही. ङ्वो यानं पेकिंग आकाशवाणीवरून जो संदेश प्रसारित केला त्यावरून आम्हाला ही बातमी मिळाली. या कराराच्या अटी, मसुदा आम्ही ऐकला तेव्हा आम्हाला जबरदस्त धक्का बसला. त्यातल्या साम्यवादी कल्पना, आत्मप्रौढीची विधानं ही पूर्णपणे असत्य होती; आणि अर्धसत्य दाखवणारी ती धाडसी निवेदनं ऐकून आम्ही चिंताग्रस्त झालो. आम्ही जी काही कल्पना केली होती त्यापेक्षा कितीतरी पटीनं ह्या अटी वाईट आणि जास्त जुलमी होत्या.

याच्या प्रस्तावनेत म्हटलं होतं, "शंभर वर्षापासून किंवा त्याहूनही अधिक काळापासून साम्राज्यवादी सत्तांनी चीन आणि तिबेटमध्ये शिरकाव करून अनेक प्रकारे खोटेपणा आणि चिथावणीखोर गोष्टी केल्या आहेत. अशा परिस्थितीखाली तिबेटी राष्ट्रीयत्व आणि लोक हे गुलामगिरी आणि हालअपेष्टांच्या गर्तेत ढकलले गेले आहेत." हे म्हणणं तर शुद्ध मूर्खपणाचं होतं. त्यात असंही विधान होतं, की तिबेटमधल्या आक्रमक अशा साम्राज्यवादी सत्तांचा प्रभाव यशस्वीरित्या नष्ट करणे, तिबेटी जनतेस मुक्त करणे आणि त्यांना मोठ्या कुटुंबाकडे परत फिरणं शक्य व्हावं म्हणून चीन सरकारने तिबेटमध्ये मुक्तीसेना पाठवली होती.

करारातील पहिल्या पोटकलमाचा तो विषय होता : "तिबेटी जनता संघटित होईल आणि तिबेटमधील आक्रमक साम्राज्यवादी सत्तांना हाकलून लावेल. तिबेटी जनता त्यांच्या मातृभूमीच्या मोठ्या कुटुंबाकडे - चीन प्रजासत्ताकाकडे - परत फिरतील." हे वाचल्यानंतर 1912 मध्ये चिनी सत्तेला हाकलून लावल्यानंतर, तेव्हापासून तिबेटमध्ये कुठलीही परकीय सत्ता नव्हती, हे कडवटपणे आम्हाला आठवलं. दुसऱ्या पोटकलमात म्हटलं होतं, "तिबेटचं स्थानिक सरकार हे तिबेटमध्ये शिरण्यासाठी 'जनता मुक्ती सेने'ला मदत करेल आणि राष्ट्रांच्या संरक्षणासाठी दृढसंबंध साधेल." ङ्वो याला आम्ही दिलेल्या अधिकारच्या विशिष्ट मर्यादेच्या बाहेर हे सारं जातच होतं. आठव्या पोटकलमानुसार चिनी लष्करात तिबेटी लष्कराचं विलीनीकरण सांगितलेलं होतं. चौदाव्या कलमाने बाह्य घडामोडींवरचा तिबेटचा स्वत:चा पूर्ण अधिकार हिरावून घेण्यात आलेला होता.

कुठलाही तिबेटी माणूस अजिबात स्वेच्छेनं मान्य करणार नाही अशा या पोटकलमांमध्ये चिनी लोकांनी अनेक वचनं दिलेली होती. ती अशी - तिबेटमधील राजकीय व्यवस्थेत कुठलेली बदल केले जाणार नाहीत; दलाई लामाचे स्थान, कार्ये आणि सत्ता यात बदल केला जाणार नाही; तिबेटी लोकांचे धार्मिक विश्वास, चालीरीती आणि सवयी यांचा आदर राखला जाईल आणि मठांचे संरक्षण केले जाईल; शेतीचा विकास करणे आणि लोकांचे जीवनमान उंचावणे; आणि सुधारणा स्वीकारण्यासाठी लोकांना भाग

पाडलं जाणार नाही. एका बाजूला आम्ही आमचा देश चीनच्या हाती सोपवायचा होता आणि स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व संपवायचं होतं - त्यामुळं ही वचनं म्हणजे किरकोळ समाधान होतं. सगळं असलं तरी आम्ही पार असहाय होतो. मित्रांशिवाय आम्ही काहीही करू शकत नव्हतो. फक्त मूकपणे संमती देणं, आमचा प्रखर विरोध असूनसुद्धा चिनी हुकूमशाहीपुढं मान तुकवणं आणि आमचा संताप गिळून टाकणं एवढंच हाती राहिलं होतं. चिनी लोकांकडून एवढीच अपेक्षा आम्ही करू शकत होतो, की किमान या जबरदस्तीनं लादलेल्या, एकेरी सौद्यात त्यांचा शब्द तरी ते पाळतील.

या करारावर सही झाल्यानंतर, आमच्या प्रतिनिधी मंडळानं मला हे सांगण्यासाठी तार केली, की चिनी सरकारनं त्यांचा प्रतिनिधी म्हणून चांग चिन वु या जनरलची ल्हासामध्ये नेमणूक केली आहे. पूर्व तिबेटमधील लांबच्या रस्त्यानं येण्याऐवजी तो भारतमार्गे येत आहे. यतुंग या ज्या ठिकाणी मी राहत होतो, ती जागा जेमतेम तिबेटच्या सरहद्दीच्या आत होती. इथूनच भारतातून ल्हासाला जाणारा रस्ता जात होता. आणि त्यामुळं हे स्पष्ट होतं, की ज्या क्षणी तो आमच्या देशात पाऊल ठेवले त्यावेळी मला त्याला भेटणं क्रमप्राप्त होतं.

मला हे अपेक्षित नव्हतं. मी कधीही चिनी जनरलला भेटलो नव्हतो आणि हे सारं टळलं असतं तर बरं झालं असतं. तो कसा वागेल याची कुणालाच कल्पना नव्हती. तो सहानुभूतीपूर्वक वागेल की एखाद्या विजेत्यासारखं वागेल? करारावर सही झाल्यापासून माझ्या काही अधिकाऱ्यांनी विचार मांडला होताच, की फार उशीर होण्याआधी सुरक्षिततेसाठी मी भारतात जावं आणि काही साधक-बाधक चर्चेनंतर प्रत्येकानं हे मान्य केलं, की तो जनरल येईपर्यंत आणि त्याचा दृष्टिकोन कसा आहे याचा अंदाज घेऊन मग सर्वांनी मिळून काही ठरवेपर्यंत मी थांबून राहवं.

माझे काही वरिष्ठ अधिकारी त्याला यतुंगमध्ये भेटले. मठाच्या गच्चीत एक सुरेखसा तंबू होता आणि मी त्याला तिथं भेटावं असं आम्ही ठरवलं होतं. त्यानं यतुंगमध्ये आग्रहपूर्वक सांगितलं, की त्यानं आणि मी बरोबरीच्या नात्यानं भेटलं पाहिजे. मसुद्याबाबतच्या काही अडचणींवर आम्ही मार्ग काढला. तिबेटमधली जी नेहमीची गिरद्यांची व्यवस्था, रीत होती त्याऐवजी आम्ही प्रत्येकाला समान दर्जाची खुर्च्यांची आसनव्यवस्था दिली.

भेटीची वेळ जवळ येऊ लागली, तसं मी 'तो कसा बरं दिसतो' हे पाहण्यासाठी खिडकीतून डोकावत होतो. मला खरोखर कशाची अपेक्षा होती हे मला निश्चितसं आठवत नाही; पण मी पाहिलं की तीन माणसं करडा सूट आणि टोकदार टोप्या घालून आलेली होती. लाल आणि सोनेरी कपड्यांमधल्या, उमद्या अशा व्यक्तिमत्त्वाच्या माझ्या अधिकाऱ्यांपुढे, ते तिघं अगदीच मळके आणि क्षुल्लक दिसत होते. मला कुठं कल्पना होती, की साऱ्याच्या शेवटापूर्वी ह्याच मळकेपणाच्या अवस्थेत चीन आम्हाला ढकलणार होता; आणि 'क्षुल्लक' म्हणून जे काही वाटलं तो तर निव्वळ भ्रम होता.

पण हा लवाजमा मठापर्यंत पोहोचला आणि माझ्या तंबूत वरती आला, त्यानंतर तो जनरल मैत्रीच्या आणि अनौपचारिकतेच्या भावनेनं वागणारा निघाला. दुसरी दोन - करड्या कोटातली माणसं - त्याचे सहकारी, मदतनीस आणि दुभाषे होती. त्याने मला माओ चे तुंग याचं पत्र दिलं. या पत्रात 'मोठ्या मातृभूमीत परतण्याबद्दल स्वागत असो' म्हटलं होतं. कमी-अधिक प्रमाणात करारातल्या पहिल्या पोटकलमाची

पुनरावृत्तीच त्यात होती आणि त्याचा मला आधीपासूनच तिरस्कार वाटत आलेला होता. नंतर या जनरलनेही दुभाष्याकरवी तेच ते सारं पुन्हा सांगितलं. मी त्याला चहा दिला.

आमच्या हृदयामध्ये काय घोळतंय याची कल्पना नसणाऱ्या एखाद्या प्रेक्षकानं जर हे सारं पाहिलं असतं तर त्याला असंच वाटलं असतं, की एकंदरीत सारी बैठक अगदी छानपैकी स्नेहपूर्वक झाली आहे.

ल्हासामधलं त्याचं आगमन फारसं यशस्वी झालं नाही. मी मंत्रिमंडळाला सूचना पाठवल्या, की त्याचं योग्य पद्धतीनं स्वागत केलं जावं आणि सरकारी पाहुणा म्हणून त्याची बडदास्त ठेवली जावी. म्हणून नोर्बुलिङ्गाच्या पलीकडे मंत्रिमंडळाचे दोन सदस्य त्याला योग्य त्या इतमामानं भेटण्यासाठी गेले. मग दुसऱ्या दिवशी त्याच्या सन्मानार्थ पंतप्रधान आणि मंत्रिमंडळानं मेजवानी दिली, पण यानं त्याचं समाधान झालं नाही. मैत्रीचा हात पुढं करणाऱ्या सत्तेचा प्रतिनिधी म्हणून त्याचं योग्य ते स्वागत झालं नाही अशी त्यानं तक्रार केली. त्यामुळे तो जसा दिसतो तसा काही तो मनापासून मैत्रीपूर्ण भावना राखणारा नाही हे आम्हाला जाणवलं.

कसंही असलं तरी, या घटनांच्या दबावाखाली मला नोर्बुलिङ्गाला मागे जाणं भाग पडलं आणि तिथं मी चीनच्या लष्करी अंमलाचा विस्तार झालेला पाहिला.

जनरल चांग चिन वु आल्यानंतर दोन महिन्यांनी चिनी लष्कराच्या तीन हजार अधिकारी व इतर माणसांनी ल्हासामध्ये प्रवेश केला. त्यानंतर लगेचच, तांग को-व्हा आणि तांग कुआन-सेन या दोन जनरलच्या नेतृत्वाखाली जवळ जवळ एवढ्याच संख्येच्या आणखी तुकड्या आल्या. उघड उघड अपमान झाला तर अगदी सर्वसामान्यपणे वरवर पाहता जो तटस्थपणा दाखवतात, काहीशा तशाच पद्धतीनं ल्हासामधल्या लोकांनी या लष्करी तुकड्यांकडे पाहिलं. चिन्यांकडून रसद आणि राहण्याच्या सोयीसाठी मागणी व्हायची. त्याच्याशिवाय चीनचे सेनापती आणि आमचं सरकार यात कुठलाही संपर्क नव्हता. पण लवकरच या मागण्यांमुळं शहरात अनर्थ माजायला सुरुवात झाली.

चिन्यांनी घरांसाठी लेखी मागणी केली आणि काही घरं विकत घेतली तर काही भाड्यानं घेतली. याचबरोबर नोर्बुलिङ्गाच्या पलीकडल्या नदीकाठच्या उल्हासदायक अशा, सहलींसाठी उन्हाळ्यात वापर व्हायचा त्या जागेचा त्यांनी लष्करी शिबिरासाठी ताबा मिळवला. 2,000 टन बार्ली त्यांनी कर्जरूपानं मागितली.

अवाढव्य खर्चामुळं सरकारी धान्यभांडारातून एवढी प्रचंड मागणी पुरवली जाणं कठीण होतं; त्यामुळं सरकारला मठांकडून आणि खाजगी मालकांकडून उसनवारी करावी लागली. अन्नाच्या इतर प्रकारांचीही मागणी केली गेली आणि शहरातल्या बेताचाच असलेल्या साधनसामग्रीला गळती लागली; आणि वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या. त्यानंतर आणखी एक जनरल आणि आणखी आठ ते दहा हजार लोक नव्यानं आले. छावण्या टाकण्यासाठी त्यांनी आणखी जागा बळकावली; त्यांच्या वाढत जाणाऱ्या अन्नाच्या मागणीच्या ताणानं आमची साधीसुधी अर्थव्यवस्था पार कोसळली. त्यांनी त्यांच्या स्वत:बरोबर काहीही आणलं नव्हतं आणि आम्ही आमच्या जेमतेम अन् तुटपुंज्या पुरवठ्यातून त्यांना खायला घालावं ही त्यांची अपेक्षा होती. धान्याचे भाव अचानक सपाट्यानं दहा पटीनं वाढले; लोणी नऊ पटीनं; आणि एकंदरीत इतर वस्तूंच्या किंमती दुप्पट ते तिप्पट पटीनं भडकल्या. माझ्या आठवणीप्रमाणं पहिल्यांदाच

ल्हासातील लोक दुष्काळी परिस्थितीत ढकलले गेले. चिनी लष्कराबद्दलची त्यांची नाखुशी, राग वाढत गेला आणि लहान लहान मुलं त्यांच्याविरुद्ध घोषणा देत आणि चिनी सैनिकांवर दगडफेक करत फिरू लागली. मोठी माणसंच त्यांच्या कडवटपणावर जेमतेम ताबा राखून राहिली होती, याचंच हे चिन्ह होतं. मंत्रिमंडळाच्या कार्यालयात तक्रारींचा ओघ सुरू झाला, पण काहीही करता येणं शक्य नव्हतं. चिनी लष्कर ठिय्या देऊन राहायला आलं होतं; ते कुठलीही सूचना मानायचे नाहीत किंवा आमच्या सरकारला कुठल्याच पद्धतीनं मदत करायचे नाहीत. उलट दिवसेंदिवस त्यांच्या मागण्या वाढतच गेल्या. लवकरच त्यांनी पुन्हा 2,000 टन बार्लीची मागणी केली आणि त्यामुळं शोध करून पुरवठा करावा लागला, याला कर्ज म्हटलं गेलं आणि सारया सेनापतींनी वचन दिलं, की याची जी किंमत होईल त्या पैशांची गुंतवणूक तिबेटमधले उद्योगधंदे वाढवण्यासाठी केली जाईल; पण या वचनाची पूर्तता मात्र कधीच केली गेली नाही.

ल्हासातील परिस्थिती वाईटाकडून पार दुरवस्थेकडं घसरत चालली होती. वरिष्ठ असे चिनी अधिकारी सातत्यानं शहरात येत होते आणि जनरल चांग चिन वु यानं बैठकींच्या मालिकांचा सपाटा लावला होता. माझी मंत्रिमंडळाच्या सदस्यांना या बैठकींना उपस्थित राहायची विनंती असे; आणि बहुतेकदा, माझा प्रधानमंत्री असलेला लु-खङ्वा - याच्यावर लोकांच्या अत्यावश्यक गरजा आणि आक्रमकांच्या एकेक विनंत्या यांचा तोल सांभाळण्याची जबाबदारी येऊन पडायची. "तिबेटी लोक म्हणजे अतिशय साधा, धार्मिक समाज आहे. त्यांचं उत्पादन हे जेमतेम त्यांच्या गरजा भागतील एवढ्यासाठीच पुरेसं असतं." हे चिन्यांना थेटपणानं सांगायचं धाडस त्याच्याकडे होतं. जास्तीचा साठा फारच कमी होता. चिनी लष्कराला फार फार तर अजून महिना-दोन महिने पुरेल एवढाच होता; त्यापेक्षा तो जास्त असूच शकत नव्हता. अर्थात, पुरवठ्याचा साठा काही एकदम निर्माण केला जाऊ शकत नाही. ल्हासामध्ये एवढा मोठा ताफा ठेवण्याचं काहीच कारण नाही हे त्यानं निदर्शनास आणून दिलं. कारण जर देशाचं संरक्षण करायचीच गरज होती तर त्या सारयांना सरहद्दीवर पाठवायला हवं होतं; आणि काही थोड्याफार संरक्षक लवाजम्यासह फक्त अधिकारयांनीच शहरात राहणं गरजेचं होतं.

चिन्यांची उत्तरं पहिल्या पहिल्यांदा नम्र होती. जनरल चांग चिन वु यानं सांगितलं, की आमच्या सरकारनं, चीनचं लष्कर तिबेटमध्ये तळ ठोकून राहिल - अशा करारावर सही केलेली आहे आणि त्यामुळं त्यांना राहण्याची व्यवस्था आणि इतर गोष्टींना पुरवठा करणं हे आम्हाला बंधनकारक आहे. त्यानं सांगितलं, की ते सारे तिबेटच्या साधनांमध्ये प्रगती करण्यासाठी आणि साम्राज्यवादी वर्चस्वापासून संरक्षण देण्यासाठी तर फक्त आले आहेत; आणि जेव्हा तिबेट स्वतःचे व्यवहार सांभाळायला आणि स्वतःच्या सरहद्दीचं संरक्षण करायला समर्थ होईल, तेव्हा ते चीनला परत जातील.

तो म्हणाला, "जेव्हा तुम्ही तुमच्या पायावर उभं राहाल तेव्हा मग तुम्ही म्हटलंत तरी आम्ही इथं थांबणार नाही."

आमच्या सरहद्दींना जर कुणी धोका पोहोचवला असेल तो खुद्द चिन्यांनीच, आणि आमचे व्यवहार शतकानुशतके आमचे आम्हीच सांभाळले आहेत. चिन्यांना सांगायचं लु-खङ्वानं कसंबसं टाळलं; पण दुसरया एका बैठकीत त्यानं जनरलला सांगितलं, की ज्याप्रमाणं त्यांनी तिबेटसाठी मदतीला आल्याची खात्री, ग्वाही दिली होती, त्यानुसार आतापर्यंत तरी मदतीसाठी म्हणून त्यांनी काहीच केलेलं नाही. उलट, त्यांचं इथं असणं

हेच गंभीररित्या कष्टदायक होतं; आणि त्यांच्या बहुतेक सार्‍या कृतींमुळं लोकांच्या रागात आणि नाराजीत भरच पडणार होती. एका अशा कृतीचा त्यानं उल्लेख केला, ती बाब आमच्यासाठी महत्त्वाची होती - ल्हासा या पवित्र शहरात मृत प्राण्यांची हाडं जाळली गेली होती : तिबेटी लोकांच्या धार्मिक भावनांचा हा अपमान होता आणि त्यामुळं अत्यंत प्रतिकूल अशा प्रतिक्रिया उमटल्या होत्या.

परंतु लोकांच्या प्रतिकूलतेच्या कारणांची चर्चा करण्याऐवजी, आमच्या सरकारनं यावर पडदा टाकावा अशी चांग चिन वु यानं अपेक्षा केली. इतर तक्रारींमध्ये त्यानं म्हटलं, की ल्हासातल्या रस्त्यावर चिन्यांची हेटाळणी करणारी गाणी म्हणत लोक हिंडत होते. त्यानं सुचवलं, की आमच्या सरकारनं चिन्यांशी मैत्रीपूर्ण संबंध व्हावेत असं आवाहन करणारे घोषणापत्रक काढावे; आणि त्यानंच मसुदा तयार केला आणि लु-खङ्वाकडे दिला. जेव्हा लु-खङ्वानं तो वाचला. तेव्हा त्यात रस्त्यावर गाणी गायला बंदी करण्यात आली आहे, हे त्याला दिसलं. तेव्हा त्यानं या मसुद्यात दुरुस्ती करून त्यातली हास्यास्पदता कमी केली आणि सभ्य पद्धतीनं त्या मसुद्याचं पुनर्लेखन केलं. चिन्यांनी त्याला त्यासाठी कधी माफ केलं की नाही, ते काही मला ठाऊक नाही.

बैठकांच्या एकंदर मालिकांमध्ये, चिन्यांच्या तक्रारी जहाल होऊ लागल्या. तिबेटी लोकांच्या मदतीसाठी ते तिबेटमध्ये आले आहेत, हे जरी लोकांना सतत ते स्पष्ट करून सांगत असले, तरी दररोज लोकांचं वागणं घसरत चाललं. चिनी सत्तेवर टीका करण्यासाठी सार्वजानिक सभा होत आहेत असं त्याचं म्हणणं होतं. अर्थात, ही गोष्ट नि:संशय खरी होती. त्यांनी मंत्रिमंडळाला, अशा बैठकांवर बंदी घालण्यात यावी अशी विनंती केली. तसं केलंही गेलं. ल्हासातील लोकांनी तात्काळ शहरात जाहिरातपत्रकं लावायला आणि माहितीपत्रकं वाटायला सुरुवात केली. त्यामध्ये, त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे आणि चिन्यांनी चीनला परत जावं, अशी मागणी त्यांनी केली होती. बंदी असूनसुद्धा एक मोठी सभा भरवली गेली. या सभेत एक स्मरणपत्रक तयार करण्यात आलं. या पत्रकात लोकांची दु:खद परिस्थिती मांडण्यात आली होती. ल्हासामधील परिस्थिती किती गंभीर बनली आहे याकडे लक्ष वेधण्यात आलं होतं; आणि चिनी पथकांना काढून टाकलं जावं आणि शहरात फक्त काही अधिकार्‍यांनीच राहावं अशी मागणी करण्यात आली होती. या पत्रकाची एक प्रत चिनी जनरलांकडे आणि एक प्रत मंत्रिमंडळाकडे पाठवण्यात आली. त्यावर चिनी अधिकारी म्हणाले, की हे लिखाण, पत्रक साम्राज्यवाद्यांनी दिलेल्या चिथावणीमुळे झालेलं आहे; आणि त्यांनी हेही सूचित केलं, की ल्हासातील काही विशिष्ट लोक मुद्दाम होऊन कटकटी निर्माण करत आहेत. नंतर एका प्रसंगी, चांग चिन वु हा मंत्रिमंडळाच्या कार्यालयात आला. पेकिंग कराराचा भंग करण्यासाठी कट रचल्याबद्दल त्यानं रागानं, तावातावानं दोन्ही प्रधानमंत्र्यांवर कटाचं नेतृत्व केल्याचा आरोप केला.

जो जो देश परकीय आक्रमणांचा बळी ठरलेला आहे त्या त्या देशाला या घटना, पद्धती दुर्दैवानं परिचित असतात. आमचे जे आक्रमक होते त्यांचा ठाम विश्वास होता, की ते उपकारकर्ते म्हणून आले होते. आता यात प्रामाणिकपणाचा अंश किती होता त्याबद्दल काहीच सांगता येत नाही. त्यामुळं ज्यांच्यावर त्यांनी आक्रमण केलं आहे त्या तिबेटी लोकांनाच त्यांचे उपकार जरासुद्धा नको आहेत, हे पाहिल्यावर त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांच्या विरुद्ध जनमत तापू लागलं तरी त्यांनी लष्करी पथकं मागे घेऊन

लोकांचा उद्रेक शांत करण्याचा प्रयत्न केला नाही किंवा लोकांच्या इच्छेनुसार काही सवलतीही देऊ केल्या नाहीत. उलट जास्त जास्त बळाचा वापर करून त्यांनी जनमत ठेचण्याचा प्रयत्न केला. स्वत:ला दोष देण्याऐवजी त्यांनी बळीचे बकरेच शोधले. तिबेटमधले 'साम्राज्यवादी' आणि माझा प्रधानमंत्री लु-खङ्वा हे निव्वळ काल्पनिक असे पहिले बळीचे बकरे होते. पण या कारवाईनं अधिकच दुरवस्था झाली. लोकांमधला सार्वत्रिक असा जो असंतोष होता तो बळाचा वापर केल्यामुळं थोडच्या काळपर्यंत दबला; पण खरं तर जोर-जबरदस्तीमुळं असा असंतोष उलट जास्त वेगानं उफाळतो. कुणाच्याही दृष्टीनं हा अगदी सहज असलेला धडा आहे, वस्तुस्थिती आहे; पण चिन्यांना मात्र अजून ते कळायचं होतं.

या संपूर्ण, वाढत जाणाऱ्या ताणाच्या काळात चिनी अधिकाऱ्यांनी वेळोवेळी माझं मंत्रिमंडळ आणि इतर सरकारी यंत्रणांना डावलंलं आणि नेहमी थेटपणे माझ्याशी संपर्क साधला. सुरुवातीला मी जेव्हा जेव्हा चिनी जनरलना भेटायचो तेव्हा मला सल्ला द्यायला माझे दोन्ही प्रधानमंत्री नेहमी उपस्थित असायचे. परंतु एका बैठकीच्या वेळी माझा प्रधानमंत्री लोसङ् टाशी याच्या कुठल्यातरी वक्तव्यावर चांग चिन वु साफ उखडला. त्यावेळचं माझं वय लक्षात घेता मला तो धक्काच बसला. वयानं मोठा झालेला एखादा माणूस अशा पद्धतीनं वागू शकतो हे मी कधी पाहिलंच नव्हतं. मी जरी लहान होतो तरी त्याला शांत करण्यासाठी मला मध्यस्थी करावी लागली. आणि त्यानंतर मला ते 'मी एकट्यानच भेट घ्यावी' अशी मागणी करू लागले. जेव्हा जेव्हा ते येत, तेव्हा तेव्हा ते एक सुरक्षारक्षक घेऊन येत. मुलाखतीच्या, चर्चेच्या वेळी तो माझ्या खोलीबाहेर थांबत असे. असभ्य वर्तणुकीचं हे सारं प्रदर्शन ज्या ज्या तिबेटी माणसाला ठाऊक झालं त्या त्या प्रत्येकाला हे विलक्षण अपमानास्पद वाटलं.

चिनी अधिकारी आणि लु-खङ्वा यांच्यात शेवटची एकदा चकमक उडाली. हा मतभेद ज्यावरून झाला त्या गोष्टीचा ल्हासातील हालअपेष्टांशी काडीमात्र संबंध नव्हता. चांग चिन वु यानं खास करून एक मोठी बैठक बोलावली. माझे प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांना उपस्थित राहायला फर्मावलं गेलं; आणि नागरी व लष्करी अशा दोन्ही प्रकारातील सर्व वरिष्ठ चिनी अधिकारी उपस्थित होते. जनरलनं जाहीर केलं, की सतरा कलमी करारातील अटींनुसार तिबेटी पथकांचे 'जनतामुक्ती सेने'त विलीनीकरण करण्याची वेळ आता आली आहे आणि त्यानं याची पहिली पायरी म्हणून प्रस्ताव मांडला, की अनेक तरुण तिबेटी सैनिकांना ल्हासातील चीनच्या लष्करी मुख्य तळावर प्रशिक्षण देण्यासाठी निवडण्यात यावं. पुढं तो म्हणाला, की मग ते आपापल्या पलटणीत परत जातील आणि इतरांना प्रशिक्षित करतील.

यावर, पूर्वी कधी बोलला असेल-नसेल त्यापेक्षाही जास्त तिखटपणानं लु-खङ्वा बोलला. त्यानं ठणकावलं, की "या सूचनेची अजिबात गरज नाही आणि ती स्वीकारार्हदेखील नाही. सतरा कलमी करारातील अटींचा संदर्भ देणं असमंजसपणाचं आहे. आमच्या लोकांना हा करार मान्य नाही आणि स्वत: चिन्यांनी वेळोवेळी त्याचा भंग केलेला आहे. पूर्व तिबेटमध्ये अद्यापी त्यांचं लष्कर आहे; ठरल्याप्रमाणे हा भूभाग तिबेटला परत द्यायला हवा होता पण तसं झालेलं नाही. तिबेटवरचा हल्ला पूर्णपणे असमर्थनीय आहे; शांततापूर्ण मार्गानं चर्चा वस्तुत: तेव्हा चालल्या असताना चीनच्या लष्करानं बळजबरीनं तिबेटच्या भूमीवर प्रवेश केलेला आहे. चीनच्या लष्करात तिबेटी

पथकांना सामावून टाकण्याच्या प्रश्नाबद्दल बोलायचं तर करारात म्हटलं होतं, की चीन सरकार हे बदल स्वीकारावेत म्हणून तिबेटी लोकांवर जबरदस्ती करणार नाही. या प्रकारच्या बदलाला मात्र तिबेटच्या लोकांनी कडवा प्रतिकार केला असता, असंतोष दाखवला असता आणि त्यानं स्वत: प्रधानमंत्री म्हणून स्वीकारलाही नसता."

चीनच्या जनरलनी मोठ्या मृदुपणानं सांगितलं, की ही बाब काही मोठ्या महत्त्वाची नाही आणि तिबेटच्या सरकारनं मुळी आक्षेप का घ्यावा हे लक्षात येत नाही. नंतर त्यांनी त्यांची भूमिका किंचितशी बदलली. त्यांनी असा प्रस्ताव मांडला, की सर्व तिबेटी बराकींवरून तिबेटचा ध्वज तिथं फडकावला जावा. लु-खङ्वा यानं सांगितलं, की जर बराकींवर चीनचा ध्वज फडकावण्यात आला तर सैनिक स्वत:च तो ध्वज पुन्हा खाली खेचतील आणि मग हे सर्व चिन्यांनाच फार अडचणीचं होईल. ध्वजांबाबतच्या या वादाच्या ओघात लु-खङ्वानं स्पष्टपणं सांगितलं, की तिबेटच्या स्वायत्ततेला नष्ट करून मग तिबेटी लोकांनी चिनी लोकांशी मैत्रीचे संबंध राखावेत, हेच मुळी अजब आहे. तो म्हणाला, "जर तुम्ही एखाद्या माणसाच्या डोक्यावर प्रहार केला आणि त्याची कवटी फोडली तर तुम्ही त्याच्याकडून मैत्रीची फारशी अपेक्षाच करू शकत नाही." या वक्तव्यामुळं चिनी फारच भडकले. त्यांनी बैठक बरखास्त केली आणि तीन दिवसांनंतर आणखी एका बैठकीची योजना मांडली.

नंतर जेव्हा पुन्हा सर्व प्रतिनिधी भेटले, तेव्हा फान मिंग या दुसऱ्या एका जनरलनं चीनच्या प्रवक्त्याचं काम केलं. त्यानं लु-खङ्वा याला विचारलं, की त्याच्या पूर्वीच्या विधानांमध्ये त्याला चुकीचं काही वाटतंय का? अर्थात त्याला क्षमायाचनेची अपेक्षा होती. पण अर्थातच, लु-खङ्वा त्याच्या पहिल्या विधानांशी ठाम राहिला. 'जी परिस्थिती आहे ती स्पष्टपणे सांगणं हे माझं कर्तव्य होतं' असं तो म्हणाला. याचं कारण पूर्व भागामधील चीनच्या बळजबरीबद्दल संपूर्ण तिबेटभर अफवा पसरल्या होत्या आणि लोकांच्या भावना भडकल्या होत्या. जर लष्कराबाबतचे चीनचे प्रस्ताव स्वीकारले गेले तर त्याची प्रतिक्रिया निश्चितच हिंसक रूपात उमटेल आणि ही प्रतिक्रिया फक्त लष्कराकडून नव्हे, तर सर्वसामान्य तिबेटी लोकही त्यात असतील.

या उत्तरामुळं जनरल फान मिंग याचा पारा चढला आणि त्यानं लु-खङ्वावर परकीय साम्राज्यवादी सत्तांशी त्याचे छुपे संबंध असल्याचा आरोप केला. तो खेकसून म्हणाला, की कार्यालयातून लु-खङ्वा याला काढून टाकावं अशी तो मला विनंती करेल. लु-खङ्वा त्यावर म्हणाला, की अर्थात, मला म्हणजे दलाई लामाला जर खात्री पटली की मी काही चूक केलेली आहे, तर मी नुसतंच त्याचं कार्यालय नव्हे तर स्वत:चे प्राणही देईन. त्यानंतर जनरल चांग चिन वु यानं जरा मध्यस्थी केली, की फान मिंगचा काही गैरसमज झाला होता. त्यामुळे तो जे काही बोलला ते फार गंभीरपणानं घेण्यात येऊ नये. कुठलाही करार झाल्याशिवाय ही बैठक मोडली.

चांग चिन वु यानं जरी शांतपणा दाखवून मध्यस्थी केली असली, तरी या बैठकीनंतर लवकरच मला एक लेखी वृत्त आले. यात म्हटले होते, की तिबेट आणि चीनमधले संबंध सुधारावेत अशी लु-खङ्वाची इच्छा नव्हती आणि त्यामुळं त्याला कार्यालयातून काढून टाकलं जावं. त्यांनी हीच मागणी मंत्रिमंडळाकडंही केली. मंत्रिमंडळानं माझ्याकडे मत व्यक्त केलं, की दोन्ही प्रधानमंत्र्यांनी राजीनामे दिले तर बरं होईल. आता संघर्ष टीपेला पोहोचला होता आणि माझ्यासमोर फार अवघड निर्णय घेणं आलं. चीनला विरोध

करण्याची हिंमत दाखवल्याबद्दल मला लु-खङ्वाचं खूप कौतुक होतं, पण आता मला ठरवायचं होतं, की त्याला पुढं काम करू द्यायचं की चीनच्या मागणीपुढं मान तुकवायची.

इथं दोन गोष्टी लक्षात घेणं गरजेचं होतं; एक म्हणजे लु-खङ्वाची व्यक्तिगत सुरक्षितता आणि दुसरी म्हणजे आमच्या देशाचं एकंदरीत भविष्य. पहिलीबद्दल मला संशय नव्हताच. लु-खङ्वानं आधीच त्याचं आयुष्य धोक्यात टाकलं होतं. जर मी त्याला कार्यालयातून मुक्त करण्याचं नाकारलं तर चिन्यांनी त्यांच्या स्वतःच्या मार्गानं त्याच्यापासून सुटका करून घेतली असती.

अतिशय तणावाच्या या मोठ्या काळात, एकूणच प्रश्नाबद्दल मला समज आली होती. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे डावपेच, बारकावे समजण्याचं तात्त्विक शिक्षण काही अजूनी मला मिळालेलं नव्हतं. अशा प्रश्नांबद्दल माझं धार्मिक शिक्षण आणि त्याला माझ्या सामान्य ज्ञानाची जोड देऊन विचार करू शकत होतो; पण धार्मिक शिक्षण हेच अतिशय विश्वासार्ह मार्गदर्शन करते असा माझा विश्वास होता आणि अजूनही आहे.

मी विचार केला, की जर आम्ही विरोध करायचं चालू ठेवलं आणि चिनी अधिसत्तेला डिवचत राहिलो, तर याचा परिणाम म्हणजे दडपशाही आणि खदखदता असंतोष यांच्या दुष्टचक्रात आम्ही अडकून राहू. शेवटी हे सारं शारीरिक पातळीवरच्या हिंसाचाराच्या घटनांकडे जातं. हिंसाचार हा निरर्थक असतो; हिंसक मार्गानं आम्ही चिन्यांपासून आमची सोडवणूक करू शकलो नसतो. आम्ही त्यांच्याशी लढलो असतो तर त्यांनी नेहमीच आम्हाला जिंकलं असतं; आमचे निःशस्त्र आणि असंघटित लोक मात्र बळी ठरले असते. चिन्यांनी करारात दिलेली वचनं त्यांनी पाळावी यासाठी शांततेच्या मार्गानं त्याचं मन वळवत राहण्याचा प्रयत्न करणं, एवढीच आशा आमच्यापुढं होती. 'अहिंसा' या एका मार्गानं अखेरीस काही प्रमाणात तरी स्वातंत्र्य मिळवायला हवं होतं. कदाचित त्यासाठी अनेक वर्ष धीर धरावा लागला असता. जेव्हा शक्य आहे तेव्हा तेव्हा सरकार आणि जेव्हा अशक्य आहे ते निष्क्रिय असहकार, हा त्याचा अर्थ होता.

हिंसक विरोध हा व्यवहार्य नव्हता आणि तो नैतिकही नव्हता. अहिंसा हा एकमेव नैतिक मार्ग होता. ही केवळ माझी गाढ श्रद्धा नाही तर भगवान बुद्धाच्या शिकवणुकीशी त्याची नाळ जुळते. तिबेटचा धार्मिक नेता म्हणून मी हे तत्त्व उचलून धरणं हे माझं कर्तव्य होतं. कदाचित आमचा अवमान झाला असता आणि आमच्या परंपरागत वारशाच्या सर्वात प्रिय गोष्टी काही काळ हरवल्या की काय असं वाटलं असतं; कसंही असलं तरी नम्रता हीच आमची खरी ओळख असायला हवी होती. मला त्याबद्दल खात्री होती.

म्हणून मी खेदानं मंत्रिमंडळाची शिफारस स्वीकारली आणि प्रधानमंत्र्यांनी राजीनामे द्यावेत म्हणून सांगितलं. ते मला भेटायला आले आणि मी त्यांना स्कार्फ, भेटवस्तू आणि माझं छायाचित्र दिलं. माझी परिस्थिती त्यांनी समजून घेतली आहे, हे मला जाणवलं. मी त्यांच्या जागी पुढचे अधिकारी नेमले नाहीत. चिनी जर असेच बळीचे बकरे बनवणार असतील तर प्रधानमंत्री असण्याची काही गरज नव्हती. जबाबदाऱ्या मीच स्वीकाराव्यात हेच जास्त बरं होतं, कारण सर्व तिबेटी लोकांच्या लेखी माझी जागा एकमेवाद्वितीय होती. नंतर, लु-खङ्वा भारतात गेला आणि त्याचं पार निवृत्तीचं वय होईपर्यंत माझ्या परागंदा शासनामध्ये प्रधानमंत्री होता आणि अजूनही तो माझा विश्वासू सल्लागार आहे. 1959 मध्ये मी स्वतः तिबेट सोडलं, त्यानंतर लोसङ टाशी -

माझा भिक्षू प्रधानमंत्री - ह्याला चिन्यांनी कैदेत टाकलं आणि सोडलंच नाही, हे सांगायला मला अतिशय दु:ख होतं.

ही घटना घडल्यानंतर चिन्यांचा दृष्टिकोन जरा अधिक मैत्रिपूर्ण आणि शांतता प्रस्थापित करणारा बनला. त्यांनी मंत्रिमंडळाला सुचवलं, की तिबेटी अधिकारी, भिक्षू, व्यापारी आणि इतर लोक यांच्या एका प्रतिनिधी मंडळाने स्वत: पाहणी करण्याकरता चीनला जावं. म्हणजे आपापल्या धर्माचं पालन करण्यासाठी कसं संपूर्ण स्वातंत्र्य चीनमधील लोकांना आहे, हे कळेल. आम्ही ही सूचना स्वीकारली आणि प्रतिनिधी मंडळासाठी सदस्य निवडले. चीनला एक दौरा ठरवून ते गेले आणि परत आल्यावर त्यांनी या दौऱ्याचा अहवाल सादर केला. हे वृत्त चीनच्या दबावाखाली लिहिलं गेलं आहे, हे सर्वांनाच माहीत होतं.

नंतर मला स्वत:लाच चीनच्या भेटीसाठी चीनच्या सरकारकडून निमंत्रण आलं. जरी माझं सरकार आणि तिबेटमधील चीनची राजवट यांच्यातले संबंध थोडेसे सुधारले असले, तरीही आमच्या लोकांचं हित आणि कल्याण यांबद्दल त्यांना जी पूर्ण अनास्था होती, तिच्यामुळं माझी फार मोठी निराशा झाली होती. मी विचार केला, की चीनच्या सर्वात वरिष्ठ सत्ताधिकाऱ्यांना भेटावं आणि आमच्यावर लादलेल्या करारातील त्यांनी दिलेली वचनं पाळावीत म्हणून त्यांचे मन वळवायचा प्रयत्न करावा, म्हणून मी चीनला जायचं ठरवलं.

साम्यवादी चीनमध्ये

मी चीनला जावं अशी ल्हासामधील लोकांची बिलकूल इच्छा नव्हती. कदाचित मला परत यायची परवानगीच मिळणार नाही अशी त्यांना भीती वाटत होती; परंतु मला कैदी म्हणून ठेवलं जाण्याची भीती नव्हती आणि तिथं जायलाच हवं असा मी निश्चय केला होता, कारण माझं ते कर्तव्य होतं.

नोर्बुलिङ्गा इथं एक धार्मिक कार्यक्रम होता. त्यासाठी असंख्य लोक उपस्थित होते. तेव्हा मी वर्षभरात पुन्हा घरी परत येईन असं वचन देऊन त्यांची खात्री पटवण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

त्यावेळी, चिनी राष्ट्रीय सभेचं एक सत्र, घटना बनविण्यासाठी पेकिंगमध्ये भरणार होतं. त्याची तयारी चीनमध्ये सुरू होती. या सभेत चीननं तिबेटसाठी दहा जागा ठेवल्या होत्या. चिनी प्रतिनिधींची निवडणूक झाल्याचं सांगून तिबेटी सदस्यांची नेमणूक मी करावी असं मला सांगितलं गेलं. तसंच मी स्वत: या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व करावं असं चीनच्या सरकारनं सुचवलं होतं. आमच्या अनेक लोकांना असं वाटलं, की असल्या सभेचा सदस्य होणं हे काही दलाई लामाच्या प्रतिष्ठेला शोभेसं नाही. पण नकार देऊनही फारसं काही साध्य होणार नाही असं मला वाटत होतं. उलट, जर आम्ही नकार दिला असता तर राजकीय स्वातंत्र्याची जी काही थोडीबहुत संधी होती, ती देखील आम्ही गमावली असं झालं असतं. मी ही संधी मान्य करण्यानं चिन्यांनी त्यांची वचनं पाळावीत म्हणून त्यांचं मन वळवायला मदत झाली असती.

1954 मध्ये मी ल्हासा सोडलं. नदीच्या काठावर एका धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. तिथं लोक मला निरोप देण्यासाठी एकत्र झाले होते. साहजिकच सार्‍यांच्या मनात दु:ख होतं, माझ्या जाण्यामुळं निराशा होती. तिबेटबाहेरच्या या माझ्या पहिल्या प्रवासाकडे मी स्वत:ही एक गंमत म्हणून पाहू शकत नव्हतो.

माझ्या मोठ्या पल्ल्याच्या प्रवासाची सुरुवात गाडीनं झाली. चिन्यांनी ल्हासामध्ये अनेक वाहनं (त्यातली बहुतांशी लष्करी होती) आणली होती आणि त्या दृष्टीनं पूर्वेपासून आणि वायव्येपासून पद्धतशीरपणे रस्ते बांधणं चालू होतं. हे रस्तेबांधणीचं कामं जुलमाचं आणि असंतोषाचं मूळ झालं होतं. कारण तिबेटी कामगारांना त्यासाठी वेठीला धरलं गेलं होतं. स्वखुशीनं कुणीच पुढं येत नव्हतं. त्यांचे पगारही फारच किरकोळ होते. जमिनीबाबत लेखी मागणी केली गेली होती, पण बर्‍याच जमिनींची नुकसान भरपाई देण्यात आली नाही. जिथं लागवडीची जमीन घेतली गेली, तिथं भूमिहीन शेतकर्‍यांना पर्यायी जमीन देण्यासाठी आमच्या सरकारला सांगण्यात आलं. पण बरेचदा होतं काय, की तशीच सुपीक जमीन लगेचच शेजारपाजारी मिळते, असं नाही. आमच्या देशात जर प्रगती व्हायला हवी होती तर नि:संशय रस्ते ही गरजेची बाब होती; पण चिन्यांनी ज्या पद्धतीनं रस्ते बांधले ते सारंच आमच्या देशाच्या लोकांच्या दृष्टीनं अन्यायकारक आणि उपमर्दकारक होतं.

ल्हासाबाहेर पहिले 90 मैल आम्ही गाडीनं प्रवास केला. त्यापलीकडं रस्ता अर्धवट पूर्ण झाला होता. त्यामुळं तिबेटी लोकांना ज्या पद्धतीनं प्रवास करायला आनंद वाटतो त्या पद्धतीनं, म्हणजे पुन्हा घोड्यावरून आम्हाला जायला लागलं. मुसळधार पाऊस

झाला होता. रस्त्यावर अनेक कडे कोसळले होते. काही ठिकाणी आम्हाला घोड्यावरून जाणंही शक्य नव्हतं, तिथं कष्टपूर्वक चिखलातून मार्ग काढावा लागला. जिथं अगदी डोंगराला खेटून रस्ता जात होता तिथं रस्त्यावर वरून धोंडे कोसळत होते आणि हजारो फूट खाली खोल असलेल्या नदीत पडत होते. अर्धवट बांधून झालेला रस्ता इतका धोकादायक होता, की प्रवासात तीन माणसं, अनेक खेचरं व घोडे दगावले.

नंतर, पुढचे दहा दिवस आम्ही जीपनं प्रवास केला. रस्ता अतिशय खडतरच होता. या दहा दिवसांमधले शेवटचे सहा दिवस आम्ही मुख्यत्वे तिबेटी असलेल्या भागातून जात होतो. माझं स्वतःच घर जिथं होतं त्या जिल्ह्यांप्रमाणं, फार पूर्वीच चिन्यांनी या भागावर कब्जा केला होता आणि चिनी अंमल तिथं बसवला होता. तिथले रहिवासी मुळातले तिबेटी वंशाचेच होते; आणि जिथं जिथं मी रात्रीच्या मुक्कामासाठी थांबलो तिथं तिथं मला लोकांची भेट घ्यावी लागली. मी चीनहून परत फिरेन तेव्हा मी जास्त दिवस त्यांच्यामध्ये राहिलं पाहिजे असा त्यांचा प्रेमळ आग्रह होता. 'ता चेन लु' नावाच्या जागी आम्ही एक टेकडी पार केली. ही जागा तिबेटच्या इतिहासात प्रसिद्ध होती. इथंच तिबेट आणि चीनची प्राचीन काळातली मूळ सरहद्द दाखवणारी खूण होती. पलीकडची बाजू पाहिली तर आम्ही खरोखर परदेशात आलो आहोत, हे दिसून येत होतं. लोकांच दिसणं चिनी वळणाचं होतं. त्यांची घरं, त्यांचे कपडे, त्यांचा दृष्टिकोन आणि रीतिरिवाज हे सारं काही वेगळं होतं. रस्त्याच्या कडेनं चहाच्या टपऱ्या लागू लागल्या. ही मात्र, आम्ही चीनमध्ये आहोत हे निश्चितपणे सिद्ध करणारी खूण होती. चेंग तु या चीनमधील शहराकडे आम्ही गेलो. तिथून आम्ही विमानानं सिआनला गेलो. मग खास आगगाडीनं पेकिंगला गेलो.

अगदी काही वर्षांपूर्वीचीच गोष्ट, जेव्हा मला यांत्रिक खेळण्यामध्ये अतिशय रस वाटायचा, तेव्हा विमानानं उड्डाण काय किंवा आगगाडीनं प्रवास काय - एका छानशा चमकदार स्वप्नासारखा वाटायचा; पण आता दोन्ही प्रकारचे प्रवास मी पहिल्यांदाच करत होतो, तेव्हा माझं मन राजकीय दुर्दैवी घटना आणि माझ्यावरची जबाबदारी यांनी पूर्णपणे झाकोळून गेलं होतं. त्यामुळं या नवीन अनुभवांचा निर्भेळ आनंदही मी घेऊ शकत नव्हतो.

सिआन इथं पनछेन लामा आम्हाला येऊन मिळाला. तो माझ्यापेक्षा लहान होता, पण लोक म्हणायचे तो वयाच्या मानानं मोठा दिसतो. मी तेव्हा एकोणीस वर्षांचा तर तो सोळा वर्षांचा होता. कुणी कल्पनाही करू शकणार अशा अवघड परिस्थितीत तो मोठा झाला होता.

दलाई लामाप्रमाणेच पनछेन लामा देखील श्रेष्ठ दर्जाचा अवतारा असतो. चौदाव्या ख्रिस्ती शतकात दोघांचेही पहिले अवतार झाले. तेव्हापासून, तिबेटी धार्मिक सत्तेत पनछेन लामाला दलाई लामाच्या लगेचच खालोखालचं स्थान होतं; परंतु त्यांच्याकडे कधीही लौकिक सत्ता नव्हती. संपूर्ण इतिहासात दोघांमधील नातं अतिशय सौहार्दाचं राहिलेलं दिसतं. श्रेष्ठ अशा धार्मिक नेत्यांना शोभेसं असं हे नातं होतं. बहुतेक साऱ्या पिढ्यांमध्ये, जो लहान होता तो मोठ्याचा विद्यार्थी बनला होता. जेव्हा चीननं तिबेटवर हल्ला केला, तेव्हा 1910 च्या सुमारास आमच्या पूर्वाधिकाऱ्यांमध्ये फूट पडू लागली आणि तेव्हा तेरावे दलाई लामा भारतात निघून गेले. त्यावेळी पनछेन लामाच्या काही सहकाऱ्यांनी ही संधी साधली. दलाई लामाच्या अनुपस्थितीत सरकारने बसवलेले कर

आणि इतर लौकिक बाबींबद्दल त्यांनी तक्रारी केल्या.

सुरुवातीचे हे मतभेद चिन्यांनी बरोबर हेरले आणि मतभेदांची दरी कशी वाढेल यासाठी जे जे करता येणं शक्य होतं ते केलं. तिबेटमध्ये दुफळी झाली की हल्ला करण्यासाठी सावज अगदी सहजगत्या गवसणार होतं; अशाच हेतूनं हे केलं गेलं. पण तिबेटचं विभाजन करण्यात त्यांना अपयश आलं. तिबेटी लोकांनी त्यांना त्यावेळी देशाबाहेर हाकलून लावलं हे मी नमूद केलेलंच आहे. पण दोन लामांमधली दरी मात्र तशीच राहिली; आणि काही वर्षांनी पनछेन लामा चीनव्याप्त अशा सरहद्दीजवळच्या भागात निघून गेला. उरलेलं सारं आयुष्यभर तो तिथंच राहिला आणि माझ्या मते दु:खाच्या छायेत 1937 मध्ये त्याचा मृत्यू झाला.

अशा घटनाचक्रामध्ये, खरं तर त्याच्या पुनरावताराचा शोध घेण्यासाठी तसा विलंब झाला होता. 1950 मध्ये, खुद्द तिबेटमध्येच त्यासाठी संभाव्य असे उमेदवार सापडले आणि चिन्यांनी त्यांचं राज्य ज्या भागात होतं त्या उमेदवाराला पुढं केलं. 1951 चा तथाकथित करार बनवला गेला, तेव्हा पेकिंगमध्ये चाललेल्या चर्चांच्या दरम्यान मला ङ्वो याच्याकडून तार आली. त्यात म्हटलं होतं, की चीनच्या उमेदवाराला स्वीकारलं गेलं नाही तर चर्चेत अडथळा येऊ शकतो. सरकार आणि भिक्षू नेत्यांना साहजिकच ज्या परंपरागत चाचण्या होत्या त्यानुसार परीक्षा करायची होती, पण हे त्यावेळी अशक्य होतं आणि पर्यायानं सध्याचा पनछेन लामा हाच खरा पुनरावतार म्हणून स्वीकारला गेला. त्यावेळी तो अकरा किंवा बारा वर्षांचा होता.

अर्थात, त्याचं सर्व शिक्षण आणि प्रशिक्षण हे साम्यवादी चिनी प्रभावाखाली होतं. चिन्यांनी त्यांच्या स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी निश्चितच त्याचा वापर केला, कारण विरोध करायला तो फारच लहान होता. उदाहरणार्थ, जेव्हा चीनवर साम्यवादी सरकारनं विजय मिळवला, तेव्हा त्यांना अभिनंदनाची तार पाठवण्यात आली. तेव्हा तो केवळ दहा वर्षांचा असतानाच त्याच्या नावावर ती प्रसिद्ध करण्यात आली. खरं तर तेव्हा तो पुनरावतार म्हणून स्वीकारलाही गेलेला नव्हता; अणि त्यामुळं अधिकृत तिबेटी सूत्रांकडूनच ही तार आली असं लोकांना वाटलं आणि त्यांची चक्क फसगत झाली.

मी आधीही एकदा त्याला भेटलो होतो. तो चौदा वर्षांचा असताना ल्हासाला मला भेटण्यासाठी 1953 मध्ये आला होता. अर्थात चिनी अधिकाऱ्यांचा लवाजमा, शिवाय त्याचे स्वत:चे अनुयायी यांच्यासह त्याला आणलं गेलं होतं. पारंपरिक कार्यक्रमानुसार त्याला औपचारिकपणे माझ्यापुढं आणलं गेलं; तो माझ्यापेक्षा वयानंच नव्हे तर पदाच्या दृष्टीनं खालचा होता; पण पहिल्या भेटीच्या वेळीच मला स्पष्टपणे दिसलं होतं, की चिनी आणि त्याचे स्वत:चे काही अधिकारी आमच्या प्राचीन रिवाजाबद्दल समाधानी नव्हते. पनछेन लामाला माझ्या बरोबरीच्या आसनावर बसवलं गेलेलं त्यांना आवडलं असतं. त्यामुळं आमची पहिली भेट जरा ताणलेल्या वातावरणात झाली. ती फारशी यशस्वीही ठरली नव्हती. पण त्याच दिवशी आम्ही पुन्हा अनौपचारिकपणे भेटलो, दोघांनी एकत्र जेवण घेतलं. आमचं एकमेकांशी खूप छान पटलं, हे मला सांगायलाच हवं. बौद्ध पद्धतीप्रमाणं वरिष्ठ भिक्षूसाठी जसा आदर राखायला पाहिजे, त्यानं तसाच प्रामाणिक आदर माझ्या स्थानासाठी दाखवला. त्याची वागणूक अगदी प्रसन्न होतीच, पण तो सर्व तिबोटी रीतिरिवाजही पाळत होता. त्याच्या मनात मुळातून सदिच्छाच वास करते आहे हे मला दिसत होतं. मला खात्री आहे, की जर त्याचं खरं मत बनू द्यायला वाव दिला

असता तर त्यानं चिन्यांच्या स्वार्‍यांविरुद्ध तिबेटला पूर्णपणे, मनापासून पाठिंबा दिला असता.

ल्हासाच्या भेटीच्या शेवटी, त्याच्या चिनी सहकार्‍यानं पारंपरिक अशा निरोप समारंभाला नकार दिला, पण नोर्बुलिङ्गा इथं तो खाजगीपणे माझा निरोप घ्यायला आला. त्याच्या दृष्टिकोनातला बदल, फरक मला जाणवला. मधल्या काळात बहुधा त्याला वरिष्ठपणाच्या रूबाबात त्यानं वागावं अशी तंबी दिली गेली असावी. पण माझ्याप्रमाणंच त्याच्यासाठीही धार्मिक अभ्यास चालू ठेवणं किती महत्त्वाचं आहे याचं मी त्याला स्मरण करून दिलं आणि मी हेसुद्धा सुचवलं, की आपण दोघंही लहान आहोत त्यामुळं आपल्या पूर्वाधिकार्‍यांचे मतभेद आपण विसरून जाऊया आणि नवी प्रसन्न सुरुवात करूया. त्यानं हे मान्य केलं.

मला जुन्या काळातल्या त्या मतभेदांबद्दल प्रामाणिकपणे खेद वाटायचा आणि अजूनही वाटतो. त्याला असलेल्या सततच्या चिनी शिक्षणामुळं सारी जुनी कटुता पूर्णपणे विसरून जायची त्याला परवानगी मिळाली असेल, असं मला वाटत नाही. जर त्यानं आणि त्याच्या अनुयायांनी तसं केलं असतं तर तिबेटवरचं संकट एवढं तीव्र बनलं नसतं. आमच्या पिढीमध्ये, चिन्यांना जे मागच्या पिढीत जमलं नव्हतं ते आता करायचं होतं; आणि यावेळी एक तिबेटी धार्मिक नेता त्यांच्या बाजूनं असणं हे त्यांच्यासाठी मोठं फायद्याचं होतं. त्याच्या नावे हे जाहीरनामेही काढू शकत होते. पण त्यासाठी व्यक्तिशः पनछेन लामाला दोष देता येणार नाही. अशा पराकोटीच्या एककल्ली, सातत्यानं परक्या प्रभावाखाली लहानाचा मोठा झालेल्या कोणत्याही मुलाला स्वतःचं स्वतंत्र मत, इच्छा जपणं-जमणं तसं अवघडच होतं. पण असा प्रभाव असूनही, साम्यवादासाठी तो आमच्या धर्म पार टाकून देईल, असं मला वाटत नाही.

शिंगनान इथं भेटल्यानंतर आम्ही पेकिंगपर्यंत एकत्रच प्रवास केला. तिथं उपसभापती चु-ते, पंतप्रधान चाऊ इन लाइ आणि पेकिंग सरकारच्या इतर अधिकार्‍यांनी आमचं स्वागत केलं. रेल्वे स्थानकावर आमचं स्वागत करण्यासाठी खूप गर्दी होती. त्यापैकी बरेच जण विद्यार्थी किंवा युवक संघाचे सदस्य वाटत होते; त्यांनी टाळ्या वाजवल्या आणि उत्साहानं घोषणा देऊन आनंद व्यक्त केला. पण माझ्या मनात एक तिरसट विचार आला, की जर त्यांना आदेश दिला गेला असता तर तितक्याच तत्परतेनं त्यांनी शत्रुत्वाची भावनाही जरूर व्यक्त केली असती. एका चिनी अधिकार्‍यानं तिबेटी खेड्यात भेट दिली असताना घडलेला एक संवाद माझ्या ऐकण्यात आला होता, त्याचीच मला आठवण झाली. तो अधिकारी आला तेव्हा त्याच्या स्वागतासाठी गावकरी एकत्र गोळा झाले आणि त्यांनी उत्साहाने टाळ्या वाजवल्या. त्याला फार संतोष वाटला. नव्या कारकीर्दीत ते सारे आनंदात आहेत का? असं त्यानं एकाला विचारलं.

त्यावर तिबेटी माणसानं उत्तर दिलं, “हो अगदी आनंदात.”

“वा, उत्तम.”

“फक्त आम्हाला हा नवीन कर मात्र आवडत नाही.”

“नवीन कर?”

“हो टाळ्या पिटण्याचा कर. करवेळी कुणी चिनी इथं आला की आम्हाला सर्वांना उठून यावं लागतं आणि टाळ्या वाजवाव्या लागतात.”

अनेक तिबेटी कर हे कमी-अधिक अप्रिय कष्ट करून भरले जात, हे लक्षात घेता या संवादात काहीतरी तथ्य असलं पाहिजे.

ज्या दिवशी आम्ही आलो त्या संध्याकाळी चु-ते यानं माझ्या आणि पनछेन लामाच्या गौरवार्थ मेजवानी दिली. 200 माणसांची सोय होती. प्रत्येक गोष्ट मोठी दिमाखदार होती. सारं काही सरळ हातानं केलेलं दिसत होतं, याचं मला फार आश्चर्य वाटलं. सार्‍या वस्तू सर्वोत्कृष्ट होत्या. चिनी वाइन दिली गेली. अर्थात, आमच्या प्रतिनिधी मंडळातील फक्त जे बाहेरचे अधिकारी होते त्यांनीच फक्त वाइन घेतली. बाकीच्यांनी नाही. चु-ते यानं स्वागतपर भाषण केलं. तो म्हणाला, की तिबेटी जनता त्यांच्या मातृभूमीकडे परत आली आहे आणि चीन सरकार त्यांना मदत करायचा परोपरीनं प्रयत्न करेल. माझ्यासाठी हा सगळा नवीन अनुभव होता. चीन सरकारच्या सर्व सदस्यांशी कसं वागावं याचा मला नीटसा अंदाज येत नव्हता. पण एक मात्र समाधानाची गोष्ट होती- प्रत्येकजण सभ्य आणि नम्र होता; आणि अतिशय सुसंस्कृत तसंच सुशिक्षित दिसत होता.

दोन दिवसांनंतर मी पहिल्यांदाच माओ झे-डुंग यांना भेटलो. ती अगदी संस्मरणीय मुलाखत झाली. ही बैठक 'हाऊस ऑफ रिसेप्शन' (स्वागत-भवन) इथं आयोजित केली गेली होती. साधारणपणे याच ठिकाणी मान्यवर पाहुण्यांची चिनी साम्यवादी पक्षाच्या सभापतीशी भेट होत असे. माओ झे-डुंग याच्याबरोबर अनेक लोक होते. त्यात तत्कालीन संघराज्याचा अध्यक्ष लिऊ शाओ छि हा होता आणि माझ्याबरोबर चार ते पाच अधिकारी होते.

'तिबेट मातृभूमीकडे परत आला याबद्दल मला आनंद वाटतो.' असं म्हणून माओ झे-डुंग यानं सुरुवात केली. मी राष्ट्रीय सभेत सहभागी व्हायचं ठरवलं याबद्दल त्यानं आनंद व्यक्त केला. तो म्हणाला की नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास करून तिबेटमध्ये प्रगती घडवायची हे चीनचं ध्येय आहे. चांग चिन वु आणि फान मिंग हे जे दोघं जनरल ल्हासामध्ये आहेत ते मला व तिबेटी लोकांना मदत करण्यासाठी चीनचे प्रतिनिधी म्हणून राहिले आहेत. तिबेटी सरकार किंवा माणसं यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अधिकार गाजवायला ते तिथं गेलेले नाहीत आणि त्यानं थेटपणानं विचारलं, की या चिनी प्रतिनिधींनी माझ्या इच्छेविरुद्ध काही केलं आहे का ते.

मी अवघड परिस्थितीत सापडलो आहे, हे मला जाणवलं. मी जर खेळीमेळीचं वातावरण राखलं नाही तर मला खात्री होती, की माझ्या देशाला पुढं पूर्वीपेक्षाही जास्त सोसावं लागेल. म्हणून मी त्याला म्हणालो, की त्याच्या नेतृत्वाखाली तिबेटच्या लोकांना त्यांच्या भविष्याबद्दल फार मोठ्या आशा आहेत आणि म्हणून जेव्हा जेव्हा चिनी प्रतिनिधीबरोबर मतभेदाचे प्रसंग निर्माण झाले, तेव्हा आम्ही आमचं मत स्पष्टपणे सांगितलेलं आहे.

दलाई लामा चिनी नेत्यांसह

त्याच्याबरोबरची माझी पुढची मुलाखत जवळ जवळ तीन तास चालली; आणि तिथं दुभाष्याशिवाय दुसरं कोणीही उपस्थित नव्हतं. पुन्हा अर्थातच आम्ही बहुतांशी तिबेट आणि त्याच्या भविष्याबद्दल बोललो. मी तिबेटमध्ये नुकत्याच घडलेल्या घटनांची व्यक्तिश: त्याला माहिती दिली. आमच्या परिस्थितीबद्दल जर त्याच्या मनात काही शंका असतील तर त्या दूर करणं हा माझा प्रयत्न होता. त्याच्या मनात विश्वास निर्माण व्हावा अशी माझी इच्छा होती, कारण माझी खात्री होती, की आडमुठेपणानं केवळ विरोध करून चिनी अमलापासून आमची सुटका झाली नसती. त्याची तीव्रता फक्त आम्हीच कमी करू शकत होतो आणि काहीतरी सहन करण्याजोगी परिस्थिती यातून निर्माण व्हावी यासाठी सहनशीलपणे प्रयत्न करू शकत होतो.

1953 मध्ये जे तिबेटी व्यापारी मंडळ चीनभेटीसाठी गेलं होतं, त्यातल्या सदस्यांनी मला सांगितलं होतं, की चिनी साम्यवादी नेत्यांना माझ्याबद्दल गंभीर शंका होत्या. त्याचं मुख्य कारण म्हणजे मी भारतात सुरक्षिततेसाठी पाठवलेला खजिना; त्याचबरोबर त्यांना असं वाटत होतं, की माझ्या कुटुंबातील काहीजणांचे परकीय सत्तांशी जवळचे लागेबांधे आहेत. ते अगदी खोटं होतं आणि माओ झे-डुंगला हे सांगण्याची संधी मी साधली. खजिन्याबाबत चिनी मला सतत विचारत होतेच. तो खजिना मी ल्हासाला परत आणायचा विचार करीत आहे असं मी त्यांना वेळोवेळी सांगितलं होतं. मी तसा विचार करत होतो; पण सुदैवानं मी तो अमलात आणला नाही.

मी जे काही सांगितलं त्यानं माओ फारच संतुष्ट झाल्यासारखं वाटलं आणि त्यानं सांगितलं, की पूर्वी एका क्षणी चीन सरकारनं ठरवलं होतं की राजकीय आणि लष्करी सदस्यांची एक समिती तयार करायची आणि चीन सरकारच्या अधिपत्याखाली तिनं तिबेटवर थेट राज्य करायचं. पण आता मात्र त्याला असं वाटतं आहे, की या सगळ्याची पुढं काही गरज लागणार नाही. मला वाटतं, कदाचित माझ्या धोरणाचा तो एक विजय असावा. त्यानं पुढं सांगितलं, की त्याऐवजी आता स्वायत्त तिबेटच्या भागाची एक

व्यवस्थापन समिती तयार करावी, असं ठरवलं आहे. त्यानं माझं मत विचारलं; पण इतक्या झटकन मत द्यावं इतका काही तो छोटा विषय नव्हता आणि मी त्याला हेही सांगितलं, की इतर तिबेटी सदस्य आणि पनछेन लामा यांच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय मत द्यायला मला आवडणार नाही.

त्यावरून पनछेन लामाबाबतचे आणि त्याला अभिप्रेत असलेल्या तिबेटच्या स्थानिक सरकारबाबतचे गैरसमज यांकडे तो वळला. त्यानं सुचवलं, की आम्ही दोघंही पेकिंगमध्ये आहोत याची संधी घेऊन आमच्यातले मतभेद आम्ही दूर करावेत. मी त्यावर त्याला सांगितलं, की हे मतभेद म्हणजे भूतकाळापासूनची 'वडिलोपार्जित' मिळकत आहे आणि मला व्यक्तिगत पातळीवर पनछेन लामाबरोबर कसलेही मतभेद नाहीत; पण रेंगाळत राहिलेले जर काही गैरसमज असतील, तर त्यांचं निरसन करायला मला नक्कीच आनंद वाटेल.

काही दिवसांनंतर मला माओ चे-तुंग कडून निरोप आला, की तो मला तासाभरात भेटायला येतो आहे. आल्यावर त्यानं सांगितलं, की तो अगदी निव्वळ स्नेहभेट घ्यायला आला आहे. नंतर काही कारणांनी तो म्हणाला, बौद्ध धर्म तसा चांगला धर्म आहे; आणि भगवान बुद्धानं, तो स्वतः राजपुत्र असूनसुद्धा लोकांची परिस्थिती सुधारण्याच्या प्रश्नावर चांगल्यापैकी विचार केलेला आहे. त्यानं असंही मत व्यक्त केलं, की तारा ही देवतादेखील दयाळू हृदयाची स्त्री आहे. मग काही क्षणानंतर तो निघून गेला. हे अभिप्राय ऐकून मी चांगलाच गोंधळून गेलो आणि त्यावरून काय अर्थबोध करून घ्यावा हे काही माझ्या लक्षात आलं नाही.

पेकिंगमध्ये असताना एकदा मला साम्यवादी चीनचा मोठा नेता म्हणून त्याला काम करताना पाहण्याची संधी लाभली. त्याच्या घरी एका बैठकीला मला निमंत्रण होतं. वीस-एक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आणि मी त्याच्या शेजारी बसलो होतो; आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव चांगल्यापैकी जाणवत होता. चीनच्या शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा दर्जा हा त्या बैठकीतील चर्चेचा विषय होता. तो अगदी स्पष्टवक्ता होता आणि मला असं वाटलं, की तो मोठ्या तळमळीनं म्हणत होता, की त्याबाबतीत जे काही केलं गेलं त्यानं तो संतुष्ट नव्हता. त्यानं त्याच्या खेड्यातली पत्रं उद्धृत केली. त्यात म्हटलं होतं, की साम्यवादी अधिकाऱ्यांनी जे सर्व काही लोकांसाठी करायला पाहिजे, ते त्यांनी केलं नाही. काही वेळानं तो माझ्याकडे वळला आणि म्हणाला, की तिबेटी हे त्यांच्या कल्याणाशी ठाम होते किंवा हटवादी होते; पण वीस वर्षांनंतर तिबेट समर्थ होईल. आता सध्या, चीन तिबेटला मदत करत आहे, पण वीस वर्षानंतर तिबेट चीनला मदत करत असेल. त्यानं शि रिंग-नाउ या श्रेष्ठ चिनी लष्करी नेत्याचा उल्लेख केला. त्यानं अनेक विजय मिळवले होते पण तिबेटी लोकांच्या रूपानं मात्र त्याला तोडीस तोड प्रतिस्पर्धी मिळाला. पुन्हा एकदा, तो जे काही म्हणाला त्यानं मी फारच आश्चर्यचकित झालो; पण यावेळी किमान त्याचे अभिप्राय जास्त स्वीकारण्याजोगे होते.

चीनभेटीच्या अखेरी अखेरीस या दिग्गज माणसाशी माझी शेवटची भेट झाली. मी राष्ट्रीय सभेच्या स्थायी समितीच्या बैठकीत होतो. इथं मला निरोप मिळाला, की मी त्याच्या घरी भेटायला जावं. तोपर्यंत, चीनच्या भागांचा दौरा मी पूर्ण केला होता. मी अतिशय प्रभावित झालो आहे, मी पाहिलेल्या सर्व विकासप्रकल्पांमध्ये मला रस आहे, असं मला त्याला प्रामाणिकपणे सांगता आलं असतं. नंतर लोकशाहीच्या खऱ्या

रूपाबद्दल त्यानं मला मोठं भाषण द्यायला सुरुवात केली; आणि लोकनेता कसं व्हावं आणि लोकांच्या सूचनांची कशी मनापासून दखल घ्यायला पाहिजे याबद्दल मला सल्ला दिला. नंतर तो माझ्या खुर्चीच्या आणखी जवळ आला आणि कुजबुजला : "मला तुझी बाजू चांगलीच कळते; पण अर्थात, धर्म हे विष आहे. त्यामध्ये दोन मोठे दोष आहेत : त्यानं मानव दुय्यम मानला जातो आणि दुसरं म्हणजे देशाच्या प्रगतीत त्यानं अडथळे येतात. धर्मामुळं तिबेट आणि मंगोलिया विषारी झाले आहेत."

मी पूर्णपणे हबकलो होतो; त्याल म्हणायचं तरी काय होतं? मी स्वत:ला सावरायचा प्रयत्न केला; पण तो नक्की काय म्हणतोय हे मला कळेना. अर्थात, मला कळून चुकलं होतं की तो धर्माचा कडवा शत्रू आहे. तरीही तो माझ्याशी मनापासून मैत्रीच्या भावनेनं आणि प्रेमानं वागतो असं निदान वाटत तरी होतं. असे अद्भुत अभिप्राय देऊन झाल्यावर तो माझ्याबरोबर गाडीपर्यंत आला आणि निरोप घेताना 'मी माझ्या तब्येतीची काळजी घ्यावी' एवढाच सल्ला त्यानं मला दिला.

चीन सोडण्याआधी माओ झे-डुंग याच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वानं मी चांगलाच प्रभावीत झालो होतो. खाजगी भेटींशिवाय मी अनेकदा त्याला सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये भेटलो. त्याच्या बाह्य रूपावरून त्याच्या बुद्धिच्या प्रगल्भतेची कल्पना येत नसे. त्याची प्रकृती तशी धडधाकट वाटत नसे. त्यात त्याला नेहमीचा धाप लागायची आणि तो कष्टानं खोल श्वास घेताना दिसायचा. इतर लोकांच्या कपड्यांप्रमाणंच त्याचे कपडे असायचे; फक्त बरेचदा वेगळ्या रंगाचे असत; पण त्याचं कपड्यांकडे काही फारसं लक्ष नसायचं. एकदा तर त्याच्या शर्टाच्या बाहीचा दुमडलेला भाग फाटला आहे, हेही मी पाहिलं. त्याचे बूट कधीही पॉलिश केले गेलेले नाहीत असं वाटायचं. त्याच्या हालचाली मंद होत्या आणि बोलणं तर त्याहूनही संथ होतं. तो शब्द अगदी तोलूनमापून वापरायचा, लहान वाक्य बोलायचा; पण प्रत्येक वाक्य हे अर्थगर्भ, बहुतेकदा स्पष्ट आणि अचूक असायचं. तो जेव्हा बोलायचा तेव्हा तो एकसारखा धूम्रपान करायचा. असं असूनही त्याची बोलण्याची पद्धत निश्चितपणे त्याच्या श्रोत्यांच्या मनाची आणि कल्पनांची पकड घ्यायची. त्याच्या दयाळूपणा तसंच प्रामाणिकपणा यांचा ठसा रेंगाळत राहायचा. मला खात्री होती, तो जे बोलायचा त्यावर त्याचा विश्वास असायचा आणि त्याच्या दृष्टीनं जे योग्य असायचं ते साध्य करून घ्यायचा आत्मविश्वास त्याच्याकडे होता. तिबेटचं साम्यवादी राज्यात परिवर्तन करण्यासाठी तो बळाचा वापर करणार नाही असा मला विश्वास वाटू लागला होता. पण अर्थातच नंतरच्या काळात चिनी अधिसत्तेनं तिबेटमध्ये जे काही छळणुकीचं धोरण राबवलं त्यानं माझा पुरता भ्रमनिरास झाला. पण अजूनही माओ झे-डुंगच्या पाठिंब्यानं आणि मान्यतेनं सर्व पिळवणूक, जाच केला गेला असेल, यावर मला विश्वास ठेवणं कठीण जातं.

चाऊ एन लाइ, पनछेन लामा, मोआ झे-डुँग व लिऊ छोआ छी यांच्यासह दलाई लामा.

चीनच्या अधिकारी वर्तुळात पंतप्रधान चाऊ इन लाइ हा आणखी एक महत्त्वाचा माणूस होता. माझं त्याच्याबद्दल फारच निराळं मत झालं होतं. तो रेल्वे स्थानकावर माझं स्वागत करायला आला होता तेव्हा मी त्याला पहिल्यांदा भेटलो होतो आणि मग चीनमधल्या वास्तव्यात त्याच्याबरोबर माझं अनेकदा थोडं थोडं बोलणं झालं. त्यापैकी एका भेटीच्या वेळी त्यानं मला तिबेटच्या भविष्याबाबत बराच सल्ला दिला. राष्ट्रबांधणी आणि राष्ट्राचा विकास जितक्या लवकर शक्य आहे तितक लवकर करणं फार महत्त्वाचं आहे, असं तो म्हणाला. मी त्याला सांगितलं, की आमचा देश मागास आहे हे आम्हाला ठाऊक आहे; तसंच आयुष्यातील लौकिक परिस्थितीची दशा सुधारणं आणि प्रशासनात आधुनिकता आणणं हे आता शक्य होईल. मी स्वत: या दिशेनं सुरुवात केली होतीच. जर साधनसंपत्तीचा विकास करायचा असेल तर आम्हाला निश्चितपणे आर्थिक मदतीची सर्वप्रथम गरज आहे, या मुद्याच्याही मी भर घातली.

चाऊ ग इन लाइ हा मला नेहमी मित्रत्वानं वागणारा वाटला; पण माओ झे-डुंग जसा मोकळा आणि स्पष्ट होता तसा तो नव्हता. तो अत्यंत नम्र, सभ्य आणि गोड बोलणारा होता. तो अतिशय संयमी आहे असं वाटायचं. नेपाळमध्ये नुकत्याच झालेल्या बैठकीत त्यानं गोंधळ घातला आणि टेबलावर आदळआपट केली हे ऐकून, म्हणूनच मला आश्चर्य वाटलं. मी त्याला पहिल्यांदा भेटलो तेव्हाच मला कळून चुकलं होतं, की तो फार हुशार आणि धूर्त आहे. त्याच्या हातात असलेले प्रकल्प राबवून घेताना तो कठोरही होऊ शकतो असं मला वाटलं. माओ झे-डुंगबद्दल जसं मला आश्चर्य वाटलं होतं तसं मला चाऊ इन-लाइ यानं तिबेटमध्ये दडापशाहीचं धोरण अवलंबलं, हे नंतर कळल्यावर कणभरही आश्चर्य वाटलं नाही.

मी पेकिंगमध्ये असताना काही मान्यवर परदेशी लोकांनाही थोडावेळ भेटलो. एका मेजवानीच्या वेळी माझी रशियन राजदूताशी ओळख करून देण्यात आली आणि तेव्हा मी त्याच्याबरोबर थोडं बोललो. त्यानं मला सांगितलं, की माझ्याबरोबर जास्त बोलायला त्याला आवडेल आणि मी त्याला आनंदानं होकार दिला. पण ही भेट कधीही झाली नाही आणि मला लक्षात आलं, की परदेशी लोकांबरोबर मी मनमोकळं बोलावं अशी चिन्यांची

इच्छा नाही. रूमेनियाच्या मंत्र्याच्या बाबतीतही अगदी असंच घडलं. भारतीय राजदूताबरोबर माझी मुलाखत झाली. भारत हा आमचा जवळचा शेजारी असल्यानं, चिन्यांना माझ्या या भेटीवर आक्षेप घेता आला नाही; पण त्यांनी एक आग्रह मात्र धरला, की भेटीच्या वेळी माझ्या स्वत:च्या दुभाष्याऐवजी चिनी दुभाषी पाठवला जाईल. माझा स्वत:चा दुभाषी तिबेटीचं इंग्रजीत उत्तम भाषांतर करू शकत होता; पण चिनी दुभाषी मी जे काही बोलायचो ते आधी चिनी भाषेत उतरावयाचा, म्हणजे मग त्याचा सहकारी ते चिनीतून इंग्रजीत अनुवादित करून राजदूताला सांगायचा. त्यामुळे वातावरण अगदी औपचारिक आणि आखडलेलं होतं आणि त्यामुळं विशेष काहीक बोलता आलं नाही. तिथं दुसरेही दोघं अतिशय गंभीर आणि कुर्रेबाज चिनी अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या वेळी फळांचा मोठा वाडगा जरा हलला; आणि या दोन सभ्य गृहस्थांबद्दल माझी या प्रसंगाची मुख्य आठवण काय असेल, तर हे दोघंही हाता-गुडघ्यांवर टेबलाखाली वाकून संत्री आणि केळी शोधत होते!

चीनच्या राष्ट्रीय दिनाच्या सभारंभाला उपस्थित राहण्यासाठी श्री. ख्रुश्चेव्ह आणि श्री. बुल्गॉनिन हे दोघं पेकिंगला आले असताना त्यांची भेट घ्यायची विशेष संधी मला मिळाली. मी विमानतळावर त्यांना भेटण्यासाठी गेलो आणि तिथं माझा त्यांच्याशी परिचय करून दिला गेला. त्याचप्रमाणे त्या दिवशी संध्याकाळी एका स्वागतसमारंभात मी त्यांना भेटलो; परंतु आमच्यात कोणतीही चर्चा किंवा विचारांची देवाणघेवाण झाली नाही.

पेकिंगमध्येच पहिल्यांदा श्री. नेहरू यांना भेटण्याची सुखद संधी मला मिळाली; खरं तर आम्ही ज्या ठिकाणी भेटलो ती अपवित्र जागा होती. पत्रकारांनी गैरसमज करून घेण्यात काय धोका असतो ते मी त्यावेळी पहिल्यांदा शिकलो.

श्री. नेहरूंच्या, चीनची भलावण करण्याच्या धोरणात मी सहभागी होतो असं म्हटलं गेलं, पण ते खरं नाही. मी त्यांच्याबद्दल खूप ऐकलं होतं अन् वाचलं होतं. त्यांच्याशी बोलायला आणि त्यांचा सल्ला घ्यायला मी खूप उत्सुक होतो; पण आम्ही चीनमध्ये होतो तोवर काही मला यश आलं नाही. एका कॉकटेल पार्टीत चाऊ इन-लाइ यानं माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. ते विचारांमध्ये गढून गेल्यासारखे वाटले; आणि थोडा वेळ ते काही बोलले नाहीत. मी त्यांना सांगितलं, की जगातील महत्त्वाचे मुत्सद्दी म्हणून त्यांचं नाव आणि कीर्ती हे दूरवर एकांतात असलेल्या तिबेटमध्ये आमच्यापर्यंत पोहोचलेली आहे. मला त्यांना भेटण्याची फार इच्छा होती हेही मी व्यक्त केलं. ते हसले आणि एवढंच म्हणाले, की माझ्याशी भेट झाल्याचा त्यांना आनंद वाटतो. नंतर जरी मी विविध प्रसंगी त्यांना भेटलो, तरी चीनमध्ये माझा त्यांच्याशी म्हणून झालेला संवाद एवढाच होता. मी त्यांच्याबरोबर खाजगी भेटी घेतल्या अशी वृत्त आली, पण मी तसं काही केलं नव्हतं. तिबेटला मदत करण्यासाठी भारत काही करू शकतो का? असंही त्यांनी मला कधी विचारलं नाही. मला त्यांच्याशी बोलता आलं नाही म्हणून माझी फार निराशा झाली. कारण मला त्यांची मदत आणि सल्ला फार हवासा, गरजेचा होता; पण त्यानंतरच्या वर्षी मी भारतात जाईपर्यंत ती इच्छा पूर्ण व्हायची राहिली.

नेहरूंच्या भेटीच्या वेळी एका स्वागत समारंभात भारतीय वृत्तसंस्थेचा एक प्रतिनिधी चिनी दुभाष्यासहित माझी मुलाखत घ्यायला आला. नेहरूंच्या चीनभेटीबद्दल मला काय वाटतं? असं त्यानं विचारलं. मी उत्तर दिलं, की जगातल्या दोन महासत्ता

एकत्र याव्यात अशी आशा मी करतो आणि त्यामुळे आशिया आणि जगापुढं एक चांगलं उदाहरण राहील. नंतर त्यानं मला विचारलं, की तिबेटमध्ये सुधारणा घडवून आणण्यास माझी तयारी आहे का? त्यावर मी त्याला सांगितलं, की तिबेटमध्ये मी जेव्हापासून सत्तेवर आलो आहे तेव्हापासून राजकीय आणि सामाजिक आयुष्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी मी परोपरीनं प्रयत्न करत आलो आहे. या प्रयत्नांना लवकरच यश यावं आणि नजीकच्या काळात त्याचे सुयोग्य परिणामही दिसावेत अशी मला अपेक्षा आहे; पण त्याचवेळी चिनी दुभाष्यानं खंड पाडला आणि मला तिथून दूर नेलं. चिनी दुभाष्या घाईघाईनं या संभाषणाची टिपणं घेतो आहे हे पाहून मला फार मजा वाटली. नंतर त्यानं मला सांगितलं, की मी जे काही बोलेन ते सर्व काही लिहून ठेवावं आणि अधिकाऱ्यांना त्याचं वृत्त द्यावं असा त्याला आदेश दिला गेला होता.



दलाई लामा पं. जवाहरलाल नेहरूंसह.

माझं जे आदरातिथ्य केलं गेलं त्याची थोडीशी परतफेड म्हणून आणि तिबेटी नववर्ष साजरं करायच्या निमित्तानं मीदेखील पेकिंगमध्ये एक मेजवानी दिली. तिबेटच्या परंपरा आणि चालीरीतींप्रमाणे सर्व काही आयोजित करण्यात आलं होतं. निमंत्रण पत्रिकांवर आम्ही 'फोर युनायटेड ब्रदर्स' (चार भावांचा मिलाफ किंवा चार भावांचे ऐक्य) असं ज्या चित्रांना म्हणतो, ती छापली होती. त्यात एक हत्ती, माकड, एक ससा आणि एक पक्षी असतो. पक्षी हा पवित्रतेचं - भगवान बुद्धाचं प्रतीक आहे. या चित्रांमधून आम्हांला, आमच्या दृष्टिकोनातून, 'राष्ट्रीयतांचा मिलाफ' हे जे चिन्यांचं म्हणणं होतं, त्यावर भर द्यायचा प्रयत्न केला होता. या कार्यक्रमाच्या निमित्तानं अनेक चिनी अधिकाऱ्यांना भेटायची सुसंधी मला मिळाली. त्यात माओ झे-डुंग हाही होता. त्याचे रीतिरिवाज वागण्यातील नम्रता हे पुन्हा एकदा मला भावून गेलं. या कार्यक्रमात आम्ही धार्मिक प्रसंग ठेवले नाहीत; पण आम्ही नववर्षाला अनुसरून असलेल्या आमच्या पद्धतीनं सारं सजवलेलं होतं आणि या प्रसंगी तिबेटमध्ये जो एक खास केक बनवतात तोही ठेवला

होता. आमच्यात अशी एक पद्धत आहे, की या केकचा एक छोटासा तुकडा घ्यायचा आणि वर - छताच्या दिशेनं तो बुद्धाला अर्पण करण्यासाठी म्हणून उडवायचा. जेव्हा माओ झे-डुंगला या प्रथेबद्दल सांगण्यात आलं, तेव्हा त्यानं एक तुकडा छताच्या दिशेनं उडवला आणि अतिशय खोडसाळ भाव दाखवून त्यानं आणखी एक तुकडा जमिनीवर टाकला.

या सर्व सार्वजनिक कार्यक्रमांच्या मधे मधे राष्ट्रीय सभेच्या मोठ्या बैठका असत. राजकीय बैठकांचा असा हा माझा पहिलाच अनुभव होता आणि इतक्या सारया बैठकांमध्ये जे काही चाललं होतं ते अतिशय कंटाळवाणं होतं, हे मला चांगलंच जाणवलं. मला स्वत:लासुद्धा, जे काही चाललं होतं त्यात रस वाटत नव्हता हे कबूल करायला पाहिजे. चीनच्या लांब पल्ल्याच्या प्रवासानं मी एक तर खूप दमलो होतो; आणि सभांमधील सर्व कामकाज चिनी भाषेत असल्यानं मला ते अजिबात कळत नव्हतं. चिनी लोक फारच सतर्क असतात असं मला वाटलं होतं, पण मी ज्या काही ज्येष्ठ प्रतिनिधींजवळ बसलो होतो ते तर माझ्यापेक्षाही दमलेले आणि कंटाळलेले दिसत होते. कशाबद्दल चर्चा चालली आहे ते त्यांना अजिबात कळत नाहीये, हे त्यांच्या चेहर्यावरच्या आविर्भावांवरून वाटत होतं. मधल्या मधल्या चहाच्या सुट्टीच्या वेळेकडे लक्ष ठेवून ते सारखे घड्याळ बघत होते आणि जेव्हा हा छोट्या सुट्टीचा वेळ नेहमीपेक्षा कमी असायचा तेव्हा ते तक्रार करायचे.

चीनमध्ये मी अनेक परिषदांना हजर राहिलो, पण माझं मत कायम तसंच राहिलं. जेव्हा भाषणं ठोकली जात तेव्हा बरेचदा ती असंबद्ध असत आणि त्यात केवळ साम्यवादानं जे काही साधलं होतं त्याचं उदात्तीकरण प्रतिबिंबित होत असे. जेव्हा सदस्य स्वत:चं म्हणून काही मत व्यक्त करत तेव्हा त्याची फारशी दखल घेतली जात नसे. पक्षातला एखादा ज्येष्ठ सदस्य उठून उभा राही आणि अधिकृत असं जे म्हणणं असे ते मांडत असे; आणि कुठल्याही चर्चेला परवानगी न देता सभापती ती विधानं मान्य करून टाकत असे. समित्यांमध्ये खरं तर खूप प्रामाणित चर्चा होत असे, पण त्याचा कुठलाही परिणाम पक्षाच्या निर्णयावर होत नसे. थोडक्यात सांगायचं तर, या दीर्घ चर्चा आणि परिषदा म्हणजे पोकळ औपचारिकता होती. कारण एकाही प्रतिनिधीला कुठलाही बदल करायची ताकद नव्हती. अगदी त्याला कितीही रस असला तरीही तो काहीही करू शकत नसे.

नंतरच्या वर्षी जेव्हा भारतीय संसदेला भेट दिली तेव्हा तिथं फार वेगळं वातावरण मला आढळून आलं. चीनमधल्या राजकीय चर्चांचा अनुभव घेतल्यानंतर, संसदेतील सर्वसामान्य भारतीय सदस्याला स्पष्टपणानं आणि मोकळेपणानं आपली मतं मांडताना पाहून आणि कडक शब्दात सरकारची हजेरी घेताना पाहून मला सुखद आश्चर्य वाटलं. नवी दिल्लीत त्यावेळी चाऊ इन-लाईदेखील होता. मी दिल्लीतल्या अनुभवानं विलक्षण प्रभावित झालो होतो आणि मी ते त्याला सांगितलं; पण त्यानं मला एवढंच उत्तर दिलं, की पेकिंगला मी भेट दिल्यानंतरच्या काळात तिथं बर्याच गोष्टी पूर्णपणे बदलल्या आहेत.

चीनमधल्या राजकीय बैठकांबद्दलचं माझं आणखी एक मत कायम झालेलं होतं : नेत्यांच्या भाषणांची लांबी भयानक असायची. सारया नेत्यांचं वक्तृत्व कलेवर जीवापाड प्रेम होतं असं दिसत होतं आणि त्यांची मतं व्यक्त करण्याची एकही संधी ते दवडत

नसत. चाऊ इन-लाइ जेव्हा बांडुंग परिषदेहून परत आला त्यानंतर त्यानं ठोकलेलं भाषण मला आठवतं. तेव्हा मी तिबेटला परत यायला निघालो होतो आणि चेङ्-तु इथं अडकलो होतो, कारण पुढच्या रस्त्यात भूकंप झाला होता. चाऊ इन-लाइ आणि मार्शल चेन-यि हा पक्षाचा उपसभापती देखील, परिषदेहून चीनला परत जाताना तिथं थांबले होते. ते येत आहेत असं मला कळलं, त्यामुळं मी विमानतळाच्या इथं त्यांना भेटायला गेलो. मी जिथं उतरलो होतो त्या घराजवळ चाऊ इन-लाइ आला आणि काही क्षण बोलणं झालं. नंतर आम्ही स्थानिक लष्करी सभागृहात गेलो. तिथं तीनशे ते चारशे लोक जमले होते आणि परिषदेमधील चीनच्या प्रतिनिधी मंडळाच्या यशाबद्दल भाषण द्यायला त्यानं सुरुवात केली. परदेशी घडामोडींचा अभ्यास करण्याचं महत्त्व त्यानं सांगितलं आणि श्रोत्यांना पुढं हेही सांगितलं, की त्यानं कधी ऐकलेलंही नव्हतं अशा राज्यांच्या प्रतिनिधींना तो भेटला, त्यामुळं जगाच्या नकाशावर त्यांच्या ठावठिकाणांचा त्यानं शोध घेतला. साम्यवादी कारकीर्दीच्या नेहमीच्या 'यशोगाना'नं शेवट होण्याआधी त्याचं भाषण सणसणीत पाच तास चाललं होतं; पण चेन-यि यानं मात्र भाषणाचा विक्रम केला. तो जेव्हा बोलायला लागायचा, तेव्हा तो साधारणपणे सात तास तरी थांबत नसे. त्याचं रटाळ पाल्हाळ ऐकताना, श्रोत्यांच्या मनात काय बरं चाललं असेल असं कुतूहल माझ्या मनात असायचं. पूर्वी मी राष्ट्रीय सभेत पाहिलेल्या, जुन्या वळणानं आयुष्य जगणाऱ्या थोड्याफार प्रतिनिधींपेक्षा, ही मुलं वेगळी होती. बहुतेक सारी तरुण साम्यवादी मंडळी होती. आसपास पाहिल्यावर मला क्वचितच कंटाळा आणि थकव्याची चिन्हं दिसायची. या बहुतेक साऱ्यांचा संयम, सहनशीलता पाहून मला असं वाटलं, की साम्यवादी विचारांच्या मुशीत अगोदरच त्यांची मनं तयार झाली आहेत, पुनर्रचित झाली आहेत.

चीनच्या वेगवेगळ्या भागांमध्ये मी दौऱ्यांसाठी गेलो, तेव्हापासून एका एकसंध, एकेरी अशा समाजमनाचा पक्का ठसा माझ्यावर उमटला. मी तीन महिने या देशात प्रवास केला आणि मठांना, उद्योगधंद्यांना, कामगार संघटनांना, सहकारी शेती उद्योगांना, शाळांना तसंच विद्यापीठांना भेटी दिल्या. साऱ्या देशात एक तत्परता, चटपटीतपणा होता, हे मला सांगायलाच पाहिजे. मी अनेक अधिकाऱ्यांना भेटलो आणि माझ्या मनात त्यांच्याबद्दल खूप आनंदी आठवणी आहेत. जे सर्वोत्कृष्ट अधिकारी होते, ते समर्थ होते तसंच सभ्य आणि मुत्सद्देगिरीत उत्तम प्रशिक्षित होते. सरकारी खात्यांची उत्तम रचना होती आणि ते सारेजण तत्परतेनं काम करायचे. अडाणी कामगारवर्ग समाधानी दिसत होता आणि त्यावेळी तरी त्यांच्या आयुष्याची एकंदर परिस्थिती व्यवस्थित होती, असं मला वाटलं होतं. सुशिक्षित वर्गामध्ये छुपं असमाधान ठसठसत होतं. साम्यवादामुळं चीनमध्ये जी प्रचंड प्रमाणात औद्योगिक प्रगती झाली ती तर कुणीच नाकारू शकत नाही.

तत्परता आणि प्रगती यांचं मूल्यांकन हे देखील त्यांच्यासाठी मोजाव्या लागणाऱ्या किमतीत आहे; चीनमध्ये ही किंमत फार भयंकर आहे असं दिसत होतं. प्रगतीमुळे माणसांचं व्यक्तिमत्त्वच विकलं गेलं होतं. 'माणूस' नावाचा एका मोठा सजातीय गट म्हणून ही सारी माणसं जगत होती. जिथं जिथं प्रत्येक ठिकाणी मी गेलो तिथं ही माणसं मला पद्धतशीरपणे संयोजित, नियमबद्ध आणि नियंत्रित वाटली.

सारे स्त्री आणि पुरुष जाडेभरडे, मळकट कपडे वापरत. साऱ्यांचे कपडे एकसारखे

होते. एवढंच नव्हे, तर सार्‍यांचं बोलणं-वागणंही एकाच छापाचं होतं. मला तर वाटतं, त्यांचे विचारही सारखेच असावेत. त्यांना दुसरं काही करायला क्वचितच जमलं असतं, कारण वृत्तपत्रं आणि बातम्यांची फक्त सरकारी नभोवाणी आवृत्ती - एवढाच काय तो त्यांच्या माहितीचा स्रोत होता. परदेशी वृत्तपत्रं आणि आकाशवाणी यांना बंदी होती. एकदा पेकिंगजवळच्या एका खेड्यातून मी चिनी अधिकार्‍यांबरोबर जात होतो तेव्हा मला युरोपियन संगीत ऐकून सुखद धक्का बसला. बीबीसीवरती बातम्या सुरू होण्याआधी जे संगीत लागतं तसं काहीसं ते होतं; आणि तेव्हा माझ्याबरोबरच्या सहकार्‍याच्या चेहर्‍यावरचे भाव मात्र विलक्षण प्रेक्षणीय होते. चीनमधले लोक उत्स्फूर्तपणे, दिलखुलासपणे हसणंही विसरले होते की काय कोण जाणे; जेव्हा त्यांनी हसणं अपेक्षित असे तेव्हाच ते हसत आणि जेव्हा त्यांना गायचा आदेश मिळे तेव्हाच फक्त ते गात. अर्थात, साम्यवादी मंडळींपैकी नवीन दमाचे काही तरुण, त्यांच्या परीनं हुशार आणि सुशिक्षित होते, पण ते कधीही स्वयंस्फूर्त अस्सल मतं व्यक्त करीत नसत. चीनचा मोठेपणा आणि चीननं साध्य केलेली चमकदार ध्येयं यांची एकच एक गोष्ट सगळीकडे होती. जिथं तिबेटच्या सरहद्दीजवळ माझा जन्म झाला होता तिथं सिनिंग या ठिकाणी पक्षातल्या एका स्थानिक नेत्यानं मला लांबलचक भाषण ऐकवलं. पेकिंगमध्ये मी ज्या गोष्टी पुन:पुन्हा ऐकल्या होत्या, त्या त्या सगळ्या त्यानं मला ऐकवल्या. फक्त त्यानं एक स्वतंत्र म्हणता येईल असा एक शेरा मारला. तो म्हणाला, "रशिया वगळता चीन हा देशातला सर्वात मोठा देश आहे. हा एकच देश इतका मोठा आहे, की तो पार करण्यासाठी संपूर्ण दिवस आणि रात्र आगगाडीनं प्रवास करावा लागतो."

'तत्परता आणि ऐहिक प्रगती आणि अतिशय एकसुरी आणि विनोदाचा तसूभरही शिडकावा नसलेल्या एकसंधपणाचं करडं धुकं होतं. मधूनच प्रसंगापरत्वे कधीतरी प्रकाशून जाणारी, जुन्या चीनच्या मोहकतेची आणि सभ्यतेची चमक': जवळ जवळ एक वर्ष चीनमध्ये राहिल्यानंतर माझ्या मनावर उमटलेलं सर्वसाधारण चित्र असं होतं. कडक शिस्तीची एकसंधता-एकसारखेपणा, हीच अर्थात साम्यवादाची ताकद आहे. पण चिनी लोकांना, या असल्या गुलामगिरीच्या मनोवृत्तीत तिबेटी लोकांना खाली खेचण्यात कधी यश मिळू शकेल असं मला वाटत नव्हतं. धर्म, नर्म विनोदाचा खुमासदारपणा, खेळकरपणा आणि व्यक्तित्वाचं भान या तीन गोष्टी तर तिबेटी लोकांचं चैतन्य आहेत. कुठल्याही लौकिक प्रगतीसाठी किंवा अगदी कुणा परक्याची गुलामगिरी करायला लागणार नसली तरी एकही तिबेटी माणूस या तीन गोष्टींचा सौदा करायला तयार होणार नाही.

मी ल्हासाला परत यायची तयारी करायला लागलो, तेव्हाही माझ्या मनात आशा होती, की अजूनही मी माझ्या लोकांना चिन्यांच्या वर्चस्वाखालच्या दुष्ट परिणामांपासून वाचवू शकतो. माझ्या चीनभेटीचा दोन बाजूंनी उपयोग झाला असं मला वाटतं.

आम्ही कुणाविरुद्ध आहोत हे मला निश्चितपणे कळलं. माओ झे-डुंगनं चिन्यांची जी मूळ योजना आखली होती, त्यानुसार तिबेटवर थेट पेकिंगहून, एका लष्करी आणि राजकीय समितीच्या द्वारे आमच्यावर राज्य केलं जाणार होतं. त्या योजनेपासून चिनी थोडे ढळले आहेत असं मला वाटलं. ते जास्त महत्त्वाचं होतं. आमच्या अंतर्गत बाबींबद्दल आमचं काही प्रमाणात तरी नियंत्रण राहील आणि स्वायत्ततेचं वचनही आम्हाला दिलं गेलेलं आहे, असं मला तेव्हा तरी वाटलं.

'प्रिपेरेटरी कमिटी फॉर द तिबेट ऑटोनॉमस रिजन'- ही जी समिती पर्याय म्हणून

माओ झे-डुंगनं सुचवली होती, तिच्याबद्दल मला एव्हाना सविस्तर कळलं. तिच्यात एक्कावन्न सदस्य असणार होते आणि त्यातले फक्त पाच तिबेटी असणार होते. मी सभापती आणि पनछेन लामा तसंच एक चिनी अधिकारी, उपसभापती झालो असतो. ङ्वो हा सर्वसाधारण सचिव असला असता. आर्थिक आणि धार्मिक बाबींसाठी एक उपसमिती बनवून तिबेटमधील धार्मिक स्वायत्तता आणणं हे या समितीचं काम होतं. ही रचना वरवर पाहता आमच्या छे-खङ् आणि यिग-छ्ङ् त्याचबरोबर सरकारच्या इतर विभागांशी साधर्म्य दाखवणारी होती.

समितीतले सदस्य असंबद्ध पद्धतीनं निवडले गेले असते हे खरंच आहे. माझ्यासकट फक्त पंधरा सदस्य म्हणे आमच्या खऱ्या सरकारचं- 'स्थानिक तिबेटी सरकार'चं प्रतिनिधीत्व करणार होते. नामवंत मठ, धार्मिक गट, लोकांचे गट आणि प्रतिष्ठित लोक यांच्यामधून अकरा जण निवडायचे होते. चिन्यांनी निर्माण केलेल्या दोन गटांचं दहाजणांनी प्रतिनिधीत्व करायचं. याला 'छुमदो मुक्ती समिती' असं नाव होतं. पूर्व तिबेटमधल्या भागात हिची स्थापना केली होती. याच भागावर चिन्यांनी पहिलं आक्रमण केलं होतं आणि पुन्हा आमच्या सरकारच्या ताब्यात हा भाग आलाच नव्हता; दुसरी होती 'पनछेन लामाची समिती'. तिबेटच्या पश्चिम भागात त्यांनी ही तयार केली होती. इथं त्यांना पनछेन लामाला अशी लौकिक सत्ता मिळवून द्यायची होती, की जी त्याच्या पूर्वाधिकाऱ्यांना कधीच नव्हती. उरलेले इतर पाच सदस्य ल्हासातील चिनी अधिकारी होते आणि सर्व नेमणुका या चीन सरकारच्या मान्यतेनुसारच होणार होत्या.

नव्यानं निर्मिलेल्या या नव्या स्वतंत्र भागांना सदस्यत्व देणं हीच मुळात चीनच्या कराराचा भंग, उल्लंघन करणारी बाब होती. कारण तिबेटमधल्या राजकीय स्थितीत बदल करणे किंवा दलाई लामाच्या स्थानात बदल करणे या गोष्टी केल्या जाणार नाहीत, असं करारात म्हटलं होतं. पण पार घायकुतीला, मेटाकुटीला आलेले लोक नेहमी आशेचा किंचितसा कवडसा शोधण्याच्या मागे लागतात. चिनी राजकीय समित्यांचा माझा अनुभव निराशाजनक असूनही सेहेचाळीस तिबेटी सदस्य आणि पाच चिनी यांच्यामुळे काहीतरी तरी काम होऊ शकेल, अशी फोल अपेक्षा मी करीत होतो.

म्हणून मी घरी, परतीच्या प्रवासाला निघालो तेव्हा तिथं काय चाललं असेल याची चिंता होती; आणि स्वातंत्र्याची ही जी शेवटची संधी होती तिचा तरी काही चांगला उपयोग करता येईल अशी आशा घेऊन मी परतत होतो.

दडपशाही आणि चीड

घरी परत जाताना मला तगसेरला पुन्हा भेट देण्याची संधी मिळाली. याच खेड्यात माझा जन्म झाला होता. अप्रिय अशा त्या प्रवासातला तो एक आनंदाचा क्षण होता. अगदी साध्या, नम्र आणि खऱ्याखुऱ्या तिबेटी कुटुंबात माझा जन्म होता, हे आठवून मला अभिमान वाटला अन् कृतज्ञताही दाटून आली. मी चार वर्षांचा असताना ज्या जागा सोडल्या त्यांच्या क्षीण आठवणी जागवताना मला फार मजा आली. पण जेव्हा जेव्हा मी लोकांशी बोललो, तेव्हा मी आकस्मिकपणे पुन्हा वर्तमानाकडे ओढला गेलो. "तुम्ही सारे आनंदात आहात का?" असं मी त्यांना विचारलं. तेव्हा त्यांनी उत्तर दिलं, की ते सारेजण "चिनी साम्यवादी पक्ष आणि सभापती माओ झे-डुंग यांच्या मार्गदर्शनाखाली अगदी आनंदी आणि समृद्ध आहेत." पण जेव्हा ते हे बोलत होते तेव्हा मला त्यांच्या डोळ्यात आसवं दिसली आणि या चिनी साम्यवादी नमुन्याशिवाय इतर कुठलं उत्तर मला द्यायला त्यांना भीती वाटते आहे, हे कळल्यावर मला विलक्षण दु:खद धक्का बसला.

शेजारच्या मठांपैकी एके ठिकाणी, माझं लामांबरोबर जरा सविस्तर बोलणं झालं आणि अर्थात बेधडक बोलण्याचा स्पष्टवक्तेपणा त्यांच्यात होता. ते अतिशय चिंतेत असल्याचं मला आढळून आलं. चिन्यांनी सामूहिक शेतीची जबरदस्ती लादायला अगोदरच सुरुवातही केली होती आणि शेतकऱ्यांच्यामध्ये त्याबद्दल कडवट संताप होता. चिनी, हे त्यांच्या योजना स्वीकारल्या जाव्यात म्हणून शेतकऱ्यांवर अधिकाधिक जुलूम करत जाणार हे लामांनी ताडलं होतं. लोकांच्या इतर नेत्यांशीही मी बोललो आणि त्यांनी मला इतर साम्यवादी 'सुधारणां'बद्दल माहिती दिली. ते म्हणाले, की ताण-तणाव वाढतो आहे आणि चिनी जास्त जास्त जुलमी आणि संशयी बनत चालले आहेत. मी चिनी अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांना सांगितलं, की सुधारणांची गरज आहे, पण ते सारे बदल चीनमधल्यासारखेच व्हायला पाहिजेत असं नाही. त्यांची जबरदस्ती केली जाऊ नये. स्थानिक परिस्थितीचा अंदाज घेऊन तसंच लोकांच्या इच्छा आणि सवयी लक्षात घेऊन टप्प्याटप्प्यानं त्यांची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. पण पेकिंगपेक्षा इथले चिनी अधिकारी उर्मट आणि पूर्णपणे सहानुभूतीशून्य आहेत, हे पाहून मी निराश झालो. त्यांना लोकांच्या भावनांकडे दुर्लक्षच करायचं होतं. एका चिनी जनरलनं मला पुढं जाऊन हेही सांगितलं, की लोकांना काय हवंय किंवा काय नकोय याच्याशी आम्हांला काही देणं-घेणं नाही. उलट सुधारणा राबवण्यासाठी आम्ही अधिक पथकं इथं मागवणार आहोत. चिन्यांच्या इथल्या भागातल्या आमच्या तिबेटी लोकांचं भवितव्य निश्चितपणे अंधारमय दिसत होतं.

असं असूनही इथली माणसं व्यक्तित्वानं पूर्णपणे तिबेटी राहिली. मी इथं-तिथं दोन-दोन तीन-तीन दिवस थांबत गेलो. कधी चिन्यांच्या अधिकृत विश्रामगृहांमध्ये तर कधी मठांमध्ये राहिलो. सर्व जिल्ह्यांमधून जवळ जवळ 100,000 माणसं मला पाहायला आणि माझ्याबद्दलचा आदर व्यक्त करायला आली होती.

मी पेकिंगमध्ये असताना, एक प्रतिनिधी मंडळ मला विनंती करण्यासाठी भेटायला आलं. त्यांनी विनंती केली, की घरी परत जाताना पूर्व तिबेटमधल्या महत्त्वाच्या

जागांना मी भेट दिली तर बरं होईल. पुढचा रस्ता भूकंपामुळं खराब झाल्यानं मला उशीरच झाला होता. त्यामुळं मला जिथं जिथं जायला आवडलं असतं अशा सर्वच ठिकाणी काही मी जाऊ शकलो नाही. गाडीनं पोहोचता येईल अशा सर्व मठांमध्ये मी गेलो आणि इतर ठिकाणी भेट देण्यासाठी माझे प्रतिनिधी म्हणून मी तीन श्रेष्ठ लामांना पाठवलं. हे तिघं होते, ठ्रिजङ् रिनपोचे (माझे कनिष्ठ गुरू), छुङ् रिनपोचे आणि कर्मा-पा होता; माझ्या खेड्याच्या वरच्या बाजूला डोंगरावर ज्याच्या चौथ्या पुनरावतारानं मठ स्थापन केला होता, त्याच कर्मा-पाचा हा कर्मा-पा पुनरावतार होता.

सरहद्दीवरच्या या सर्व भागात मी तीच ती जड अशी दु:खाची छाया जाणवली. तिबेटी लोकांमध्ये मला चिन्यांबद्दल वाढता कडवटपणा आणि तिरस्कार आढळला; आणि चिन्यांमध्ये मला वाढत्या प्रमाणात निष्ठुरता आणि ठामपणा प्रत्ययास आला. भीती आणि समंजसपणाचा अभाव यांमुळे हे घडत होतं. जेवढं शक्य होतं तितकं मी चिन्यांना, थोडं नरमाईनं घ्या अशी विनंती केली आणि अनेक सभांमधून तिबेटी लोकांशीही मी वेळोवेळी बोललो. त्यांना सांगितलं, की सर्वांनी संघटित राहिलं पाहिजे, शांततापूर्ण मार्गांनी गोष्टी सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि चिन्यांच्या धोरणांमध्ये जे काही चांगलं असेल ते स्वीकारावं. मला असं वाटलं, की किमान हिंसाचार टाळण्यासाठी हा सल्ला उपयोगी पडेल. वर्षभरात परस्परांमधली शत्रुता किती वाढली होती हे मी येताना अनुभवलं होतं. त्यामुळे ही आशा फारच क्षीण होती हे माझं मला कबूल केलंच पाहिजे.

तिबेट आणि चीनची हद्द सांगणारी डी-छु (भुताची नदी) मी पार केली आणि छमदो या प्रदेशात प्रवेश केला. इथंच आक्रमणाला सुरुवात झाली होती. छमदो शहरातल्या चिनी मुख्य केंद्रावर मी थोडे दिवस थांबलो आणि काही दिवस तिथल्या मठात राहिलो. याच ठिकाणी चिन्यांनी 'छमदो मुक्ती समिती'ची स्थापना केली होती आणि या समितीबरोबर भविष्यात काम करणं अपेक्षित होतं. तिच्यात आधी काही तिबेटी सदस्य होते, पण लवकरच मी पाहिलं, की चिनी अधिकाऱ्यांच्या हातातच सर्व अधिकार एकवटलेले आहेत आणि जिल्ह्यावर लष्काराचीच सत्ता चालली आहे. इथंही संताप उकळत होता आणि लोकांनी मला छळांच्या आणि अन्यायांच्या गोष्टी सांगितल्या. शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या गेल्या होत्या. ज्या आश्वासनांवर आधी तिबेटी लोकांचा विश्वास होता, ती आश्वासनं आधीच मोडली गेली होती. इथं तर अचानक हिंसाचार उद्भवेल अशी परिस्थिती होती. हा खांपा लोकांचा जिल्हा होता. मी आधी सांगितलं होतं, की खांपा लोकांची सर्वात प्रिय, मौल्यवान अशी मालकीची वस्तू कोणती, तर त्याची बंदूक. आता खांपा लोकांच्या कानावर आलं होतं, की लवकरच चिनी अधिकारी सर्व नागरिकांकडची शस्त्र चिन्यांच्या हवाली करण्याचं फर्मान काढणार होते. खांपा कधीही त्याची बंदूक कुणाच्याही हवाली करणार नाही - तो पहिल्यांदा ती वापरणारच याची मला पूर्ण खात्री होती.

इथंही हजारो लोक माझ्याविषयीचा त्यांचा आदर व्यक्त करायला आले. मी त्यांचं स्वागत केलं आणि त्यांना सांगितलं, की त्यांच्यातलं स्वातंत्र्याचं चैतन्य पाहून मला आनंद वाटतो. मी पुढं म्हणालो, की मध्यवर्ती तिबेटी सरकारच्या तिबेटी अधिकाऱ्यांनी पूर्वी ज्या पद्धतीनं वर्तणूक केली त्यात उणिवा होत्या. त्यांना आक्रमणाचं दिव्य सोसावं लागलं त्यामागचं किमान हे एक कारण असलं पाहिजे. पण आता मात्र सर्व तिबेटी

लोकांचं हे कर्तव्य आहे, की त्यांनी संघटित राहिलं पाहिजे. मग जेव्हा प्रारंभिक समितीचं काम चालू होईल तेव्हा छमदो हा आपल्या देशात पुन्हा अंतर्भूत होईल.

सरहद्दीवरून मी जो प्रवास केला त्यामुळं चीनमध्ये केलेल्या माझ्या दोन निरीक्षणांची मला आठवण झाली, एक अगदी दु:खद होतं तर दुसरं आशेचा उरला-सुरला किरण दाखवत होतं.

पहिलं निरीक्षण होतं चिनी मठांचं. चीनच्या लांबलांबच्या भागातली देवळं आणि मठ हे पूर्ण दुर्लक्षित होते, बहुतांशी रिकामे होते.

ऐतिहासिक दृष्टीनं मोठ्या महत्त्वाच्या जागांची हीच अवस्था होती. तिथं असलेले उरलेले काही भिक्षू म्हातारे होते आणि अशा काही संशयास्पद वातावरणात राहात होते, की काही थोडकी माणसं देवळात येऊन प्रार्थना करण्याचं किंवा वस्तू अर्पण करून जायचं धाडस करायची. मंगोलियातल्या आतल्या भागात अजून विद्वान लामा आहेत असं जरी मला सांगितलं गेलं होतं, तरीसुद्धा भिक्षूंमध्ये फारसं पांडित्य उरलं आहे असं काही मला वाटलं नाही. मी पेकिंगमध्ये होतो तेव्हा मंगोलियाच्या अंतर्भागातून खरंच हजारो लोक मला भेटायला, माझे आशीर्वाद घ्यायला आले होते. पण संन्यस्त मार्गावर जाण्यापासून तरुण लोकांना परावृत्त करण्यात येत होतं आणि धार्मिक संस्थांमध्ये साम्यवाद्यांनी इतक्या हुशारीनं शिराकाव करून घेतला होता, की या संस्थांचाच राजकीय प्रचारासाठी वापर करून घेतला जात होता. चीनचं सरकार म्हणत होतं, की लोकांना धार्मिक स्वातंत्र्य आहे; पण धार्मिक संस्थांच्या भविष्यासाठी कुठलीच तरतूद नव्हती. त्यांना मृत्युपंथाला लावलं होतं आणि झिजत-कुजत संपविण्याची व्यवस्था केली गेली होती.

जे तिबेटी भिक्षू आणि मठ आधीच चिन्यांच्या कह्यात गेले होते त्यांच्यावर हीच काळी छाया तरंगणार आहे, हे भविष्य मला दिसत होतं; पण माझं दुसरं एक निरीक्षण मला धीर देऊन सांगत होतं, की हे अजूनही टाळता येऊ शकेल.

चिन्यांच्या मतप्रणालीच्या विळख्यात सहजासहजी सापडू शकणार नाहीत अशा तेजस्वी तिबेटी लोकांची झळझळीत उदाहरणं मी पाहिली होती. तरुण असो वा वृद्ध, हे तिबेटी त्यांचं अस्तित्व आणि श्रद्धा यांना घट्ट पकडून होते. पेकिंगमध्ये 'स्कूल ऑफ नॅशनॅलिटीज' इथं तिबेटी मुलांना नेऊन दाखल केलं गेलं होतं. त्यांच्याबरोबर मंगोलिया, पूर्व तुर्कस्तान आणि कोरिया इथली मुलंही होती. या मुलांच्या मनातून त्यांच्या स्वत:च्या धर्माबद्दलच्या आणि सांस्कृतिक परंपरांबद्दलच्या कल्पना पूर्णपणे काढून टाकण्याचा आणि तिथं राज्यातल्या हुकूमशाहीबद्दलच्या नव्या कल्पना कोंबण्याचा चिन्यांनी परोपरीनं हरेक प्रयत्न केला; पण तिबेटी मुलांची मनं मात्र त्यांच्या काबूत जावू शकली नाहीत हे पाहून मला आनंद झाला. त्यांच्या मनात अजूनही आमचे स्वत:चे आदर्श तेवत होते आणि त्यांची राष्ट्रीय भावना, चैतन्य नष्ट होऊ शकलेलं नव्हतं. शेवटी चिन्यांनी त्यांचे परिवर्तन करायचे प्रयत्न सोडून दिले आणि नंतर या मुलांना त्यांच्या घरी परत यायचा मार्ग मोकळा झाला. ल्हासामध्ये चिनी राजवटीविरुद्ध झालेल्या उठावात यांपैकी काही जणांनी प्राण गमावले; आणि काही जण विशीच्या खालच्या वयातच भारतात निर्वासित म्हणून आले. या अपयशानंतर सरहद्दीवरच्या भागात चीननं अनेक शाळा उघडल्या, पण तिथंही त्यांना यश आलं नाही. त्यांचं लौकिक शिक्षण तिबेटी मुलांच्या काही केल्या पचनी पडायचं नाही. विचारांनी ती पूर्णपणे तिबेटी आणि बौद्धच

राहायची. मंगोलिया आणि पूर्व तुर्कस्तानमधली मुलंही अशाच हठवादानं, चिवटपणानं आपल्या श्रद्धांना चिकटून राहिली असतील असं मला वाटतं. असं निश्चितच झालं असलं पाहिजे, कारण नंतरच्या काळात, काही आठवडे वयाची तिबेटी बाळं हिसकावून चीनमध्ये न्यायचा उद्योग चिन्यांनी चालू केला. ही मुलं तिबेटी साम्यवादी म्हणून मोठी व्हावीत ही अपेक्षा त्यामागे होती. परंतु दरम्यानच्या काळात तरुण तिबेटी मुलांमधली गाढ श्रद्धा पाहून मला प्रोत्साहन मिळालं. चिन्यांनी कितीही प्रयत्न केले तरी ते आमचं निषेधीपणं नष्ट करू शकणार नाहीत.

नव्यानं झालेल्या चिनी लष्करी रस्त्यावरून, चीन ते तिबेट हा प्रवास अजूनही तसा साहसाचाच होता. मुसळधार पाऊस कोसळत होत; नद्यांना पूर आले होते आणि रस्त्यात अनेक कडे कोसळत होते, दगड पडत होते, कोसळत्या पावसाच्या रात्रीची एक आठवण मला लख्खपणे आठवते. आमचा मार्गदर्शक एका तुटक्या पुलाजवळ जरा वेळ थांबला होता. डोंगरावरून अगदी त्याच जागी वरून मोठमोठ्या शिळा कोसळत होत्या. चिनी लोक गोंधळ माजवत, आरडाओरडा करत फिरत होते; आम्ही तिबेटी लोक कॅनव्हासनं झाकलेल्या आमच्या जीपमध्ये बसलो होतो आणि आमच्या प्रार्थना म्हणत होतो. आदल्याच दिवशी, जिवावरच्या एका दुर्घटनेतून आम्ही जेमतेम वाचलो होतो. आम्ही ज्या एका पुलाशी आलो तो दुसऱ्या बाजूला पार कोसळला होता. चिनी लोकांनी त्याची तात्पुरती डागडुजी केली होती आणि आम्ही तो पार करू शकू असं वाटत होतं; पण त्यांनी आम्हाला वजन कमी पडावं म्हणून चालत पलीकडे जायला सांगितलं आणि तिथं मार्गदर्शकाची वाट पाहवी असं सांगितलं. आम्ही तसं केलं. आम्ही आमच्या जीप आणि ट्रक येताना पाहत राहिलो. काही वाहनं सुरक्षितपणे पलीकडे आली आणि नंतर एका जीपची चाकं जशी पुलावर आली तसा काड काड, असा मोठा आवाज झाला. लाकडाच्या चिरफळ्या उडाल्याचा आवाज आला. पूल साफ तुटला आणि खालच्या पाण्याच्या प्रवाहात कोसळला. सुदैवानं चालकानं हा आवाज ऐकला आणि त्यानं जीप झटकन मागे घेतली आणि स्वत:ला वाचवलं. पण मार्गदर्शक म्हणून आलेल्यांपैकी अर्धेजण नदीच्या भलत्याच बाजूला होते. आमचे कोरडे कपडे, अंथरुणं असं सगळं तिकडंच राहिलं. जी काही थोडी वाहनं पलीकडे आली होती त्यामध्ये आम्ही कसेबसे अंग कोंबून बसलो आणि एका चिनी विश्रामगृहात गैरसोयी सहन करीत काकडत, ती रात्र कशीबशी काढली.

अखेरीस मी ल्हासात पोहोचलो. नोर्बुलिङ्गा इथं परत आल्यावर मला किती सुखद आणि कृतज्ञ वाटलं म्हणून सांगू? त्याच्या भिंतीच्या बाहेर असलेल्या चिनी लष्करी छावण्या आम्हाला डाचत होत्या; पण आत मात्र, तसंच शांत आणि सुंदर वातावरण होतं. आमचं धार्मिक आयुष्य बरंचसं पूर्वीसारखंच चालू होतं.

माझं मंत्रिमंडळ अजूनही चिन्यांबरोबर बऱ्यापैकी मैत्रीचे संबंध टिकवून आहे, असं मला दिसलं. ल्हासातल्या लोकांमधली शत्रुता जणू नष्ट होऊन प्रसन्न राहण्यासाठी वाटचाल चालू आहे की काय असं वाटलं. शहर शांत-संथ होतं. पूर्वेकडे सरहद्दीवरच्या भागात कुठले जबरी बदल लादण्यात येत आहेत याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. तिकडे जो जहाल असंतोष मी पाहिला होता, तो अजूनी मध्य तिबेटमध्ये जोमानं पसरला नव्हता. म्हणून प्रस्ताव समितीला अजूनही काहीतरी उपयुक्त काम करायला आणि दुर्दशा थोडीशी टाळायला वाव आहे असं वाटत होतं.

समितीच्या उद्घाटनासाठी चीनचं सरकार मार्शल चेन-यि याला पाठवणार होतं. सात

तास भाषण ठोकण्यासाठी प्रसिद्ध असलेला हाच तो उपपंतप्रधान. ल्हासाला तो आला तेव्हा त्याचं स्वागत करायला मी जावं असं चिन्यांना वाटत होतं. माझ्या मंत्रिमंडळानं हे मान्य करायला साफ नकार दिला; पण मला असं वाटलं की प्रतिष्ठेचा बाऊ करत बसण्याची ही वेळ नाही. एवढं केल्यानं मार्शलला जर बरं वाटणार असेल तर कदाचित समितीचं काम चांगलं सुरू व्हावं म्हणून तो मदतही करेल. असं झालं तर योग्य होईल म्हणून मी गेलो.

एप्रिल 1956 मध्ये उद्घाटनाचा सोहळा होता. या एक्कावन्न सदस्यांमध्ये देशात शांतपणे बदल घडून यावा अशी धुगधुगणारी अखेरची आशा मला दिसत होती. ही भावना मनात ठेवूनच मी तिथं उपस्थित होतो. ती काही अगदीच अशक्य अशी आशा नव्हती. घटनात्मक आखणी, योजना विश्वसनीय आणि आकर्षक दिसत होत्या. कागदावरच्या आराखड्यावर तरी साम्यवादातली, पूर्णपणे स्वीकारायला अवघड अशी एकही बाब नव्हती. तिबेटी सदस्यांची त्यातली संख्या मोठी होती. त्यामुळं असं वाटत तरी होतं, की आमच्या स्वत:च्या सरकारला मिळतं-जुळतं होईल असं अत्यंत तत्पर असं सरकार यातून घडवता येऊ शकेल. मला असं वाटत होतं, की यामुळं आमच्या तिबेटी अधिकाऱ्यांना चिनी अधिकाऱ्यांकडून त्यांच्या प्रशासनाच्या पद्धतींबद्दल शिकायची संधी मिळेल. कारण साम्यवाद वगळता, त्यांचं प्रशासन नि:संशय आमच्यापेक्षा चांगल्या दर्जाचं होतं.

या अपेक्षाही लवकरच मोडून पडल्या. चीनच्या राजकीय सभांमध्ये जे अनिष्ट, अरिष्टकारक असं मी पाहिलं होतं त्याची पुनरावृत्ती इथं झाली. एक बाब मी गृहीत धरलेली नव्हती ती म्हणजे, यातले वीस सदस्य तिबेटी असले तरी ते 'छुमदो मुक्ती समिती' आणि पश्चिम जिल्ह्यातल्या पनछेन लामाच्या समितीचं प्रतिनिधीत्व करणारे होते. या दोन्ही गोष्टी खास चीनची 'निर्मिती' होती. या प्रतिनिधींना त्यांची स्थानं चिन्यांमुळं मिळालेली होती. त्या बदल्यात त्यांनी चीनच्या योजनांना पाठिंबा द्यायचा होता. पनछेन लामाच्या प्रतिनिधींपेक्षा छुमदोच्या प्रतिनिधींची वागणूक बरीच चांगली होती. अशा प्रकारे मतं पद्धतशीरपणे नियंत्रित करून ठेवलेली होती. त्यात भरीला पाच चिनी सदस्य होते. त्यामुळे समिती ही वस्तुत: शक्तिहीन, अधिकारशून्य होती. तिबेटी प्रतिनिधीत्व हे केवळ दिखाऊ होतं, पण त्याच्या आडून चिन्यांकडून सत्तेची सूत्रं पक्केपणानं हलवली जात होती. खरं तर, सारी मूलभूत योजना ही दुसऱ्याच एका गटाकडून ठरवली जात होती. तिबेटमधल्या या गटाचं नाव होतं 'चिनी साम्यवादी पक्षसमिती'. याच्यात तिबेटी सदस्य अजिबात नव्हते. आम्हाला किरकोळ मुद्यांवर चर्चा करायची परवानगी होती, पण आम्ही एकही महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकत नव्हतो. मी जरी नाममात्र सभापती होतो, तरी मला फारसं काहीही करता येण्यासारखं नव्हतं. त्यामुळं कामकाज कसं नियंत्रित आणि शिस्तबद्ध चाललंय, हे पाहणं कधी कधी फार हास्यास्पद असे. दुसऱ्या समितीत अगोदरच तयार केल्या गेलेल्या योजनांवर बिनकामाची, निष्फळ आणि पोकळ चर्चा होऊन, ती योजना संमत केली जात असे. असल्या सभांमध्ये मला बऱ्याचदा पेचात सापडल्यासारखं होत असे. मला कळत होतं, की चिन्यांनी त्यांच्या योजनांमध्ये तिबेटी अधिकाराचा वरवरचा देखावा उभा व्हावा म्हणून मला सभापती केलेलं होतं.

समितीनं जेव्हा तिच्या सरकारचे म्हणून वेगवेगळे विभाग स्थापन करायला सुरुवात

केली, तेव्हा नक्की काय घडतंय ते लोकांना कळायला लागलं आणि मग मात्र त्यांच्या ज्या प्रतिक्रिया घडल्या त्यात अनपेक्षित, आश्चर्यकारक असं काही नव्हतं. जे जे काही चिनी आहे त्याबद्दलचं त्यांचं वैर पुन्हा उफाळून येऊ लागलं. ल्हासामध्ये या नव्या संस्थेबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी एक सार्वजनिक सभा झाली. तिच्यात एक ठराव करण्यात आला आणि चिनी अधिकृत सत्तेकडे तो पाठवून देण्यात आला. त्यात म्हटलं होतं, की 'दीर्घकाळापासून तिबेटला स्वत:ची म्हणून प्रशासन पद्धत आहे आणि त्यामुळे ही नवी संस्था अनावश्यक आहे, त्यामुळे ती नष्ट केली जावी.' जरी ही मागणी लोकप्रिय असली तरी चिन्यांनी तिला उत्तर दिलं नाही. त्यांनी मंत्रिमंडळाला खडसावलं, की जाहीर सभांवर बंदी घालण्यात मंत्रिमंडळाला अपयश आलं आहे; त्यामुळे ते करण्यासाठी आता मला भेटतील. असं झाल्यानं मंत्रिमंडळानं अनिच्छेनं नवीन जाहीरनामा तयार केला. त्यावर इच्छा नसताना मी सही केली. सार्वजनिक सभांवर बंदी घालून जनमत काही दबलं जाणार नाही याची मला पूर्ण जाणीव होती. लोकांचा दोष दुसऱ्या मार्गानं उसळणं यामुळं अपरिहार्य बनलं होतं.

1956 च्या सुरुवातीला मोनलम उत्सवाच्या वेळी एक घटना घडली. चिन्यांविरुद्ध सर्वसामान्य लोकांची जी चीड होती, तिच्यातून तिबेटमध्ये एक वेगळंच वातावरण निर्माण झालं. लोकांनी उत्स्फूर्तपणे राजकीय नेते स्वत:हून निवडले. हे नेते म्हणजे सरकारी अधिकारी नव्हते. त्यांना अधिकृत असं कुठलंच पद नव्हतं, पण समाजाच्या अगदी सर्वसामान्य घटकातून आलेले होते. मी जेव्हा त्यांना 'राजकीय नेते'असं म्हणतो तेव्हा मला 'राजकीय' हा शब्द पाश्चात्य मतानुसार अपेक्षित नाही. चिनी हे साम्यवादी आहेत म्हणून त्यांचा त्यांना विरोध नव्हता; जगात दुफळी माजवणाऱ्या कुठल्याही राजकीय सिद्धांतांशी त्यांना काहीही देणं-घेणं नव्हतं. ती अगदी साधी माणसं होती. त्यांनी अव्यक्त अशा आमच्या असंख्य लोकांबरोबर दु:ख आणि क्षोभ अनुभवला होता; आणि त्या साऱ्याला दु:खाला वाचा फोडण्याची, शब्दरूप देण्याची धमक-उपजत क्षमता त्यांच्या अंगी होती. म्हणूनच त्यांचा प्रभाव पडू शकला.

या लोकांनी ल्हासातल्या जनतेचं संघटन केलं, नेतृत्व केलं. एकंदरीत त्यांनी लोकांच्या वतीनं त्यांना जाणवलेला संताप व्यक्त केला. 'जशास तसे' या न्यायानं वागावसं वाटणं ही नैसर्गिक मानवी प्रतिक्रियाच आहे. त्यामुळं साहजिकच कधी कधी अटळपणे त्यांचे माझ्या मंत्रिमंडळाशी खटके उडाले. कारण माझ्याप्रमाणेच मंत्रिमंडळाला कळून चुकलं होतं, की चिनी लष्करविरुद्ध 'ठोशास ठोसा' करण्याचा प्रयत्न करणं निष्फळ आहे. त्या नेत्यांच्या राष्ट्रभक्तीनं रसरसलेल्या पण आत्मघातकी होऊ शकणाऱ्या योजनेवर मंत्रिमंडळाला लगाम घालावा लागला. यामुळं साहजिक त्यांचा असा ग्रह झाला, की मंत्रिमंडळ हे आक्रमकांना चुचकारत आहे. कधीकधी मलाही मध्ये पडावं लागलं आणि त्यांच्या हिंसक कारवायांना विरोध करावा लागला. कारण ज्या लोकांचं ते प्रतिनिधीत्व करत होते त्यांनाच त्याचा त्रास झाला असता. त्यांना राग आला असू शकेल, पण नाईलाजानं कडवटपणानं ते मनापासून माझ्याशी प्रामाणिकपणे एकनिष्ठ राहिले. माझ्यातल्या काही व्यक्तिगत सद्गुणांमुळे ही एकनिष्ठता मला मिळाली, असं मी म्हटलं तर त्यात आत्मप्रौढी नव्हे. त्यांच्या एकनिष्ठेतेचं कारण होतं 'दलाई लामा' ही संकल्पना. ते ज्यासाठी संघर्ष करत होते त्या साऱ्याचं प्रतीक मी होतो. साऱ्या तिबेटी लोकांची हीच अढळ श्रद्धा होती आणि आहे.

माझ्याबद्दल म्हणाल तर, जरी मी त्यांना विरोध केला तरी मला त्याचं कौतुक होतं. नेतृत्वाचे असे गुण तिबेटी लोकांच्यात आहेत हे तरी अशा दुर्दैवाच्या वेळी दिसलं याचा मला आनंद वाटला. अशा गुणांची तर आम्हाला कायमच गरज भासेल.

मोनलम उत्सवाच्या वेळच्या या नेत्यांच्या कारवाया या परंपरागत समारंभाच्या काळात मोठ्याच विसंगत होत्या. पहिल्यांदाच उत्सावावर राजकीया सावट पडलं आणि त्याची सर्वांनाच चुणूक मिळाली. जेव्हा मिरवणूक गोल फिरली आणि कित्येक भिक्षूंनी रस्ते फुलून गेले होते, तेव्हा सार्‍या शहरभर पत्रकं चिकटवली गेली होती. नेहमीप्रमाणे 'चिन्यांनो परत जा' आणि 'तिबेटी लोकांच्या हातात तिबेट राहू दे' अशी मागणी त्यांनी केलेली होती. नेहमीसारखीच चिनी जनरलना यामुळे चीड आली. पुन्हा नेहमीप्रमाणे त्यांनी मंत्रिमंडळाला बोलावलं आणि त्याच्यावर खापर फोडलं. परंतु यावेळी, त्यांनी आगपाखड करून दिलेल्या धमक्यांमध्ये, तीन लोकप्रिय नेत्यांची नावं घेतली. प्रस्ताव समितीविरुद्ध ज्यांनी ठराव केला होता त्यांपैकी हे तिघं होते. त्यामुळे चिन्यांनी ठासून सांगितलं, की माहितीपत्रकं आणि भित्ती-चित्रपत्रकं यांना तेही जबाबदार आहेत. मंत्रिमंडळानं त्यांना अटक करण्याचं फर्मान सोडावं, असा त्यांचा आग्रह होता. खरं तर त्यांनी आमचा कुठलाच कायदा मोडला नव्हता; परंतु चिन्यांनी धमकी दिली, की जर तिबेटी लोकांनी त्यांना अटक करायला नकार दिला तर ते स्वत: त्यांना अटक करतील आणि त्यांची कसून चौकशी करतील. म्हणून मग या सर्वात मोठ्या दुर्दशेतून त्यांना वाचवण्यासाठी मंत्रिमंडळानं त्यांना तुरुंगात टाकलं. एकाचा तिथं मृत्यू झाला. इतर मात्र सुटले, कारण ल्हासातील तीन श्रेष्ठ मठांनी त्यांच्या वर्तणुकीबद्दल हमीपत्र घेतलं; आणि त्यापैकी एक आता भारतात माझ्याबरोबर आहे.

मध्यंतरीच्या काळात, छमदोहून येणार्‍या बातम्यांवरून, पूर्वेकडल्या अजूनही पूर्णतया चिनी लष्करी अंमलाखाली असलेल्या जिल्ह्यात परिस्थिती अधिकाधिक बिकट होत चालली होती. मोनलम सणाच्या वेळी, सरहद्दीपलीकडे लिथङ् इथं हाणामारी झाली. प्रस्ताव समितीचं उद्घाटन झाल्यानंतर लगेचच छमदो इथल्या चिनी जनरलनं 350 मान्यवर अशा तिबेटी व्यक्तींची सभा बोलावली. त्यानं त्यांना सांगितलं, की तिबेट हा साम्यवादी बदलासाठी तयार नाही. बदलांचा परिचय हळूहळू करू दिला गेला पाहिजे आणि तो बहुसंख्य तिबेटी लोकांनी मान्य केला तरच पण तो स्वीकारला जावा असं दलाई लामा म्हणतात. पण नंतर तो म्हणाला, पनछेन लामानं सांगितलं आहे, की बदल काय ते एकाचवेळी पुढे आणले गेले पाहिजेत. या दोन्ही पर्यायांवर चर्चा व्हावी म्हणून ती बैठक बोलावलेली होती आणि त्यातून छमदो इथं काय केलं गेलं पाहिजे ते ठरवलं जाणार होतं.

ही चर्चा बरेच दिवस चालली. शेवटी, जेव्हा मी आणि उर्वरित तिबेट मान्यता देतील तेव्हा दुरूस्त्या व्हाव्यात - या बाजूनं शंभर लोकांनी मत दिलं. चाळीस जणांचं मत पडलं, की काय त्या दुरूस्त्या सरळसोट व्हाव्यात. उरलेल्या, अंदाजे 200 जणांनी मत नोंदवलं, की जरी सुधारणा हा पर्याय म्हणून दिला नसला तरी त्यांची अजिबात गरजच नाही. जनरलनं सार्‍यांना धन्यवाद दिले आणि सुधारणा यथावकाश आणल्या जातील असं जाहीर केलं आणि प्रत्येक सदस्याला एक चित्रांचं पुस्तक, पेन, शाई, कागद आणि वैयक्तिक स्वच्छतेसाठी उपयुत अशा काही वस्तू भेट म्हणून दिल्या. सार्‍या भेटवस्तूंची विचारपूर्वक निवड केली होती असं वाटलं. नंतर निरोप दिला गेला.

सरहद्दीवरच्या भागातल्या अधिकार्‍यांना एका महिन्याच्या आत पुन्हा बोलावलं

गेलं. छुमदो इथल्या 'ज़ोमदा जोङ्' या किल्ल्याच्या इथं बोलावलं गेलं होतं. चिनी तुकड्यांनी त्यांना घेरून टाकलं आणि 'लोकशाही पद्धती'च्या दुरुस्त्या सुरू केल्या जातील असं सांगितलं. सरहद्दीपलीकडच्या भागात या तथाकथित लोकशाही सुधारणांमुळं झालेली दुर्दशा त्यांनी पाहिली होती त्यामुळे त्यांनी निषेध नोंदवला. त्यांना त्यापैकी काहीही नको होतं. चिन्यांनी त्यांना किल्ल्यात जवळजवळ पंधरवडाभर ठेवून त्यांचं मन वळवत राहण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत या अधिकाऱ्यांनी तोंडी संमती दिली. त्यांना सांगितलं गेलं, की आपापल्या भागात लोकांना सुधारणा समजावून सांगण्यासाठी त्यांना परत पाठवलं जाईल, पण त्याआधी त्यांना स्वत:लाच प्रशिक्षण घ्यायला पाहिजे.

या बोलाचालीनंतर किल्ल्याला वेढून बसलेले चिनी पहारेकरी जरा सैलावले. जेव्हा 'सिद्धांत' शिकवण्याचा वर्ग चालू होणार होता तेव्हा आदल्या रात्री, दोनशे अधिकारी किल्ल्याबाहेर सटकले आणि डोंगरात पळाले.

चित्यांच्या अशा या आततायी कृतीमुळं जिल्ह्यातल्या बहुतांशी निवडक लोकांना हद्दपार केल्या गेलेल्या गुंडांप्रमाणं परागंदा अवस्थेतील आयुष्य जगण्यासाठी भाग पाडलं गेलं. कारण जर ते घरी परत गेले तर आता त्यांना अटक करण्यात येईल हे त्यांना पक्कं ठाऊक होतं. त्यांनी एक गट स्थापन केला. हा गट वाढतच जाणार होता. चिन्यांकडून शस्त्रसाठा बळकावूनच त्यांना स्वत:चं संरक्षण करता येणार होतं; त्यामुळे इच्छा असो वा नसो, त्यांना युद्ध करावंच लागलं. पूर्वेकडले तिबेटी, खास करून खांपा लोक हे काटक आणि दृढनिश्चयी होते. त्यांना त्यांचा डोंगराळ भाग ठाऊक होता आणि गनिमी काव्याच्या युद्धासाठी डोंगराळ भागच आदर्श होता. 1956 च्या मध्यापर्यंत त्यांनी चिनी रस्ते आणि साठे यांच्यावर छापे घातल्याच्या कथा प्रस्तृत झाल्या होत्या. माझ्या मते याचा शेवट काय होणार हेच कळत नाही, अशी ही साहसी, अविचारी परिस्थिती होती. प्रवेश करायला बिकट अशा त्या डोंगरांमध्य हे गनिमी योद्धे कितीतरी वर्ष टिकाव धरून राहू शकत होते. चिनी त्यांना कधीही हलवू शकले नसते आणि त्या योद्ध्यांना चिनी लष्कराला हरवणं कधीच शक्य झालं नसतं. आणि हे सारं कितीही काळ लांबत चाललं, तरी यामुळे तिबेटी लोकांना विशेषत: बायका-मुलांना याची झळ लागणार होती.

मी अतिशय विषण्ण झालो होतो. दोन वर्षांपूर्वीपेक्षाही परिस्थिती फारच चिघळली होती. हुकूमशाही पद्धतीची दडपशाही आणि सार्वत्रिक चीड यांचं दुष्टचक्र, मी लु-खङवा याला राजीनामा द्यायला सांगितला तेव्हा संपलं असं मला वाटलं होतं; पण त्या दुष्टचक्रानं आम्हाला पुन्हा वेढलं होतं. शांततामय मार्गानं आमच्या प्रश्नांना उत्तरं शोधण्याच्या माझ्या प्रयत्नांमधून काहीही साध्य झालं नाही आणि 'प्रस्ताव समिती' हे जे काही जबाबदार सरकारच्या नावानं नाटक चाललं होतं, त्यातून मला भविष्यात यशाच्या कुठल्याच वाटा दिसत नव्हत्या. सगळ्यात वाईट म्हणजे, माझा माझ्या स्वत:च्या लोकांवरचा ताबा सुटतो आहे की काय असं मला वाटू लागलं. पूर्वेकडल्या लोकांना रानटीपणानं राहायला भाग पाडलं गेलं. मध्य तिबेटमध्ये हिंसक पद्धतीचा आश्रय घेण्यासाठी लोक वळू लागले होते. मला जरी हिंसाचार मान्य नसला आणि या मार्गाचा फारसा उपयागे होईल यावर माझा विश्वास नसला, तरी आता फार काळ त्यांना रोखणं शक्य होणार नाही, हे मला कळून चुकलं होतं.

दुसरं म्हणजे 'दलाई लामा' म्हणून जे माझं स्थान होतं त्याच्या छत्राखाली अनेक

शतकं तिबेट आनंदानं नांदला होता. ते स्थान आता कारभारास सहायभूत ठरेना. धार्मिक आणि लौकिक नेता, अशा माझ्या दुहेरी जबाबदारीनुसार लोकांकडून होणाऱ्या कुठल्याही हिंसाचाराचा विरोध करणं मला अगत्याचं होतं, बंधनकारक होतं. चिनी लोक माझ्या राजकीय सत्तेला सुरुंग लावू पाहत आहेत हे मला कळत होतं. मी जसजसा लोकांच्या हिंसक उद्रेकांना विरोध करत होतो तसतसा लोकांचा माझ्यावरचा विश्वास नष्ट व्हायला लागला होता. ही चिन्यांना एक प्रकारे मदतच होती. लौकिक नेता म्हणून जरी लोकांची माझ्यावरची श्रद्धा हरवली तरी धार्मिक नेता म्हणून त्यांची श्रद्धा, विश्वास कमी होता कामा नये याची गरज होती आणि ते जास्त महत्त्वाचं होतं. माझ्या लौकिक नेतृत्वासाठी मी प्रतिनिधी नेमू शकलो असतो किंवा ते नेतृत्व सोडून देऊ शकलो असतो; पण दलाई लामा - धार्मिक नेता म्हणून कधीही स्थान सोडू शकत नाही किंवा असं करण्याचं कधी माझ्या स्वप्नातही आलं नव्हतं.

म्हणून मग मी विचार करू लागलो, की तिबेटच्या भल्यासाठी मी साऱ्या राजकीय कार्यक्रमांमधून अंग काढून घ्यावं. त्यामुळे माझी धार्मिक सत्ता शाबूत राहिली असती; पण जोवर मी तिबेटमध्ये होतो तोवर मला राजकारणापासून दूर राहता आलं नसतं. बाजूला होण्यासाठी कडवटपणानं, नाइलाजानं मला देश सोडावा लागला असता. या कल्पनेचा जरी मला तिटकारा होता तरी मला पर्याय नव्हता.

अशाप्रकारे खिन्नतेच्या विळख्यात मी सापडलो असताना, मला भारतभेटीचं निमंत्रण आलं.

भारताची तीर्थयात्रा

सिक्कीमचे महाराज कुमार हे माझे मित्र मला मुद्दाम निमंत्रण देण्यासाठी ल्हासाला आले होते. त्यांची भेट म्हणे माझ्यासाठी बाहेरच्या जगाकडून आलेला सहानुभूती आणि शुचितेचा किरण होती. भारतातील महाबोधी सोसायटीनं मला निमंत्रण दिलं होतं. भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्यासाठी सत्तर वर्षांपूर्वी या संस्थेची स्थापना झाली होती. भारतातील तीर्थस्थळांच्या यात्रेकरूंची आणि देवळांची काळजी घेणं हेही तिचं काम होतं. 2500 व्या बुद्ध जयंतीला मी उपस्थित राहवं असं निमंत्रण होतं.

राजकीय आणि धार्मिक अशा दोन्ही कारणांसाठी मला जाण्याची फार इच्छा होती. सर्व बौद्ध धर्मीयांसाठी बुद्ध जयंती हा एक फार महत्त्वाचा प्रसंग असतो. शिवाय, प्रत्येक तिबेटी माणसाची, एक ना एक दिवस तरी भारताच्या तीर्थयात्रेला जावं अशी सुप्त इच्छा असते. आमच्यासाठी, भारत ही कायमच एक पवित्र भूमी आहे. बौद्ध संस्कृतीच्या स्थापनेची ही जन्मभूमी आहे. तसंच शेकडो वर्षांपूर्वी भारतीय संत आणि द्रष्टे यांनी आमच्या डोंगरांमध्ये जे ज्ञान आणलं, त्याचा मूलस्रोत ही भूमी आहे. तिबेट आणि भारतातील धर्म आणि संस्था या विभिन्न मार्गांनी फुलत गेल्या, पण तरीही तिबेट हे अजूनही भारतीय संस्कृतीचंच अपत्य आहे.

आणि ऐहिक, निधर्मी दृष्टिकोनातून पाहिलं तर, भारताची भेट ही माझ्यासाठी, इथले जवळचे संपर्क आणि चिन्यांशी निरर्थक वाद यातून दूर जाण्याची संधी होती. काही काळासाठी तरी हे शक्य झालं असतं. एवढंच नव्हे, तर श्री. नेहरू आणि लोकशाहीचे इतर नेते तसंच महात्मा गांधींचे अनुयायी यांच्याशी सल्ल्यासाठी भेटता यावं, ही देखील माझी इच्छा होती. तिबेटमधल्या आमच्या राजकीय एकांताचं उगीच वाढवून वर्णन मला करायचं नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात मी अजून अननुभवी आहे हे मला ठाऊक होतं, पण आमच्या देशातल्या प्रत्येकाची तीच परिस्थिती होती. आमच्याप्रमाणे इतर देशांना संकटांना तोंड द्यायला लागलं होतं; आणि लोकशाही जगाकडे राजकीय शहाणपण आणि अनुभव यांचा मोठा साठा असतो हे आम्हांला माहीत होतं. यापैकी आम्हांला काहीच उपलब्ध न झाल्यानं अशिक्षित अशा अंत:स्फूर्तीमुळं आम्ही वागत होतो. आम्हाला सहानुभूतीपूर्ण शहाण्या अशा सल्ल्याची विलक्षण गरज होती.

मला जायचं होतं याला आणखीही एक कारण होतं. भारतातल्या ब्रिटिश सरकारशी आमचे दीर्घकाळापासून मैत्रीचे संबंध होते. खरं तर, पाश्चात्य जगाशी तेवढा एकमेव असा आमचा संपर्क होता; परंतु भारत सरकारकडे सत्ता आल्यानंतर, भारताशी राजकीय संपर्क फिकट झाला होता. मला हे संबंध पुनरूज्जीवित आणि पक्के करावेत अशी इच्छा होती. सभ्यतेच्या आणि स्वातंत्र्याच्या जगाला आम्हाला जोडणारी ती एक जीवनरेखा होती.

मी जावं अशी फक्त माझीच इच्छा होती असं नव्हे. तिबेटच्या लोकांना या निमंत्रणाबद्दल कळलं. त्यांनी माझ्या अधिकाऱ्यांकरवी मला, मी हे निमंत्रण स्वीकारावं असा आग्रह केला. मी सांगितलेली कारणं तर त्यामागे होतीच. फक्त हे त्यांच्या बाबतीत घडलं नाही. मला ही संधी चालून आली. राजकीय कटकटीतून मी बाहेर पडणं योग्य होतं.

परंतु नुसती जाण्याची इच्छा असणं पुरेसं नव्हतं. जर चिन्यांची इच्छा नसली तर ते माझं जाणं सहज थांबवू शकत होते. म्हणून मी त्यांच्या मान्यतेसाठी विचारणा करायला सुरुवात केली.

मी जनरल फान मिंग याच्याशी संपर्क साधला. तो सुरुवातीपासून ल्हासामध्ये होता आणि त्यावेळी वरिष्ठ चिनी सरकारी प्रतिनिधी म्हणून कार्यरत होता. 'तो मला फक्त सूचना देऊ शकेल' असं तो म्हणाला; पण त्यानं मला असं काही सूचित केलं, की कुठल्याही प्रकारच्या सूचना आल्या तरी त्या मला मान्य करायला पाहिजेत. तो बोलत होता तसं मला धस्सं व्हायला झालं. सुरक्षेच्या कारणांखातर भारतभेट करू नये, असं तो म्हणाला. त्याला असंही वाटत होतं, की प्रस्ताव समितीला अजून बरंच काम करायचं होतं; आणि मी तिचा सभापती असल्याने, मी ल्हासामध्ये थांबणं गरजेचं आहे. नंतर समजूत काढल्याप्रमाणं तो म्हणाला, की शेवटी हे निमंत्रण तर फक्त एका धार्मिक संस्थेकडून आलेलं आहे, ते काही भारत सरकारचं निमंत्रण नव्हे. त्यामुळे मला ते स्वीकारण्याची काही गरज नाही. त्याऐवजी मी सहजगत्या एखादा दुय्यम अधिकारी पाठवू शकतो.

मी फार हताश झालो, पण आशेवर पाणी सोडावं असं मला वाटेना. दुय्यम अधिकाऱ्याचं नाव सुचवण्याचा विचार मी थोडा बाजूला ठेवला. महाबोधी सोसायटीला 'मी येऊ शकत नाही' असं काही मी कळवलं नाही. चार महिन्यांनंतर, 1956 च्या ऑक्टोबर महिन्याच्या मध्यावर जनरलनं मला दुसऱ्या पर्यायी अधिकाऱ्याचं नाव सुचवायला सांगितलं, कारण त्या अधिकाऱ्याचं नाव भारतात आधी कळवणं गरजेचं होतं; मग मात्र मी माझ्या कनिष्ठ शिक्षकांच्या नेतृत्वाखाली एक प्रतिनिधी मंडळ माझ्या वतीनं म्हणून तयार केलं. पण नोव्हेंबरच्या एक किंवा दोन तारखेला तो पुन्हा मला भेटायला आला. त्यानं सांगितलं, की एक ऑक्टोबरला भारत सरकारकडून चीन सरकारला तार आली. त्यात मला आणि पनछेन लामाला समारंभासाठी पाहुणे म्हणून निमंत्रण दिलं गेलं होतं. पुढं तो म्हणाला, की चीन सरकारनं या बाबीचा सर्व बाजूंनी विचार केला आहे आणि त्यानुसार मला जायचं असेल तर मी जाऊ शकतो. मला अतिशय आनंद झाला आणि ल्हासातले लोकही खूश झाले. असाही प्रवाद पसरला, की भारतीय कौन्सुल जनरलने या निमंत्रणाबद्दल ल्हासातील असंख्य लोकांना, जनरल फान मिंग यानं मला सांगण्याअगोदरच सांगितलं होतं. त्यामुळं अर्थात ते निमंत्रण स्वीकारण्याची वेळ टळून गेल्यावर मला त्याची बातमी द्यावी असा चिन्यांचा बेत असावा; पण ही बातमी आधीच उघड झाल्यानं त्यांना पुनर्विचार करणं भाग पडलं, असं यावरून अनुमान काढता येतं.

मग मी जाण्याची तयारी केली. पण मी ल्हासा सोडण्याआधी, जणू काही मी शाळकरी मुलगा आहे असं समजून, जनरल चांग चिन-वु यानं मला एक भलं मोठं व्याख्यान दिलं. चीनहून कायमस्वरूपी प्रतिनिधी म्हणून तो नुकताच परत आला होता. हे व्याख्यान मला गमतीशीर वाटलं. तो म्हणाला, की नुकत्याच हंगेरी आणि पोलंडमध्ये थोड्याशा कटकटी झाल्या. परकीय साम्राज्यवाद्यांच्या प्रभावाखाली येऊन, लोकांच्या एका लहानशा गटानं हा उपद्व्याप केला होता. हंगेरीयाच्या आणि पोलिश लोकांच्या मदतीच्या हाकेला लगेच प्रतिसाद देऊन सोव्हिएत रशियानं तात्काळ कुठल्याही त्रासाशिवाय बंडखोरांना मोडून काढलं. समाजवादी देशांमध्ये कुरापती काढण्याची संधी हे बंडखोर नेहमीच शोधत असतात; पण समाजवादी सत्तांची सांघिक एकात्मता ही

इतकी श्रेष्ठ असते, की ती यापैकी कुठल्याही देशाच्या मदतीला धावून जाते. तो याबद्दल इतका वेळ बोलला, की मला कळून चुकलं, की तिबेटमध्ये ढवळढवळ करण्याची इतर कोणत्याही देशाला परवानगी नाही असा इशारा तो देत होता.

त्यानंतर तो माझ्या भारत भेटीबद्दल बोलू लागला. तो म्हणाला, 'जरी हे निमित्त बुद्ध जयंतीचं म्हणजे धार्मिक असलं, तरी त्याचा युनेस्कोशी काहीतरी संबंध असला पाहिजे. चीन सरकार त्यांचं एक प्रतिनिधी मंडळ पाठवणार आहे, पण फोर्मोसाहून काऊमिंगतांग सुद्धा प्रतिनिधी मंडळ पाठवण्याची शक्यता आहे. त्यांनी जर तसं केलं तर चीनचं मंडळ सभा सोडून जाईल; आणि त्यांनी असं होऊ शकेल याची पूर्वसूचना भारत सरकारला आधीच देऊन ठेवली आहे. आणि फोर्मोसाहून कुणी उपस्थि झालंच तर मीही सहभागी व्हायला नकार दिला पाहिजे. मी भारतात पोहोचलो की तिथला चीनचा राजदूत मला याबद्दलची ताजी माहिती देईल.'

पुढं त्यानं मला ताकीद दिली, की जर एखाद्या भारतीय नेत्यानं मला इंडो-तिबेटी सरहद्दीबद्दल विचारलं तर त्यावर मी एवढंच उत्तर द्यावं, की 'ती पेकिंगच्या परराष्ट्र खात्याची बाब आहे.' तो म्हणाला, की मला तिबेटमधल्या परिस्थितीबद्दलही विचारलं जाऊ शकतं. जर वृत्तपत्राच्या लोकांनी किंवा कनिष्ठ अधिकाऱ्यांनी मला विचारलं तर मी उत्तर द्यावं, की 'थोडासा त्रास झाला होता, पण आता सगळं आलबेल आहे.' आणि जर नेहरू किंवा भारत सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विचारलं तर मी त्यांना थोडंसं जास्त - जास्त म्हणजे एवढं, की तिबेटच्या काही भागात उठाव झाले होते - इतकं सांगू शकतो.

या भाषणाच्या शेवटी त्यानं सूचना केली, की जर मला समारंभात भाषण करावं लागणार असेल तर मी आधीच ल्हासामध्येच त्यांची तयारी केली तर बरं होईल. बुद्ध जयंतीला मला बोलावं लागेल अशी माझी अटकळ होती आणि मी ल्हासा सोडण्याआधी, चिन्यांशी विचारविनिमय करून ङ्वो यानं - म्हणजे प्रस्ताव समितीच्या महासचिवानं भाषणाचा मसुदा माझ्यासाठी लिहून तयार केला. मी भारतात आल्यावर त्या मसुद्याचं पुनर्लेखन केलं.

तोपर्यंत जवळजवळ यतुंगपर्यंत रस्ता तयार झाला होता. सरहद्दीपासून हा फक्त दोन दिवसांचा प्रवास होता. चिन्यांच्या, पद्धतशीरपणे रस्त्यांचं जाळं पसरवण्याच्या उद्योगापैकीच हा रस्ता होता. लष्करी ठाण्यांनी जितक्या जागा आमच्या देशात व्यापून टाकता येतील तितकं बरं, या हेतूनं चिनी झपाटल्यासारखे रस्ते तयार करत होते; पण यामुळं ल्हासा ते भारताचा काही आठवड्यांचा प्रवास केवळ काही दिवसांवर आला होता. आम्ही गाडीनं दोन दिवसात यतुंगला पोहोचलो. वाटेत, शिगाचे इथं चिन्यांनी ब्रह्मपुत्रा नदीवर गाडी पलीकडे नेण्यासाठी फेरीची सोय केली होती, तिथं आम्हांला पनछेन लामा येऊन मिळाला. चौथ्या दिवशी आम्ही तट्टांवर बसलो. अजूनही हिमालयातील खिंडी पार करण्यासाठी प्रवासाचं तेवढंच साधन होतं.

थिन-मिंग-यि - हा दुय्यम स्थानावरचा विभागीय अधिकारी - चिनी जनरल, आमच्याबरोबर छुम्बी-थङ् इथपर्यंत आला. ही तिबेटमधली शेवटची वस्ती होती; तिथपर्यंत आम्हांला सोडल्यावर त्यानं मला पुन्हा एक भाषण दिलं. तो चुकचुकत म्हणाला, भारतात खूप बंडखोर आहेत आणि त्यांच्याशी बोलायची वेळ आलीच तर मी खूप सावध राहिलं पाहिजे. त्यानं मला स्मरण करून दिलं, की मी चीन राष्ट्रीय सभेचा

उपसभापती या नात्यानं चीनचं तसंच तिबेटचं प्रतिनिधीत्व करीत आहे. त्यामुळे चीननं नैसर्गिक संपत्तीचा विकास साधण्यात आणि लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यात किती मोठी प्रगती केलेली आहे, हे मी प्रत्येकाला सांगितलंच पाहिजे, असं तो म्हणाला. तसंच 'चीन आणि तिबेटमध्ये पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य आणि इतरही गोष्टींमाध्ये पुरेपूर स्वातंत्र्य आहे, याबद्दल लोकांच्या मनात कुठलीही शंका राहता कामा नये याची मी काळजी घ्यायला पाहिजे. आणि जर कुणी माझ्यावर विश्वास ठेवला नाही तर मी त्यांना सांगू शकतो, की जेव्हा त्यांना आवडेल तेव्हा चीनच्या भेटीला ते आले तर त्यांचं स्वागत आहे.'

मी सरहद्द ओलांडण्याअगोदर सल्ल्याचा हा शेवटचा 'हप्ता' मला मिळाला.

तिबेटपासून भारताचा उतार म्हणजे एक नाट्यमय प्रवास आहे.

तिबेटच्या उजाड अशा पन्नास मैलाच्या पठारावरून जाताना, जोमो ल्ह-रि हे पांढरंशुभ्र शिखर खुणावत राहतं. फ-री या ठिकाणी अगदी डोगंगराजवळून जायला होतं. तिथून त्याचं एकांडं सौंदर्य पूर्णपणे दिसतं. नंतर वाट एकाएकी उतरून जाते. खालच्या छुम्बी दरीतल्या पाइन आणि र्‍होडेडेन्ड्रॉनच्या जंगलात ओघळते. इथं डेल्फीनियम, अ ॅकॉनाइट आणि पिवळ्या खसखशीच्या फुलांची उधळण असते. जणू दुसर्‍याच जगात उतरून आलो की काय असं इथं वाटतं. पुढं लांबवर खाली पसरलेला असतो भारतातील उष्ण हवेचा दीर्घ माळ; गजबजलेली शहरं आणि समुद्र. हे सारं फार थोड्या तिबेटी लोकांनी पाहिलेलं असतं. पण नाथू-ला ही खिंड अजूनही ओलांडायची असते. रस्ता पुन्हा एकदा जंगलाच्या किनारीवर शिखराच्या हद्दीपर्यंत नेतो. पुन्हा एकदा तिबेटचं ते चिरपरिचित उजाड निसर्गदृश्य दिसतं आणि शेवटी सिक्कीमच्या दरीत उतारायला होतं.

छुम्बी दरीतला रस्ता हा कायमच तिबेट आणि भारतामधला मुख्य रस्ता, द्वार म्हणून होता. 1903 मध्ये ब्रिटिश पथकानं हाच रस्ता वापरला होता. 1904 च्या करारानंतर व्यापार्‍यांनीही मुख्यत्वे हा रस्ता वापरला. ग्यानत्से या तिबेटमधल्या एकमेव रस्त्यावर परकीयांचा हक्क होता. दरीतच यतुगं हे गाव होतं. 1950 मध्ये झालेल्या चिनी आक्रमणाच्या वेळी याच गावात मी हललो होतो, पण तेव्हापेक्षा आत त्यात बदल झाला होता. मी एका तट्टावरून दरीत उतरलो. मग चिन्यांच्या रस्त्यावरून चिनी गाडीतून पुढं खाली गेलो. हे गाडीतून जाणं दसपटीनं जास्त वेगाचं होतं आणि जास्त सोयीचं होतं. पण सगळ्या तिबेटी लोकांप्रमाणे, जर पूर्वीसारखा प्रवास करता आला असता तर ते मला अधिक आवडलं असतं, असं वाटलं. योगायोगानं फ-रीजवळ, रस्त्याच्या अगदी वर चिनी किती विनोदी दिसू शकतात याचं उदाहरण घडलं. मला असं वाटतं, उंच डोंगरांमधल्या विरळ हवामानाबद्दल त्यांनी वाचलं असावं. जिथल्या रस्त्यांवरून शेकडो शतकांपासून लोकांनी चालत आणि घोड्यावरून प्रवास केलेला आहे, तिथं हे चिनी गाडीत बसून, ऑक्सिजनचे मुखवटे घालून आरामशीरपणे गाडी चालवताना दिसत होते!

यतुंगच्या पलीकडलं निसर्गदृश्य मला नवीन होतं. गाडी सोडल्यानंतर मी नाथु-ला खिंडीकडे, सरहद्दीकडे चढून आलो. काही क्षण तरी मी चिनी देखरेखीपासून मोकळा होतो. मनात आनंददायक असा विश्वास, भरवसा आणि उत्सुकता दाटली होती. मला असा अनुभव पूर्वी कधी आला नव्हता. जेव्ह आम्ही तो मोठा चढ चढू लागलो तेव्हा हवा

लखलखीत आणि स्वच्छ होती. पण लवकरच आम्ही एका ढगात शिरलो आणि शेवटचं काही हजार फूट अंतर, हवामान ओलसर-दमट आणि थंडगार होतं. शिखरावर आमचं जे उबदार स्वागत झालं त्यात जणू या मृदू ओलसरपणानं सुखद भरच घातली होती. सरहद्दीवर पहिली गोष्ट मी कोणती पाहिली तर ती होती सन्मानदर्शक सलामी. नंतर महाराजा कुमार आणि सिक्कीममधील भारतीय राजकीय अधिकारी यांनी माझं हार्दिक स्वागत केलं. भारतीय अधिकाऱ्यानं राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि भारत सरकारच्या शुभेच्छाही माझ्यासाठी आणल्या होत्या. शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी तिबेटमध्ये जे प्रतीक वापरलं जातं, तो स्कार्फ त्यानं मला भेट दिला आणि भारतीय प्रतीक म्हणून फुलांचा हार मला घातला. साऱ्यांच्या सोबतीनं आम्ही खिंड उतरलो. सिक्कीमच्या बाजूच्या छोड्‌गो इथं एक रात्र आनंदात घालवली.

दुसऱ्या दिवशी आम्ही सिक्कीमची राजधानी गंगटोक इथं निघालो. जसजसं आम्ही सिक्कीम आणि उत्तर भारतातून पुढं पुढं निघालो तसतशी आमची प्रवासाची वाहनंही टप्प्याटप्प्यानं बदलू लागली - जणू पुरातन काळापासून आधुनिक काळापर्यंत बदल व्हावा तसंच काहीसं. उत्स्फूर्त प्रसन्न स्वागतही वाढत गेलं आणि मला, मी कुठल्या परक्या देशात आहे असं वाटलंच नाही; मला अगदी घरच्यासारखंच वाटलं. दहाव्या मैलावर आम्ही आमची तट्टं सोडली आणि जीपमध्ये बसलो आणि तिथं चिनी राजदूत आमच्या गटाला येऊन मिळाला. मग थोडंसं शहराबाहेर पडल्यावर सिक्कीमचे महाराज आणि त्यांचे मंत्री येऊन भेटले. मग मी जीपमधून त्यांच्या गाडीत बसलो. त्या गाडीच्या बाबतीत एक विनोदी प्रसंग घडला. गाडीवर एका बाजूला सिक्कीमचा ध्वज तर दुसऱ्या बाजूला तिबेटचा ध्वज फडकत होता. गावात शिरण्याआधी आम्ही थोडंसं थांबलो. लोकांची मोठी गर्दी जमली होती आणि शुभेच्छा व्यक्त करायला लोक स्कार्फ आणि फुलं देत होती. अन् एका चिनी सभ्य गृहस्थाला पाहून मी चकितच झालो. तो काय करत होता? तर तो गुपचुपपणे गाडीवरचा तिबेटी ध्वज काढून त्याऐवजी चिनी ध्वज बांधत होता. माझ्या भारतीय मित्रांनीही त्याला पाहिलं. त्यांनीही ही 'मजेदार' घटना पाहिली, याचा मला आनंद झाला.

प्रवासाच्या शेवटी आम्ही विमानात बसलो. नवी दिल्ली जवळ आलं तसं ब्रिटीशांनी बांधलेल्या राजधानीचं देखणं दृश्य मी पाहिलं. नंतर ब्रिटीश, जणू ती वडीलोपार्जित संपत्ती म्हणून नवीन आणि स्वतंत्र भारताकडे सोडून गेले. विमानतळावर उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् आणि पंतप्रधान श्री. नेहरू हे दोघं माझ्या स्वागतासाठी वाट पाहत थांबले होते. चिनी राजदूत विमानात माझ्याबरोबर होता. आधी त्यांचा आणि मग अन्य मुत्सद्दी लोकांशी माझा परिचय करून देण्याचा त्यानं आग्रह केला. त्यानं मला या अधिकाऱ्यांच्या रांगेसमोरून नेलं. विविध देशांचे अधिकारी तिथं होते. आम्ही ब्रिटनच्या प्रतिनिधीसमोर आलो; पण अमेरिकेच्या प्रतिनिधीसमोर मला नेल्यावर काय घडणार होतं? मुत्सद्देगिरीचे अतिशय नाजूक, सूक्ष्म पातळीवरचे डावपेच इथं चालतात. एका बरोबर महत्त्वाच्या क्षणी जणू एखाद्या जादूगाराप्रमाणे चिनी राजदूत अचानक नाहीसा झाला; आणि मी अमेरिकी प्रतिनिधीच्या अगदी थेट समोर उभा होतो. भारतीय परराष्ट्र खात्यातील कुणीतरी चपळाईनं पुढे सरसावलं आणि त्यानं आमची एकमेकांशी ओळख करून दिली.

मी डॉ. राधाकृष्णन् यांच्याबरोबर गाडीतून शहरात गेलो. माझी भेट झाल्याबद्दल

त्यांनी आनंद व्यक्त केला आणि आम्हा देशांमधल्या जुन्या नात्यांबद्दल उत्फुल्लपणे ते बोलले. माझं स्वागत करायला रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी जमली होती. बुद्धजयंतीसाठी पताका लावल्या होत्या, सजावट केली होती. आम्ही राष्ट्रपती भवनाकडे - राष्ट्रपतींच्या अधिकृत निवासस्थानाकडे गेलो. तिथं राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी अतिशय मृदू आवाजात मंद स्मित करून दरबार हॉलच्या दारात माझं स्वागत केलं. या दोन्ही नेत्यांना पाहून मी खूप प्रभावित झालो आणि आनंदून गेलो. धर्मशील आणि विद्वान अशी ही दोन्ही माणसं म्हणजे मला भारतीय लोकांचं चिरंतन चैतन्याचं प्रतीकच वाटून गेली.

नवी दिल्लीमधल्या माझ्या पहिल्या भेटीची पहिली सकाळ राजघाट इथं होती. या जागेवर महात्मा गांधीजींचे अंत्यसंस्कार केले गेले होते. यमुना नदीकडे उतरत जाणाऱ्या हिरवळीवर थांबून प्रार्थना करताना मी हेलावून गेलो. मला असं वाटलं, की मी एका थोर आत्म्याच्या सहावासात आहे. आमच्या काळातला खरंच एका सर्वश्रेष्ठ माणसाचा हा आत्मा. भारताचं आणि माणुसकीचं चैतन्य जपण्यासाठी अखेरच्या घटकेपर्यंत ते झगडले. ते खरे बुद्धाचे शिष्य आणि साऱ्या लोकांमध्ये शांतता आणि सामंजस्य नांदावी यावर विश्वास ठेवणारे खरे श्रद्धाळू. मी तिथं थांबलो तेव्हा असाच विचार केला, की जर हा महात्मा जिवंत असता तर त्यानं मला शहाणपणाचा कुठला बरं सल्ला दिला असता? मला अगदी खात्री आहे, की तिबेटच्या लोकांच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी त्यांची इच्छाशक्ती आणि व्यक्तिमत्त्व, शांत-सभ्य मोहिमेसाठी कष्टवलं असतं.

या जगात त्यांना भेटण्याचं महद्भाग्य मला मिळायला हवं होतं असं मला फार कळाकळीनं वाटून गेलं. पण, तिथं उभं राहिल्यावर, मी त्यांच्या अगदी निकटच्या सहवासात गेलो असं मला वाटलं. मी शांततेचा मार्ग धरावा हाच त्यांचा सल्ला आहे, असं मला मनोमन वाटून गेलं. त्यांनी ज्या अहिंसा तत्त्वाची शिकवण दिली आणि त्या तत्त्वाला अंगिकारलं, त्यावर माझी अजूनही अढळ श्रद्धा आहे. कितीही संकटं आली तरी त्यांचा मार्ग सोडायचा नाही असा आता मी दृढ निश्चय केला. हिंसाचाराच्या कुठल्याही कृतीशी माझी नाळ जुळत नाही, याबद्दल पूर्वी कधी नव्हे एवढा मी खंबीर बनलो.

या पवित्र स्थळाला भेट दिल्यानंतर मी नंतरचे दोन-तीन दिवस बुद्ध जयंतीच्या कार्यक्रमांमध्ये व्यग्र राहिलो. इथं मला अगदी फार मनापासून हवी होती ती संधी मिळाली. जगाच्या वेगवेगळ्या भागात अनेक माणसं एखाद्या जुलमाचा अनुभव न घेता काम करत होती, विश्वशांतीसाठी भगवान बुद्धाच्या शिकवणुकीचा प्रसार करत होती. अशा माणसांशी संवाद साधायची मला संधी मिळाली. देशादेशांमधले शांतीपूर्ण संबंध हा माझ्या मनातला सगळ्या महत्त्वाचा विचार होता; म्हणून जेव्हा मी म्हणालो, की 'माझी अशी अपेक्षा आहे, की अशा समारंभामुळे ज्ञानप्रकाशाच्या मार्गाच्या माहितीबद्दल केवळ आशिया नव्हे, तर पाश्चात्य जगातल्या लोकांमध्येही प्रचार व्हायला हवा; कारण बुद्धाची शिकवणूक केवळ माणसाला त्याच्या व्यक्तिगत आयुष्यात समाधान आणि शांतचित्तपणाकडे नेते असं नाही, तर देशांमधलं आपापसातलं वैरही ती शमवते. मानवतेला गरजेची असलेली मुक्ती बुद्धाच्या तत्त्वांमध्ये सापडू शकते.' मला या विधानात आनंदानं थोडी भर घालायला आवडेल. माणसांचा पंथ कुठलाही असला तरी मानवतेला हवी असणारी मुक्ती ही माणसांमध्ये अदृश्यपणे वसत असणाऱ्या धार्मिक

उपजत प्रवृत्तींमध्ये असते. या नैसर्गिक अंत:प्रेरणेला दडपून टाकणं हे शांतता-सलोख्याला शत्रुतेचं होतं.

या कार्यक्रमांनंतर श्री. नेहरू यांच्याशी खऱ्या अर्थानं माझं बोलणं झालं. तोपर्यंत माझी मतं आणखी प्रगल्भ झाली होती. मला भारतात का यावंसं वाटत होतं ते मी आधीच स्पष्ट केलं आहे; आता नाखुशीनं मी एका नवीनच निष्कर्षापर्यंत आलो होतो. मी घरी परत जाऊच नये असं मला वाटू लागलं. चीनच्या धोरणात जोपर्यंत काही सकारात्मक बदलांची चिन्हं दिसत नाहीत तोपर्यंत मी भारतात थांबावं, असं माझ्या मनानं घेतलं. कदाचित महात्मा गांधींबरोबर मला भावलेलं सख्य आणि अनेक सभ्य, सहानुभूतीपूर्ण विद्वान माणसांशी माझी भेट झाल्यामुळेही मी अशा दु:खद निर्णयापर्यंत पोहोचलो असेन. कारण आयुष्यात अगदी पहिल्यांदाच मी अशा माणसांना भेटलो होतो, की जे तिबेटी नसूनसुद्धा त्यांना तिबेटबद्दल खरीखुरी कळकळ वाटत होती. घरी असताना, मला निराशेनं असं वाटू लागलं होतं, की माझ्या लोकांना आता मी फारशी मदत करू शकणार नाही; हिंसाचाराकडे झुकण्याच्या त्यांच्या इच्छेला मी धरबंद घालू शकत नाही; आणि सलोखा-समेटासाठी केलेल्या माझ्या सर्व प्रयत्नांना अपयश आलं आहे. पण भारतातून मी किमान जगभरच्या लोकांना तिबेटमध्ये काय चाललं आहे हे सांगू शकतो; त्यांचा नैतिक पाठिंबा मिळविण्यासाठी धडपड करू शकतो; आणि यामुळं कदाचित चीनच्या कठोर धोरणांमध्ये बदल घडून येऊ शकेल.

मला श्री. नेहरूंना हे सारं स्पष्ट करून सांगावं लागलं. आम्ही खाजगीत भेटलो. बरोबर फक्त त्यांचा तिबेटी दुभाष्या होता. भारतात येण्याची आणि बुद्ध जयंतीला उपस्थित राहण्याची संधी दिल्याबद्दल पहिल्यांदा मी कृतज्ञता व्यक्त केली. पूर्व तिबेटमधली परिस्थिती किती भयानक बनली आहे, हे मी त्यांना सांगितलं. देशभरात यापेक्षाही दुष्ट संकटं पसरू शकतात ही आम्हाला वाटणारी काळजी सांगितली. मी पुढं म्हणालो, की 'आता मला नाईलाजानं ही खात्री वाटू लागली आहे, की चिन्यांना आमच्या धर्म आणि चालीरीती पार समूळ नष्ट करून टाकायच्या आहेत आणि पर्यायानं भारताशी असलेलं ऐतिहासिक नातंगोतंही तोडून टाकायचं आहे. आता सारे तिबेटी लोक भारत सरकार आणि भारतीय लोक यांच्यावर उरल्या-सुरल्या आशा एकवटून बसले आहेत.' शांततापूर्ण मार्गांनी आमचं स्वातंत्र्य परत जिंकून आणेपर्यंत मल भारतात राहण्याची का अन् कशी गरज आहे, हेही मी त्यांना उलगडून दाखवलं.

ते अतिशय सहृदयी होते आणि त्यांनी धीमेपणानं सर्व ऐकलं. पण सध्या तरी तिबेटबद्दल काही करता येणं शक्य नाही यावर ते ठाम होते. ते म्हणाले, तुमच्या देशाचं स्वातंत्र्य कुणीच अधिकृतपणे मान्य केलेलं नाही. चिन्यांशी युद्ध करण्याचा काडीइतका उपयोग नाही, यावर ते माझ्याशी सहमत झाले. तसा जर आम्ही प्रयत्न केला, तर ते सहजी अधिक लष्करी बळ वापरून आम्हाला पूर्णपणे चिरडू शकतील. त्यांनी मला, 'मी तिबेटला परत जावं आणि सतरा-कलमी कराराची अंमलबजावणी व्हावी म्हणून शांततेच्या मार्गानं प्रयत्न करत राहवं', असा सल्ला दिला.

मी त्यावर म्हणालो, की 'मी शक्य होतं तेवढं सारं केलं आहे. पण मी कितीही प्रयत्न केले तरी कराराची त्यांची स्वत:ची बाजू मान्य करायला चिन्यांनी नाकारलेलं आहे. त्यांच्या मनातसुद्धा काही बदल व्हावा अशी सुतराम शक्यता मला दिसत नाही.' त्यावर त्यांनी चाऊ इन लाइबरोबर चर्चा करण्याचा शब्द दिला. चाऊ इन लाइ दुसऱ्या दिवशी

भारतात येणार होता. इथं आमची चर्चा संपली.

मी देखील चाऊ इन लाइशी बोललो. मी विमानतळावर त्याला भेटायला गेलो आणि त्याच दिवशी संध्याकाळी त्याच्याबरोबर माझी दीर्घ चर्चा झाली. आमच्या पूर्वेच्या भागातली परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे, हे मी त्याला सांगितलं. स्थानिक परिस्थिती, लोकांच्या इच्छा-अपेक्षा, आवडी-निवडी हे काहीही लक्षात न घेता चिनी लोक जबरदस्तीनं बदल लादत आहेत. चाऊ इन लाइला सहानुभूती आहे असं वाटलं; आणि तो म्हणाला, की तिथं नेमलेल्या स्थानिक चिनी अधिकाऱ्यांकडून चुका होत असतील. माओ झे-डुंगला, मी जे काही सांगितलं त्याचं वृत्त तो जरूर देईल; पण परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून त्याच्याकडून कुठलंही निश्चित वचन घेऊन मला त्याला शब्दात बांधता आलं नाही.

पण मग काही दिवसांनंतर चाऊ इन लाइ यानं माझ्या मोठ्या भावांना - थुबतेन नोर्बू आणि ग्यलो दोन्डुब यांना - चीनच्या दूतावासात जेवायला बोलावलं. तेव्हा त्यांच्याबरोबर त्याचं जे बोलणं झालं ते अधिक आशादायक आणि मुद्याला धरून निश्चित असं होतं. आमच्या सरकारमध्ये माझ्या भावांना काही अधिकृत स्थान नव्हतं. त्यामुळं तिबेटमध्ये काय प्रतिक्रिया होतील याची फिकीर न करता ते जास्त स्पष्टपणे बोलू शकत होते. नंतर जेव्हा त्यांच्या संभाषणाबद्दल त्यांनी मला सांगितलं त्यावरून मला अंदाज आला, की टीकाटिप्पणी करताना त्यांनी पूर्ण स्पष्टवक्तेपणा दाखवला असावा. त्यांनी चाऊ इन लाइ याला सांगितलं, की शेकडो वर्षांपासून तिबेटनं चीनला महत्त्वाचा देश आणि मित्र असा शेजारी म्हणून आदर दिलेला आहे. असं असूनही तिबेटमधले चिनी हे तिबेटी लोकांनाच भयानक हाडवैरी असल्यासारखे वागवत आहेत. अतिशय फालतू अशा काही तिबेटी माणसांचा ते हेतूपुरस्सर वापर करून घेत आहेत. हे लोक तिबेटी समाजात गुंड म्हणून गणले जातात. त्यांच्यामार्फत चिन्यांना तिबेटी लोकांच्यात बेबनाव निर्माण करायचा आहे. अनेक देशभक्त तिबेटी लोकांकडे ते दुर्लक्ष करत आहेत. खरं तर, अशा लोकांमुळे तिबेटी आणि चिनी यांच्यातले संबंध सुधारायला मदत झाली असती. लौकिक बाबतीत ते पनछेन लामाला पाठिंबा देत आहेत. यामुळे पूर्वीची जुनी खपली निघून पुन्हा जखम भळभळू लागेल किंवा जुनी दरी पुन्हा निर्माण होईल आणि आपोआपच दलाई लामाच्या सरकारचं महत्त्व उतरणीला लागेल. गरज नसताना त्यांनी तिबेटमध्ये, खास करून ल्हासामध्ये, लष्कर ठेवलेलं आहे. त्यामुळं आमची आर्थिक व्यवस्था कोलमडून पडली. वस्तूंच्या किंमती इतक्या चढल्या, की तिबेटी लोकांचीच उपासमार होऊ लागली. तिबेटमधला सत्ताधारी वर्गच नव्हे, तर सामान्य तिबेटी जनता चिनी लोकांच्या उपस्थितीला कडवा विरोध करत आहे. लष्कर काढून घेतलं जावं आणि दोन समसमान भागीदारांप्रमाणे विचार होऊन, करार बनवला जाऊन सह्या केल्या जाव्यात, ही त्यांचीच मागणी आहे; परंतु ल्हासातल्या चिन्यांना या सार्वत्रिक जनमताकडे मुळी लक्षच द्यायचं नाही.'

चाऊ इन लाईला हे साधं-सरळ रोखठोक बोलणं फारसं पसंत पडलं नसावं, पण तो नेहमीप्रमाणं सभ्य आणि मिठ्ठास वागला. त्यानं माझ्या भावांना हमी दिली, की अयोग्य अशा तिबेटी लोकांचा किंवा पनछेन लामाचा वापर करून माझ्या सत्तेला कमी लेखणं किंवा तंटे-बखेडे माजवणं असा काही चीन सरकारचा हेतू नव्हता. त्यांना तिबेटच्या व्यवहारात ढवळाढवळ करायची नव्हती किंवा आर्थिकदृष्ट्या ओझंही लादायचं नव्हतं.

स्थानिक चिनी अधिकाऱ्यांना फारशी समज नसल्यानं कदाचित काही अडचणी निर्माण झाल्या असतील, हे त्यानं मान्य केलं. त्यानं ल्हासातला अन्नपुरवठा सुधारण्याचं वचन दिलं; आणि ज्या क्षणी तिबेटला आपापले व्यवहार सांभाळता येऊ लागतील त्याक्षणी तिबेटमधली चिनी पथकं, पलटणी हळूहळू कमी करायचं कबूल केलं; आणि या तक्रारी माओ झे-डुंग याच्या कानावर घालू हेही तो म्हणाला आणि तक्रारींची कारणं दूर करण्याकडे लक्ष घालू असंही तो म्हणाला. पुढं तो म्हणाला, की ही वचनं म्हणजे नुसते पोकळ शब्द नव्हेत; ही वचनं पूर्ण होतायत की नाही याचं निरीक्षण करण्यासाठी माझ्या भावांनी भारतात राहिलं तरी चालेल. आणि जर ही वचनं पूर्ण झाली नाहीत तर चीन सरकारवर टीका करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य त्यांना आहे.

पण मुलाखतीच्या शेवटी तो त्यांना म्हणाला, की त्याला पण एक विनंती करायची आहे. त्याच्या असं कानावर आलं होतं, की मी भारतात राहण्याचा विचार करत आहे; पण माझ्या भावांनी, मी तिबेटला परत जाण्याबाबत माझं मन वळवायला पाहिजे. जर मी परत गेलो नाही तर त्यामुळे मला आणि माझ्या लोकांना त्याचा त्रास होईल.

चाऊ इन लाईच्या त्या भेटींनंतर मी भारताच्या विविध भागांच्या दौऱ्यावर निघालो. नानगल इथल्या प्रचंड जलविद्युत केंद्रासारख्या अनेक नवीन औद्योगिक प्रकल्पांच्या इथं मला नेण्यात आलं. आणि पहिल्यांदाच मी साम्यवादी देशातील प्रकल्प आणि खुल्या लोकशाहीतील प्रकल्पांमधील फरक अनुभवला.

सक्तीनं भरती केलेले कामगार आणि स्वेच्छेनं काम करणारे कामगार - या दोन्हीत वातावरण आणि उत्साह याबाबत किती फरक असतो हेही मी बघितलं. अर्थात, दौऱ्यातला माझा मुख्य हेतू होता तो ऐतिहासिक धार्मिक स्थळांना भेटी देण्याचा. त्यानुसार मी सांची, अजंठा, बनारस आणि बुद्धगया इथं गेलो. भारतीय धार्मिक कलेचे अद्भुत आविष्कार पाहताना माझं मन कौतुकानं भरून आलं. या कलेतून भारतीयांच्या कल्पक बुद्धिमत्तेचा आणि तेजस्वी श्रद्धेचा प्रत्यय येत होता. मी विचार करत होतो, की सांप्रदायिक आणि जातीविषयक द्वेषाचा या संपन्न वारशावर पूर्वी किती हानिकारक परिणाम झाला; पण भारतीय घटनेनं देऊ केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या हमीमुळे तो तिरस्कार कसा शांतता आणि स्थिरतेत बदलत गेला.

बनारस आणि बुद्धगया इथं हजारो तिबेटी यात्रेकरू मला भेटण्यासाठी थांबले आहेत हे मी पाहिलं. दोन्ही ठिकाणी मी त्यांच्याशी भगवान बुद्धाच्या तत्त्वांबद्दल बोललो आणि त्यांच्या मनावर हेच ठसवलं, की बुद्धानं आपल्यासाठी स्पष्टपणे आखून दिलेल्या शांतीच्या मार्गावरच आपण नेहमी चाललं पाहिजे.

बुद्धगयेला दिलेल्या भेटीमुळं मला आतून, खोलपासून एक प्रेरणा मिळाली. प्रत्येक सश्रद्ध, बौद्ध माणूस त्याच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशामध्ये जे जे काही उदात्त आहे, भव्य आहे, त्याच्याशीच बुद्धगयेचं नातं जुळवेल. माझ्या फार लहानपणापासून मी या स्थानाच्या भेटीबद्दल विचार केला होता, स्वप्न पाहिलं होतं. आता मी खरोखर त्या पवित्र चैतन्याच्या सान्निध्यात उभा होतो. याच या पवित्र ठिकाणी त्या श्रेष्ठ आत्म्याला महापरिनिर्वाण- सर्वश्रेष्ठ निर्वाण लाभले. इथंच साऱ्या मानवजातीच्या मुक्तीचा मार्ग त्याला सापडला. मी जसा तिथं उभा होतो, तसं धार्मिक तीव्रतेनं माझं हृदय भरून गेलं. आपल्या साऱ्यांच्या ठायी वसत असणारं ज्ञान आणि दैवी सत्तेचा प्रभाव हे सारं जाणवून मी थरारून गेलो.

अजूनी मी माझ्या तीर्थस्थळांच्या प्रवासात होतो. सारनाथला गेलो होतो तेव्हा दिल्लीतील चिनी वकिलातीतून माझ्यासाठी निरोप घेऊन एक दूत आला. त्यानं ल्हासातील चीनचा प्रतिनिधी, जनरल चांग चिन-वु याच्याकडून आलेली तार आणली होती. त्यात म्हटलं होतं, की माझ्या देशातील परिस्थिती गंभीर झाली आहे; गुप्तचर आणि त्यांचे सहकारी बंडखोर क्रांतीचा मोठा कट रचत आहेत; मला जितकं लवकर परत येणं शक्य होईल तितक्या लवकर मी परत यावं. बुद्धगयेतच, माझ्या एका चिनी अंगरक्षकानं निरोप दिला, की चाऊ इन लाइ दिल्लीला परत येतो आहे आणि त्याला तातडीनं मला भेटायचं आहे. त्यामुळं थोड्याच दिवसांनंतर, मला स्वत:ला राजकारण, शत्रुत्व आणि अविश्वास यांच्या जगात ओढून आणावं लागलं.

दिल्लीमध्ये, चाऊ इन लाइनं पुन्हा मला सांगितलं, की तिबेटमधली परिस्थिती बिकट झाली आहे आणि मला परत गेलंच पाहिजे. जर खरोखर जनतेचा उठाव झाला तर तो चिरडण्यासाठी तो बळाचा वापर करायला तयार असेल याबाबत त्यानं माझ्या मनात शंकेला वावच ठेवला नव्हता. मला आठवतं, की तो मला म्हणाला होता, की भारतात राहणारे जे तिबेटी आहेत ते कटकटी निर्माण करत आहेत; आणि काय करायचं आहे त्याबद्दल आता मला निर्णय केलाच पाहिजे. मी त्याला सांगितलं, की मी काय करावं हे अजून माझं ठरलं नाही; आणि चिन्यांनी ताबा घेतल्यामुळे आम्हाला जो त्रास होतो आहे त्याबद्दल मी पुन्हा त्याला सांगितलं आणि मी हेही म्हणालो, की भूतकाळात आमच्याबाबत जो काही अन्याय झाला तो आम्ही विसरून जायला तयार आहोत, पण सध्याची अमानुष वागणूक आणि जुलूम-जबरदस्ती मात्र तुम्ही थांबवली पाहिजे. त्यानं उत्तर दिलं, की लोकांच्या इच्छेनुसारच तिबेटमध्ये 'सुधारणां'ची सुरुवात केली जाईल; हे माओ झे-डुंगनं स्पष्ट केलं आहे. तो अशा काही सुरात बोलत होता, की जणू तिबेटी लोक हे चिन्यांचं स्वागत का करत नाहीत हे त्याच्या मुळी लक्षातच येत नाहीये.

तो मला म्हणाला, की उत्तर भारतात तिबेटच्या सरहद्दीजवळ कालिंगपाँग इथं भेटीचं निमंत्रण मिळालेलं आहे, असं माझ्या कानावर आलं आहे. इथं काही तिबेटी लोकांची वस्ती होती. त्यांच्यापैकी काहीजण अगोदरच चीनच्या राजवटीतून हद्दपार म्हणून हाकलून दिले गेलेले होते. तो म्हणाला, 'मी तिथं जाऊ नये. जर तिथल्या लोकांनी कटकट निर्माण केली तर काय करायचं?' मी फक्त त्याला म्हणालो, 'मी यावर विचार करेन.' आमचं बोलणं इथंच थांबलं. जाताना त्यानं मला ताकीद दिली, की काही भारतीय अधिकारी चांगले आहेत; पण काही अधिकाऱ्यांपासून सावध राहिलं पाहिजे, कारण ते जरा वेगळ्या प्रकारचे आहेत. या बैठकीतून तसं काहीच निष्पन्न झालं नाही; आणि मला अतिशय निराश आणि असमाधानकारक वाटू लागलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी चीन सरकारचा आणखी एक वरिष्ठ सदस्य - मार्शल हो-लुङ हा चाऊ इन लाइ याच्या सल्ल्याची पुनरावृत्ती करण्यासाठी भेटला आणि 'मी ल्हासाला परत जावं' हे त्यानं मला पुन्हा सांगितलं. त्यानं एक चिनी म्हण उद्धृत केल्याचं मला आठवतं : 'बर्फाळ जागी राहणारा सिंह तो त्याच्या डोंगरातल्या घरात राहिला तरच रूबाबदार दिसतो, पण जर तो दरीत खाली उतरून आला तर त्याला एखाद्या कुत्र्याप्रामाणे वागवलं जातं.' मात्र त्यावर वाद घालायची इच्छा नव्हती. तोपर्यंत, मी श्री. नेहरूंनी दिलेला सल्ला आणि चाऊ इन लाइ यानं मला आणि माझ्या भावांना दिलेली खात्री यावर विचार करून ठेवला होता. मी मार्शलला सांगितलं, की मी परत

जायचं ठरवलं आहे; आणि मला तसंच माझ्या भावांना दिली गेलेली वचनं पाळली जातील यावर मी विश्वास ठेवतो आहे.

दिल्ली सोडायच्या अगोदर, श्री. नेहरूंबरोबर माझी शेवटची भेट झाली. माझ्याबरोबर झालेली त्यांची भेट आणि चाऊ इन-लाइशी झालेली त्यांची भेट याबद्दल त्यांनी स्वत: नोंदवलेलं निरीक्षण मी इथं सांगितलं पाहिजे. 1959 मध्ये त्यांनी हे वृत्त लोकसभेत सांगितलं होतं.

"जेव्हा पंतप्रधान चाऊ इन-लाइ इथे दोन किंवा तीन वर्षांपूर्वी आला होता, त्यावेळी पुरेसा वेळ देऊन त्यानं तिबेटच्या प्रश्नाची माझ्याबरोबर चर्चा करण्याचा चांगुलपणा दाखवला होता. आमचं बराच वेळ आणि स्पष्टपणे बोलणं झालं. तो मला म्हणाला, की तिबेट हा चिनी राज्याचा अनेक काळापासून भाग आहे. ते तिबेटला चीनचा सुभा मानत नाहीत. मुख्य चीनमधल्या लोकांपेक्षा हे लोक वेगळे आहेत. चीनच्या राज्यातील इतर स्वतंत्र भागांमधील लोकही वेगळे आहेत, मग जरी ते चीनचा भाग असले तरीही. म्हणून मग त्यांच्या लेखी तिबेट हा स्वतंत्र भाग आहे आणि त्याला स्वायत्ततेचा आनंद उपभोगता आला पाहिजे. त्यानं मला असंही सांगितलं, की चीन हा तिबेटवर साम्यवाद लादणार आहे, असं कुणी समजत असेल तर ते असमंजसपणाचं आहे. अशाप्रकारे साम्यवाद हा काही एखाद्या मागास देशावर लादता येत नसतो. त्यांची तशी इच्छाही नाही. मात्र तिथे सुधारणा आणि प्रगती झाली पाहिजे असं त्यांना वाटतं. पण या सुधारणाही पुरेशा काळापर्यंत लांबणीवर टाकाव्यात असा त्यांचा प्रस्ताव आहे."

त्याच्याबरोबरच्या माझ्या भेटींबद्दल सांगताना श्री. नेहरू म्हणाले, "त्या सुमारास दलाई लामा देखील इथं होता आणि त्यावेळी त्याच्याबरोबर माझं बराच वेळ बोलणं झालं. पंतप्रधान चाऊ इन-लाइ याच्या मैत्रीपूर्ण दृष्टिकोनाबद्दल आणि तिबेटच्या स्वायत्ततेचा तो मान राखेल अशी त्यानं हमी दिल्याचं मी त्याला सांगितलं. मी त्याला सुचवलं, की सदिच्छांसहित त्यानं या खात्रीचा स्वीकार करावा आणि स्वायत्तता राखण्यात आणि तिबेटमध्ये विशिष्ट सुधारणा घडवून आणण्यासाठी सहकार्य करावं. दलाई लामानं मान्य केलं, की त्याचा देश हा जरी आध्यात्मिकदृष्ट्या प्रगत असला तरी सामाजिक व आर्थिक दृष्ट्या अतिशय मागास आहे आणि तिथं सुधारणांची गरज आहे."

श्री. नेहरू यांना त्या शेवटच्या भेटीत मी सांगितल्याचं आठवतं. मी तिबेटमध्ये परत जायचा मनाचा निश्चय दोन कारणांसाठी केला, कारण त्यांनी मला तसा सल्ला दिला आणि चाऊ इन-लाइनं मला व माझ्या भावांना निश्चित वचनं दिली आहेत.

श्री. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्यावर फार प्रभाव पडला. जरी महात्मा गांधींची छाया त्यांच्यावर पडलेली होती, तरी त्यांच्यातल्या धार्मिक तळमळीची चुणूक मला पाहता आली नाही; पण मी त्यांना बुद्धिमान वास्तववादी राजनीतिज्ञ म्हणून पाहिलं. आंतरराष्ट्रीय राजकारणाची त्यांना उत्कृष्ट जाण होती, त्यावर पकड होती आणि त्यांचं त्यांच्या देशावर विलक्षण प्रेम आहे आणि लोकांवर असीम श्रद्धा आहे. या लोकांच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी, शांतीचा मार्ग चोखाळण्याबाबत ते ठाम होते, असं मला त्यांच्या भेटीत जाणवलं. त्या भेटीच्या वेळी मला कालिंगपाँग इथं जाण्याची इच्छा होती, त्याबद्दल आम्ही बोललो हे देखील मला आठवलं. चाऊ इन-लाइ यानं मला तिथं न जाण्याचा सल्ला दिल्याचं श्री. नेहरूंना ठाऊक होतं. कदाचित तिथले लोक गडबड करतील आणि मी तिबेटमध्ये परत जाऊ नये म्हणून आग्रह धरतील, हेही

त्यांना ठाऊक होतं. भारत हा स्वतंत्र देश होता त्यामुळे ते म्हणाले, की कालिंगपाँगच्या लोकांना त्यांची मतं व्यक्त करण्यापासून कुणीही रोखून धरू शकत नाही. पण त्यांनी पुढं जाऊन हेही सांगितलं, की जर माझी खरोखर जायची फार इच्छा असेल तर त्यांचं सरकार सर्व व्यवस्था करेल आणि माझी काळजी घेईल.

चाऊ इन-लाइ याच्या सल्ल्याविरुद्ध मी तिथं जायचं ठरवलं. ही भेट म्हणजे काही पूर्णपणे राजकीय बाब नव्हती. माझ्या देशवासीयांना भेटणं हे माझं आध्यात्मिक कर्तव्य होतं आणि यावर चाऊ इन-लाइ यानं सल्ला द्यायचं अजिबात कारण नव्हतं.

मी तिथं गेलो. तिथं राहणाऱ्या तिबेटी लोकांनाच फक्त मी भेटलो असं नाही, तर ल्हासातल्या माझ्या सरकारनं मला घरी परतताना सोबत करण्यासाठी पाठवलेल्या प्रतिनिधी मंडळालाही मी भेटलो. आणि खरोखरच त्या सर्वांनी सुचवलं की मी भारतातच राहावं, कारण तिबेटमधली परिस्थिती फार बिकट आणि धोकादायक बनलेली होती. पण मी मनोमन निश्चय केला होता, की चीनला त्यांच्या सरकारनं दिलेल्या वचनांची अंमलबजावणी करण्यासाठी आणखी एक संधी दिलीच पाहिजे आणि शांततामय मार्गानं स्वातंत्र्यासाठी आणखी एक प्रयत्न केलाच पाहिजे.

मला राजकारणाचा कंटाळा आलेला होता. राजकीय चर्चांमध्येच दिल्लीतला माझा बहुतांशी वेळ गेला होता आणि राजकारणामुळे माझ्या तीर्थयात्रेत काटछाट करावी लागली होती. मला त्याचा तिटकारा यायला लागला होता आणि जर तिबेटमधल्या माझ्या लोकांसाठी म्हणून मला जर जबाबदारी, कर्तव्य नसतं तर मी आनंदानं राजकारणातून निवृत्त झालो असतो. कालिंगपाँग आणि गंगटोक इथं मला माझ्या ध्यानधारणेसाठी आणि मला ऐकायला जमलेल्या लोकांसमोर धार्मिक प्रवचन यांसाठी वेळ देता आला, याचा मला आनंद वाटला.

डोंगरांमध्ये जोरदार हिमवर्षाव होत होता. नाथू-लामधून जाणारा तिबेटचा रस्ता मोकळा होण्यासाठी मला जवळजवळ एक महिना वाट पाहवी लागली.

उठाव

अखेर एक दिवस हवा सुधारली आणि रस्ता मोकळा झाला. नाथू-लाच्या माथ्यावर मी भारत आणि सिक्कीमच्या माझ्या शेवटच्या मित्रांचा निरोप घेतला. मी खिंडीच्या वरून चाललो होतो, तिबेटच्या दिशेने निघालो होतो. तेव्हा मी पाहिलं, की तिबेटी लोकांचे जे छोटे छोटे प्रार्थनाध्वज उंच ठिकाणी फडकत असतात, त्यांच्यामध्ये मोठमोठ्या आकाराचे लाल रंगाचे चिनी ध्वज आणि माओ झे-डुंगची चित्रं लावलेली आहेत. ते सारं स्वागतासाठी होतं यात संशयच नाही; पण ते माझ्या स्वत:च्याच देशातलं खिन्न स्वागत होतं.

माझं स्वागत करायला एक चिनी जनरल थांबला होता; पण सुदैवानं तो विभागीय उपसेनानायक, जनरल चिन-रावो-रेन होता. मला खरोखर आवडत असलेल्य चिनी अधिकाऱ्यांपैकी तो एक होता. तो मोकळ्या मनाचा आणि निष्कपट माणूस होता; जी प्रामाणिक आणि सहानुभूती दाखवणारी माणसं मला भेटली त्यापैकी तो एक होता. त्यांच्यापैकी अनेक जणांना आम्हांला मदत करायला आवडलं असतं याची मला नक्की खात्री आहे. पण ते सारेजण कडक साम्यवादी शिस्तीचे गुलाम होते, त्यांना करता येईल असं काही फारसं नव्हतंच. तरीही त्यांच्यापैकी एकाला आमच्यासाठी झटण्याची इतकी तीव्र तळमळ होती, की तो आमच्या गनिमी योद्धयांना 1958 मध्ये जाऊन मिळाला. त्यांच्याबरोबर नऊ महिने लढला आणि आता तो भारतात निर्वासित म्हणून आहे.

ल्हासाला परत फिरण्याच्या वाटेवर मी ठरवलं होतं की यतुंग, ग्यङ्चे आणि शिगाचे या ज्या ज्या गावांमधून आपण जाऊ तिथं तिथं मोकळेपणी बोलायचं. दिल्लीमध्ये माझ्या भावांना आणि मला जी वचनं दिली गेली होती त्यानंतर मला स्पष्टोक्तीनंतरची तिबेटमधली चिन्यांची प्रतिक्रिया पाहायची होती. 1955 मध्ये चीनहून परत आल्यानंतर मी माझ्या लोकांना, चिनी आणि तिबेटी अधिकाऱ्यांना जे सांगत आलो होतो, तेच पुन्हा ठासून सांगितलं - 'चिनी हे आमचे राज्यकर्ते नाहीत आणि आम्हीही त्यांचे आज्ञांकित नाही. आम्हांला स्वायत्त सरकार देण्याचं वचन दिलं गेलं आहे आणि ते वास्तवात यावं म्हणून आपण झटलं पाहिजे. चिनी किंवा तिबेटी लोकांपैकी कोणाकडूनही जे जे काही चुकीचं घडलं आहे ते दुरुस्त करणं हे आपलं कर्तव्य आहे. चीनच्या राज्यकर्त्यांनी मला खात्रीनं सांगितलं आहे, की चिनी हे तिबेटमध्ये तिबेटी लोकांना फक्त मदत करण्यासाठी आले आहेत. आणि म्हणूनच जे चिनी आम्हाला मदत करण्यात अपयशी ठरले आहेत ते त्यांच्या मध्यवर्ती सरकारशी प्रतारणा करत आहेत.'

हे धोरण मी वास्तवात राबवण्याचा प्रयत्न केला. आपल्या सरकारची प्रत्येक कृती ही सतरा कलमी कराराला धरून राहील यावर कटाक्ष ठेवला आणि स्वायत्तता मिळवण्यावर वेळोवेळी भर दिला. पहिल्यांदा मला चिन्यांकडून काही प्रतिक्रिया मिळाली नाही. परकियांच्या प्रभावाखाली वागतो आहे असं त्यांना वाटू लागलं आहे, हे हळूहळू मला जाणवू लागलं.

मी जेवढा काळ भारतात होतो तेव्हा चिन्यांविरुद्ध लोकांचा राग ल्हासा आणि बाहेरच्या जिल्ह्यांमध्ये वाढीस लागला आहे, हे लवकरच मला कळलं. मला वाटतं, याचं मुख्य कारण, पूर्व भागातल्या खांपा आणि इतर निर्वासितांचा पश्चिमेकडे जाणारा ओघ -

हे असावं. सरकारच्या संरक्षणासाठी त्यापैकी अनेकजण ल्हासाभोवती तळ टाकून बसले होते. चिन्यांनी त्यांची तत्त्वं लादण्यासाठी कोणकोणत्या निर्घृण पद्धतींचा पूर्व भागात वापर केला याबद्दल त्यांच्याकडून अनेकांना कळलं होतं. उरलेल्य तिबेटमध्येही या दुष्ट प्रकारांची अंमलबजावणी होईल की काय अशी आता सर्वांना भीती वाटू लागली होती.

हळूहळू उठाव, बंड होण्याच्या दिशेनं संथपणे लोकांचा राग धुमसायला लागला होता. तर चिनी अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन मात्र फारच अचंबित आणि अस्वस्थ करणारा होता. मी तिबेटमध्ये परतल्यावर काही काळ तर माझ्या मंत्र्यांशी हे चिनी अधिकारी अगदी खास त्यांच्या मिठ्ठास पद्धतीनं वागत होते. त्या काळात त्यांनी एक बैठक बोलावली आणि मंत्रिमंडळात सांगितलं, की चीन सरकारला कळलं आहे, की तिबेटमध्ये सुधारणांबाबत केलेल्या प्रस्तावांबद्दल लोकांना काळजी वाटते आहे. लोकांच्या इच्छेचा त्यांना अजिबात अनादर करण्याची इच्छा नाही आणि सुधारणा करणं हे सहा वर्षांसाठी लांबणीवर टाकलं आहे. दिल्लीमध्ये चाऊ इन लाइ याला मी केलेल्या विरोधाचा हा परिणाम होता की काय हे मला ठाऊक नाही. ते काहीही असलं तरी लोकांमध्ये निर्माण झालेली शत्रुत्वाची भावना दूर करण्यास आता उशीर झालेला होता.

याच काळात म्हणजे घटवून केलेल्य मैत्रीच्या काळात, एका सार्वजनिक सभेत चिन्यांनी जाहीर केलं, की 'पूर्व भागात त्यांच्या राजवटीविरुद्ध उठाव झालेला आहे आणि तो चिरडण्यासाठी कोणताही मार्ग स्वीकारण्याची त्यांनी पूर्ण तयारी ठेवलेली आहे.' याची कोणतीही पूर्वसूचना त्यांनी मंत्रिमंडळाला दिली नव्हती. आमच्या मंत्र्यांना हा मोठा धक्का होता. खांपा लोक लढत आहेत हे त्यांना ठाऊक होतं; पण चिन्यांनी त्याची दखल घेऊन उठावाची कल्पना इतक्या भर सभेत द्यावी, इतका तो उठाव गंभीर असेल याची त्यांना कल्पना नव्हती.

आणि अचानकपणे कोणत्याही कारणाशिवाय मित्रत्वाचा काळ संपून गेला. पुन्हा आम्ही त्याच त्या जुन्या धमक्यांच्या, मागण्यांच्या आणि बऱ्याच अंशी उघडपणे घडणाऱ्या अपमानांच्या वातावरणात ढकलले गेलो.

माझ्या भारतभेटीनंतर, मी श्री. नेहरूंना ल्हासाला यायचं निमंत्रण दिलं. भारतात जे माझं आगत-स्वागत झालं त्याची कृतज्ञता म्हणून मला इथं त्यांचं आदरातिथ्य करण्याची इच्छा होती. एवढंच नव्हे, तर तिबेटमध्ये नक्की काय घडतं आहे याची प्रत्यक्ष माहिती त्यांना व्हावी, अशीही माझी इच्छा होती. त्यांनी निमंत्रण स्वीकारलं; आणि चिन्यांनीही आधी काही आक्षेप घेतला नाही, पण काय होईल ते मला ठाऊक असायला हवं होतं. बाहेरच्या जगातल्या एखाद्या मुत्सद्यानं इथं येऊन काय चाललंय ते पाहवं, ही हिंमत चिन्यांना झाली नसती. भेट होण्याच्या थोडंसंच आधी त्यांनी स्पष्ट केलं, की 'तिबेटमध्ये त्यांच्या सुरक्षिततेची खात्री देता येत नाही. कदाचित तिबेटी माणसं त्यांचं स्वागत करण्याऐवजी त्यांना इजा पोहोचवतील. ते तसं नक्कीच करू शकतील.' त्यामुळे दुर्दैवानं, एक रक्षणकर्ता या भूमिकेतून माझं निमंत्रण मागे घ्यावं लागेल. पुन्हा एकदा मी सहृदयी सहानुभूती आणि सल्ला यांपासून तोडला गेलो.

हळूहळू, निर्वासीतांच्या वृत्तांवरून पूर्व आणि ईशान्य भागात काय काय भयानक गोष्टी घडत आहेत, याची आम्हांला कल्पना येऊ लागली. त्या घटनांचा इतिहास जसाचा तसा आजही उपलब्ध नाही, तो उपलब्ध होणंही शक्य नाही. आक्रमण व्हायला सुरुवात झाली तेव्हाचा जो भाग मुख्यत्वे पूर्णपणे चिनी राजवटीखाली होता, तिथं ज्या

खांपांनी डोंगरांमध्ये गनिमी योद्धे म्हणून आश्रय घेतला होता, त्यांची संख्या शेकडोंवरून दहा हजारांपर्यंत पोहोचली होती. चिनी लष्कराबरोबर त्यांनी अगोदर युद्ध केलं होतं. चिनी हे तोफखाना आणि बॉंब टाकणाऱ्या विमानांचा वापर करत होते. यांचा वापर ते फक्त गनिमी योद्ध्यांविरुद्धच करत होते असं नव्हे, तर त्यांनी कोणतीही मदत केल्याच्या संशयावरून मठातल्या आणि खेड्यांमधल्या लोकांवर दोषारोप करून शस्त्रांचा वापर केला. त्यामुळं खेडीच्या खेडी, मठ पार उद्ध्वस्त झाली. लामा आणि लोकनेते यांचा अपमान, कैद, हत्या आणि छळ होऊ लागला. जमिनीवर जप्ती आणली गेली. पवित्र मूर्ती, धर्मग्रंथ आणि आमच्यासाठी धार्मिक दृष्ट्या पवित्र असलेल्या गोष्टींची मोडतोड केली गेली, त्यांची टर उडवली जाऊ लागली किंवा सरळ चोरी झाली. पत्रकांवर आणि वर्तमानपत्रांमध्ये ईश्वरनिंदा करणारा मजकूर छापला जाऊ लागला. धर्मामुळं लोकांची पिळवणूक होते आणि भगवान बुद्ध हा 'बंडखोर' होता, असं शाळांमधून शिकवलं जावू लागलं. चिनी भागात छापल्या गेलेल्या या काही वर्तमानपत्रांच्या प्रती ल्हासापर्यंत पोहोचल्या आणि तिबेटी व चिनी अधिकाऱ्यांमध्ये त्या फिरू लागल्या. तिबेटी लोकांच्या प्रतिक्रियेच्या तीव्रतेचं गांभीर्य ओळखून चिनी अधिकारी ही वर्तमानपत्रं पाच-पाच डॉलर देऊन विकत घेऊ लागले. जेणेकरून त्यांचा प्रसार थांबेल आणि ल्हासातल्या जनसामान्यांपर्यंत हा मजकूर पोहोचणार नाही.

'मातृभूमी'कडे परत आलेल्या तिबेटी लोकांना, खरंच आपलंसं करावं ही चिन्यांची इच्छा असती तर त्यांनी किमान पूर्व भागातले जुलमी प्रकार थांबवले असते. तिबेटी लोकांना घाबरवून, दडपून टाकून किंवा छळून मूकसंमती द्यायला कधीही भाग पाडता आलं नसतं. आणि सर्वात जास्त मौल्यवान असा जो आमचा ठेवा म्हणजे धर्म; त्याच्यावर घाला घालणं म्हणजे माथेफिरू धोरण होतं. या कृतींमुळे बंडाची तीव्रता आणखी पसरली आणि वाढली. मी ल्हासाला येऊन थोडाच काळ उलटला असेल, तर तिबेटच्या पूर्व, ईशान्य आणि आग्नेय या भागांमधल्या लोकांनी शस्त्रे हातात घ्यायला सुरुवात केली. त्यातल्या त्यात तुलनात्मक दृष्ट्या देशाच्या पश्चिमेकडील आणि मध्य भागातल्या ठिकाणीच शांतता नांदत होती.

अर्थात, ल्हासातील चिनी जनरलकडे या असल्या डावपेचांबद्दल कडकपणे निषेध नोंदवला. खेडी आणि मठ यांच्यावर केल्या जाणाऱ्या बॉंबफेकीबद्दल मी विरोध दर्शवला, की ते सारं तात्काळ थांबवलं जाईल असं तो वचन द्यायचा, पण कृती मात्र तीच चालू ठेवायचा.

ल्हासामध्ये खांपा, अम्दो आणि पूर्वेकडच्या इतर लोकांची संख्या कमीतकमी दहाएक हजारांवर वाढली. त्यांच्यातले काहीजण कायम राहणारे रहिवासी होते, पण बहुतेकजण शरणार्थी, निर्वासित होते. पूर्वेकडल्या लोकांनी बंडाची सुरुवात केल्यामुळे, ल्हासात राहणाऱ्या या लोकांना आता काळजी वाटू लागली, की चिनी त्यांच्यावर सूड उगवू शकतील. त्यामुळे त्यांनी मंत्रिमंडळाला एक विनंती अर्ज पाठवला आणि संरक्षणाची मागणी केली. चिनी सेनानायकांनी मंत्रिमंडळाला सांगितलं, की ते पूर्वेच्या लोकांविरुद्ध सरसकट दंडात्मक कारवाई करणार नाहीत. त्यामुळं मंत्रिमंडळानं स्थानिक खांपा नेत्यांना बोलावलं आणि त्यांना वाटणारी दहशत दूर करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला; पण काही थोडका काळच त्यांना शांत करता आलं. ते पुन्हा परत आले आणि त्यांनी मंत्रिमंडळाला सांगितलं, की चीनकडून लेखी हमीपत्र लिहून घेण्यात यावं, की

खांपा आणि अम्दो लोकांना शिक्षा करण्यात येणार नाही; पण चिन्यांनी तसं करायला नकार दिला. त्याचं अतिशय अजब कारण दिलं, की असं हमीपत्र जर सार्‍यांना कळलं तर ते भारतापर्यंत पोहोचेल आणि चीनची नामुष्की होईल.

चिन्यांनी दिलेलं तोंडी वचन पुन:पुन्हा सांगणं आणि स्वत:च्या अधिकारात ते लेखी करणं, याशिवाय मंत्रिमंडळाला वेगळं काही करता येणं शिल्लक नव्हतं. पण लवकरच अशी चिन्हं दिसू लागली, की इतर अनेक वचनांप्रमाणे हे वचनही पोकळच ठरणार. काही आठवड्यांच्या अवधीतच चिनी अधिकारी खांपा लोकांच्या तंबूंमध्ये खानेसुमारी करत फिरू लागले. जो जो तिथं मिळेल त्याच्या व्यक्तिगत माहितीच्या बारीक-सारीक नोंदी टिपून ठेवायला सुरुवात केली गेली. असं त्यांनी पूर्वी कधीच केलं नव्हतं आणि यामुळं पुन्हा नव्यानं खांपा लोकांच्या मनात भीतीनं उचल खाल्ली. त्यांना असं वाटलं, की सामुहीक अटकसत्राची ही पूर्वलक्षणं आहेत; आणि त्यांनी निर्णय घेतला, की आता यापुढं ल्हासामध्ये ते सुरक्षित नाहीत. त्यामुळं मोठ्या प्रमाणात शरणार्थी लोकांचे गटच्या गट रातोरात डोंगराळ भागात हलले. काहींनी त्यांची कुटुंब बरोबर नेली. गनिमी योद्ध्यांच्या पथकाला शोधून त्यांच्याबरोबर मिळून जाण्यासाठी सारे पसार झाले. क्वचितच कुणी शिल्लक राहिलं असेल.

यामुळं अर्थात चिन्यांना राग आला आणि मंत्रिमंडळाच्या कार्यालयात त्यांच्याकडून असंख्य तक्रारींचा भरणा झाला. घटनांनी हे वळण घेतलेलं पाहून मलाही नाराज व्हायला झालं. त्यामुळं मला चांगलंच कचाट्यात सापडायला झालं. गनिमी योद्ध्यांचं एका बाजूला मला कौतुक होतं. त्यांच्यातले स्त्री-पुरुष सारी शूर माणसं होती. आमचा धर्म आणि देश वाचवण्यासाठी, त्यांच्यासाठी उरलेल्या एकमेव मार्गाचा अवलंब करून त्यांनी स्वत:चं आणि आपल्या मुलाबाळांचंही आयुष्य पणाला लावलं होतं. पूर्वेच्या भागात चिन्यांनी केलेल्या निर्घृण कृत्यांबद्दल कळलं असतं, तर कुणालाही पटलं असतं की त्यांचं वागणं चुकीचं नाही. सूड घेणं ही नैसर्गिक मानवी प्रवृत्ती आहे. त्यापेक्षा, हेही मला ठाऊक होतं, की ते मला म्हणजे 'दलाई लामा'ला निष्ठा अर्पण करून लढत होते. त्यांना जे काही सुरक्षित राखायचं होतं त्याचं मर्मस्थान होतं - दलाई लामा.

तरीही मला माझ्या जुन्याच म्हणण्याकडे जावं लागलं. राजघाटच्या दिलेल्या भेटीची आठवण मी केली आणि पुन्हा नव्यानं चिंतन केलं, की समजा, महात्मा गांधी असते तर त्यांनी या बदलत्या घटनांमध्ये मला कोणता सल्ला दिला असता. त्यांनी अजूनही अहिंसेचाच पुरस्कार केला असता का? त्यांनी जरूर जरूर तसंच केलं असतं, हाच माझा विश्वास होता. आमच्याविरुद्ध कितीही मोठा हिंसाचार का घडला असेना; प्रत्युत्तर म्हणून हिंसाचारानंच वागणं हे बरोबर नाही. आणि अगदी वस्तुस्थिती म्हणून जरी मी विचार केला असता, तरी चिन्यांविरुद्ध जर आम्ही लढलो तर पूर्व भागात चिन्यांनी निर्घृणपणे कसली भयानक कृत्य केली होती याचं उदाहरण आमच्यासमोर होतं आणि चिनी ते सारं पूर्ण तिबेटभर सहजी करू शकत होते. म्हणून मी विचार केला, की माझ्या लोकांनी शस्त्रांचा वापर करू नये यासाठी मी त्यांचं मन वळवायचा प्रयत्न केला पाहिजे, शस्त्रवापराला देशात प्रोत्साहन किंवा चिथावणी देऊ नये हे सांगितलं पाहिजे. मंत्रिमंडळाला मी सांगितलं, की ही माझी इच्छा असल्याचा निरोप खांपा नेत्यांना पाठवला जावा. बाहेरचे दोन अधिकारी आणि तीन भिक्षू यांचं पथक मंत्रिमंडळानं नेमलं. गनिमी योद्ध्यांना शोधून त्यांना निरोप देण्याचं काम या पथकाला होतं. याच पथकानं

चिन्यांकडूनही वचन घेतलं, की जर या योद्धयांनी शस्त्रं खाली ठेवली तर त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई केली जाणार नाही. या वचनाचा ध्वनितार्थ असाही होता, की जर याला त्यांनी नकार दिला तर कारवाई कडक असेल. वचनाच्या बदल्यात चिनी अधिकाऱ्यांची मागणी होती, की खांपा लोकांनी अगदी शब्दश: त्यांची शस्त्रं हवाली केली पाहिजेत. पण मंत्रिमंडळानं, त्यांनी अशी मागणी करू नये म्हणून त्यांचं मन जरा वळवलं, कारण त्यांना ठाऊक होतं, की एकही खांपा हे कधीही मान्य करणार नाहीत.

या सुमारास चांग चिन-वु, तन कुवो-हवा आणि तन-कुआन सेन या तीन वरिष्ठ जनरलबरोबर माझं बऱ्याचदा बोलणं झालं. ते जे काही बोलत होते त्याचा, जे काही घडत होतं त्याच्याशी काहीही ताळमेळ नव्हता. मी प्रत्येक वेळी त्यांना भेटलो की चाऊ इन लाइ यानं भारतात मला दिलेल्या वचनांची पुनरावृत्ती करायचे : कमीत कमी सहा वर्षापर्यंत तरी तिबेटमध्ये कुठलेही मोठे बदल करण्यात येणार नाहीत आणि नंतरही लोकांच्या इच्छेविरुद्ध ते लादण्यात येणार नाहीत. असं असूनही ते मुळात या गोष्टी लादत होते. पूर्वेकडल्या जिल्ह्यांमध्ये लोकांचा कडवा विरोध असूनही हे घडत होतं. कदाचित त्यांना स्वत:लाच हे पटवायचं असेल, की हे जिल्हे म्हणजे चीनचा भाग आहेत, तिबेटचा नव्हे. पण त्यांची वचनं म्हणजे माझ्यासाठी शेवटचा आशेचा धागा होता. कदाचित त्यांना याचीच अपेक्षा असेल.

नंतर अचानक त्यांनी धोरण बदललं. आतापर्यंत पूर्वेतल्या गनिमी योद्धयांविरुद्ध चिनी लष्करानं सूडाचं धोरण ठेवलं होतं आणि इतरत्रही त्यांना धमक्या दिल्या होत्या. आता त्यांनी आग्रह धरला, की आमच्या सरकारनं त्यांच्याविरुद्ध कारवाई केली पाहिजे. उठाव चिरडून टाकण्यासाठी आम्ही आमचं तिबेटी लष्कर पाठवायला हवं. ते आम्हांला जादा कुमक आणि रसद यासाठी पुरवतील; पण याला मात्र मंत्रिमंडळाने साफ नकार दिला. त्यांनी सूचित केलं, की तिबेटी लष्कर तसं संख्येनं कमी आहे, तसंच ते उत्तम प्रकारे प्रशिक्षित नाही, सशस्त्र नाही आणि ल्हासातली शांतता टिकवायला त्यांची गरज आहे. तसंच गनिमी योद्धयांशी ते कशावरून हातमिळवणी करणार नाहीत, असं मंत्रिमंडळाला सांगितलं; आणि असं होऊ शकतं याची मला खात्री होती. जे तिबेटी देशाला वाचवण्यापेक्षा दुसरा कोणाताही मोठा गुन्हा करत नव्हते त्यांच्याविरुद्ध तिबेटी लष्कराला लढायला पाठवायचं, हा विचार करणंच अवघड होतं. एका महत्त्वाच्या अशा चीनच्या आदेशाची अवज्ञा करणं मंत्रिमंडळाला भाग पडलं.

अत्यंत महत्त्वाच्या बाबींमध्ये क्षुल्लक गोष्टींची बेमालूम मिसळण करायची अद्भूत क्षमता, पद्धत चिन्यांकडे होती. या सगळ्या गंभीर घटनांमध्ये त्यांनी आग्रह धरला, की ज्या खांपांनी त्यांच्याविरुद्ध शस्त्र उगारलं होतं, त्यांना उद्देशून 'प्रतिगामी' हा शब्द वापरला जावा.

साम्यवाद्यांच्या दृष्टीनं प्रतिगामी या शब्दाला काही भावनिक महत्त्व आहे; पण अर्थात, आम्हाला त्यात काही गम्य नव्हतं. सरकारच्या आतला आणि बाहेरचा प्रत्येक जण गनिमी योद्धयांना पर्यायी म्हणून हा शब्द वापरू लागला. साम्यवाद्यांच्या लेखी त्या शब्दातून दुष्टपणाची कमाल मर्यादा सूचित होत होती, तर आम्ही लोक एकंदरीत पाहता हा शब्द कौतुकानं वापरत होतो. आम्हांला काय किंवा खांपांना काय, आपलेच तिबेटी लोक त्यांना उद्देशून काय म्हणतात याच्याशी फारसं घेणं नव्हतं. पण नंतर जेव्हा मी अजाणतेपणी हा शब्द लिखाणात वापरला तेव्हा आमच्या परदेशी मित्रांना संभ्रमात

पडल्यासारखं झालं.

अनेक गंभीर बाबींमध्ये याच प्रकारचा तर्काचा अभाव आणि ढिसाळपणा चिन्यांनी दाखवला. ज्या भागात सात वर्ष त्यांचं नियंत्रण होतं तिथंच बंड उसळलं होतं; आणि आता ते तिरीमिरीनं या दोषाचं खापर आमच्या सरकारवर फोडत होते. दिवसेंदिवस त्यांच्या तक्रारी आणि आरोप अखंडपणे वाढत होते : जसं, मंत्रिमंडळ प्रतिगाम्यांना दाबण्याचा प्रयत्न करत नाही, तिबेटी शस्त्रांवर ते फारशी देखरेख करत नाहीत जेणेकरून प्रतिगाम्यांना ही शस्त्र, दारूगोळा चोरून नेता यावा! याचा परिणाम म्हणून, हजारो चिन्यांना प्राण गमवावे लागले आणि आता चिनी हे रक्तपात करून सूड घेतील. सर्वच आक्रमकांप्रमाणे, उठाव कशामुळे झाला, त्याच्या कारणाच्या बाबतीत ते पूर्णपणे अंध झाले होते. याचं कारण उघड होतं, की आमच्या लोकांना ते आमच्या देशात नको होते आणि त्यांच्यापासून सुटका व्हावी म्हणून ते जीवावर उदार झाले होते.

जरी चिनी आमच्या सरकारला दोष देत असले तरी अजूनही ते अस्तित्त्वात नसलेल्या 'साम्राज्यवाद्यां'च्या भुतानं पछाडलेले होते. एव्हाना तिबेटमध्ये कुठलेही 'साम्राज्यवादी' नाहीत हे त्यांना कळून चुकलं होतंच; पण आता ते म्हणत होते, की भारतातले काही तिबेटी हे 'साम्राज्यवाद्यां'ना जाऊन मिळालेले आहेत आणि हे लोकच तिबेटमध्ये उच्छाद मांडत आहेत. त्यांनी या संदर्भात नऊ जणांची नावं घेतली, त्यात माझा आधीचा प्रधानमंत्री लु-खङ्वा आणि माझे भाऊ थुबतेन नोर्बू तसंच ग्यलो दोन्डुब हे होते. चिन्यांनी अशी मागणी केली, की त्यांचं तिबेटी नागरिकत्व काढून घेतलं जावं. हा आदेश नाकारण्याचं काहीच कारण नाही असं मला आणि माझ्या मंत्रिमंडळाला वाटलं. कारण हा आरोप अत्यंत मूर्खपणाचा होता. अशा तऱ्हेनं आपला वेगळा उल्लेख होणं, या नऊ जणांना हा सन्मानच वाटला असता आणि त्यांना या शिक्षेनं आजमितीस कोणताही त्रास झालेला नाही, हे मी सांगू शकतो.

परंतु ल्हासामध्ये अगदी कटाकटीची वेळ आली होती. चिनी आणि आमचे मंत्रिमंडळ यांच्यात आधीच फूट पडली होती. चिनी त्यांच्यातल्या नागरी लोकांना सशस्त्र बनवत होते आणि शहरात पुन्हा त्यांचे अडथळे किंवा मेढेबंदी घालायला सुरुवात केली. त्यांनी जाहीर केलं, की देशभरात ते फक्त त्यांचे स्वत:चे नागरिक आणि त्यांची स्वत:ची संवादसाधनं यांना संरक्षण देणार; बाकी जे काही असेल ती आमची जबाबदारी असेल. त्यांनी शाळांमध्ये आणि इतर ठिकाणी सभा बोलावल्या आणि लोकांना सांगितलं, की मंत्रिमंडळ हे 'प्रतिगाम्या'शी संगनमत साधून आहे. त्यामुळे त्याच्या सदस्यांनाही त्याप्रमाणेच वागवलं जाईल - त्यांच्यावर फक्त गोळ्या झाडल्या जातील. एवढंच नव्हे, पुढे त्यांनी स्पष्ट केलं, की त्यांना हळूहळू जाहीररित्या देहांत शासन करण्यात येईल. जनरल तन-कुआन सेन यानं ल्हासामध्ये महिलांच्या सभेत म्हटलं, की जिथं सडकं मांस असतं तिथं माश्या घोंगावतात; पण जर तुम्ही त्या मांसापासून सुटका करून घेतलीत तर माश्यांचा त्रास होतच नाही. मला वाटतं, इथं गनिमी योद्धे म्हणजे 'माश्या' असाव्यात; सडकं मांस म्हणजे एकतर माझं मंत्रिमंडळ असेल किंवा मी स्वत:च असेन.

आणि जरी चिन्यांनी म्हटलं असलं, खांपा गनिमी योद्ध्यांबरोबर मंत्रिमंडळाचं मेतकूट आहे; तरी मला नि:संशय ठाऊक आहे, की खांपांचा मात्र, मंत्रिमंडळाचं चिन्यांशी संगनमत आहे यावर विश्वास होता. मंत्रिमंडळानं खांपांकडे जे पथक पाठवलं

होतं, ते कधीच परत आलं नाही. त्यातले पाच सदस्य गनिमी योद्धयांनाच जाऊन मिळाले आणि याबद्दल त्यांना दोष देणं फार कठीण होतं. पथकाबरोबर मी पाठवलेल्या निरोपामुळे किमान त्यांच्या युद्धात थोडी थंडाई आली; पण या निरोपाला फार उशीर झाला होता. बहुतेक गनिमी योद्धे घरी जाऊ शकत नव्हते, कारण त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई केली जाणार नाही, या हमीवर त्यांचा विश्वास नव्हता. पण खरं तर तेव्हा परिस्थिती किंवा वास्तव हे होतं, की त्यांच्यापैकी अनेकजणांना परत जाण्यासाठी घरंच शिल्लक राहिलेली नव्हती.

मी भयानक निराश झालो होतो, हे मला कबूल केलं पाहिजे. आणि नंतर, अचानक म्हणा किंवा व्यवस्थित कट रचून म्हणा, चिन्यांनी आमच्यावर शेवटचा घाला घातला.

ल्हासामधलं संकट

एक मार्च 1959 रोजी मी मोनलम उत्सवासाठी, कार्यक्रमांसाठी ल्हासामधल्या 'जोरवांग' या मुख्य देवळात होतो. या उत्सवाच्या सुमारास मी 'अध्यात्मविद्येतील पारंगत' या अभ्यासक्रमाची शेवटची परीक्षा दिली. अर्थात, आमच्या सर्व राजकीय दुर्दैवी परिस्थितीत - उलथापालथीमध्ये माझं धार्मिक शिक्षण चालू होतं. तो अजूनही माझ्या आवडीचा विषय होता. जर शक्य असतं तर शांतपणे धार्मिक अभ्यास चालू ठेवावा, याकडेच माझा स्वत:चा कल होता. भिक्षू आणि लामा यांच्या प्रचंड उपस्थितीत चालणाऱ्या वादविवादात्मक परीक्षेबद्दल मी आधी सांगितलं होतंच. ही परीक्षा म्हणजे माझ्यासाठी फार महत्त्वाची होती. ती संपूर्ण तिबेटच्या दृष्टीनंही मोलाची होती. आणि त्यावेळी मी पूर्णपणे धार्मिक प्रश्न, विषय यांच्या विचारातच गढलेलो होतो.

सगळ्या कार्यक्रमांची आणि माझ्या शेवटच्या परीक्षेची तयारी चालू असताना मधेच मला निरोप आला, की दोन चिनी अधिकाऱ्यांना माझी भेट घ्यायची आहे. त्यांना माझ्याकडं आणलं गेलं. ते दोन कनिष्ठ अधिकारी होते. त्यांना जनरल तन कुआन-सेन यानं पाठवलं आहे असं ते म्हणाले. चिनी लष्करी तळावर आयोजिलेल्या एका नाटकासाठी मी कधी येऊ शकेन ती तारीख जनरलनी विचारली होती, असं ते म्हणाले. या कार्यक्रमाबद्दल आधीच माझ्या कानावर आलं होतं. मी जाईन असंही वचन दिलं होतं; पण त्यावेळी मला खरोखर दुसऱ्या कशाचाही विचार करायला जमणार नव्हतं म्हणून मी त्या अधिकाऱ्यांना सांगितल, की दहा दिवसात हे कार्यक्रम संपले की मी लवकरात लवकर तारीख ठरवेन. त्यांचं समाधान होईना आणि काय ती एकदाच तारीख ठरवावी म्हणून ते माझ्या खनपटीला बसले. कार्यक्रम झाल्यानंतरच मी तारीख ठरवू शकेन हे मी त्यांना पुन्हा सांगितलं. शेवटी एकदा हा निरोप त्यांच्या जनरलकडे घेऊन जायला ते तयार झाले.

ही भेट जरा अजब होती. साधारणपणे जेव्हा जनरल स्वत: मला भेटायला यायचा नाही, तेव्हा त्याचे निरोप हे माझ्या सर्वात जास्त विश्वासू अशा अधिकाऱ्यांमार्फत माझ्याकडे पाठवले जात. सार्वजनिक कार्यक्रमांची निमंत्रणं, माझे ज्येष्ठ कारभारी 'दोनझेर छेनमो फ-ला' किंवा चिख्यब खेनपो - हे प्रमुख अधिकृत मठाधिपती आणि मंत्रिमंडळातील माझा प्रतिनिधी यांच्याकरवी मला पाठवले जात.

त्यामुळं कनिष्ठ दर्जाचे अधिकारी मला व्यक्तिश: भेटायला येतात आणि त्यांना पार देवळात पाठवलं जातं- अशा जरा अपरिचित पद्धतीमुळे, ज्या ज्या लोकांना या भेटीबद्दल कळलं त्यांच्या मनात संशय निर्माण झाला. यामुळे माझ्या अधिकाऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आणि प्रत्येकाला असं वाटलं, की असल्या कृतीमुळे लोकांच्या नजरेतून दलाई लामाचं स्थान घसरावं, हा जनरलचा हेतू आहे.

चिनी राजवटीखालचा आमचा दु:खद अनुभव असा होता, की मला शोभत नसलेल्या एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमाचं निमंत्रण नाकारायचा पर्यायही मला नव्हता. नाकारून फक्त काय परिणाम, तर चिन्यांचा रोष आणि इतर प्रकारचे रोष ओढवून घेणं. अशा बाबतीत त्यांना जो राग यायचा तो वेगळ्या मार्गानं बाहेर पडायचा. म्हणून आम्ही विचार केला, की देशाच्या भल्याच्या दृष्टीनं असे बारके-सारखे अपमान गिळून टाकावेत,

हे शहाणपणाचं आहे. अन्यथा मला खड्यासारखं वगळून काढण्याचं आणि माझ्या सरकारला दुय्यम लेखण्याचं असं चीनचं जे सर्वसाधारण धोरण होतं, त्यात ते आणखीच ताठर झाले असते.

पाच मार्चला मी नोर्बुलिङ्गा इथलं देऊळ सोडलं, त्याआधी या विचित्र निमंत्रणाबद्दल आणखी काही ऐकायला मिळालं नाही. नोर्बुलिङ्गा इथली माझी मिरवणूक हा एक नेहमीच मोठा प्रसंग असायचा आणि या आधीच्या वर्षांमध्ये चिन्यांनीही त्यात भाग घेतलेला होता; पण यावर्षी एकाही चिन्यानं त्यात सहभाग घेतलेला नाही, हे प्रत्येकाच्या लक्षात आलं. दोन दिवसांतर, 7 मार्चला जनरलकडून मला दुसरा निरोप आला. त्याच्या ली नावाच्या दुभाष्यानं, प्रमुख अधिकृत मठाधिपतीला दूरध्वनी केला आणि चिनी तळावरच्या नाटकाच्या सादरीकरणाला मी निश्चित केव्हा उपस्थित राहू शकतो ती तारीख विचारली. त्या मठाधिपतीनं माझ्याशी संपर्क साधला आणि माझ्या वतीनं त्यानं ली याला सांगितलं, की दहा मार्च आमच्यासाठी सोयिस्कर होईल.

माझ्या जाण्याच्या व्यवस्थेबाबत अगदी आदल्या दिवसांपर्यंत म्हणजे नऊ मार्चपर्यंत कसलीही चर्चा केली गेली नाही. मग आठ वाजता सकाळी कुसुङ दे-पोन हा जो माझा अंगरक्षक नायक होता, त्याच्या घरी दोन चिनी अधिकारी आले. आल्यावर त्यांनी सांगितलं, की ते त्याला ब्रिगेडियर याच्याकडे म्हणजे लष्करी सल्लागाराकडे घेऊन जायला आले आहेत. कुसुङ दे-पोन यानं सांगितलं, की अजून त्यानं न्याहारीही केली नाहीये, त्यामुळे तो दहा वाजता येऊ शकेल. हे ऐकून चिनी अधिकारी गेले, पण पुन्हा एका तासात निरोप घेऊन आले आणि त्यांनी सांगितलं, की त्याला लगेच निघायला हवं कारण ब्रिगेडियर त्याच्यासाठी तातडीनं वाट पाहत आहे.

त्यानंतर सकाळी, कुसुङ दे-पोन हा नोर्बुलिङ्गा इथं तसा वैतागून परत आला. तो प्रमुख अधिकृत मठाधिपती आणि ज्येष्ठ कारभारी यांच्याशी बोलला. या दोघांनी त्याला माझी भेट घ्यायला म्हणून आणलं आणि त्यानं काय काय घडलं ते शब्दश: मला सांगितलं. तो मला सांगू लागला, "ब्रिगेडियर कार्यालयात आला तेव्हा चिडलेला दिसत होता. तो तुटकपणे म्हणाला, उद्या नाटक पाहायला दलाई लामा इथं येणार आहे. काही गोष्टींची व्यवस्था व्हायला हवी. म्हणून मी तुला बोलावून घेतलं आहे." कुसुङ दे-पोन यानं त्याला विचारलं, "तारीख पक्की ठरली आहे का?" ब्रिगेडियर एकदम वसकन अंगावर आल्यासारखं बोलला, "तुला माहित नाही? दलाई लामानं जनरलचं निमंत्रण स्वीकारलं आहे आणि तो दहा तारखेला येणार आहे. आता मला स्पष्ट करायला पाहिजे, की तुमचे जे नेहमीचे कार्यक्रम होतात तसं काहीही होणार नाही. तुमच्यापैकी सशस्त्र माणसं जशी त्याच्याबरोबर प्रस्ताव समितीच्या इथं जातात, तसं इथं कोणीही येणार नाही. दगडी पुलापलीकडे एकही तिबेटी सैनिक यायला परवानगी नाही. जर तुझा आग्रहच असेल, तर तुला दोन-तीन तिबेटी अंगरक्षक आणता येतील; पण हे निश्चित, की त्यांच्याकडे कुठलंही शस्त्र असणार नाही."

माझ्या अंगरक्षक प्रमुखाच्या दृष्टीनं या प्रकारचे विचित्र आदेश हा फारच अप्रिय असा धक्का होता. जिथं चिनी मुख्य लष्करी ठाणं होतं तिथं असलेल्या प्रचंड चिनी लष्करी तळाची सीमा म्हणजे दगडी पूल होती. नोर्बुलिङ्गा इथपासून जेमतेम दोन मैलांवर असलेला हा लष्करी तळ, नेहमीच प्रत्येक देशभक्त तिबेटी माणसाच्या डोळ्यात

खुपायचा. चिन्यांनी त्याचा कारभार त्यांच्यापुरताच मर्यादित ठेवला होता, तोवर ल्हासातल्या लोकांना त्याचं अस्तित्व सहन केलं होतं. पण खुद्द दलाई लामानं एखाद्या हेतूनं तिथं जाणं हे सार्‍यांच्या लेखी अघटित होतं; आणि कुसुङ् दे-पोनला ठाऊक होतं, की हे लोकांना अजिबात आवडणार नाही. मी अंगरक्षकाशिवाय जाणं हे तर आणखीच चमत्कारिक वाटणारं होतं. परंपरेनुसार दलाई लामा जिथं जिथं जाईल तिथं तिथं पंचवीस सशस्त्र रक्षकांचा ताफा जाण्याची पद्धत होती. शिवाय रस्त्यावर देखील सशस्त्र पथकं नेमली जायची. कुसुङ् दे-पोनला माहीत होतं, की जर अचानक ही पद्धत बंद केली तर त्याचं स्पष्टीकरण लोकांना द्यायला लागणार. त्यामुळं त्यानं ब्रिगेडियाला त्याचं कारण विचारलं. खरं तर त्यानं अगदी निष्पापपणे ही चौकशी केली होती, पण त्यामुळे तो ब्रिगेडियर आणखीनच उखडला. "कुणी चाप ओढला तर तू जबाबदार राहणार का?" तो ओरडला. "आम्हाला कटकटी नको आहेत. दलाई लामा येईल तेव्हा आमची नि:शस्त्र पथकं असतील. दगडी पुलापर्यंत तुम्हाला ठेवायचीच असली तर तुमची माणसं रस्त्यावर ठेवा; पण त्यांच्यापैकी कुणीही कोणत्याही कारणाखाली पलीकडे येता कामा नये आणि हे सर्व कटाक्षानं गुपित म्हणून राखलं गेलं पाहिजे."

कुसुङ् दे-पोन या सर्व आदेशांची माहिती देऊन परत गेल्यानंतर माझ्या अधिकार्‍यांमध्ये बरीच चर्चा झाली. त्यांच्या आदेशांना रुकार देण्याखेरीज कोणता पर्यायच नव्हता. त्यामुळे त्यानुसारच माझी भेटीची आखणी केली गेली.

पण प्रत्येकाच्या मनात मात्र संशय तरळायला लागला. कारण एकूणच चिन्यांकडून आलेलं हे निमंत्रण संशयास्पद होतं आणि ही भेट गुप्त राखली गेली पाहिजे ही त्यांची इच्छा संशयात भर टाकणारी होती. नोर्बुलिङ्गा या जागेच्या बाहेर मी कुठलाही प्रवास केला तर तो गुपित राहणं अशक्य होतं. शहारात पूर्ण संचारबंदी लागू केली तरच काहीसं हे शक्य होतं. मी बाहेर जाण्याची तयार सुरू केली की त्याची बातमी पसरायची आणि ल्हासातले सारेजण येऊन रस्त्यात मला भेटायला दुतर्फा उभे राहायचे. या घटनेच्या सुमारास तर शहरात आणखीही बरेच लोक आलेले होते आणि तेही मला भेटायला येतील हे साहजिक होतं. मोनलम उत्सवासाठी आलेले अनेक भिक्षू परत गेले होते; पण अजूनही हजारो लोक शहरातच होते. आणखी भर म्हणजे कित्येक हजार शरणार्थीही होते. त्यावेळी ल्हासात अंदाजे एक लाख लोक होते आणि शहरातल्या लोकसंख्येचा हा उच्चांक होता.

त्यामुळे रस्त्यावर व्यवस्था राहावी म्हणून माझ्या अधिकार्‍यांनी ठरवलं, की चिनी भागात जाणार्‍या दगडी पुलापर्यंत नेहमीचे तिबेटी रक्षक नेमायचे आणि पुलापलीकडे लोकांचे जथे गर्दी करून जाणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठीही त्यांनी काळजी घ्यावी. नऊ मार्चच्या दुपारी, चिन्यांनी तिबेटी पोलिसांना एक सूचना केली; ती म्हणजे दुसर्‍या दिवशी गर्दी भरण्यावर निर्बंध लादण्यात येत असून कुणालाही पुलापलीकडे जाण्याची परवानगी नाही.

त्यांनी ही खबरदारी मुद्दामच घेतली होती. कारण पुलापलीकडे जाण्याला नेहमी बंदी असायची असं नव्हे, पण लोकांनी निष्पापपणे जर मला पाहण्यासाठी म्हणून पूल ओलांडला आणि चिन्यांनी त्यांना मागे ढकलायला बळाचा वापर केला तर दु:खद परिणाम होऊ शकतील. हे टाळावं म्हणून ही काळजी घेतली गेली. पण त्यांना जे अपेक्षित होतं त्याच्या उलटाच परिणाम झाला. शहरभर वार्‍यासारखी अफवा पसरली, की चिन्यांनी माझं अपहरण करण्याचा कट रचला आहे. नऊ मार्चच्या संध्याकाळी आणि

रात्री लोकांची उत्सुकता आणि प्रक्षुब्धता वाढत गेली आणि सकाळपर्यंत ल्हासातल्या बहुतांशी लोकांनी उत्स्फूर्तपणे निर्णय घेतला, की 'कोणत्याही परिस्थितीत काय वाटेल ते झालं तरी मला चिनी छावणीमध्ये जाण्यापासून रोखायचं!'

मला पळवून न्यायचा सापळा रचला आहे, असा लोकांचा जो ग्रह झाला त्याला आणखीही एक वस्तुस्थिती कारणीभूत होती. पुढच्या महिन्यात पेकिंगमध्ये चिनी राष्ट्रीय सभेची बैठक होणार होती आणि मी तिथं जावं असा चिन्यांचा आग्रह चालू होता. लोकांचा कल पाहून मी हे निमंत्रण टाळण्याचा प्रयत्न करत होतो आणि त्यामुळं मी चीन सरकारला कुठलंही निश्चित उत्तर दिलेलं नव्हतं. आणि असं असूनसुद्धा, काही आठवड्यांपूर्वी, त्यांनी पेकिंगमध्ये जाहीरही करून टाकलं, की 'मी येणार आहे.' माझ्या संमतीशिवाय करून टाकलेल्या या घोषणेमुळं ल्हासातील लोक अतिशय चिडले होते आणि साहजिकच त्यांनी निष्कर्ष काढला, की हे नवीन विचित्र निमंत्रण म्हणजे निव्वळ माझ्या इच्छेविरुद्ध मला चीनला नेण्यासाठीची युक्ती आहे.

लोकांच्या मनात संशय निर्माण व्हायला आणखीही एक सबळ कारण होतं. पूर्व भागातल्या चार ठिकाणी श्रेष्ठ दर्जाच्या लामांना चिनी लष्करी सेनापतींनी मेजवानीसाठी म्हणून निमंत्रणं दिली गेली होती आणि हे लामा पुन्हा कधीही दृष्टीस पडले नाहीत. तिबेटमध्ये हे सर्वांना ठाऊक होतं, की तीन जणांना ठार मारलं गेलं आणि चौथ्याला तुरुंगात टाकण्यात आलं. ज्यांना लोकांचं संरक्षण मिळण्याची शक्यता असेल त्यांना लोकांपासून काहीतरी आमिष दाखवून घेऊन जायचं, ही पद्धत म्हणजे चिन्यांची परंपरा असल्यासारखं दिसत होतं.

चिनी अधिकाऱ्यांच्या आणखी एका चमत्कारिक कृतीमुळं ल्हासातल्या लोकांच्या मनात शंकेनं घर केलं होतं, तशीच शंका माझ्या सरकारच्या अधिकाऱ्यांमध्येही पसरत गेली. साधारणपणे जेव्हा चिनी लोक मला एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमाला बोलवायचे, तेव्हा सर्व वरिष्ठ तिबेटी अधिकाऱ्यांनाही सोबत निमंत्रण असायचं. पण आताच्या या प्रसंगाचं मात्र नऊ मार्चच्या संध्याकाळपर्यंत, माझ्या व्यक्तिगत कर्मचारी वर्गाव्यतिरिक्त एकाही अधिकाऱ्याला निमंत्रण आलं नाही. रात्री उशीरानं, दोन चिनी अधिकारी नोर्बुलिङ्गा इथं निमंत्रण पत्रिका घेऊन आले, पण या पत्रिका माझ्या मंत्रिमंडळातील फक्त सहा जणांसाठीच होत्या; आणि त्यांनी एक विचित्र तोंडी विनंती केली, की मंत्रिमंडळातील या सदस्यांनी फक्त एकच सेवक त्यांच्याबरोबर आणावा. परंपरेनुसार, माझा ज्येष्ठ कारभारी हा कायमच मी जिथं जाईन तिथं माझ्याबरोबर यायचा. चिन्यांना हे पक्कं ठाऊक होतं; परंतु निमंत्रणात त्याचा किंवा अन्य कुठल्याही अधिकाऱ्याला समावेश केला गेला नव्हता.

असं सगळं संशयाचं धुकं असूनही माझ्या अधिकाऱ्यांनी 'मी जाऊ नये' असं सांगून मन वळवण्याचा प्रयत्न केला नाही. पण माझ्या मंत्रिमंडळानं एक मात्र निर्णय घेतला, की नेहमीच्या प्रथेप्रमाणं सारेजण स्वतंत्र जात असत, पण यावेळी साऱ्यांनी एकत्र माझ्याबरोबर जायचं. कारण यामागची त्यांची भूमिका अशी होती, की जर काही एखादी अप्रिय घटना घडलीच तर किमान मी एकटा पडलो नाही, हे समाधान तरी त्यांना असावं.

पुढचा दिवस म्हणजे ल्हासातला चिरस्मरणीय दिवस ठरणार होता. दुपारच्या वेळी, बरोबर कुणीही न घेता चिनी छावणीमध्ये मला पाऊल ठेवावं लागणार होतं. ही तशी

अपूर्व घटनाच होती. जेव्हा मी सकाळी उठलो, तेव्हा पुढे भविष्यात या दिवसानं माझ्या पुढ्यात काय वाढून ठेवलंय याची मला काही कल्पना नव्हती. एकतर मला काळजी वाटत राहिल्यानं नीटशी झोप लागली नव्हती. पाच वाजता मी उठलो आणि नेहमीप्रमाणे माझ्या प्रार्थनेच्या खोलीत गेलो. सारं काही कसं नीटनेटकं होतं, नेहमीची परिचयाची नीरव शांतता होती, वेदीसमोर तुपाचे दिवे तेवत होते.

सोन्याच्या आणि चांदीच्या छोट्या छोट्या वाडग्यांमध्ये गोडसर सुगंधानं दरवळवून टाकणारं केशराचं पाणी काठोकाठ भरलेलं होतं. हे केशरी पाणी जणू पातळ केलेल्य सोन्यासारखं दिसत होतं. उदबत्तीचा सुगंध हवेत भरून राहिला होता. मी प्रार्थना म्हटल्या आणि ध्यानधारणा केली आणि मग मी खाली - बाहेरच्या बागेत गेलो. इथं भल्या पहाटे चालायला मला नेहमीच खूप आवडायचं.

सुरुवातीला माझं मन चिंतेनं भरून गेलेलं होतं; पण वसंतातल्या सकाळचं देखणेपण अनुभवता अनुभवता मी त्या चिंता हळूहळू विसरूनच गेलो. आकाश निरभ्र होतं. लांबवरच्या डेपुङ मठाच्या मागच्या बाजूला असलेल्या डोंगरावर, सूर्याची किरणं नुकतीच शिखरांवर पावलं ठेवत होती. आणि माझ्या 'ज्युवेल पार्क'मधल्या (रत्न उद्यानातल्या) राजवाड्यांवर, देवळांवर हे किरण चमकायला लागले होते. वसंत ऋतू होता, सारं काही ताजंतवानं आणि उत्फुल्ल होतं. नव्या हिरव्या गवताची टोकं, पॉपलर आणि विलोच्या झाडांवरच्या नाजुकशा कळ्या, तळ्यातल्या पाण्याच्या वर येऊन दाटी करणारी आणि सूर्यापुढं उलगडत जाणारी कमळाची पानं; सारं सारं कसं तकतकीत हिरवं होतं. माझा 'काष्ठ-वराह' वर्षात जन्म झाला होता, तेव्हा जंगल हिरवंगार होतं. ज्योतिषांनी सांगितलंही होतं, की हिरवा रंग हा माझ्यासाठी शुभ आहे. खरंचच, त्या कारणासाठी माझे व्यक्तिगत प्रार्थनाध्वज हिरवे होते, माझ्या छपरावर ते फडकत होते. सकाळच्या मृदु झुळकांच्या तालावर हलत होते.

मला मिळालेल्या थोडक्या काही शांत चुटपुटत्या क्षणांपैकी हा एक शेवटचा क्षण होता. उद्यानाच्या भिंतीच्या पलीकडून आलेल्या अचानक आणि बेसुरी अशा ओरड्यानं ही शांतता तटकन तुटली. मी लक्ष देऊन ऐकण्याचा प्रयत्न केला, पण मला शब्द नीटसे कळू शकले नाहीत. मी घाईनं आत गेलो, माझ्या काही अधिकाऱ्यांना बोलावलं आणि काय गडबड चालले हे पाहायला पाठवलं. लवकरच ते आले आणि त्यांनी मला सांगितलं, की ल्हासातल्या लोकांचे लोंढेच्या लोंढे शहराबाहेर येत आहेत आणि नोर्बुलिङगाला वेढून टाकत आहेत. हे लोक घोषणा देत आहेत, की ते सारे जण माझं संरक्षण करायला आले आहेत आणि मला छावणीवर नेण्यापासून ते चिन्यांना रोखणार आहेत. चिंताग्रस्त झालेल्या लोकांमुळे सर्व राजवाडे ढवळून निघू लागले. वेगवेगळ्या बातम्या घेऊन दूत माझ्याकडे येऊ लागले. गर्दी प्रचंड होती - काही जण म्हणाले, जवळजवळ 30,000 लोक जमले होते. त्यांच्यात एक वादळी खळबळ माजलेली होती आणि त्यांच्या घोषणांमधून चिन्यांबद्दलचा तीव्र राग उसळत होता. तासातासाने खदखद वाढत जात होती. मी स्वत: एका लहानशा देवळात प्रार्थनेसाठी गेलो. हे देऊळ सातव्या दलाई लामानं बांधलेलं होतं आणि ते महाकालाला अर्पण केलेलं होतं. महाकाल हा चन-रे-सिगचा लढाऊ आविष्कार होता. अशुभाविरुद्ध संरक्षण देण्याची शक्ती त्याला मिळालेली होती. आठ भिक्षू तिथं गेल्या अनेक दिवसांपासून, सतत प्रार्थना अर्पण करण्याचं अनुष्ठान करत होते.

माझ्या मंत्रिमंडळातले दोन सदस्य, लिउ-शर आणि श-सुर हे नऊच्या सुमारास चिनी लष्करी जीपमधून, चिनी चालकासह राजवाड्यात आले.

ही त्यांची नेहमीची पद्धत होती. चिनी चालकांना पाहून लोकांमध्ये जास्तच खळबळ माजली; पण माझ्या मंत्र्यांना गर्दीतून वाट काढत यायला आणि राजवाड्यात जायला तशी काही फारशी अडचण आली नाही.

पण नंतर थोड्याच वेळात समडुब फोड्रङ् हा आणखी एक अधिकारी त्याच्या स्वत:च्या गाडीतून एका चिनी अधिकाऱ्याला सोबत घेऊन आला. नंतर काही क्षणांसाठी गर्दीवरचा ताबा निसटला. समडुब फोड्रङ याची मंत्रिमंडळात नुकतीच नेमणूक झाली होती आणि ल्हासातल्या फारच थोड्या लोकांना तो प्रत्यक्ष पाहून ठाऊक होता. त्यानं पिवळ्या सिल्कचे कपडे घातलेले होते. तो जर एकटा असता तर दरवाजातून आत कदाचित कुठल्याही अडचणीशिवाय येऊ शकला असता; पण गर्दीला वाटलं, की ही गाडी चिनी आहे आणि म्हणून झटकन निष्कर्ष काढला गेला की चिनी अधिकारी मला घेऊन जायला आला आहे. कोणीतरी त्याच्या दिशेनं दगड फेकला आणि एक धडकी भरवून टाकणारी प्रतिक्रिया उसळत गेली. गाडीवर तुफानी दगडफेक झाली. समडुब फोड्रङ् याला कुणीतरी कानशीलाजवळ तडाखा दिला आणि तो बेशुद्ध झाला. तो बेशुद्ध पडला होता तेव्हा सुद्धा लोकांनी त्याला ओळखलं नाही; पण त्यांच्या एवढं मात्र लक्षात आलं, की त्यांनी चुकून माझ्याच अधिकाऱ्यांपैकी एकाला जखमी केलं आहे. त्यामुळे त्यांच्यातल्याच काही जणांनी त्याला उचललं आणि भारतीय दूतावासाच्या इस्पितळात नेलं.

आणखी थोड्या वेळानं, मंत्रिमंडळातला आणखी एक सदस्य सुर-खङ् - हा त्याच्या जीपमधून राजवाड्याशी आला; पण साऱ्या गर्दीनं रस्ता पूर्णपणे अडवून जाम केला होता, त्यामुळे त्याला दरवाजापर्यंत जीप घेऊन येता आलं नाही. काही अंतरावर जीप ठेवून तो चालत आला. गर्दीतून पुढे सरकत आला आणि दरवाजाशी उभ्या तिबेटी अधिकाऱ्याच्या मदतीनं आत शिरला.

हे तीनही अधिकारी गर्दीचा अनुभव घेऊन आले होते. त्यामुळे त्यांनी ओळखलं, की आणीबाणीचा प्रसंग टाळण्यासाठी झटकन काहीतरी केलं गेलं पाहिजे, अन्यथा हा सारा जमाव चिनी मुख्य तळावर सुद्धा हल्ला करू शकेल. त्यांनी काही वेळ मंत्रिमंडळाच्या आणखी एका सदस्याची म्हणजे ङ्वोची वाट पाहिली, पण तो काही आला नाही. नंतर आम्हाला कळलं, की तो चिनी छावणीकडे, मी तिथं गेलो असेन असं समजून, गेला होता आणि मग त्याच्या लक्षात आलं, की आता त्याला बाहेर पडणंही मुष्किल होऊन बसलं होतं. खरंच होतं ते. कारण त्याला सोबतीला म्हणून चिन्यांनी एखाद्याला पाठवलं असतं आणि समडुब फोड्रङ् प्रमाणेच त्यांच्यावरही दगडफेक होऊ शकली असती.

शेवटी त्यांनी ठरवलं, की आता फार वेळ वाट पाहता येणार नाही. तिथल्या तिघांनी मंत्री दर्जा असलेल्या चिख्यब खेनपो या प्रमुख अधिकृत मठाधिपतीबरोबर चटकन एक बैठक घेतली. मग ते मला भेटायला आले. त्यांनी मला सांगितलं, मला पळवून नेऊन चीनला नेलं जाईल या आशंकेने लोकांनी पक्कं ठरवलं आहे, की मला चिनी छावणीत जाऊच द्यायचं नाही. साऱ्या जमावानं साठ-सत्तर नेत्यांची एक समिती आधीच निवडून दिलेली आहे; आणि त्यांनी शपथ घेतली आहे, की जर 'मी जायलाच पाहिजे', असा जर चिन्यांनी आग्रहच धरला, तर ते सारेजण राजवाड्याभोवती अडथळे निर्माण करतील

आणि मला बाहेर पडणंच अशक्य करून टाकतील. मंत्रिमंडळानं मला सांगितलं, की सारा जमाव अतिशय प्रक्षुब्ध झाला आहे, निग्रही बनला आहे, त्यामुळं आता मी जाणं हे खरोखर सुरक्षित नाही.

मंत्रिमंडळाचे सदस्य मला भेटायला आले होते तेव्हा मला लोकांच्या घोषणा ऐकू येत होत्या -"चिन्यांनो परत जा. तिबेटी लोकांकडे तिबेट राहू द्या." त्यांच्या घोषणांमधून सूचित होत होतं, की त्यांना चिन्यांचं अस्तित्व नको होतं आणि दलाई लामाच्या राजवटीत चिन्यांची ढवळाढवळ त्यांना नको होती. घोषणा ऐकून लोकांमध्ये किती तणाव निर्माण झाला होता, हे मला जाणवत होतं. त्यांच्यापैकीच मी एक होतो आणि त्यांच्या भावना मला कळत होत्या आणि सध्याची त्यांची मानसिक स्थिती नियंत्रणापलीकडची आहे हेही मला कळत होतं. याला पुष्टी देणारी माहिती मला नंतर सकाळी मिळाली. फगस्-पा ला खेनछुङ् नावाच्या भिक्षू अधिकाऱ्याला अत्यंत निष्ठुरपणे वागवण्यात आलं आणि नंतर संतापानं उग्र झालेल्या जमावानं त्याला दगडफेक करून ठार मारलं. हे ऐकताना मला वेदना आणि दुःख झालं. चिन्यांशी हातमिळवणी करून घनिष्ठ संबंध ठेवल्यामुळं हा माणूस ल्हासामध्ये तसा कुख्यात झाला होता. त्या दिवशी लवकर सकाळच्या वेळी तो दररोज भरणाऱ्या भिक्षू अधिकाऱ्यांच्या ट्रुङ्-छा नावाच्या धार्मिक सभा, संस्कारासाठी उपस्थित राहिला होता. मग कुठल्यातरी अज्ञात कारणाखातर, अकराच्या सुमारास तो नोर्बुलिङ्गाच्या दिशेनं सायकलवरून निघाला. त्यानं तेव्हा थोडासे चिनी दिसणारे कपडे घातले होते. गडदा चष्मा आणि मोटरसायकलवाल्यांचा असतो तसा धुळीपासून संरक्षण देणारा मुखवटा घातला होता आणि उघडपणे दिसेल असं पिस्तूल पट्टयात लावलेलं होतं. गर्दीतल्या काहीजणांना तो छुपेपणानं आलेला चिनी वाटला; तर काहींना वाटलं, चिन्यांच्या मुख्य केंद्रावरून तो काही निरोप घेऊन आला आहे. चिन्यांविरुद्धच्या प्रत्येक गोष्टीबद्दल त्यांना वाटणारा राग, त्वेष-तळतळाट एकदम उफाळून आला आणि त्यातून दुःखद परिणाम काय झाला, तर त्याचा खून!

एकूणच या हिंसाचाराच्या उद्रेकानं मला अत्यंत यातना झाल्या. माझ्या मंत्रिमंडळाला, चिनी अधिकाऱ्याला 'मी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नाही' असं कळवून टाकायला सांगितलं. आणि हे देखील सूचित करायला सांगितलं, की त्यांच्या मुख्य छावणीतून नोर्बुलिङ्गा इथं सध्यातरी कुणी येणं शहाणपणाचं नाही, कारण त्यामुळं जमावाचा संताप आणखी वाढेल. माझ्या ज्येष्ठ कारभाऱ्यानं जनरलच्या दुभाष्याला दूरध्वनी करून माझ्यावतीनं क्षमा मागून आणि खेद व्यक्त करून निरोप दिला. माझा निर्णय बरोबर आहे याच्याशी तो दुभाष्याही सहमत झाला आणि त्यानं जनरलला निरोप पोहोचवेन असं सांगितलं.

त्याचवेळी, 'राजवाड्याला वेढा घालून बसलेल्या लोकांची जर मी चिनी छावणीवर जावं अशी इच्छा नसेल तर मी जाणार नाही' असं लोकांना सांगावं हे मी मंत्रिमंडळाला सांगितलं. सुर-खङ् हा मंत्री लोकांनी निवडून दिलेल्या नेत्यांना भेटला आणि मी ही भेट रद्द केली आहे असं त्यांना सांगितलं. तसंच दुपारच्या वेळीही जमावाला ही घोषणा सांगण्याकरिता ध्वनिप्रक्षेपकाचा वापर करण्यात आला. दरवाजाबाहेरून त्यावर जोरदार आरोळ्यांनी आनंद व्यक्त केला गेला.

तिबेटच्या लोकांचं नेतृत्व करायला लागल्यापासूनच्या थोड्या काळात, त्या

सकाळच्या वेळी जो ताण मी अनुभवला तसा अनुभव त्यापूर्वी कधी घेतला नव्हता. मला असं वाटत होतं, की दोन ज्वालामुखींच्या मध्ये उभा आहे, दोन्हीपैकी कोणत्याही ज्वालामुखीचा कुठल्याही क्षणी स्फोट होऊ शकतो. एका बाजूला चीनी राजवटीविरुद्ध माझ्या लोकांचा तीव्र, जबरदस्त, स्पष्ट, सर्वमतानं व्यक्त होणारा निषेध होता; तर दुसऱ्या बाजूला, मुक्काम ठोकून असलेल्या शक्तीचे ताकदवान आणि आक्रमत असे सशस्त्र सामर्थ्य होते. जर या दोघांमध्ये संघर्ष घडला असता तर त्याचा निकाल, परिणाम हा पूर्वनिश्चित होताच. ल्हासातल्या लोकांची निष्ठुरपणे हजारोंनी कत्तल केली गेली असती आणि मग ल्हासातल्या आणि उरलेल्या तिबेटनं काय पाहिलं असतं, तर गांजणूक आणि जुलूम करणारा, संपूर्णपणे लष्करी असा अंमल.

या स्फोटक परिस्थितीमागचा आताचा प्रश्न होता, की 'मी चीनी छावणीत जावं की न जावं.' परंतु त्याचवेळी, मी एकटाच तर शांती-समेटासाठी प्रयत्न करणारा माणूस होतो. मला ठाऊक होतं, की काय वाटेल ते झालं तरी माझ्या स्वत:च्या लोकांसाठी, मी लोकांचा राग शांत करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे आणि त्याचबरोबर अधिक चिडणाऱ्या चिन्यांचीही समजूत घातली पाहिजे.

माझी अशी अपेक्षा होती, की 'मी जात नाहीये' ही घोषणा केल्यानंतर निदर्शनं थांबतील आणि लोक शांतपणे आपापल्या घरी परततील. पण तेवढंच पुरेसं नव्हतं. लोकनेत्यांनी मला सांगितलं, की मी त्यांना वचन दिलं पाहिजे, की 'मी फक्त आजची भेट रद्द केली आहे असं नव्हे, तर भविष्यातही कधी मी चिनी छावणीवर जायचं निमंत्रण स्वीकारायचं नाही असं ठरवलेलं आहे.' मोठी दुर्घटना टाळण्यासाठी दुसरा उपायच नव्हता म्हणून मी त्यांना हवी असलेली खात्री देऊन टाकली. नंतर निवडलेल्या या नेत्यांपैकी बरेचसे निघून गेले; पण उरलेले अनेक लोक मात्र अजूनही राजवाड्याबाहेर ठाण मांडून थांबले होते आणि ते परत जायला तयार होईनात.

एकच्या सुमारास मी माझ्या तीन मंत्र्यांना जनरल तन कुआन-सेन याला भेटायला सांगितलं आणि व्यक्तिश: त्याला सर्व परिस्थिती समजावून सांगितली जावी, अशी सूचना दिली. दरवाजातून कुणालाही बाहेर पडू न देण्यासाठी बाहेर प्रचंड जनसमुदाय निग्रहानं थांबला होता; आणि दरवाज्याशी माझे मंत्री आलेले पाहून लोकांना संशय आला, की कदाचित मी त्यांच्यामागून येत असेन. अतिशय कष्टानं माझ्या मंत्र्यांनी जमावाला सांगितलं, की 'त्यांना चिनी मुख्य तळावर जाऊन मी नाटकाच्या प्रयोगाला येऊ शकत नाही असं जनरलला सांगावं' अशी माहिती देण्याचा आदेश मी दिलेला आहे. ही खात्री देऊनही गर्दीतल्या लोकांनी आग्रह धरला, की त्यांना मंत्र्यांच्या गाड्यांची तपासणी करू द्यावी. एखाद्या गाडीत मी लपलेलो तर नाही ना! ही त्यांना खात्री करून घ्यायची होती. मग हे सर्व केल्यानंतर त्यांचं स्वत:चं समाधान झालं, तेव्हाच त्यांनी मंत्र्यांना जाऊ दिलं. दरवाज्याजवळ जी काही चर्चा झाली तेव्हा जमावाच्या प्रवक्त्यानं सांगितलं, की लोकांनी त्यांच्यातून एक अंगरक्षक निवडायचा ठरवलं आहे. ह्या माणसानं राजवाड्याच्या आसपास लक्ष ठेवायचं आणि मला घेऊन जाण्यासाठी जर एखादा चिनी आलाच तर त्याला रोखायचं. माझ्या मंत्र्यांनी त्यांना खूप पटवलं, की असलं काही केलं जाऊ नये, पण ते काही त्यांचा सल्ला मानायला तयार होईनात.

त्या दिवशी मग दुपारच्या वेळी माझे मंत्री जेव्हा परत आले, तेव्हा चिनी मुख्य छावणीवर काय घडलं ते त्यांनी मला सांगितलं. ते गेले तेव्हा जनरल तन कुआन-सेन

तिथं नव्हता; पण इतर दहा अधिकारी त्यांची वाट पाहत होते. वरवर पाहता ते कुठल्यातरी गंभीर चर्चेत गुंतल्याचं दाखवत होते; त्यांच्याबरोबर माझा दुसरा एक मंत्री ङ्वो हा होता. त्यावेळी तो तिबेटी कपड्यांमध्येच होता. अन्यथा चिनी कार्यालयात भेट घ्यायची असेल तर त्याला चिनी जनरलचा गणवेश घालायला लागायचा. ङ्वो इतर अधिकाऱ्यांबरोबर बसलेला तर होता, पण त्यांच्या चर्चेत भाग घेतो आहे असं काही दिसलं नाही. जेव्हा माझे मंत्री तिथं पोहोचले तेव्हा त्यांना जाऊन मिळण्यासाठी त्यानं त्याची जागा सोडली नाही.

काही वेळ, दिवसभरात घडलेल्या घटनांबद्दल दोन्ही बाजूंनी कुणीही चकार शब्द काढला नाही. चिनी अधिकारी बेफिकीर दिसत होते आणि त्यांनी नम्रपणे मंत्र्यांना त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. पण जनरल तन कुआन-सेननं प्रवेश करून पुढची सूत्रं हातात घेतल्यानंतर अचानक सारं वातावरण बदललं.

मंत्र्यांनी मला सांगितलं, की खोलीत आला तेव्हाच जनरल अतिशय भडकलेला होता. त्याचा एकूण अवतारा भेदरवून टाकणारा होता; त्याला आदर दाखवण्यासाठी माझे मंत्री जरा घाबरूनच जागेवरून उठले. काही क्षण, संतापानं तो बोललाच नाही आणि त्यानं मंत्र्यांना अभिवादनही केलं नाही. सुर-खङ् यानं संभाषणाला तोंड फोडलं. त्यानं सांगितलं, की मी नाटकाच्या प्रयोगाला का येऊ शकलो नाही हे स्पष्ट करण्यासाठी मीच त्यांना पाठवलं आहे. तो म्हणाला, की मला जावं अशी खूप इच्छा होती पण लोकांना तीव्रपणे वाटत होतं की मी तसं करू नये, त्यामुळं मला ती कल्पनाच सोडून द्यावी लागली. इतर दोन मंत्र्यांनीही पुस्ती जोडली. दुभाष्यानं जेव्हा हे सारं सांगून संपवलं तोपर्यंत जनरलचा चेहरा उघडपणे लाललाल झाला होता. तो जागेवरून उठला आणि खोलीत येरझाऱ्या घालू लागला. रागावर ताबा मिळवण्याचा तो प्रयत्न करतोय, असं वाटत होतं. नंतर मोठ्या कष्टानं त्यानं स्वत:वर संयम राखला आणि तो पुन्हा बसला; आणि नंतर अगदी जाणीवपूर्वक कमावलेल्या मसलतीच्या आणि संथ सुरात त्यानं मंत्र्याविरुद्ध आणि 'तिबेटी प्रतिगाम्यां' विरुद्ध सालंकृत, डौलदार भाषण सुरू केलं. जरी तो त्याच्या रागावर ताबा राखण्याचा प्रयत्न करीत होता तरी त्याचा आवाज बरेचदा चढत होता आणि त्याच्या उकळणाऱ्या रागाला उर्मट आणि शिवीगाळ करणाऱ्या भाषेतून तोंड फुटलं. सभ्य चिनी समाजात कधीही न वापरले जाणारे अर्वाच्य चिनी शब्द तो वापरत होता. त्याच्या या सालंकृत भाषणाचा सर्वसाधारण मुद्दा हाच होता, की 'तिबेटी सरकार हे गुप्तपणे चिनी अधिसत्तेविरुद्ध लोकांना भडकावत आहे आणि खांपांना त्यांच्या बंडात मदत करत आहे.' तिबेटी अधिकाऱ्यांनी चिन्यांच्या आदेशांचा अधिक्षेप केला होता आणि ल्हासातल्या खांपांना नि:शस्त्र करायचं नाकारलं होतंच. आणि आता - चीनी सत्तेला होणारा विरोध चिरडून टाकण्यासाठी जहाल पद्धतींचा अवलंब केला जाणार होता. इतर दोन अधिकाऱ्यांनीही तसलीच शिव्यांची लाखोली वाहिली. त्यांच्यापैकी एकानं जाहीर केलं, की "या साऱ्या प्रतिगाम्यांना नष्ट करून टाकायची वेळ आता आली आहे... आमच्या सरकारनं आजपर्यंत बरंच सहन केलं", पुढं तो म्हणाला, "पण हे तर बंड आहे. आता निर्णायक क्षण आला आहे. आता आम्ही कृती करणारच, म्हणून तयार राहा!"

माझे मंत्री पार बावरून गेले. त्यांच्या दृष्टीनं ही फर्डी भाषणं म्हणजे, जनमताचा उठाव थांबला नाही तर लष्करी कारवाईबद्दलचा निर्वाणीचा इशारा होती. भविष्यकाळ

आता धोकादायक आहे, याची त्यांना खात्री पटली आणि दलाई लामा या व्यक्तीच्या सुरक्षिततेचा प्रश्न यात गुंतलेला आहे, असं त्यांना निश्चितपणे वाटलं. जर मला काही झालं तर तिबेटमध्ये काहीच शिल्लक राहणार नाही, असं त्यांना वाटलं. त्यांनी संयम राखण्याचा प्रयत्न केला. श-सुर यानं जनरलला सांगितलं, की सर्वसामान्य तिबेटी लोकांना चिन्यांनी समजून घेतलं पाहिजे आणि संयम आणि सहनशीलता दाखवली पाहिजे. प्रत्युत्तर देऊन त्यांनी आधीच चिघळलेली परिस्थिती बिघडवून टाकता कामा नये. त्यानं त्याला पटवायचा प्रयत्न केला, की मंत्रीमंडळ हे खांपांमधले बेकायदेशीर उठाव रोखण्यासाठी किंवा चिनी सत्तेविरुद्ध मूर्खपणानं संघर्षाची ठिणगी टाकणारे इतर तिबेटी लोक यांना अटकाव करायला सर्वतोपरी प्रयत्न करेल; पण चिनी जनरल त्याची ही हमी स्वीकारायला किंवा त्याचा हा सल्ला ऐकून घ्यायलाच तयार नव्हते.

संध्याकाळी पाचच्या सुमारास, हे मंत्री मनोमन अतिशय खोलवर दुखावले जाऊन, नोर्बुलिङ्गा इथं परत आले. तोपर्यंत काही गर्दी ओसरली होती, तरीही मुख्य दरवाजाबाहेर अजून प्रचंड संख्येनं लोक घेरून होते. नंतर आम्हाला कळलं, की जे लोक तिथून निघून गेले ते शहरात सार्वजनिक सभा भरवायला आणि चिन्यांविरुद्ध सामूहिक निदर्शन करायला गेले होते. सभांमध्ये त्यांनी उघडपणे सतरा कलमी करारावर दोषारोप केले, कारण चिन्यांनीच त्याचा भंग केला होता. चिन्यांनी निघून जावं याचाही त्यांनी सभेत पुनरूच्चार केला. त्याच दिवशी संध्याकाळी सहा वाजता, सरकारचे जवळजवळ सत्तर सदस्य, त्यातले बहुतेक कनिष्ठ अधिकारी होते, त्यांच्याबरोबर जमावानं निवडलेले नेते आणि कुसुङ् रेजिमेंटचे (म्हणजे दलाई लामाच्या अंगरक्षकांच्या पलटणीचे) सदस्य या सर्वांनी मिळून नोर्बुलिङ्गाच्या आत पटांगणावर सभा घेतली. शहरातल्या सभांमध्ये केल्या गेलेल्या घोषणांना संमती दर्शवली. त्यांनी असाही ठराव केला, की तिबेट चिनी सत्ता मानणार नाही; त्यानंतर लगेचच कुसुङ् रेजिमेंटने जाहीर केलं, की ते यापुढे चिनी अधिकाऱ्यांचे आदेश मानणार नाहीत. त्यांनी त्यांच्यावर जबरदस्तीनं लादलेला चिनी गणवेश टाकून दिला आणि ते सारे पुन्हा तिबेटी कपड्यांमध्ये आले.

ज्या क्षणी मी या निर्णयांबद्दल ऐकलं, त्याच क्षणी मी नेत्यांना सूचना पाठवल्या, की सध्या निर्माण झालेला ताण कमी करणं हे त्यांचं कर्तव्य आहे, त्या ताणात कुठलीही भर घातली जाऊ नये. धीर धरावा आणि सर्व प्रसंगांना शांतपणे आणि संयमाने तोंड द्यावं; पण तेव्हा लोकांची चीड इतक्या कडवट थराला गेली होती आणि चीन्यांबद्दलचा त्यांचा संशय इतका पक्का होता, की माझ्या सल्ल्याचा त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही असं दिसलं.

त्या दिवशी संध्याकाळी उशिरानं, जनरल तन कुआन-सेन याचं पत्र माझ्यापर्यंत पोहोचलं. पुढच्या तीन दिवसात त्यानं तीन पत्रं मला पाठवली, त्यातलं हे पहिलं होतं; आणि मी त्याच्या सर्व पत्रांना उत्तरं दिली.

ल्हासातील सर्व घटना घडल्यावर ही पत्रं चिन्यांनी प्रकाशित केली होती. त्यांच्या विशिष्ट तत्त्वांची भलावण करण्यासाठी ती लिहिली होती. त्यात त्यांनी असं काहीतरी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता, की मला चिनी मुख्य छावणीवर आश्रय हवा होता, पण 'प्रतिगामी गटानं' मला नोर्बुलिङ्गा इथं नजरबंद करून ठेवलं आणि शेवटी माझ्या इच्छेविरुद्ध देशाबाहेर भारतात पळवून नेलं गेलं. साम्यवादी चीनच्या बाजूनं झुकणारी ही गोष्ट काही परदेशी वृत्तपत्रांमध्ये पुन:पुन्हा छापली गेली. नंतर जवळजवळ एक वर्षानं

'हाऊस ऑफ लॉईस' मधल्या बड्या ब्रिटिश उमरावानं ही गोष्ट उद्धृत केल्याचं ऐकून मला धक्का बसला. ही गोष्ट तर सत्याच्या पार विरुद्ध होती. ज्या परिस्थितीत, ज्या कारणांखातर ही पत्रं लिहिली गेली ते मला जरा सविस्तर सांगितलं पाहिजे. मला एकदाच काय ते ठणकावून सांगायचं आहे, की मी जेव्हा ल्हासा सोडलं, तेव्हा मी माझ्या स्वत:च्या इच्छेनं गेलो. अतिशय बिकट आणि घातक परिस्थितीच्या दबावाखाली मी माझ्या स्वत:च्या इच्छेनं तो निर्णय घेतला होता. माझ्या बरोबर असलेल्या लोकांकडून माझं अपहरण वगैरे काही झालं नव्हतं; कुणापासून दूर जायचा माझ्यावर दबाव नव्हता. फक्त ल्हासातल्या प्रत्येक तिबेटी माणसाला उघड दिसून येत होतं, की चिनी माझ्या राजवाड्यावर बॉंब टाकण्याची तयारी करत आहेत आणि जर मी तिथं राहिलो तर माझं आयुष्य धोक्यात येऊ शकतं.

जनरलची पत्रं अतिशय मैत्रीपूर्ण शब्दात लिहिलेली होती. जर मला माझ्या मंत्र्यांकडून, त्याला आलेल्या रागाबद्दल आधी कळलं नसतं तर ती पत्रं मला फार प्रामाणिक वाटली असती. त्यानं माझ्या सुरक्षिततेबद्दल काळजी व्यक्त केली होती आणि मला त्याच्या छावणीवर आश्रय घेण्यासाठी आमंत्रित केलं होतं.

मधे वेळ मिळावा म्हणून त्याच्या सर्व पत्रांना मी उत्तरं दिली- वेळ कशासाठी? तर दोन्ही बाजूंचा राग जरा थंड व्हावा आणि ल्हासातल्या लोकांबद्दल नरमाईचं धोरण घेतलं जावं, ही विनंती मला करता यावी म्हणून. प्रसंग मोठा बाका असल्यानं, माझ्या दृष्टीनं जनरलशी वाद घालणं हा मूर्खपणा होता. माझ्या लोकांपासून संरक्षण मिळावं म्हणून मी चिन्यांना साकडं घालीन ही फार अशक्य गोष्ट आहे हे सांगणंही वेडेपणाचं होतं. उलट, मी त्याचा राग जरा निवेल अशा पद्धतीनं पत्रं लिहिण्याचं ठरवलं होतं. हे मी फक्त कशा पद्धतीनं करू शकत होतो, तर त्याच्या सहानुभूतीचा वरवर स्वीकार करून आणि त्याच्या सल्ल्याचं स्वागत करून पहिल्या पत्रात मी त्याला सांगितलं, की मनोरंजनासाठी ठेवलेल्या कार्यक्रमाला जाण्यापासून मला रोखण्यासाठी माझ्या लोकांनी जी काही कृती केली त्यानं मला फार गोंधळून टाकलं आहे. दुसऱ्या पत्रात मी त्याला माहिती दिली, की मी नोर्बुलिङ्गाला वेढून बसलेल्या लोकांना परत जायचा आदेश दिला आहे. मला संरक्षण देण्याच्या कृतीमुळे हे लोक चीन आणि आमचं सरकार यांच्यातले संबंध बिघडवत आहेत, या त्यांच्या एका विचाराशी मी सहमती दर्शवली. आणि तिसऱ्या पत्रात मी याचीही भर घातली, की मी मुख्य तळाला भेट देण्याअगोदरच जे लोक नवीन कल्पनांना पाठिंबा देत आहेत आणि जे त्यांना विरोध करत आहेत अशा लोकांना वेगवेगळं ठेवलं पाहिजे.

ही पत्रं नंतर माझ्याविरुद्ध उद्धृत केली जातील अशी जरी मला कुणकुण असती तरीही मी ती लिहिलीच असती, कारण त्यावेळी माझं सर्वात निकडीचं नैतिक कर्तव्य हे होतं, की माझे नि:शस्त्र लोक आणि चीनचं लष्कर यांच्यात होऊ घातलेला भीषण संघर्ष काहीही करून टाळणं. मला कुठलाही हिंसाचार मान्य नव्हता आणि त्यामुळं ल्हासातील लोकांचा हिंसाचाराकडे झुकणारा कल मला पसंत पडणारा नव्हता, हे मला पुन्हा ठासून सांगायचं आहे. मला ते तिबेटचं प्रतीक मानत आणि त्यामुळेच त्या दुर्दैवी दिवशी त्यांनी त्यांचा राग व्यक्त केला होता, त्यामागचं माझ्याबद्दल प्रेम मी निश्चितच समजू शकत होतो आणि अजून मला त्यांच्या स्नेहाचं कौतुक आहे. माझ्या सुरक्षितेबद्दल त्यांना जी चिंता वाटत होती, त्याबद्दल मी त्यांना दोष देऊ शकत नव्हतो, कारण ते ज्यासाठी जगत

होते, कष्ट करत होते, त्याचा एकमेव प्रतिनिधी आणि प्रतीक म्हणजे दलाई लामा. पण मला खात्री होती, की ते जे काही करत होते, ते जर चालूच राहिलं असतं तर त्याचा परिणाम भयंकरच झाला असता. राज्यप्रमुख म्हणून मला त्यांच्या उफाळलेल्या भावना शांत व्हाव्यात म्हणून मला झटणं भाग होतं. त्याचबरोबर चिनी लष्करी सामर्थ्यानं ते चिरडले जाऊ नयेत म्हणून मला त्यांना शांत करणं भाग पडलं. म्हणून त्यांना मी जो सल्ला दिला तो पूर्णतया प्रामाणिक होता. आणि चिनी जनरलला लिहिलेल्या पत्रांमध्ये माझ्या खऱ्या भावना, हेतू दडवून ठेवले गेले असले तरी, मला तेव्हा वाटलं आणि अजूनही वाटतं, की ती पत्रं समर्थनीय होती.

परंतु दुसऱ्या दिवशी म्हणजे अकरा मार्चला ल्हासातले लोक ताबा राखण्याच्या दृष्टीनं अवघड होऊ लागले, हे स्पष्ट होऊ लागलं. त्या दिवशी त्यांनी नोर्बुलिङ्गाच्या आतील बाजूस मंत्रिमंडळाच्या कार्यालयाजवळ सहा सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आणि मंत्र्यांना इशारा दिला, की त्यांना तिथून निघून जाण्याची परवानगी मिळणार नाही. संभवत: त्यांना संशय होता, की चिन्यांबरोबर मंत्रिमंडळ काहीतरी तडजोड करेल आणि त्यामुळं 'चिन्यांनी तिबेट सोडून जावा' ही जी जनमताची मागणी आहे तिचा पराभव होईल. मंत्रिमंडळानं तातडीनं बैठक बोलावली. सहा मंत्र्यांपैकी चारजणच उपस्थित होते, कारण समडुब फोड्रङ् हा जखमी होऊन आजारी असल्यानं येण्याच्या अवस्थेतच नव्हता आणि ङ्वो यानं चिनी छावणीतून बाहेर येण्यास नकार दिला होता. परंतु मग या चार जणांनी लोकांना निदर्शनं करण्यापासून परावृत्त करावं म्हणून आणखी एक प्रयत्न करायचा ठरवला आणि त्यांनी जमावाच्या नेत्यांना बोलावणं पाठवलं.

या बैठकीच्या वेळी, हे नेते जबाबदारीनं वागत आहेत असं वाटत तरी होतं आणि त्यांनी मंत्रिमंडळाला सांगितलं, ते लोकांना जाण्याची सूचना देतील. त्यांनी एवढंही म्हटलं, की समडुब फोड्रङ् याला हकनाक जखमी केलं गेलं त्याबद्दल त्यांना खेद वाटतो आणि त्यांनी क्षमायाचना करून त्यांच्या वतीनं काही भेटवस्तू त्याला पोहोचवण्याची विनंती केली.

खरं तर, या शांतता प्रस्थापित करण्याच्या मनोवस्थेत सारेजण असताना लोक केव्हाच निघून गेले असते; शांतपणे सलोख्यानं निदर्शनांचा शेवट व्हावा म्हणून मी आणि माझं मंत्रिमंडळ आटोकाट जे प्रयत्न करत होतो त्यांना यशही आलं असतं; पण तेवढ्यात जनरलकडून आणखी दोन पत्रं आली - एक मला आणि एक मंत्रिमंडळाला. मंत्रिमंडळाला आलेल्या पत्रानं आमच्या साऱ्या प्रयत्नांवर पाणी पडलं. त्या पत्रात म्हटलं होतं, ल्हासाच्या उत्तर भागात 'प्रतिगामी बंडखोरांनी' चीनकडे जाणाऱ्या रस्त्यावर अडथळे उभारले आहेत आणि हे अडथळे ताबडतोब दूर केले जावेत असा मंत्रिमंडळाला आदेश दिला गेला होता. तसंच मंत्रिमंडळाला धमकीही देण्यात आली होती, की जर हे केलं गेलं नाही तर "त्याचे परिणाम गंभीर होतील आणि त्याची जबाबदारी सुर-खङ्, लिउ-शर, श-सुर आणि दोनझेर छेनमो यांच्यावर राहील."

मंत्रिमंडळानं लोकांच्या नेत्यांना पुन्हा बोलावलं आणि त्यांना अडथळे हलवायला सांगितले. म्हणजे किमान आणखी जुलूम करायला चिन्यांना निमित्त तरी राहिलं नसतं. पण त्या सल्ल्याचा परिणाम नेमका उलटाच झाला. अडथळे हलवायला नेत्यांनी साफ नकार दिला. 'चिन्यांना शहराबाहेर ठेवून नोर्बुलिङ्गाला संरक्षण देण्यासाठी म्हणून तर अडथळे घातले आहेत', असं ते म्हणाले, 'तसंच जर चिन्यांना ते अडथळे काढायचे

आहेत तर याचाच अर्थ त्यांना राजवाड्यावर हल्ला करायचा आहे आणि दलाई लामाला पकडायचं आहे.' पुढं ते असंही म्हणाले, 'चिन्यांनीही स्वत: देवळासमोर असेच अडथळे टाकले आहेत आणि ड्वोसारखे त्यांचे जे तिबेटी समर्थक आहेत त्यांचं संरक्षण करण्यासाठी अशीच दक्षता घेतली आहे. जर ड्वो याला संरक्षण देण्यासाठी चिनी लोक अडथळ्यांचा वापर करू शकतात तर मग राजवाड्याला संरक्षण देण्यासाठी ल्हासातल्या लोकांनी हेच केलं तर त्यांचा आक्षेप काय म्हणून?' हे तर्कशास्त्र दुर्दैवी होतं खरं; पण चिन्यांच्या आदेशाचा अन्य कुठल्याच प्रकारे विचार करण्यासाठी या नेत्याचं मन वळवताच आलं नाही; आणखी एक दु:खद परिणाम झाला तो असा, की ते सारेजण माझ्या सुरक्षिततेबद्दल आणखीच साशंक बनले आणि जमाव पांगवण्यासाठी त्यांनी नकार दिला. लोक अधिकच आडमुठे बनले. राजवाड्याची सुरक्षाव्यवस्था आणखी मजबूत करण्यासाठी लोकांनी त्यांच्यातूनच सहा सेनापतींची निवड करून नेमणूक केली. त्यांनी साफ जाहीरच करून टाकलं, की आता काय वाटेल ते घडलं तरी किल्ल्याला संरक्षणव्यवस्था देण्यासाठी ते जागा सोडणारच नाहीत.

या घटनाक्रमांमुळं माझ्यावर कमालीचा ताण पडला. संकटाकडे आणखी एक पाऊल आपण पुढं टाकलंय असं मला जाणवलं. म्हणून लोकांच्या नेत्यांशी मी स्वत:च बोलायचं ठरवलं. मी त्यांना बोलावलं. ते सारे सत्तरजण मला भेटायला आले. त्यानंतर मंत्रिमंडळाच्या आणि इतर ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांना त्यांच्या कृतीपासून परावृत्त करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. मी त्यांना सांगितलं, की चिनी जनरलनं मी निमंत्रण स्वीकारावं म्हणून अजिबात माझ्यावर जबरदस्ती केली नव्हती; माझ्याशी संपर्क साधून चर्चा केली गेली होती आणि निमंत्रण अधिकृतरित्या पाठविण्याआधी माझी संमती घेतली गेली होती. चिन्यांपासून व्यक्तिगत पातळीवर मला कुठल्याही धोक्याची भीती नाही. त्यामुळं ज्यानं गंभीर परिणाम होतील अशी परिस्थिती त्यांनी निर्माण करू नये, हे मी त्यांना सांगितलं. मला ठाऊक होतं, की यामुळं त्यांच्या भावना दुखावल्या जातील; परंतु ल्हासात काही प्रमाणात किमान शांती पुन्हा प्रस्थापित व्हावी या माझ्या कळकळीच्या हेतूनं मला त्यांना हे सांगणं भाग पडलं.

नेत्यांनी माझ्या सल्ल्यावर प्रश्न विचारले नाहीत किंवा मला विरोधही केला नाही. ते बैठकीतून शांतपणे निघून गेले आणि राजवाड्याच्या बाहेरच्या दरवाजाजवळ त्यांनी आपापसात एक चर्चा झाली. माझा आदेश धुडकावणं अशक्य आहे, यावर त्यांचं एकमत झालं. पण मग संरक्षण काढून घेतल्यास माझं काय होईल यावर त्यांची भलीमोठी चर्चा, वाद झाले. अखेरीस नोर्बुलिङ्गाच्या आतल्या परिसरात ते आणखी सभा घेणार नाहीत, इतपत मानण्यापर्यंत त्यांनी माझी इच्छा पाळली. त्याऐवजी ते सारे पोतालाच्या पायथ्याशी, शोल नावाच्या खेड्यात एकत्र भेटले. प्रत्येक बैठकीचं वृत्त त्यांनी बैठक झाल्यावर माझ्याकडे आणि मंत्रिमंडळाकडे पाठवलं. या वृत्तांमध्ये त्यांच्या पूर्वीच्या घोषणांची पुनरावृत्ती होती : ते माझं संरक्षण करत राहणार आणि चिन्यांनी ल्हासा तसंच तिबेट सोडलंच पाहिजे आणि तिबेटी लोकांना त्यांचे व्यवहार सांभाळण्याची परवानगी दिली पाहिजे.

अशाच प्रकारे पुढचे दिवस ढकलले गेले. परीस्थिती आहे तशीच राहिली होती आणि प्रश्न अनुत्तरीत होते; पण अर्थात हे सारं असंच चालू राहणं शक्य नव्हतं. कधीतरी तोंड फुटायला, काहीतरी घडायला हवं होतं - चांगल्यासाठी किंवा वाईटासाठी तरी.

जनरल तन कुआन-सेन याचं तिसरं आणि शेवटचं पत्र सोळा मार्चला माझ्यापर्यंत पोहोचलं, आणि त्याच दिवशी मी लगेच त्याला उत्तरंही लिहिली. नंतर चिन्यांनी ती दोन्ही उत्तरं प्रकाशित केली. त्याच पाकिटात जनरलच्या पत्राबरोबर ङ्वो यानं मला लिहिलेलं पत्रही होतं, हे त्यांनी जाहीर केलं नव्हतं. जेव्हापासून संघर्ष सुरू झाला तेव्हापासून तो मंत्रिमंडळाच्या बैठकींना उपस्थित राहिला नव्हता. आता त्यानं मला इशार दिला होता आणि सांगितलं, की आता शांतता प्रस्थापित करायला काही संधी आहे असं त्याला वाटत नाही. त्यानं मला सुचवलं होतं, की 'प्रतिगामी बंडखोरांचे जे कट चालले आहेत ते नष्ट करण्याचा मी प्रयत्न करावा आणि लोकांच्या नेत्यांबरोबरचे माझे सर्व संबंध मी तोडून टाकावेत.' नोर्बुलिङ्गामधून मला पळविण्यासाठी लोकांनी कट रचला आहे असं त्यानं अनुमान काढलं होतं; आणि जर त्यात तथ्य असेल तर ते माझ्यासाठी धोकादायक होतं, कारण मी पलायन करू नये यासाठी चिन्यांनी अतिशय कडक धोरणं अवलंबली होती. आणि त्यातूनही जर मी सटकलोच तर सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती अशी होती, की मी पुन्हा कधीही ल्हासामध्ये परत येऊ शकलो नसतो. पुढं तो म्हणाला, की 'जर आपण काही थोडक्या विश्वसनीय अंगरक्षक अधिकाऱ्यांबरोबर आतल्या भिंतीच्या आतच गेलात आणि तिथंच थांबून राहून जनरल तन कुआन-सेनला तुम्ही निश्चितपणे कल्पना दिलीत की तुम्ही कुठल्या इमारतीत आहात, तर ते त्या विशिष्ट इमारतीला धोका पोहोचणार नाही याची नक्कीच काळजी घेतील."

याचाच अर्थ असा होता, की आम्ही ज्याची फक्त अटकळ बांधली होती, त्या गोष्टीची ङ्वो याला माहिती होती. म्हणजे राजवाडा आणि जमावाला नष्ट करायचा चिन्यांचा हेतू होताच. पण हे करताना, शक्यतो मला ठार न मारता त्यांना हे साध्य करायचं होतं.

त्यानं मंत्रिमंडळाला देखील, बहुतांशी जे मला लिहिलं होतं त्याचीच पुनरावृत्ती करून लिहिलं होतं आणि विनंती केली होती, की 'त्यांनीही राजवाड्यातून लोकांना दूर करावं किंवा लोक किमान भिंतीबाहेर थांबतील असं तरी बघावं.' त्यानं पुढं म्हटलं होतं, की 'मला अडचणी लक्षात येतात आणि जर का लोकांना बाहेर घालवणं आम्हाला शक्य झालं नाही तर किमान त्यांनी मला तरी राजवाड्याबाहेर न्यावं आणि माझ्याच सुरक्षिततेसाठी चिनी छावणीता घेऊन जावं. तोवर मधल्या काळात, मी ज्या इमारतीत आहे ती जागा सूचित करणारं असं राजवाड्याच्या नकाशाचं रेखाचित्र त्यांनी पाठवून द्यावं.'

मीदेखील साधारणपणे पहिल्या पत्रात जसं लिहिलं होतं त्याच धर्तीवर जनरलच्या पत्राला उत्तर दिलं. अजूनही मला आशा वाटत होती, माझ्याप्रमाणंच त्याचीही इच्छा अशीच आहे, की शक्यतो जमावावर आणि राजवाड्यावर हल्ला करायला लागू नये. मी कुठल्या इमारतीत आहे ते काही मी त्यांना सांगितलं नाही. मला अशी इच्छा होती, की जोपर्यंत चिन्यांना मी नक्की कुठं आहे याचा थांगपत्ता लागत नाही, तोपर्यंत ते शस्त्रास्त्रांचा वापर करणार नाहीत असं मानायला वाव आहे; जर आम्ही त्यांना सांगितलं तर उरलेल्या नोर्बुलिङ्गाची राखरांगोळी होणार हे निश्चित होतं. मी त्याला सांगितलं, की ज्या क्षणी शक्य होईल तेव्हा त्याच्या छावणीवर येईन. निघून जाण्याचा माझा विचार नाही. पण यामुळे मला अशी आशा होती, की या वचनामुळे हल्ला

करण्याचा त्याचा आदेश जरा लांबणीवर पडेल आणि आम्हांला लोकांना वेळेवर हलवता येईल. त्याला मी लिहिलेलं हे शेवटचं पत्र होतं.

राजवाड्याभोवतालचं वातावरण कमालीचं तंग होतं. त्याच्या आतल्या भिंतीबाहेर प्रक्षोभित आणि संतापलेल्या लोकांचा प्रचंड जमाव होता. त्यातले बहुतेक काठ्या, कुदळी किंवा सुऱ्या बाळगून होते किंवा काही इतर शस्त्रांची जुळवाजुळव त्यांनी केली होती. त्यांच्यामध्ये बंदुका आणि मशिनगन घेतलेले थोडे सैनिक आणि खांपा होते. त्यांच्याकडे अगदी चौदा-पंधरा उखळी तोफाही होत्या. आमोरसमोर विचार केला तर, मनगटाच्या बळावर किंवा तलवारीच्या जोरावर एक तिबेटी हा डझनभर चिन्यांना पुरून उरला असता - नुकत्याच पूर्वेकडल्या भागांमध्ये आलेल्या अनुभवानं ह्या जुन्या विश्वासाला पुष्टी मिळालेली होती. पण हे अगदी उघड होतं, की त्यांना पार पुसून टाकण्यासाठी चिनी लोक जी अवजड साधनं आणू शकत होते, त्या मारयापुढं या तिबेटी लोकांची ताकद कुचकामाची ठरली असती. अगदी स्पष्ट सांगायचं तर, मला संरक्षण द्यायचा त्यांचा दुर्दम्य, प्रबळ निश्चय वगळता दुसरी कोणतीही प्रेरणा किंवा बळ त्यांच्याकडे नव्हतं.

आतल्या भिंतीच्याही आतल्या बाजूला राजवाड्याच्या अंतर्भागात सारं कसं संथ आणि शांत दिसत होतं. जणू तिथं काही पुढच्या घटनांचं सावट नव्हतं. बाग नेहमीसारखीच निःशब्द-शांत होती. पिसारे उंचावून मोर त्यांच्या नेहमीच्या डौलानं चालत होते; माणसांनी माजवलेल्या खळबळीची त्यांना कल्पनाच नव्हती; गाणारे पक्षी या झाडावरून त्या झाडावर झेपावत होते, दगडांच्या उद्यानाजवळच्या कारंज्याच्या आवाजात त्यांची किलबिल मिसळून जात होती; पाळलेली हरणं, मासे, चक्रवाक आणि पांढरे करकोचे नेहमीसारखेच निवांत होते. माझ्या अंगरक्षकांची एक तुकडी, गणवेश न घालता, हिरवळीला आणि फुलांच्या ताटव्यांना पाणी घालत होती. सारं वातावरण कसं अगदी खास तिबेटी होतं. शतकानुशतके तिबेटी लोकांनी इथे मानसिक शांती मिळवली होती; आणि दुःख आणि वेदना यांच्यापासून मुक्ती देणाऱ्या स्वातंत्र्याचा रस्ता शोधण्यासाठी, धर्माच्या द्वारे लोकांनी स्वतःला झोकून दिलं होतं.

सोळा मार्चला, चिन्यांनी ही शांत सुंदर जागा नष्ट करण्यासाठी तयारी सुरू केली आहे अशा बातम्या येऊ लागल्या. लोकांनी मंत्रिमंडळाला आणि पर्यायानं मला बातम्या दिल्या, की जिल्ह्यातील सर्वी शस्त्रसामग्री ही शहराच्या टप्प्यात येणाऱ्या ठिकाणांवर आणि मुख्य म्हणजे नोर्बुलिङ्गा टप्प्यात येईल अशा ठिकाणी आणवली जाऊ लागली आहे. ल्हासाच्या पूर्वेला आठ मैलांवर जिथं जलविद्युत प्रकल्प उभारणं चालू होतं, तिथं काम करणाऱ्या माणसानं बातमी दिली, की चार पहाडी तोफा आणि अठ्ठावीस जड मशिनगन, या ज्या नेहमी तिथं ठेवलेल्या असायच्या त्या गुप्तपणे 14 तारखेच्या रात्री ल्हासाला नेण्यात आल्या. त्याबरोबर अनेक ट्रक भरून चिनी सैनिकही गेले. तेरा तारखेच्या तसंच पुन्हा पंधरा तारखेच्या संध्याकाळी, दोन प्रचंड मोठी चिनी लष्करी वाहनं आली. राजवाड्याच्या उत्तरेच्या दरवाजाजवळ आलेल्या वाहनांमध्ये प्रत्येकी तीन सैनिक होते, त्यांच्याजवळ यांत्रिक आयुधं होती; आणि वरवर पाहता ते कसलीतरी मोजमापं घेत होते. लोक त्यांच्याकडे पाहत आहेत ते लक्षात येताच ते घाईघाईनं निघून गेले आणि लोकांच्या रक्षकांनी लगेच अनुमान काढलं, की ते राजवाड्यावर जड बंदुकांनी हल्ला करण्यासाठी अंतराची मोजमापं, अंदाज घेत होते.

रात्रीच्या वेळी शंभर नवीन चिनी ट्रक हळूहळू करत पोतालाकडे आणि तिथून चिनी छावणीकडे जाताना दिसले. दुसऱ्या दिवशी सकाळी, साध्या नागरी कपड्यांमधली पंधरा ते वीस चिनी माणसं तारायंत्रांच्या खांबावर चढलेली दिसली. वरवर पाहता ते वायरींची दुरूस्ती करत होते; पण लोकांनी निष्कर्ष काढला, की ते हल्ला करण्यासाठी मारा करायला अंतराचा अंदाज घेत आहेत. आमच्या माणसांना तोफखान्याबद्दल फारशी माहिती नव्हती अन् त्यांचं अनुमान कदाचित चुकीचंही असेल. पण त्यांचा असा समज झाला खरा.

या निरीक्षणांशिवाय आणखीही अफवा होती, की चीनहून हवाई मार्गानं आणखी नव्या तुकड्या येत आहेत. सोळा तारखेच्या रात्री, लोकांची खात्रीच पटली, की चिनी आता राजवाड्यावर तोफा डागणारच आणि कुठलीही पूर्वसूचना न मिळता कोणत्याही क्षणी हे घडू शकतं. सारे लोक अतिशय घाबरले, पण ते मला एकटा टाकून पोतालापासून दूर गेले नाहीत. अधिकारावर असलेल्या प्रत्येकानं त्यांना शांत करायचा प्रयत्न केला; पण चिन्यांविरुद्धचा त्यांचा राग संयमाचे बांध फोडून गेला होता. जमावासाठी, माझ्या मंत्र्यांसाठी आणि माझ्या स्वत:साठीही ती रात्र फार उद्विग्नतेची होती आणि कुणाचाच डोळ्याला डोळा लागू शकला नाही.

सकाळ उजाडली. अजूनी अफवा उठत होत्या, पसरत गेल्या आणि उद्ध्वस्त होणं अजून अगदी जवळ येऊन ठेपलंय असं वाटत होतं. मला आणि माझ्या मंत्रिमंडळाला ही परिस्थिती पार हाताबाहेर गेली आहे, असं वाटू लागलं होतं. आम्ही एक सभा घेतली. सभेत एकच प्रश्न तर चर्चेला होता : राजवाड्याला उद्ध्वस्त होण्यापासून आणि त्याच्या भोवती जमलेल्या हजारो लोकांची कत्तल होण्यापासून कसं वाचवायचं, थांबवायचं? आम्ही जनरलला आणखी एक विनंती करायचं ठरवलं, की कृपा करून जमाव पांगवण्यासाठी बळाचा वापर केला जाऊ नये, तर लोकांचं मन वळवून त्यांना शांतपणे किल्ला सोडायला सांगायचा प्रयत्न मंत्रिमंडळाला करू देईपर्यंत तरी थांबावं. त्यानुसार या प्रयत्नासाठी मंत्रिमंडळानं घाईघाईनं ङ्वो याला पत्र लिहिलं. त्यांनी म्हटलं, की लोक वेड्यासारखं भावनेच्या ताणाखाली आहेत, पण अजूनही आशा करायला जागा होती, की शेवटी कसं का होईना त्यांना राजवाडा सोडून जायला तयार करता येऊ शकेल. त्यांनी हेही सुचवलं, की मला चिनी छावणीत नेण्यासाठी ङ्वो यानं मदत करावी. त्यांनी कटाक्षानं सांगितलं, की 'हे काम अत्यंत कठीण आहे कारण राजवाड्याभोवतालचा संपूर्ण भाग लोकांच्या ताब्यात होता, पण तरीही ते प्रयत्नांची शर्थ करतील.' त्यांनी पत्राबरोबर एक विशिष्ट संकेत पाठवला आणि पत्रोत्तर करताना ङ्वो याला तो वापरायला सांगितला. कार राजवाड्याभोवती जमावानं नेमलेले जे रक्षक होते, त्यांनी त्यांच्या हातात पडणाऱ्या प्रत्येक पत्राची तपासणी करायला सुरुवात केली होती. चिनी जनरलच्या मनात काहीतरी आपुलकी निर्माण करणं हा एकमेव हेतू त्या पत्रांमागे होता. वस्तुत: चिनी छावणीवर जाणं हे माझ्यासाठी फार फार अशक्य होतं. जर चिन्यांना माझ्या लोकांची कत्तल करण्यापासून थांबवता येणं शक्य झालं असतं तर त्यासाठी मी खरोखरच चिनी छावणीत जाऊन त्यांच्याकडे लोकांचे जीव वाचविण्यासाठी दयेची याचनाही केली असती, पण लोकांनी मला कधीच तसं करू दिलं नसतं.

तेवढं पत्र पाठवणंही किती अवघड होऊन बसलं होतं, पण लोकांनी नेमलेले रक्षक चांगलेच सतर्क होते आणि अधिकाऱ्यांना ते बिलकूल राजवाड्याबाहेर जाऊ देत नव्हते.

पण श-सुर या माझ्या मंत्र्याच्या सेवकांपैकी एकजण सटकण्यात यशस्वी ठरला. शहरात खरेदीसाठी चाललो आहोत अशी त्यानं बतावणी केली. ङ्वोपर्यंत पत्र पोहोचवणं त्यानं जमवलं आणि त्याचं उत्तर घेऊन तो परत आला. ते पत्र म्हणजे एक नम्र अशी पोचपावती होती. त्यानं म्हटलं होतं, की 'मला चिनी छावणीवर हलवावं हा जो मंत्रिमंडळाचा प्रस्ताव आहे त्याबद्दल मला आनंद वाटतो.' मागाहून सविस्तर पत्र पाठवायचं वचन त्यानं दिलं; पण ते उत्तर आलं तेव्हा सारं काही संपून गेलं.

त्यादिवशी दुपारी चारच्या सुमारास मी जेव्हा ङ्वोच्या उत्तराची मंत्र्याबरोबर चर्चा करत होतो, तेव्हा जवळच्या चिनी छावणीवरून दोन अवजड उखळी तोफांतून डागलेल्या गोळ्यांचे दणदणाटी आवाज ऐकू आले. उत्तरेकडच्या दरवाज्याबाहेरच्या दलदलीत हे गोळे आदळण्याचा आवाजही आमच्या कानावर आला.

या दोन मार्‍यांमुळे जमावाची त्रेधातिरपीट उडाली आणि संतापाचाही कळस गाठला गेला. तोफा का डागल्या गेल्या याचं कोणतंही स्पष्टीकरण मिळालं नाही; पण ज्यानं हे आवाज ऐकले त्यानं एवढाच विचार केला असता, की हल्ल्याला सुरुवात झाली आहे आणि राजवाडा हे त्याचं लक्ष्य आहे. राजवाड्यात प्रत्येकाला जाणवलं, की आता शेवट जवळ आला आहे आणि आणखी दिरंगाई न करता काहीतरी तातडीची पावलं उचलली पाहिजेत; पण काय करावं हे कोणालाच उमगेना.

मलाच त्याचं उत्तर शोधावं लागलं आणि निर्णय घ्यावा लागला. पण जगाच्या व्यवहारांबाबतचा माझा अननुभव लक्षात घेता ते सोपं नव्हतं. मला मृत्यूची भीती नव्हती. चिनी हल्ल्यातला एक बळी ठरण्याचीही मला भीती वाटत नव्हती. सध्याचं शरीर कुठल्याही भीतीशिवाय सोडून जायची शक्यता उभी राहत असेल तर त्याला तोंड देण्याची पुरेशी ताकद माझ्या धार्मिक प्रशिक्षणानं मला दिली आहे, यावर माझा प्रामाणिकपणे विश्वास आहे. जसं नेहमीच वाटतं तसंच मला त्यावेळीही जाणवलं, की मी तर फक्त मर्त्य जीव आहे आणि माझ्या गुरूचं अविनाशी चैतन्य ज्यातून काम करेल त्याचं मी फक्त एक साधन आहे; आणि या मर्त्य शरीराचा शेवट होणं म्हणजे काही कुठला भयंकर परिणाम नव्हे. पण माझे लोक आणि माझ्या सरकारातले अधिकारी माझ्या या भावना मात्र वाटून घेऊ शकणार नाहीत, हेही मला ठाऊक होतं. त्यांच्यासाठी 'दलाई लामा' ही व्यक्ती फार उत्कटपणे अनमोल होती. त्यांचा विश्वास होता, की दलाई लामा म्हणजे तिबेट आणि तिबेटी आयुष्याचं प्रतिनिधित्व! आणि इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा ही गोष्ट त्यांना फार प्रिया होती. त्यांना खात्री होती, की जर चिन्यांच्या हातून माझ्या शरीराचा नाश झाला तर तिबेटच्या जीवनचैतन्याचाच जणू शेवट झाल्यासारखं आहे.

जेव्हा मृत्यूची घंटा वाजवत चिनी तोफा धडाडल्या, तेव्हा राजवाड्यातल्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या आणि तिथं असलेल्या प्रचंड जमावातल्या प्रत्येक साध्या-नम्र सदस्याच्या मनात विचार चमकला, की माझं आयुष्य वाचलं पाहिजे आणि मी राजवाडा, शहर हे दोन्ही ताबडतोब सोडून गेलं पाहिजे. हा निर्णय म्हणजे काही लहान-सहान गोष्ट नव्हती; धोके खूप होते; सार्‍या तिबेटचं भविष्य त्याच्यावर अवलंबून होतं. सहीसलामत पळून जाणं तितकसं सहज शक्य नव्हतं. ङ्वो यानं त्यातल्या असुरक्षिततेबद्दल छातीठोकपणे सांगितलं होतंच. जर मी ल्हासातून निसटलोच तर मी कुठं जायचं? कुठं आश्रयाला पोहोचायचं? त्यापेक्षाही जास्त म्हणजे, जर मी गेल्यावर चिन्यांनी आमचं

पवित्र शहर उद्ध्वस्त केलं आणि आमच्या लोकांची कत्तल केली तर? की मी निघून गेल्याचं कळल्यावर लोक राजवाड्यापासून पांगतील आणि त्यामुळं तरी त्यांचा जीव वाचेल? ज्यांना उत्तरंच नाहीत अशा या प्रश्नांनी आम्ही चक्रावून गेलो. प्रत्येक गोष्टच अनिश्चित होती; फक्त एकच दबाव येत होता तो लोकांच्या चिंतेचा. त्यांना ही काळजी भेडसावत होती, की चिन्यांनी सारं उद्ध्वस्त करायच्या आणि सामूहिक कत्तलींना सुरुवात करायच्या आधी मी कसा निघून जाईन. माझा निर्णय होण्यात जगाकडून जे काही सकारात्मक शिकलो ते शहाणपण इथं होतं. जर मी थांबलो तर त्यामुळं माझे लोक आणि माझा घनिष्ठ मित्र यांच्या दुःखात भरच पडणार होती. मी जायचं ठरवलं. मी मार्गदर्शनासाठी प्रार्थना केली आणि मला ते मिळालं, हे सांगण्याची तितकीशी गरज नाही.

प्रवास कसा होईल किंवा तो कुठे संपेल हे आम्ही काहीच सांगू शकत नव्हतो; पण मला जवळच्या असणाऱ्या सर्वच माणसांना माझ्याबरोबर जायचं होतं : त्यात तिथं उपस्थित असलेले, माझ्या मंत्रिमंडळातले चार सदस्य, माझे शिक्षक, माझे व्यक्तिगत अधिकारी, माझे अंगरक्षक आणि अर्थातच माझ्या कुटुंबातील निकटवर्तीय हे सर्व होते. या कटकटींना सुरुवात झाली तेव्हाच माझी आई नोर्बुलिङ्गा इथं आली होती. तिच्याबरोबर माझा सर्वात छोटा भाऊ होता - जो दोन वर्षांचा असताना मृत्यू पावला आणि नंतर त्यानं पुनर्जन्म घेतला - तोच हा भाऊ. तिथं माझी मोठी बहीणही होती. माझ्या अंगरक्षकांचा जो सेनापती होता - कुसुङ् दे-पोन, त्याच्याशी तिचं लग्न झालेलं होतं. माझे दोन भाऊ अमेरिकेत होते आणि एक भाऊ भारतात होता. तसंच माझी एक बहीणही भारतात होती. ती दार्जिलिंगला शाळा चालवत होती.

अशा तऱ्हेनं एवढा मोठा गट बनला. आणि आम्हाला आणखीही कितीतरी जास्त लोकांची मदत लागणार होती. त्याचवेळी हे सर्व गुप्त राहायला हवं होतं - फक्त चिन्यांपासूनच नव्हे तर बाहेरच्या प्रचंड गर्दीपासूनही. शिवाय मी चाललो हे कळलं असतं तर मला संरक्षण पुरवण्यासाठी म्हणून त्यातले हजारो लोक माझ्या मागे आले असते. हा प्रचंड जथा चिन्यांनी निश्चितच पाहिला असता आणि एकाच फटक्यात त्यांनी साऱ्यांची कत्तल केली असली.

मी आणि माझ्या मंत्र्यांनी लोकांच्या नेत्यांशी चर्चा केली. त्यांनी ताबडतोब संमती दिली, की ज्या लोकांनी त्यांना निवडून दिलं त्या लोकांच्या ताकास तूर न लागता हे घडून आलं पाहिजे. त्यांनी आम्हाला उत्तम सहकार्य दिलं. मी त्यांच्यासाठीदेखील पत्र लिहिलं आणि दुसऱ्या दिवशी ते दिलं जावं अशी सक्त ताकीद देऊन ते पत्र नोर्बुलिङ्गा इथं ठेवलं. त्या पत्रातही मी त्यांना याचना केली होती, की त्यांच्यावर हल्ला झाल्याखेरीज त्यांनी दारूगोळा वापरू नये. मी जेव्हा आताच्या धोक्यातून आणि सध्याच्या बंधनातून दूर जाईन तेव्हा मी आणखी सविस्तर आदेश देईन, असं वचनही लोकांना दिलं होतं.

बिनागरजेची एकही वस्तू बरोबर घ्यायला आम्हाला वेळच नव्हता; पहाटेपूर्वी आम्हाला ल्हासापासून जास्तीत जास्त लांब जायचं होतं. मंत्र्यांनी कार्यालयाचा माझा शिक्का, मंत्रिमंडळाचा शिक्का आणि नोर्बुलिङ्गा इथं योगायोगानं होती तेवढी थोडकी कागदपत्रं; बरोबर घेतलं. बरीचशी कागदपत्रं मंत्रिमंडळाच्या कार्यालयात किंवा पोताला इथं होती. त्यांच्यावर पाणीच सोडावं लागलं. तसंच आमच्या व्यक्तिगत

वस्तूंबद्दलही झालं. फार फार तर मला काय घेता आलं तर 'लामा'च्या कपड्यांचे एखाद्-दुसरे संच. कुठल्याही निधीसाठी ना आम्हाला खजिन्याकडे जाता आलं ना पोताला इथं ठेवलेल्या अगणित प्रमाणातल्या रत्नांच्या आणि खजिन्यासाठी जाता आलं. ही संपत्ती मला वंशपरंपरेनं मिळालेली होती.

आम्ही लहान-लहान गटांमध्ये बाहेर पडायचं ठरवलं. नदी पार करून जाणं ही पहिली गरज होती. उत्तरेकडच्या किनाऱ्यावर नोर्बुलिङ्गा आणि चिनी छावणी हे दोन्ही जवळ होतं. फक्त दक्षिणेकडच्या बाजूनं आम्हाला निसटायला संधी होती.

एका मठाचा कारभारी आमच्याबरोबर होता आणि त्याला नदी पार करून पलीकडच्या बाजूस घोड्यांची आणि मदतनीस सोबत्यांची व्यवस्था करायला पाठवलं गेलं. दोर्जे डमदुल हा तिबेटी लष्कराच्या दुसऱ्या तुकडीचा सेनापती, शंभर एक सैनिक बरोबर घेऊन नोर्बुलिङ्गाच्या आग्नेय बाजूच्या नाक्यावर पहारा द्यायला गेला. त्या ठिकाणी नदी अरुंद आणि त्यामानानं ओलांडायला सोपी होती. ही सगळीजण जेमतेम अर्धा मैल गेली असतील तेव्हा अचानक त्यांना गस्त घालणारे चिनी दिसले, ते त्याच बाजूला येत आहेतसे वाटले. त्यांनी त्यांची ब्रेन गन तयार ठेवली आणि पाच फैरी झाडल्या. ही कृती झपाट्यानं केली गेली आणि त्यामुळे वेळ मारून नेता आली. चिन्यांना ठाऊक होतं, की नदीजवळ सशस्त्र खांपा होते; पण अंधारात हा तिबेटी लोकांचा गट किती मोठा आणि कसा आहे, ते मात्र त्यांना दिसेना. त्यामुळे सुरक्षिततेसाठी ते जवळच असलेल्या त्यांच्या छावणीत परतले.

जेव्हा सारी तयारी झाली तेव्हा मी महाकालाच्या मंदिरात गेलो. मी जेव्हा जेव्हा लांबच्या प्रवासाला निघायचो तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी निरोप घेण्यासाठी म्हणून त्या मंदिरात जायचो. तिथं अजून भिक्षू होते, त्यांच्या सतत प्रार्थना चालू होत्या, आणि काय घडणार आहे याची त्यांना कल्पना नव्हती. पण निरोप घेण्याचं प्रतीक म्हणून मी स्कार्फ अर्पण केला. मला ठाऊक होतं, मी असं का केलं याचं त्यांना आश्चर्य वाटलं असेल; पण मला हेही ठाऊक होतं, की ते त्यांना वाटलेलं आश्चर्य अजिबात व्यक्त करणार नाहीत.

मी मंदिराच्या बाहेर आलो तसं माझे ज्येष्ठ कारभारी, प्रमुख अधिकारी, मठाधिपती आणि कुसुङ् दे-पोन हे मला भेटले. कारभारी आणि मठाधिपती यांनी आधीच सर्वसाधारण माणसांसारखे कपडे घातले होते. ते जेव्हा बऱ्याच दिवसांसाठी बाहेरगावी जायचे तेव्हा ते असेच कपडे घालायचे, पण मी मात्र त्यांना अशा कपड्यांमध्ये पूर्वी कधी पाहिलं नव्हतं. आतल्या भिंतीच्या दाराशी दहा वाजता भेटायचं असं आम्ही ठरवलं होतं. आम्ही आमची घड्याळ एकसारखी लावून घेतली. नंतर मी इतर अनेक मंदिरांमध्ये गेलो, आशीर्वाद दिले आणि मग माझ्या खोल्यांमध्ये परत आलो; तिथं मी एकटाच वाट पाहत थांबलो.

जेव्हा मी वेळ होईपर्यंत वाट पाहत होतो, तेव्हा मला ठाऊक होतं, की माझी आई, बहीण आणि माझा छोटा भाऊ बाहेर पडले असतील : त्यांनी आधी जायचं हे आम्ही ठरवलं होतं. इतर कोणाहीपेक्षा राजवाड्यातून बाहेर पडणं त्यांच्यासाठी जास्त सोपं होतं, कारण ते राजवाड्याच्या आतल्या पिवळ्या भिंतीबाहेर राहत होते. माझ्या आईनं आणि बहिणीनं पुरुषांसारखा वेश घेतला होता. नंतर मी, मंत्रिमंडळातले अधिकारी, माझे शिक्षक एवढे जण बाहेर पडणार होतो. उरलेल्यांपैकी काही जण तिसऱ्या आणि शेवटच्या

गटांमध्ये बाहेर पडणार होते.

माझ्यासाठी सैनिकाचे कपडे आणि फरची टोपी ठेवण्यात आली होती. साधारण साडेनऊच्या सुमारास मी माझे भिक्षूचे कपडे उतरवले आणि दुसरे घातले आणि त्या अनोळखी अशा कपड्यांमध्येच मी शेवटचं म्हणून, माझ्या प्रार्थनेच्या खोलीत गेलो. मी माझ्या नेहमीच्या सिंहासनावर बसलो आणि तिथं समोर असलेलं भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचं पुस्तक उघडलं. मी ते माझ्यापुरतं वाचत गेलो. भगवान बुद्धानं आपल्या शिष्याला 'चांगलं धैर्य बाळग' असं जिथं सांगितलं होतं, त्या परिच्छेदाशी येईपर्यंत मी वाचलं. मग मी पुस्तक बंद केलं आणि दिवे बंद केले. मी जसा बाहेर पडलो, तशा माझ्या मनातल्या सर्व भावना जणू विरून गेल्या होत्या. त्या मातीच्या जमिनीवरचा माझ्या पावलांचा आवाज, सार्‍या नीरवतेत ऐकू येणारी घड्याळाची टिकटिक यांची जाणीव होत होती.

माझ्या घराच्या आतल्या दाराशी एकच सैनिक माझी वाट पाहत थांबला होता आणि दुसरा बाहेरच्या दरवाज्याशी होता. मी त्यातल्या एकाकडून बंदूक घेतली आणि माझा एकंदर वेश परिपूर्ण व्हावा यासाठी माझ्या खांद्यावर ती अडकवली. सैनिक माझ्यामागे आले. मी अंधार पसरलेल्या बागेतून खाली येऊ लागलो. या बागेतच तर माझ्या आयुष्यातल्या सर्वात जास्त आनंदी आठवणी सामावलेल्या होत्या.

बागेच्या दरवाज्याजवळच्या आणि आतल्या भिंतीच्या दाराजवळच्या पहारेकर्‍यांनी दूर विखरून जावं असा कुसुङ् दे-पोन यानं आदेश दिला होता. तो मला पहिल्या दाराशी भेटला आणि दुसर्‍या दाराशी माझे दुसरे दोन साथीदार भेटले. महाकालाच्या मंदिराजवळच्या पवित्र ग्रंथालयावरून आम्ही जाऊ लागलो; तेव्हा डोक्यावरच्या टोप्या काढून आम्ही आमचा आदर व्यक्त करीत उद्यानातून एकत्रच बाहेर पडलो. बाहेरच्या भिंतीच्या दाराकडे जाताना मठाधिपती, कारभारी आणि अंगरक्षकांचा सेनापती पुढं होते आणि मी तसंच दुसरे दोन सैनिक त्यांच्यामागे होतो. मी माझा चष्मा काढला, म्हणजे लोकांना चष्म्याशिवाय माझा चेहरा ओळखता आला असताच असं नाही.

दरवाजा बंद होता. माझा कारभारी पुढं झाला आणि त्यानं पहारेकर्‍यांना सांगितलं की तो जरा पाहणी, देखरेख करण्याच्या दौर्‍यावर निघालेला आहे. त्यांनी त्याला नमस्कार केला आणि भलंमोठं कुलूप काढलं.

माझ्या आयुष्यात पूर्वी फक्त एकदाच, नऊ वर्षांपूर्वी मला यतुंगला नेलं होतं, तेव्हाच फक्त नोर्बुलिङ्गाच्या दाराबाहेर मी कुठल्याही थाटामाटाशिवाय, मिरवणुकीशिवाय गेलो होतो. जेव्हा आम्ही तिथं पोहोचलो, तेव्हा मला अंधुकपणे रात्रीच्या अंधारात माझ्या गटातले लोक अजून निरखून पाहत आहेत असं मला दिसलं. पण त्यांच्यापैकी कुणीही एका 'साध्याशा सैनिकाची' दखल घेतली नाही किंवा तो फारसा कुणाच्या लक्षातच आला नाही. आणि अशाप्रकारे पलीकडे असलेल्या अंधार्‍या रस्त्याकडे कुठलीही अडवणूक न होता मी चालत गेलो.

सुटका

नदीकडे खालच्या बाजूस जाताना वाटेत आम्हाला लोकांचा एक मोठा जमाव भेटला. माझा कारभारी त्यांच्या नेत्यांशी बोलायला थांबला. मी त्या रात्री बाहेर पडणार आहे, ही गोष्ट नेत्यांपैकी काही जणांना सूचित करून ठेवलेली होती; पण अर्थात, सर्वसाधारण गर्दीला काही त्याची कल्पना नव्हती. ते बोलत होते तोवर मी थांबलो आणि वाट पाहत राहिलो. एखाद्या सैनिकासारखं दिसण्याचा मी प्रयत्न करत होतो. तेव्हा काही गडद काळोख नव्हता, पण मला माझ्या चष्म्याशिवाय नीट दिसत नव्हतं. लोक माझ्याकडे उत्कुकतेनं पाहत होते की नव्हते, हे पण यामुळं मला सांगता आलं नाही. त्यांचं संभाषण संपलं तेव्हा मला बरं वाटलं.

नदी ओलांडायच्या ठिकाणावरून आम्ही नदीच्या किनाऱ्याशी आलो. तिथून खाली चालत जावं लागणार होतं. पांढऱ्या वाळूच्या किनाऱ्यावर झुडपांचे काळसर दाट पुंजके होते. मठाधिपती हा धिप्पाड माणूस होता. त्यानं एक भलीमोठी तलवार बाळगली होती. त्याचा वापर करण्याचीही त्याची तयारी होती याची मला खात्री आहे. किमान प्रत्येक झुडपाशी गेल्यावर तो सावधगिरी घेत होता, पण त्या आड कुठेही शत्रू नव्हता.

छोट्या होडक्यांमधून आम्ही नदी पार केली. पलीकडच्या किनाऱ्यावर आम्हाला माझे कुटुंबीय भेटले. माझे मंत्री आणि शिक्षक हे नोर्बुलिङ्गामधून एका ट्रकमधून ताडपत्रीखाली लपून बाहेर पडले. तेही आम्हाला तिथं येऊन मिळाले. जवळजवळ तीस सैनिक आमची वाट पाहत होते. त्यांच्याबरोबर त्यांचे तीन नेते होते : कुनगा समतेन, तेनपा दरग्ये आणि जेमतेम विशीतला एक अतिशय धाडसी मुलगा वङ्छुग छेरिङ्. लोसङ् येशे नावाचा आणखी एक मुलगा तिथं होता. ज्या मुलांना पेकिंगमध्ये शाळेसाठी नेण्यात आलं होतं, त्या मुलांपैकी तो एक होता. पाच वर्ष तो तिथं होता, पण चिनी सिद्धांताना आपलंसं करण्याला त्यानं कायम ठाम विरोधच दाखवला होता. या भेटीनंतर दोनच दिवसांनी लढता लढता तो मृत्यूमुखी पडला.

आम्ही तिथल्या नेत्यांबरोबर स्कार्फची देवाणघेवाण केली. त्या प्रसंगी जे जे जेवढं म्हणून करणं शक्य होतं ते ते सारं जुळवून ठेवलं होतं. मठाचा जो एक कारभारी पुढं गेला होता त्यानं आम्हा सगळ्यांसाठी तट्टं मिळवून ठेवली होती. त्याला चांगली खोगीरं तेवढी मिळवता आली नव्हती. दबत्या आवाजात एकमेकांना शुभेच्छा देऊन आम्ही तट्टांवर चढलो आणि वेळ अजिबात न घालवता निघालो. पहिले काही मैल कापणं सर्वात जास्त धोकादायक होतं.



घोड्यावर स्वार असलेले दलाई लामा.

तिथं रस्ता असा नव्हताच. नदीच्या वरच्या बाजूनं टेकडीच्या कडेकडेनं जाणारी खडकाळ पायवाट होती. उजव्या हाताला चिनी छावणीतले दिवे आम्हाला दिसत होते. आम्ही ओळीनं चाललो होतो; आणि खालच्या बाजूला असलेल्या नदीच्या अंधाऱ्या किनाऱ्यांवर त्यांची कुठे, कशी गस्त असेल सांगता येत नव्हतं. आम्ही बेटाजवळून गेलो. तिथं खाणीतून दगड नेण्यासाठी चिनी लोक ट्रकमधून सतत ये-जा करायचे - हे काम अगदी रात्रीसुद्धा चालायचं. त्यापैकी एक जरी ट्रक तेव्हा आला असता तरी त्याच्या दिव्यांमध्ये आम्ही पकडले गेले असतो. ज्यावरून आम्ही चाललो होतो तो रस्ता फारसा दिसत नव्हता. घोड्यांच्या नालांचा दगडावर आपटून होणारा आवाजही केवढा मोठा वाटत होता. गस्त घालणाऱ्यांना तो आवाज ऐकू जाईल अशी धास्ती वाटत होती, पण काही झालं तरी आम्हांला झपझप जाणं गरजेचं होतं. मी एकदा रस्ता चुकलो. माझं तट्टू पुन्हा वळवून मला मागे जावं लागलं. नंतर आम्हांला आमच्या मागच्या बाजूला विजेऱ्यांची लुकलुक दिसली. क्षणभर वाटलं, की चिनी आमच्या मागावर आले; पण ते तिबेटी सैनिक होते. आमच्या गटातले काहीजण भलत्या मार्गाने गेले तर काही चुकले होते, त्यांना ते मार्गदर्शन करत होते.

पण आम्ही ती जागा यशस्वीपणे ओलांडून गेलो. खालच्या धारेनं जाणाऱ्या तीन मैल अंतरावरच्या नदीकिनाऱ्यावर आम्ही सारे पुन्हा भेटलो. त्या जागी खाली नदी खूप उथळ होती. त्यातून ट्रकसुद्धा सहजी घालता येण्यासारखे होते. जर चिनी सावध झाले असते तर त्यांनी दुसऱ्या किनाऱ्यावर वाहनानं जाऊन तिथंच आम्हांला कापलं असतं. त्यामुळं पिछाडीचं सैन्य म्हणून एक अधिकारी आणि थोडे सैनिक यांना तिथं थांबवण्यात आलं. उरलेले आम्ही सर्वजण संथपणे पुढं गेलो. शहरापासून दूर, शांत, मोकळ्या खेड्यापाड्यात आलो.

बराच वेळ आम्हांला जिवंतपणाचं काही चिन्ह दिसलंच नाही; पण पहाटे तीनच्या सुमारास एक कुत्रा भुंकला आणि आम्हांला पुढे एक घर दिसलं. आम्ही कुठे आहोत याचा

ठावठिकाणा शोधण्यासाठी मी माझ्या कारभाऱ्याला पुढे पाठवलं. ते घर कोणाचं आहे, हेही विचारायला सांगितलं. त्या जागेचं नाव होतं नमग्यल-गङ्. त्या घराचा मालक अगदी साधासा, दयाळू माणूस होता. आमच्यापैकी दोन साथीदार त्याला सूचना देण्यासाठी अगोदरच पुढे गेले होते. त्याला त्यांनी एक अतिशय महत्त्वाची व्यक्ती पाहुणे म्हणून त्याच्याकडे येत आहे असं सांगितलं. तोपर्यंत मी फार दमलो होतो, त्यामुळं मी तिथं थोडावेळ विश्रांती घेतली. मी पुढं ज्या ज्या घरांमध्ये आसरा घेतला त्यांच्यापैकी हा पहिला साधासा नम्र असा तिबेटी होता. त्यांच्याकडे धोक्याचा कुठलाही विचार करायची गरज नव्हती. 'मी कोण आहे' हे त्यातल्या काही जणांना ठाऊक होतं, तर काही जणांना ठाऊक नव्हतं.

तिथं वङ्छुग छेरिङ् हा कौतुकास्पद असा वीस वर्षांचा तरुण खांपा नेता आम्हाला सोडून गेला. नदीपलीकडून हल्ला झालाच तर आमचं संरक्षण करता यावं म्हणून त्याची 400 माणसं आणायला तो गेला. त्यानं आधीच दोनशे ते तीनशे इतर खांपांना पूर्वसूचना देऊन आमच्या मार्गावर संरक्षण पुरवायला सांगितलं होतं.

जेव्हा मी नोर्बुलिङ्गा सोडलं आणि जेव्हा प्रवासाचा हा अत्यंत दगदगीचा टप्पा पार करत होतो तेव्हा थेट भारतात जावं याबद्दल मी विचारही करत नव्हतो. मला अजूनही आशा होती, की मला तिबेटमध्येच कुठेतरी राहता येईल. कुठल्याही परिस्थितीत भारतात जाणाऱ्या नेहमीच्या मार्गांचा विचार करणंच शक्य नव्हतं. ल्हासाच्या नैऋत्येकडून ते रस्ते जात होते. अर्थात, त्यांवर चिन्यांचा सख्त पहारा होता. त्याऐवजी आम्ही दक्षिणेकडे आणि ल्हासाच्या आग्नेय दिशेकडे चाललो होतो. त्या दिशेला अजिबात रस्ता नाही असा प्रचंड पसरलेला डोंगराळ भाग होता. कितीही शक्ती वापरली तरी चिनी लष्कराला या भागात घुसणं फार कठीण होतं. या भागाची दुर्गमता हीच योद्ध्यांची मुख्य ताकद होती. इथल्या अवघडपणाचा इतर तिबेटी लोकांना गनिमी योद्धे म्हणून त्यांच्याबरोबर काम करताना फायदा होता. या डोंगरांमधून, हिमालयाच्या मुख्य डोंगररांगाच्या कडेनं भूतान राज्य आणि भारताच्या सरहद्दींकडे रस्ते खाली जात होते. तिबेटी आणि भूतानच्या व्यापाऱ्यांनी शेकडो वर्ष या रस्त्यांचा वापर केला होता. त्यामुळं अगदी एखादी वाईटातली वाईट परिस्थिती जरी आमच्यावर कोसळली तरी आम्हाला मागे सरकायला वाव राहणार होता.

पण भविष्यात 'अभयस्थान' म्हणून ठरू शकणाऱ्या डोंगरांमधल्या या जागेकडे पोहोचण्याआधी आम्हांला विस्तीर्ण अशी ब्रह्मपुत्रा नदी पार करायची होती. ब्रह्मपुत्रेला तिबेटमध्ये चङ्-पो असं म्हटलं जातं. नदीपर्यंत पोहोचण्याआधी आम्हाला एका उंच डोंगरातली खिंड ओलांडायची होती. त्या खिंडीचं नाव होतं छे-ला. चिन्यांना जर कळलं असतं मी निसटलो आहे, तर त्यांनी चङ्-पो जवळ गस्त घातली असती. हा मोठा धोका होता, म्हणून आम्ही नदी ओलांडायची जेवढं शक्य होतं तेवढी घाई केली.

सकाळी आठच्या सुमारास आम्ही छे-ला या खिंडीच्या पायथ्याशी पोहोचलो. तिथं चहा घ्यायला थोडं थांबलो. शिखरांवर सूर्य नुकताचा डोकावायला लागला होता आणि आमच्या मागचं पठार सोनसळी प्रकाशानं उजळून टाकत होता. आम्ही अजूनी डोंगरांच्या सावलीत होतो तेव्हाच आम्ही खिंडीकडे जाणारा लांब अंतराचा, चिंचोळा, उभा चढ चढायला सुरुवात केली. रस्ता अगदी खराब आणि भीतीदायक होता आणि त्यानं आम्ही बर्फाच्या रांगेच्या अगदी वर आलो. काही तट्टं आणि खेचरं मागे पडू

लागली. पण टाशी नोर्बु नावाच्या वृद्ध माणसानं आमचं मनोधैर्य वाढवलं. तो चढण चढताना आमच्यात येऊन सामील झाला आणि त्यानं मला एक डौलदार पांढराशुभ्र घोडा दिला. मी कृतज्ञतेनं तो स्वीकारला आणि आमच्या गटारातल्या सार्‍यांनाच आनंद झाला. कारण अशा भेटींना तिबेटी लोक अनुकूल, शुभ मानतात.

छे-ला म्हणजे 'वालुकामय खिंड'. शिखराच्या पलीकडे आम्हाला वाळूचे खोल उतार दिसले. असं वाटलं, की तट्टं मागे वळणावळणाच्या रस्त्यानं ठेवून आपण खाली पळत पळत जाऊ शकतो; पण तरीही ही खिंड पार करायला आम्हांला तीन ते चार तास लागले. शेवटी एकदा आम्ही चड्-पोच्या दरीत तळाला पोहोचलो तेव्हा अचानक वाळूचं एक जोरदार वादळ उठलं. त्यानं आम्हाला अक्षरश: आंधळं करून टाकलं. पण त्यात एक समाधान असं होतं, की जर या दरीत चिनी सैनिक गस्त घालत असतील तर त्यांनाही या वादळानं आंधळं करून सोडलं असेल.

खिंडीच्या पायथ्याशी माणसांची वस्ती नव्हती. पण आम्हाला ठाऊक होतं, की पूर्वेकडे दहाएक मैलांवर- खालच्या धारेला- एक तर होती. या तरीतून पलीकडे जाणं हा एकमेव मार्ग होता. त्यामुळे चिनी तिथं पोहोचण्याआधी ती तर गाठणं आम्हाला गरजेचं होतं. पण सारं काही व्यवस्थित झालं. तरीतून नदी पार केल्यावर पलीकडच्या किनार्‍यावर क्यि शोङ् नावाचं लहानसं खेडं होतं. त्या गावाच्या नावाचा अर्थ होता 'आनंदी दरी'. पलीकडच्या किनार्‍यावर तर पोहोचली तेव्हा आमचं स्वागत करण्यासाठी जमलेली मोठी गर्दी आम्हाला दिसली. आम्ही जेव्हा जवळ पोहोचलो तेव्हा त्यांच्यातले खांपा सैनिक आणि खेड्यातील जमीनदार, मिरासदार आम्हाला ओळखू आले. या मिरासदारांनी हातांवर पांढरे आणि पिवळे बिल्ले लावलेले होते. हे लोक 'स्वयंसेवी लष्करा'चे होते आणि ते खांपांना जाऊन मिळालेले होते. आम्ही जेव्हा तरीतून उतरलो तेव्हा ल्हासात घडणार्‍या घटना कानावर आल्यानं ते खोलवर घायाळ, दु:खी झाले आहेत असं आढळून आलं. आणि जेव्हा मी पुन्हा घोड्यावर बसलो तेव्हा त्यातले अनेक जण रडत आहेत असं मी पाहिलं. क्यि शोङ् हे आमच्या प्रवासात आम्ही पार केलेलं पहिलं गाव. ह्या घटनेमुळं आणि त्यातही या गावाच्या नावामुळं, आम्ही जसे पुढे गेलो तेव्हा मला वाईट वाटलं. माझ्या मनात विचार आला, इथं तिबेटचे लोक त्यांच्या या 'आनंदी दरीत' शतकानुशतके नितांत शांतता आणि सलोख्यात राहिले; पण आता एक उग्र भीती त्यांच्यापुढं उभी ठाकली आहे आणि ते सारं आयुष्यभर ज्याच्यासाठी जगले त्यालाच धक्का देते आहे. तरीसुद्धा त्यांचं मनोबल मोठं होतं आणि हिंमत अजिंक्य होती. मला ठाऊक होतं, की मी त्यांची मदत मागितली असती किंवा नसती तरी त्यांनी जीवावर उदार होऊन माझं संरक्षण केलं असतं.

नदी आणि ही मजबूत माणसं आमच्या पाठीशी होती; त्या क्षणी तरी आम्ही पाठलागापासून थोडं सुटलो होतो. आम्ही पुढं र-मे नावाच्या मठाकडे निघालो. तिथं आम्ही रात्रीचा मुक्काम करायचा ठरवला होता. तिथं दुपारी साडेचारच्या सुमारास आम्ही पोहोचलो. कुठेही आम्ही अगदी थोडावेळ विश्रांतीसाठी टप्पे घेत आम्ही जवळजवळ अठरा तास वेगानं घोडेस्वारी करत आलो होतो. आता आम्ही नि आमची तट्टं थोडंदेखील पुढं जाऊ शकत नव्हतो. आम्ही विश्रांती घेत होतो, तेव्हा आमच्या मागं राहिलेल्या गटाबद्दल अधिकाधिक काळजी वाटू लागली; पण अखेरीस रात्री नऊच्या सुमारास उरलेले सारेजण पोहोचले.

माझ्या मंत्र्यांनी त्या रात्री दोन पत्रं लिहिली; एक होतं ङ्वो याला आणि दुसरं होतं समडुब फोड्रङ् याला. हे दोघं मंत्री ल्हासात मागे राहिलेले होते. तिबेटला शक्य तेवढी मदत त्यांनी करावी आणि त्या सर्वांकडे देशाच्या स्वातंत्र्यासाठीच्या सारख्याच आशा आहेत, असं आवाहन आणि विश्वास त्या पत्रांमध्ये व्यक्त केला होता.

एव्हाना आमचा गट शंभरपर्यंत वाढला होता. तसंच आमच्या सोबतीला 350 तिबेटी सैनिक आणि कमीतकमी पन्नास गनिमी योद्धे होते. र-मे पासून नैऋत्य दिशेकडे शंभर माणसांची एक तुकडी पाठवण्यात आली. भारताकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांच्या दिशेनं जर चिनी सैनिक आलेच तर आम्हांला संरक्षण देता यावं म्हणून हे लोक गेले होते. पुढचे पाच दिवस, बाकीचे सारे जण, डोंगरांच्या अगदी आतल्या रस्त्यांनी आमच्या वर घोडेस्वारी करत आले. हे चिंचोळे खडकाळ रस्ते अगदी खास करून जुन्या तिबेटी वळणाचे होते. दिवसा आम्ही अनेक गटात विगागले जात असू; आणि रोज रात्री आम्ही एखाद्या खेड्यात किंवा मठात थांबायचो. कधी कधी आमच्याबरोबर गनिमी सैनिकांचे नेते नसायचे. ते यायचे आणि जायचे. डोंगराळ भागात वस्ती करून राहणाऱ्या विखुरलेल्या मंडळींच्या ते संपर्कात असायचे. आम्हाला खात्री होती, की आमच्या भोवताली अतिशय विश्वासू, निग्रही माणसं आहेत, मग भलेही आम्ही त्यांना कधीही पाहिलेलं का नसेना. त्यांच्यापैकी साऱ्यांनाच काही कल्पना नव्हती, की ते नक्की कुणाचं संरक्षण करत आहेत. पहिली रात्र र-मे इथं मुक्काम केल्यानंतर, आम्ही एका मोठ्या खेड्यात थांबलो. या खेड्याचं नाव होतं डोफु छोखोर. इथं अजूनही गनिमी योद्धे चिनी आक्रमकांशी अटीतटीनं झुंज देत आहेत. अख्खं खेडं आमच्या स्वागतासाठी जमलं. पण मी घातलेल्या अनोळखी कपड्यांमुळं त्यांनी काय किंवा आसपासच्या मठांमधल्या भिक्षूंनीही मला ओळखलं नाही.

बर्फाळ पर्वत पार करताना दलाई लामा.

पाच दिवसांच्या या वाटचालीत आमच्या योजना आकार घेत होत्या. त्यानुसार आम्ही छेन-ये या ठिकाणी एक दिवस थांबायचं ठरवलं. त्यामुळं आम्हांला भविष्याबद्दल सविस्तर चर्चा करता आली असती. तसंच ल्हासातल्या अधिकाऱ्यांना आणि इतर गनिमी सैनिकांना काही सूचना पाठवता आल्या असत्या. ल्हुङचे ज़ोङ् या जागेपर्यंत पोहोचेपर्यंत कूच करत राहवं असा आमचा विचार होता. सरहद्दीपासून ही जागा फार दूर नव्हती. त्या भागातला सर्वात मोठा किल्ला तिथं होता आणि तिथून उरलेल्या दक्षिण तिबेटबरोबर उत्तम संपर्कव्यवस्था होती. आम्ही असा विचार केला, की मी तिथं राहावं आणि चिन्यांबरोबर शांततापूर्ण वाटाघाटी पुन्हा चालू करता येतील का यासाठी प्रयत्न करावा. आम्हाला एवढी तरी आशा होती, की मी अजूनी तिबेटमध्येच राहिलेलो आहे, हे कळल्यावर तरी चिन्यांना वाटाघाटी-बोलाचाली करण्यात फायदा वाटेल आणि कदाचित अजूनही ल्हासावर बॉंबचा हल्ला होणं थांबू शकेल.

आम्ही सुरक्षितपणे छेन-ये इथं पोहोचलो. एक-दोन दिवसांपूर्वी मी माझ्या धाकट्या भावाला माझ्या गटात ठेवून घेतलं होतं. तो बरोबर नसला तर माझ्या आईला आणि बहिणीला झपाझपा प्रवास करता येईल असा विचार होता आणि खरंच तसंच घडलं. आम्हा सगळ्यांना मागे टाकून त्या बऱ्याच पुढं पोहोचल्या. त्यांच्याबरोबर सोबतीला थोडे खांपा होते. पुढचे अनेक दिवस, आमच्या प्रवासाचा बराच पुढचा टप्पा गाठेपर्यंत

आमची त्यांच्याशी भेट झाली नाही. तुलनेनं त्या सुरक्षित आहेत हे कळल्यामुळं माझ्या मनावरचं मोठं ओझं कमी झालं. आमच्या बरोबर एक बॅटरीवर काम करणारा रेडिओ ग्राहक होता. त्यामुळं जेवढी शक्य होतील तेवढी सर्व बातमीपत्रं आम्ही ऐकत होतो. ल्हासाबद्दल काहीतरी बातमी कळेल अशी आशा होती. मला वाटतं, की छेन-ये मध्ये असताना पहिल्यांदा आम्ही ल्हासाचा उल्लेख ऐकला. ती बातमी 'व्हॉईस ऑफ अमेरिका'नं दिली होती; पण त्यात फक्त शहरात अशांतता आहे आणि माझा ठावठिकाणा कळलेला नाही एवढंच म्हटलं गेलं.

दलाई लामा त्यांच्या लहान भावाबरोबर (तेनजिन छोग्याल).

छेन-ये इथल्या छोटया मठात आम्ही रात्री राहिलो. पण प्रत्येकानं आम्हाला सल्ला दिला, की आम्ही अजून एक पल्ला पुढे छोङ्ग्ये रेडदेछेन नावाच्या मठात जावं. अजूनी इथं थांबू नये, कारण ती दुसरी जागा मोठी होती आणि सर्व गनिमी नेत्यांशी संपर्क साधणं तिथून जास्त सोपं गेलं असतं. म्हणून आम्ही पुन्हा पुढच्या आठ तासांच्या स्वारीवर निघालो; पण आम्ही तिथं पोहोचण्याआधीच आमच्या योजना बारगळतील की काय असं वाटू लागलं. कारण ल्हासात काय घडत आहे याच्या थेट बातम्या आमच्यापर्यंत येऊन धकडू लागल्या.

छेन-ये सोडल्यानंतर थोडयाचे वेळात घोडेस्वारांचा एक गट आमच्याकडे येताना आम्ही पाहिला. ते जवळ आले तसं आम्ही त्यातल्या छे-पोन नमसे-लिङ् याला ओळखलं. सात महिन्यांपूर्वी 'सशस्त्र प्रतिकार थांबवावा' यासाठी खांपांचं मन वळवावं म्हणून मंत्रिमंडळानं जे अधिकारी पाठवले होते, त्यांच्यापैकी हा एक होता. तेव्हा तो खांपांना जाऊन मिळाला आणि ल्हासात नंतर कधीच परत आला नाही. आम्ही थांबलो आणि त्याच्याबरोबर बराच वेळ बोललो. त्यानं चिनी तुकडयांच्या रचनेबद्दल आणि खांपांच्या त्यांच्याशी उडालेल्या चकमकींबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यानं भावना उद्ध्वस्त करणारी एक बातमी आणली होती - 'ल्हासावर अगोदरच बॉंबचा वर्षाव झाला आहे.'

मी याबद्दल तसं अप्रत्यक्षपणे ऐकलं होतं; पण नंतर लवकरच मला माझ्या स्वीय

सचिवाचं - खेनछुङ् तारा याचं पत्र आलं. मी त्याला ल्हासात शेवटचं भेटलो होतो, पण हे पत्र लिहिलं गेलं होतं र-मेच्या मठातून. ल्हासावर हल्ल्याला सुरुवात होईपर्यंत त्यानं ल्हासा सोडलं नव्हतं. तो जखमी झाला तेव्हा तो अजूनी नोर्बुलिङ्गाच्या आतल्या बाजूलाच होता आणि त्याला बाँबगोळ्याच्या एका कपचीचा मार बसला. त्याच्याकडून आणि इतर साक्षीदारांकडून पुढच्या काही दिवसांमध्ये जी माहिती मिळाली, त्यावरून आम्हांला सगळ्या भयानक संकटाची कल्पना आली. हे टाळण्यासाठी तर मी जीव तोडून प्रयत्न केला होता.

20 मार्चच्या पहाटे दोनच्या सुमारास बाँबगोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. तेव्हा मी बाहेर पडून अठ्ठेचाळीस तासच उलटले होते. मी गेलो आहे हा त्यांना शोधही लागला नव्हता. तो पूर्ण दिवस त्यांनी नोर्बुलिङ्गावर हल्ला केला. मग त्यांनी त्यांची शस्त्रसामग्री शहर पोताला, मंदिर आणि जवळपासचे मठ यांच्याकडे वळवली. ल्हासात किती लोक ठार झाले, कोणाला काही माहिती नाही; परंतु नोर्बुलिङ्गाच्या आत आणि बाहेरच्या बाजूला हजारो प्रेतं दिसत होती. नोर्बुलिङ्गातील काही मुख्य इमारती पार उद्ध्वस्त झाल्या होत्या आणि बाकी इतर सर्व इमारतींचं काही ना काही नुकसान, पडझड झाली होती. फक्त यातून चमत्कार वाटावा अशा पद्धतीनं महाकालाचं मंदिर बचावलं होतं. शहरामध्ये घरं कोसळली होती किंवा घरांना आग लागली होती. मुख्य मंदिराच्या सोनेरी छताला भोकांची चाळणी पडली होती आणि त्याच्या आसपासच्या इतर देवळांचा विध्वंस झाला होता. पोतालामधल्या पश्चिम बाजूला गंभीररित्या मोडतोड झाली होती. मी ज्या खोल्या वापरत होतो, त्यातल्या काही खोल्या नष्ट झाल्या होत्या. तीच परिस्थिती सरकारी शाळा, मुख्य दार, लष्कराचं मुख्य ठाणं आणि या खेड्यातल्या इतर घरांची झाली होती. तेराव्या दलाई लामाच्या स्मरणार्थ असलेलं सोनेरी समाधीस्थळ ज्या खोलीत होतं, त्या खोलीवर एका गोळा येऊन आदळला होता. तिबेटी वैद्यक महाविद्यालयांपैकी एक - चकपो-रि हे ठिकाण जमिनीवरून पार पुसलं, उखडलं गेलं होतं. तेसरा या मोठ्या मठात सुद्धा याचप्रकारे अतिशय निरर्थक असं अपरिमित नुकसान जागोजागी झालं होतं.

पहिल्या दिवसाच्या अखेरीस नोर्बुलिङ्ग ओसाड बनलं होतं. सर्वत्र प्रेतं विखुरली होती आणि जळीतातून धूर निघत होता. तिथं चिन्यांनी प्रवेश केला. ङ्वोसारखे थोडके तिबेटी अजूनी चिनी छावणीतच होते आणि त्यांना माझ्या नशिबाबद्दल भयंकर चिंता लागून राहिली होती. त्या दिवशी संध्याकाळी, चिनी प्रत्येक प्रेतांच्या चेहऱ्यांची आणि खास करून भिक्षूंच्या चेहऱ्यांची तपासणी करत हिंडत होते. आणि त्या रात्रीतच छावणीवर वृत्त आणलं गेलं, की 'मी नाहीसा झालो आहे.'

चिन्यांनी असं सारं का केलं? मी अद्यापि आत असेन या कल्पनेनं त्यांनी नोर्बुलिङ्गा नष्ट केलं. मी ठार झालोय की नाही याचीही तमा त्यांना नव्हती, ते स्पष्ट होतं. आणि 'मी तिथं जिवंत किंवा मृतावस्थेत नाही' हे कळल्यानंतरही त्यांनी शहर आणि मठांवर बाँबहल्ले चालूच ठेवले. त्यांनी जाणूनबुजून आमची हजारो माणसं मारली. अशी माणसं, की ज्यांच्या हातात होत्या काठ्या, चाकू आणि जवळचा पल्ला गाठतील अशी तुटपुंजी शस्त्रं. हे कशाच्या विरुद्ध? तर प्रचंड शस्त्रसामग्रीविरुद्ध त्यांना स्वतःचाही बचाव करता आला नसता की चिनी लष्कराला ते काही शारीरिक इजा करू शकत नव्हते. ही भयानक बातमी कानावर आली तेव्हा आम्हांला ठाऊक होतं, की याला एकाच कारणाची

शक्यता असणार ते म्हणजे, आमचे श्रीमंत लोक आणि राज्य चालवणारा वर्गच नव्हे, तर आमच्या इतर सर्वसामान्य लोकांनी, आक्रमणाला आठ वर्षे होऊन गेली तरी हार खाल्ली नव्हती. त्यांनी जणू चिन्यांची खात्री करून दिली होती, की ते त्याचं - परकीयांचं राज्य कधीही स्वेच्छेनं स्वीकारणार नाहीत. म्हणून आता चिनी अतिशय निर्घृण हत्या, कत्तली करून त्यांच्यावर दहशत निर्माण करून, त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांचं राज्य स्वीकारायला भाग पाडण्याचा प्रयत्न करीत होते.

मी अपरिहार्य म्हणून देश सोडायचा निर्णय घेतला त्या क्षणापासून, आता मी शांतपणे विचार करतो. मी राहिलो असतो तरी लोकांसाठी आणखी काही करता येणं शिल्लक राहिलं नसतं आणि अखेरीस चिन्यांनी मला पकडलं असतं. भारतात जाणं आणि भारत सरकारकडे आश्रय मागणं तसंच प्रत्येक ठिकाणी माझ्या लोकांसाठी आशा उजळवत, तेवत ठेवणं - एवढंच काय ते मी करू शकत होतो. अजूनही मला तो मनोमनी पूर्णपणे स्वीकारता येत नाही, इतका हा विचार अप्रिय आणि नकोसा होता. अन् अशा तऱ्हेनं आम्ही ल्हुङ्चे जोङ्च्या दिशेनं पावलं टाकू लागलो. तिथं आपल्याला आपल्या सरकारचं एक केंद्र स्थापन करता येईल ही अपेक्षा ठेवून मी त्या दिशेनं निघालो; पण ही अपेक्षा देखील हळूहळू मालवत, विझत गेली. संपली.

हद्दपार

आम्ही पुढं जात राहिलो आणि पूर्वीपेक्षाही हा प्रवास विषण्ण होता. मी तरुण होतो, सशक्त होतो; पण माझ्या सहकाऱ्यांपैकी काही जण वयस्कर होते. आम्ही आधी घाईनं केलेल्या मोठ्या प्रवासाचे परिणाम त्यांना जाणवायला लागले होते. अजूनही सगळ्यात जास्त अवघड असा प्रवासाचा टप्पा यायचा होता.

आम्ही छोड्ग्ये सोडण्याआधी आणखी काही नेत्यांना भेटायची आणि त्यांच्याशी मोकळेपणाने बोलण्याची सगळ्यात जास्त चांगली संधी मिळाली. माझ्या मूलभूत श्रद्धा वेगळ्या असल्या, तरी त्यांनी धाडसानं आणि निग्रहानं आमचं स्वातंत्र्य आणि धर्म यांच्यासाठी जे खडतर युद्ध आरंभलं होतं, त्याचं मला फार कौतुक होतं. त्यांचं सामर्थ्य आणि साहस या गुणांबद्दल आणि मला दिलेल्या संरक्षणाबद्दल व्यक्तिशः मी त्यांचे आभार मानले. सरकारनं त्यांना प्रतिगामी बंडखोर आणि लुटारू म्हणून जाहीर केल्याबद्दल त्यांनी रागवू नये, असं त्यांना सांगितलं. चिन्यांनी ते शब्द आमच्यावर कसे थोपले आणि आम्हांला तसं करणं का भाग पडलं, तेही स्पष्ट केलं. 'हिंसाचार करू नका' असं खरं तर मला फार मनापासून त्यांना सांगता आलं नाही. लढण्यासाठीच केवळ त्यांनी आपलं घरदार, साऱ्या सुखसुविधा आणि शांत-स्थिर आयुष्याचे फायदे, या साऱ्याचा त्याग केला होता. आता त्यांना पर्याय नव्हता, संघर्ष चालूच ठेवावा लागणार होता; आणि मी त्यांना काहीही देऊ शकत नव्हतो. मी त्यांना फक्त एवढं सांगितलं, की 'डोंगराळ भागातलं त्यांचं स्थान सुरक्षित राखण्यासाठी म्हणून अगदी गरज पडली तर हिंसेचा वापर करा'. आणि मी त्यांना सावधगिरीचा इशारा दिला, की ल्हासाहून आमच्याकडे आलेल्या वृत्तांवरून असं दिसतं आहे, की जिथं खांपा तळ ठोकून होते तिथल्या डोंगराळ भागांवर हल्ला करण्याची योजना चिनी लोक आखत आहेत. त्यामुळं स्वतःचं संरक्षण करण्यासाठी त्यांना जेव्हा जायचं असेल तेव्हा ते जरूर, ताबडतोब जाऊ शकतात.

तिथं अनेक भिक्षू आणि अन्य अधिकारी मला भेटण्यासाठी वाट पाहत होते, पण आम्हांला सारंच झटपट आटोपतं घ्यावं लागलं. कारण दुसऱ्या कोणत्याही मार्गानं चिनी येऊ शकत होते. मग आम्ही सरहद्दीजवळच्या एखाद्या ठिकाणी आश्रयाला पोहोचू शकण्याआधीच त्यांनी आम्हाला उडवलं असतं.

पुढचा एक आठवडा आम्ही उंच उंच डोंरांमधून स्वतःला रेटत राहिलो. त्या आठवड्यातल्या प्रत्येक दिवशी आम्हाला खिंड ओलांडावी लागत होती. दरीतला आणि खिंडीच्या उतारांवरचा बर्फ वितळू लागला होता आणि त्यामुळं वाट बहुतेक ठिकाणी निसरडी आणि चिखलाची बनलेली होती. कधी कधी ही वाट आम्हांला 19,000 फूट उंचीवर नेई. तिथं अजून भुरभुरतं हिम आणि बर्फ पडलेलं असे. जुन्या काळातल्या डोंगरामधल्या व्यापाऱ्यांनी हा मार्ग तयार केलेला होता. ल्हासामध्ये स्थिर-स्थावर आयुष्य जगण्याची सवय असलेल्या लोकांसाठी तर तो अवघड आणि दूरचा होताच.

छोड्ग्ये नंतरच्या पहिल्या रात्री आम्ही ज्या मळ्यात राहिलो, तिथं माझे वरिष्ठ शिक्षक हे श्रेष्ठ दर्जाचे लामा म्हणून होते. दुसऱ्या दिवशी आम्ही जास्त उंच, चढण आणि अवघड अशी 'यर-तो तग ला' खिंड पार केली. काही तट्टांना या मार्गावर चढता

आलं नाही. त्यामुळं मी आणि गटातले बहुतेक सारे जण खाली उतरलो आणि पुढं चालू लागलो. आणि शिखरावर पाहतो तर काय, आम्ही चकितच झालो. अतिशय सुपीक असं पठार होतं, तिथं याक चरत होते. एक तळं होतं, त्याच्यावर पातळसर पापुद्र्यासारखं बर्फ पसरलेलं होतं. तळ्याच्या उत्तरेला अत्यंत उंच, बर्फाळ पर्वत होता.

त्या रात्री, अकरा तास खडतर पद्धतीनं घोडेस्वारी आणि चढणं झाल्यानंतर आम्ही भयानक दमलो होतो. घोड्यावर बसून आमची शरीरं आंबली होती. 'इ-छुदोग-याङ्' नावाच्या लहानशा जागी आम्ही पोहोचलो. ही जागा तिबेटमध्ये इतकी प्रसिद्ध होती, की तिच्याबद्दल एक म्हण होती - ती अशी : 'इ-छुदोग-याङ् इथं जन्माला येण्यापेक्षा, जिथं गवत अन् पाणी आहे अशा ठिकाणी एखाद्या जनावराचा जन्म येणं फार बरं.' ही अत्यंत उजाड जागा होती. वस्ती जेमतेम चारशे-पाचशे. इथं नेहमीच वादळं आणि तुफान वेगानं वाहणाऱ्या वाऱ्यांचा विळखा असायचा. इथली आसपासची माती म्हणजे करड्या रंगाची वाळू होती. त्यामुळं इथं काहीही पीक घेता यायचं नाही की गवत उगवायचं नाही तसंच जळण मिळायचं नाही. लोक बहुतांशी दरिद्री होते, पण आनंदी होते, कारण गरिबीला कसं तोंड द्यायचं ते त्यांना ठाऊक होतं. त्यांनी हात पसरून आमचं स्वागत केलं. त्यांच्या साध्याशा घरांमध्ये आम्हांला फार कृतज्ञता वाटली. माझ्या काही सहकाऱ्यांना घरात जागा मिळू शकली नाही, पण त्यांना गोठ्यांमध्ये आसरा मिळाला. ते देखील खूप झालं.

एव्हाना एक आठवडाभर आम्ही प्रवास करत होतो. अर्थात, मला जाणीव होती, की परदेशात असणाऱ्या माझ्या मित्रांना ल्हासातल्या अंदाधुंदीबद्दल अतिशय काळजी आणि माझं काय झालं असेल म्हणून चिंता वाटत असणार. आम्ही इकडे झगडत होतो; पण आमच्यापैकी कुणालाही ही कल्पना आली नाही, की आम्ही निसटलो ती घटना जगभरच्या वृत्तपत्रांमध्ये ठळक शीर्षकांनी झळकली असेल! दूरवर असलेले युरोप आणि अमेरिकेचे लोक मोठ्या कुतूहलानं, आणि मला अशी आशा आहे की सहानुभूतीनं, मी सुरक्षित असल्याची बातमी मिळावी म्हणून वाट पाहत होते. आणि समजा, या सगळ्याची आम्हांला जरी कल्पना असती तरी त्याबाबत आम्ही काही म्हणजे काही करू शकत नव्हतो. कारण दुसऱ्याशी संपर्क साधायचं कुठलंही साधन आमच्याजवळ नव्हतं.

या प्रवासातल्या एका टप्प्यावर आम्ही ऐकलं, की चिन्यांनी आमचं सरकार बरखास्त केलं आणि यावर आम्ही काहीतरी कृती करू शकत होतो. कारण अर्थात, सरकार बरखास्त करण्याचा, कायदेशीर किंवा कुठलाही अधिकार त्यांना नव्हता. वस्तुतः ही घोषणा करून सतरा कलमी करारातील एक वचन त्यांनी मोडलं होतं. हे वचन तसं पाहिलं तर जेमतेमच राहिलं होतं, मोडणंच फक्त शिल्लक होतं : 'माझ्या दर्जामध्ये कोणतेही बदल केले जाणार नाहीत' हे ते कलम होतं. पण आता त्याबद्दलची घोषणाच केली गेली होती. त्यामुळं आमच्या असं लक्षात आलं, की दूरदूरच्या एकाकी जिल्ह्यांमध्ये राहणाऱ्या तिबेटी लोकांना, ही घोषणा माझ्या संमतीनंच केली गेली असावी असं वाटू शकेल. त्यामुळं जे घडलं आहे ते नाकारण्यापेक्षा नवीन तात्पुरतं सरकार तयार करणं सर्वात चांगलं, असं आम्हांला वाटलं आणि ल्हुङ्चे जोङ् इथं पोहोचता क्षणीच हे करावं, असं आम्ही ठरवलं.

पुढं दोन टप्पे होते. सकाळी पाचच्या सुमारास आम्ही इ-छुदोग-याङ् सोडलं. तग-ला ही आणखी उंच खिंड ओलांडायची होती. तिथून आम्ही पुन्हा वरच्या बाजूला, तट्टांच्या

पुढं चालत, हिमरेषेवर आलो. हा दिवसही खडतर होता. या जागेपर्यंत पोहोचेस्तोवर दहा तास आम्ही घसरड्या, खडकाळ रस्त्यावरून चालत होतो. पण इथं आम्हाला मठात पूर्वीच्या रात्रीपेक्षा जरा सोयीची अशी राहण्याची जागा मिळाली, याचा आनंद वाटला.

दुसऱ्या दिवशी आम्ही ल्हुङ्चे ज़ोङ् इथं पोहोचलो. ज़ोङ् म्हणजे किल्ला. आणि ल्हुङ्चे ज़ोङ् ही रुंद अशी खडकावर बांधलेली इमारत आहे. थोडीशी छोट्या पोतालासारखी. तिथले अधिकारी आणि नेते, आम्ही ज्या रस्त्यानं आलो तिथं स्वागतासाठी आले होते आणि आम्ही जवळ पोहोचलो तसं ज़ोङ्च्या गच्चीवरून भिक्षूंचा वाद्यवृंद धार्मिक संगीत वाजवत होता त्या सुरांनी आमचं स्वागत केलं. उदबत्त्या हातात घेऊन रस्त्याच्या कडेनं हजारोंपेक्षाही जास्त माणसं उभी होती. आमच्या सुरक्षिततेसाठी धन्यवाद व्यक्त करण्याच्या कार्यक्रमासाठी आम्ही ज़ोङ्मध्ये गेलो.

त्यानंतर आम्ही नवीन, तात्पुरतं सरकार स्थापन करण्याचा शुभारंभ म्हणून एक धार्मिक समारंभ आयोजित केला. अन्य अधिकारी, खेड्यांमधील प्रमुख आणि इतर अनेकजण धार्मिक ग्रंथ आणि योग्य ती प्रतीकं घेऊन, ज़ोङ्च्या दुसऱ्या मजल्यावर आमच्यात सामील झाले. भिक्षूंकरवी मला अधिकार सूचित करणारी परंपरागत प्रतीकं मिळाली आणि उपस्थित असलेले लामा, माझे शिक्षक यांनी राज्याभिषेकाच्या प्रार्थना म्हटल्या. जेव्हा धार्मिक समारंभ संपला, तेव्हा आम्ही खालच्या मजल्यावर गेलो. तिथं माझे मंत्री आणि स्थानिक नेते एकत्र जमले होते. या बैठकीसमोर तात्पुरत्या सरकारच्या स्थापनेची घोषणा वाचून दाखवण्यात आली. तिबेटमध्ये सर्वत्र वेगवेगळ्या ठिकाणी पाठवायच्या त्याच्या प्रतींवर मी औपचारिकपणे सह्या केल्या. डो-श्येच्या प्रयोगानंतर हे सर्व समारंभ संपले. डो-श्ये हे दैवासाठी सूचक नृत्य असते.

या प्रसन्न अशा कार्यक्रमांमध्ये आम्ही तीन तास घालवले आणि नुकत्याच कोसळलेल्या संकटांचा आणि दु:खांचा आम्हांला विसर पडला. तिबेटच्या भविष्याच्या दृष्टीनं आम्ही सकारात्मक असं काहीतरी करत आहोत, असं आम्हाला वाटलं.

तिथूनच आम्ही पनछेन लामासाठी सुद्धा एक पत्र आणि टाशी ल्हुन-पो इथल्या त्याच्या मठासाठी भेटवस्तू पाठवल्या. रीतिप्रमाणं ह्या भेटवस्तू माझ्या शेवटच्या परीक्षेच्या वेळी किंवा एक महिनाभर आधी पाठवणं अपेक्षित होतं, पण मला तेव्हा ते करणं जमलं नव्हतं.

चिन्यांच्या हालचालींबद्दल अजूनही बातम्या येत होत्या. त्यांच्यावरून वाटत तरी होतं, की ते आमच्यावर हल्ला करण्याची तयारी करत आहेत, आणि म्हणूनच आम्ही ज़ोङ्पासून हललो. तिथूनच थोडं पुढं असलेल्या मठाकडे गेलो, कारण पहिल्या जागी आम्ही फारच उघडकीस येण्यासारखे होतो. तिथं आम्ही बैठक घेतली. तोपर्यंत आम्ही एक अप्रिय सत्य स्वत:शीच मान्य केलं होतं : आम्ही जिथं जिथं म्हणून डोंगराळ भागात थांबू तिथं तिथं चिनी आमची झडती घेत येणार. तिथं असलेल्या माझ्या उपस्थितीमुळं सगळ्याचं पर्यवसान फक्त अधिक संघर्षात, युद्धात आणि माझ्या संरक्षणासाठी धडपडणाऱ्या साहसी माणसांच्या मृत्यूमध्येच होणार. म्हणून शेवटी आम्ही निर्णय घेतला, की आमच्या पुढं सरहद्दीवर अधिकारी पाठवून द्यावेत आणि त्यांनी भारत सरकाराला आश्रयासाठी विनंती करण्याचा निरोप घेऊन जावा. परवानगी मिळाल्याशिवाय सरहद्द ओलांडण्याची आमची इच्छा नव्हती. आम्ही त्यांना सांगितलं,

की भारतीय भूमीत जाऊन जवळातला जवळ असलेला भारतीय अधिकारी शोधावा म्हणजे हा अधिकारी आमच्याकडून निरोप स्वीकारेल आणि दिल्लीला पाठवेल, असा विचार होता. या अधिकाऱ्यांनी उत्तरासाठी थांबावं आणि उत्तर घेवून सरहद्दीपाशी परत यावं. अधिकाऱ्यांचा हा गट त्याच मध्यरात्री सरहद्दीवर जितक्या लवकर जाता येईल तितक्या लवकर जाण्यासाठी घोड्यांवर स्वार होऊन निघाला. सरळ रस्त्यानं सरहद्द साधारणपणे साठ मैलांवर होती, आणि वळणावळणाच्या रस्त्यानं गेल्यास हेच अंतर बहुधा दुप्पटीएवढं होत होतं.

आम्ही सकाळी पाच वाजता त्यांच्या पाठोपाठ निघालो. सरहद्दीच्या जसजसं जवळ चाललो होतो तसतसा प्रवास अधिकाधिक कठीण बनत चालला. पुढच्या काही दिवसांत तर लागोपाठ येणारी हिमवादळं, बर्फावरची डोळ्यांना त्रासदायक अशी चमक आणि मुसळधार पाऊस यांनी वेढले गेलो, झोडपले गेलो. एके दिवशी आम्ही ज्या टप्प्यावर पोहोचलो तिथं रस्ता विभागला गेला होता. तीन रस्ते फुटत होते; आणि आमचं पुढचं इच्छित ठिकाण होतं जो-रा नावाचं खेडं. ज्या रस्त्यावर आणखी एक उंच खिंड होती तो रस्ता मी निवडला. खिंडीचं नाव होतं 'ल-गोए-ला'. त्याच्या माथ्यावर आम्ही जोरदार वादळात अडकलो. कडाक्याची थंडी होती. आमची बोटं-हात बधीर झाले आणि भुवया गोठल्यासारख्या झाल्या; खास करून माझ्या धाकट्या भावाला याचा फार त्रास झाला. प्रवासात ज्यांच्या ज्यांच्या मिशा वाढल्या होत्या, त्यांच्या मिशांमध्येही बर्फ साठलं. आमच्याकडे जास्तीचे कपडेच नव्हते, त्यामुळं ऊब टिकवण्यासाठी एकच मार्ग आमच्याकडे शिल्लक होता, तो म्हणजे चालत राहणं. त्यामुळं आम्ही पुन्हा आमची तट्टं दामटली. त्यांना नेत आम्ही चालत जात होतो. आम्ही तट्टांचा जपून जपून वापर करत होतो. तिबेटी लोक नेहमीच असं करतात फक्त म्हणून नव्हे तर त्यांना अजून बराच मोठा पल्ला गाठायचा होता आणि त्यांना खायला घालायला पुरेसा चाराही मिळत नव्हता. आमचा प्रवास हळूहळू चालला होता त्यामागचं हे एक कारण होतं आणि या संथ गतीमुळं विविध देशांमधल्या आमच्या मित्रांना, आम्ही इतके दिवस कुठे आहोत आणि काय करतो आहोत, असा प्रश्न पडला होता.

त्या दिवशी सकाळी अकाराच्या सुमारास आम्ही खिंड ओलांडली आणि विश्रांतीसाठी थोडं थांबलो. आमच्याकडे थोडा ब्रेड, गरम पाणी आणि आटवलेलं दूध होतं. हे अन्न खूप चविष्ट लागलं.

माझे तीन मंत्री आणि शिक्षक वेगळ्या, दुसऱ्या रस्त्यानं गेले होते. तो रस्ता थोडा लांबचा होता, पण तिथली खिंड कमी उंचीवर होती. आणि तो जो तिसरा रस्ता फुटला होता, त्या रस्त्यानं काही सैनिकांना पाठवलं होतं. माझे दोन शिक्षक वगळता बहुतेक सारे जण जो-रा इथं एकाचवेळी, दुपारी तीनच्या सुमारास पोहोचले. थोड्या उशिरानं माझे शिक्षकही पोहोचले; आणि त्याच जागी अनेक दिवसांनी माझी आई आणि बहीण भेटल्या. त्यांनी थोडं आधीच एक वेगळा रस्ता पकडला होता. त्यांनी इतक्या झपाट्यानं प्रवास केला होता, की माझ्या राज्याभिषेकाच्या वेळी जी जागा माझ्या कुटुंबाला भेट म्हणून मिळालेली होती, तिथं त्यांना दोन दिवस राहता आलं.

जो-रातल्या गावकऱ्यांनी आमचं प्रेमानं स्वागत केलं. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही पुन्हा चारला निघालो. आता आम्ही मोठ्या लवाजम्यानं निघालो होतो. आम्ही दोनशे-तीनशे जण होतो. त्यात सैनिक आणि खांपाही होते. थोडावेळ रस्ता दरीच्या

पायथ्याजवळून गेला, पण नंतर तो करपो-लाच्या दिशेनं वर जावू लागला. हवा सुंदर आणि स्वच्छ होती; पण आम्ही पूर्वी पाहिलं होता त्यापेक्षा कितीतरी जास्त बर्फ तिथं होतं. जोर्‍याच्या वार्‍यानं ते भुरभुरीत बर्फ उचललं जात होतं आणि आमच्या चेहर्‍यावर आपटत होतं. बर्फाच्या चमकीपासून संरक्षण व्हावं म्हणून आमच्यापैकी फार थोड्या जणांकडे गॉगल होते. बर्फामुळं येणारं आंधळेपण टाळण्यासाठी बाकीच्यांनी रंगीत कापडाची पट्टी डोळ्यांवर बांधली होती, किंवा बरेच तिबेटी डोक्याभोवती जी लांब केसांची वेणी गुंडाळतात, तीच वेणी डोळ्यांभोवती बांधली होती.



भारतीय सरहद्दीवर दलाई लामा.

अचानक शिखरापलीकडून कसलातरी आवाज आम्ही ऐकला. त्या निर्जन, दूरच्या जागेत तो आवाज फारच अनपेक्षित, विसंगत आणि धोका सूचित करणारा वाटून गेला. तो एका विमानाचा आवाज होता. अचानक ते विमान दिसू लागलं. जे दुहेरी इंजिनाचं होतं आणि आमच्या मार्गावर घिरट्या घालत होतं. चकाकत्या बर्फावर आम्ही - शेकडो माणसं आणि घोडे अगदी सहज दिसत होतो. प्रत्येकजण उतरला आणि विखरून गेला. बहुतेक जण शिळांमागे दबा धरून बसले; काहीही घडलं तर फैरी झाडता याव्यात म्हणून सैनिक आपापल्या बंदुका सरसावून बसले. जिथलं बर्फ वितळलं होतं अशा गडद जागी मी उभा राहिलो. विमान थेट आमच्या डोक्यावर आलं; पण त्याचा मार्ग न बदलता ते इतक्या झपाट्यानं दिसेनासं झालं, की त्याच्यावर काय अक्षरं, खुणा होत्या त्याही आम्हांला दिसल्या नाहीत.

त्यानंतर त्या विमानाबद्दल आमच्यात बरीच चर्चा झाली. एखादा धोका टळून गेला की या गप्पा लोकांच्यात नेहमीच होत असतात. ते विमान नक्कीच चीनचं असावं असं आम्हाला वाटलं; कारण त्या भागात दुसरं कोणतं राष्ट्र विमान पाठवणार! चिनी नक्कीच आम्हाला शोधत असणार. कारण त्याशिवाय अगदी चिन्यांनाही त्या भागात कुठलं कारण असणं शक्य नव्हतं. आम्ही दिसलो आहोत असं कुठलंही चिन्ह त्यानं दाखवलं

नाही. कारण आम्ही न दिसणं शक्य नव्हतं. चिन्यांना आता आम्ही नक्की कुठं आहोत आणि कुठं चाललो आहोत हे कळलं आहे, अशी मनस्ताप देणारी जाणीव, भावना घेऊन आम्ही पुढं गेलो. जर आणखी विमानं हल्ला करायला आलीच तर छोट्या गटांमध्ये विभागलं जाणं, एवढंच काय ते आम्ही करू शकत होतो. आता खात्रीच पटली होती, की मी हद्दपार व्हायलाच पाहिजे. कारण मी तिबेटमध्ये कुठंही थांबलो तरी त्या जागेवर बॉंब पडण्याची किंवा तिथं वेढा पडण्याची शक्यता होतीच होती.

जवळजवळ दुपारी आम्ही विश्रांतीसाठी आणि खाण्यासाठी थांबलो, आणि आम्ही जेमतेम बसलो तोच एक धुळीचं वादळ उठलं. त्याचा त्रास झाल्यानं आम्ही पुढं गेलो आणि थोडक्या वेळेतच आम्ही एका विस्तीर्ण पठारावर आलो. तिथलं बर्फ खूप घट्ट होतं. नेमकं त्याचवेळी सूर्य पुन्हा झळझळीतपणे प्रकाशू लागला. त्यावेळी बर्फावर जी चमक होती तिचा, आमच्या ज्या लोकांकडे गॉगल नव्हता त्यांना अतोनात त्रास झाला.

आणखी दोन दिवस या पद्धतीनं दमछाक घडवणारी घोडेस्वारी झाल्यानंतर आम्ही तिबेटमधल्या शेवटच्या वस्तीपर्यंत आलो. त्या जागेचं नाव होतं मङ्-मङ्. आमच्यापैकी जे काही अधिकारी पुढं गेले होते, त्यांच्यापैकी एकजण या ठिकाणी आमची वाट पाहत होता. त्यानं एक चांगली बातमी आणली होती, की भारत सरकार आम्हाला आश्रय देण्यास तयार आहे. छुथङ्-मो या पहिल्या वस्तीच्या ठिकाणी भारतीय अधिकारी नेमलेला होता, तिथं आमच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे, हे त्यानं प्रत्यक्ष पाहिलं होतं.

मङ्-मङ् या ठिकाणी आम्हाला खूप सुरक्षित वाटलं. या बहुतेक सर्व काळात आमचा बाहेरचा झगा वगळतात आम्ही पूर्ण तयारीनं सारखं झोपत होतो. पण मङ्-मङ् हे तिबेटच्या अगदी एका कोपऱ्यात होतं. तिथं जाणारा फक्त एकच रस्ता होता आणि त्याच्यावर कडक पहारा होता. कारण जे जे रस्ते कडेकडेने येऊन आमच्या रस्त्याला मिळत होते, तिथं काही शे खांपा आणि सैनिक यांना थांबवलं होतं. आता अगदी चिन्यांनी आमच्यावर वरून हवेतूनच हल्ला केला असता तर गोष्ट वेगळी, पण नाहीतर त्यांना आम्हाला अचानकपणे पकडून नेणं किंवा कापून काढणं शक्य झालं नसतं.

परंतु तिथं आम्हाला खराब वातावरणाला तोंड द्यावं लागलं. पहिल्यांदाच आम्ही तंबूंमध्ये झोपलो तर पाऊस कोसळू लागला. माझ्या तंबूतून गळायला लागलं. मी पहाटे तीनच्या सुमारास जागा झालो आणि त्यातल्या त्यात कोरड्या जागी माझं अंथरूण हलवायाचा प्रयत्न केला, पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही आणि मला अख्खी रात्र बसून काढावी लागली. इतर बहुतेक जणांनाही त्यांच्या तंबूंमध्ये याच प्रकारचा त्रास झाला. सकाळी मला आजारी पडायला झालं. आम्ही पुढं सरकायचा प्रयत्न केला नाही. आणि पुढचा दिवसभर माझी तब्येत बिघडतच गेली.

माझ्या साथीदारांनी मला एका लहानशा घरात हलवलं, पण ते घर फारच गलिच्छ होतं. धुरानं काळं पडलं होतं. घराच्या खालच्या तळातल्या मजल्यावर असलेली गायी-गुरं सारी रात्रभर हंबरत होती; आणि वरच्या वाशांमध्ये कोंबडे आरवत होते. त्यामुळं मला पुन्हा नीटशी झोप आलीच नाही आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मला हलताही येईना. मी अशा दयनीय अवस्थेत असताना, आमच्या रेडिओवरून भारतीय वृत्त ऐकलं, की मी घोड्यावरून पडलो आणि अतिशय जखमी झालो आहे. माझ्या मित्रांना या बातमीमुळे चिंता वाटेल हे मला जाणवलं, पण त्या बातमीनं मला जरा उत्साहच वाटून

गेला - कारण बाकी काही असो, घोड्यावरून पडण्याचं दुर्दैव अजून तरी नशीबानं माझ्या वाट्याला आलं नव्हतं!

मी जरी तब्येतीनं चांगला असतो तरी आम्हांला मङ्-मङ् इथं एक दिवस थांबायला लागणार होतं. कारण माझ्याबरोबर भारतात कोण येणार आणि कोण मागे थांबणार याबद्दल मला ठरवायला हवं होतं. मुख्यत्वे, धार्मिक आणि राजकीय अधिकारी माझ्याबरोबर आले आणि लष्करी लोक मागे थांबले. जेव्हा आम्ही ल्हासा सोडलं तेव्हाच हा पहिला गट मी जिथं जाईन तिथं येणार हे ठरलेलं होतं. पण दुसरा गट पूर्णपणे मला संरक्षण पुरवणाच्या हेतूनंच बरोबर आला होता; आणि त्यातल्या बहुतेकांना तिबेटमध्ये परत जाऊन युद्ध चालू ठेवायची इच्छा होती.

त्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी सकाळी घोड्यावर बसण्याइतकी हुशारी मला नव्हती; तरीही आम्ही विचार केला, की आम्हांला पुढं जायलाच पाहिजे, म्हणजे पिछाडीचे जे खांपांचे आणि सैनिकांचे गट होते, ते त्यांच्या जबाबदारीतून मोकळे झाले असते. म्हणून माझ्या अनुयायांनी ज़ोच्या रुंद पाठीवर चढायला मला मदत केली. ज़ो हा प्राणी याक आणि गाय यांच्या संकरातून झालेला असतो; आणि तसा तो धीम्या, समतोल चालीनं जातो. अशा या खास तिबेटी वाहनावरून मी माझा देश सोडला.

आम्ही सरहद्द ओलांडण्याच्या घटनेत तशी काही नाट्यमयता नव्हती. देशभूमी तशी प्रत्येक बाजूला रानटी होती आणि उजाड होती. आजारपण, विलक्षण थकवा आणि दुःख यांनी मला पार घेरी आल्यासारखं झालं होतं आणि त्याच्या विषण्ण तंद्रीत मी सारं पाहिलं. ती विषण्णता, खिन्नता इतकी खोल होती, की ती मी शब्दात व्यक्त करू शकत नाही.

वर्तमान आणि भविष्य

भारतातील पहिल्या खेड्यांमध्ये, शहरांमध्ये आम्ही पोहोचल्यावर जी सहानुभूती मला मिळाली त्यामुळं मनातली खिन्नता खूपशी कमी झाली. आम्हाला अजूनही एक आठवडा आगेकूच करायची होती, अजूनी अनेक खिंडी ओलांडायच्या होत्या. रस्त्यापर्यंता किंवा रेल्वेपर्यंत पोहोचेपर्यंत हा प्रवास करायलाच हवा होता. पण वाटेत मला जो अधिकारी भेटला, त्याला भेटून मला फार आनंद झाला. कारण मी आधी भारतात आलो होतो तेव्हापासून मी त्याला ओळखत होतो. नंतरही एक पूर्वपरिचित अधिकारी आणि दुभाष्या भेटला. मग श्री. नेहरू यांनी अंत:करणपूर्वक पाठवलेली तार मला मिळाली : "माझे सहकारी आणि मी, भारतात तुम्ही सुरक्षितपणे पोहोचल्यावर, स्वागत करतो आहे. तुम्ही, तुमचे कुटुंबीय यांना आणि सहकाऱ्यांना भारतात राहण्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरवायला आम्हाला आनंद वाटेल. भारतातील लोकांना तुमच्याबद्दल अतोनात आदर आहे. ते नि:संशय तुम्हाला व्यक्तिगत पातळीवरही तो परंपरागत आदर देतील. तुम्हाला सस्नेह शुभेच्छा."

तेजपूरच्या रेल्वेस्थानकावर पोहोचल्यानंतर मी खरोखरच अचंबित आणि सद्गदित झालो, कारण तिथं शुभेच्छा व्यक्त करणाऱ्या हजारो तारा येऊन पडल्या होत्या. जगभरातल्या वृत्तपत्रांचे सुमारे शंभर पत्रकार आणि छायाचित्रकार, त्या दूरच्या ठिकाणी मला भेटायला आणि त्यांच्या भाषेतील 'द स्टोरी ऑफ द इयर' (वर्षातली सर्वात महत्त्वाची घटना) ऐकण्यासाठी आले होते. माझ्या भवितव्याबद्दल इतक्या जणांना आस्था होती, हे पाहून मी हेलावून गेलो; पण मी खरंच त्याक्षणी खूप मोकळेपणानं बोलू शकलो नाही. माझ्या मनाची एकतर तशी तयारी नव्हती. दुसरं म्हणजे अद्यापि तिबेटमध्ये असलेल्या माझ्या लोकांच्या दृष्टीनं मी जो जो शब्द बोललो असतो त्यावर काळजीपूर्वक विचार होणं गरजेचं होतं. म्हणून मी एक निवेदन तयार केलं. या पुस्तकात नंतरच्या भागात जे जे काही सांगितलं त्याची रूपरेखा, अतिशय सरळ आणि संयमित, काळजीपूर्वक शब्द वापरून या निवेदनात शब्दबद्ध केली होती. निवेदनात म्हटलं होतं, की "मला भरभरून आलेल्या शुभेच्छांच्या संदेशांबद्दल तसंच भारत सरकारने केलेल्या स्वागताबद्दल मला अत्यंत कृतज्ञता वाटते. तसंच या क्षणी तिबेटमध्ये जी काही शोकांतिका घडली त्याबद्दल त्याला विलक्षण खेद वाटतो आणि त्याला अशी तीव्र इच्छा आहे, की अधिक रक्तपात न घडता ही सर्व संकटं संपून जावीत, अशी दलाई लामाची इच्छा आहे." (हे सर्व निवेदन त्रयस्थपणे लिहिलेलं होतं.)

दोन दिवसांनंतर पेकिंगमध्ये एक निवेदन करण्यात आलं. त्यात म्हटलं होतं : "दलाई लामाचं जे काही तथाकथित निवेदन आहे... तो अतिशय अपरिपक्व असा दस्तऐवज आहे. त्यात दुबळा तर्क, खोटी विधानं आणि पळवाटा आहेत." नंतर चिनी साम्यवादी नजरेतून घटनांचं वर्णन केलं गेलं होतं आणि ठासून सांगितलं होतं, की बंडखोरांनी ल्हासातून माझं अपहरण केलं होतं. "मी म्हणजे निव्वळ साम्राज्यवादी कुरापती करणाऱ्यांची इच्छा व्यक्त करणारं बाहुल होतो." पुढं हेही सुचवलं होतं, की मी ते निवेदन स्वत: दिलेलं नसणारच. त्या सुमारास चिनी हे 'साम्राज्यवादी आणि भारतीय विस्तारवादी' यांच्याविरुद्धही आग ओकत होते. जर एखाद्याला सत्याबद्दल काहीच

आस्था नसेल तर शब्दांनी जखमी करणं आणि वरवर मिठ्ठास बोलणं किती सोपं असतं. भारत सरकारच्या प्रवक्त्यानं त्यावर तिखट प्रत्युत्तर दिलं; पण मी त्या वादात शिरलो नाही, कारण चिनी तर फक्त शिवीगाळच करत होते. त्यांनी सत्य बाजू फिरवल्याबद्दल मी काही दिवसांनी वृत्तसंस्थांना फक्त दुसरं माफक शब्दांमधलं निवेदन दिलं आणि त्यात मी म्हटलं होतं, की 'पहिलं निवेदन द्यायला मीच जबाबदार आहे आणि माझा त्या निवेदनाला पाठिंबा आहे.'

जो जो कुणी बंड करेल अशी शंका यायची त्याला चिनी ज्या पद्धतीनं दोष द्यायचे ते खरोखर मला अजूनही विस्मयकारक वाटतं - जखमी कुत्रा ज्याचा त्याचा चावा घ्यायला पाहतो तसंच काहीसं हे होतं. वेगवेगळ्या वेळी त्यांनी कुणाकुणावर दोषारोप केला असेल तर पूर्णपणे काल्पनिक अशा साम्राज्यवाद्यांवर, भारतात राहणाऱ्या तिबेटी लोकांवर, भारत सरकारवर आणि तिबेटमधील 'राज्यकर्त्या गटावर' - हे म्हणजे माझ्या सरकारचं त्यांनी केलेलं वर्णन बरं. त्यांनी स्वत: सत्य पचविण्यासाठी तयारी दाखवलीच नाही. 'चिनी ज्यांना 'मुक्त' करायचा धोशा लावत होते त्याच लोकांनी त्यांच्या त्या 'मुक्ती'बद्दल उत्स्फूर्तपणे बंड केलं होतं. लोकांपेक्षासुद्धा तिबेटमधली राज्यकर्ती लोकंच शांततामय करारासाठी जास्त इच्छुक होती.'

आम्ही तेजपूरला पोहोचल्यानंतर लवकरच भारत सरकारने आम्हा सर्वांना मसुरीला नेण्यासाठी एक खास रेल्वे पाठवली. दिल्लीच्या उत्तरेला, हिमालयाच्या पायथ्याशी - मसुरीला - त्यांनी आमची तात्पुरतं राहायची व्यवस्था केली होती. तोही प्रवास बऱ्याच दिवसांचा होता आणि संस्मरणीय होता, कारण रेल्वे जिथं जिथं थांबत होती तिथं तिथं प्रचंड संख्येनं लोक आम्हांला प्रोत्साहन द्यायला जमले होते. माझ्या पूर्वीच्या भेटीच्या वेळी भारतीय लोकांनी माझं केलेलं स्वागत मला आठवलं, पण आताच्या या स्वागतात एक नवीनच उत्स्फूर्त उत्कटता होती. त्यामुळं माझ्या मनाला खूप बरं वाटलं आणि एका तिबेटी म्हणीची मला आठवण झाली : 'आनंदाचं मोजमाप करायला दु:ख उपयुक्त ठरतं.' हे सारे लोक काही निव्वळ मला पाहायला आले नव्हते, तर तिबेटसाठी त्यांची सहानुभूती व्यक्त करायला आले होते. हे तर स्पष्टच दिसत होतं.

मसुरीला पोहोचल्यावर मी आनंदित झालो. महिन्याभराचा प्रवास, मानसिक ताण अनुभवल्यानंतर विसावायला मिळालं आणि आमच्या प्रश्नांबद्दल विचार करायला शांतता मिळाली. मी एक वर्षभर मसुरीत राहिलो. नंतर भारताच्या पार वायव्य दिशेला धरमशाला नावाच्या जागी भारत सरकारनं मला, जोवर गरज आहे तोवर वापरण्यासाठी एक बंगला दिला. या जागीच मी सध्या राहत आहे.

मी मसुरीला पोहोचल्यावर लगेचच श्री. नेहरू मला भेटायला आले. त्यांच्याशी बराच वेळ बोलता आलं याचा मला आनंद वाटला. जूनमध्ये मी वृत्तसंस्थेला आणखी एक निवेदन दिलं. तोपर्यंत मी सार्वजनिकरित्या चिनी साम्यवाद्यांबद्दल काहीही कडक शब्दात बोललो नव्हतो, कारण चीनमध्ये अजून चांगलं असं काही आहे हे मी जाणत होतो आणि चीन योग्य चर्चा करायला पारच नाकारेल असं वाटत नव्हतं. पण भाराभर शरणार्थी, निर्वासित तिबेटच्या बाहेर पडत होते; आणि त्यांनी सांगितलेल्या गोष्टींनी मी व्यथित, भयचकित झालो होतो. तिबेटला पार टाचेखाली निर्दयपणे चिरडण्यासाठी चिन्यांनी त्यांच्या मनाची तयारी केली आहे, हे मान्य करणं मला भाग पडलं. मला अधिक तिखटपणे बोलावं लागलं. मी म्हणालो, 'मला असं वाटतं, पेकिंग सरकारला त्यांचे

प्रतिनिधी काय करत होते याची कल्पना आलेली दिसत नाही. जे काही घडलं त्याला माओ झे डुंगची संमती असेल यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही.' मी सुचवलं होतं, की जर एखाद्या आंतरराष्ट्रीय गटाला वस्तुस्थितीची पाहणी करू द्यायला त्यांनी मान्यता दिली तर मी आणि माझं सरकार त्यांचा निर्णय आनंदानं मान्य करू. आम्हांला अद्यापी समजूतदार करार व्हावा अशी इच्छा होती आणि भविष्यातसुद्धा आमची हीच इच्छा कायम राहील; परंतु चिन्यांनी कधीही या सूचनेची दखल घेतली नाही.

त्यावेळच्या पत्रकार परिषदेत मी औपचारिकरित्या सतरा-कलमी करार नाकारला. मी स्वत: पुढाकार घेऊन ही गोष्ट केली. पण मी जेव्हा मसुरीत होतो, तेव्हा माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच मला आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञांशी बोलायची संधी मिळाली आणि ही गोष्ट करणं योग्य आहे याला त्यांनी दुजोरा दिला.

दलाई लामा पं. जवाहरलाल नेहरूंसह बिर्ला हाऊस, मसूरी येथे.

आतापर्यंत आमच्या कारणासाठी न्याय मिळणं ही स्वयंसिद्ध गोष्ट आहे असं मला वाटलं होतं. पण आता माझ्या मनात विचार घोळू लागला, की जर इतर सर्व काही अपयशी ठरलं आहे तर आमच्या प्रकरणात संयुक्त राष्ट्रांना (राष्ट्रसंघाला) लक्ष घालण्याची विनंती करता येऊ शकेल. मला त्या निर्णयाची अंजिबात घाई करायची नव्हती; पण कायदेशीर गुंतागुंता महत्त्वाची ठरायला लागली होती. मला जाणीव होती, की तिबेट हा कायम चीनचा भाग होता, असा चिनी लोक दावा करू शकतात. आमची स्वातंत्र्याची अडतीस वर्ष वगळून टाकून ते त्यांच्या दाव्याला पुरावा देतील आणि असंही मांडतील, की तिबेटवरचं आक्रमण ही अंतर्गत बाब आहे आणि त्यामध्ये संयुक्त राष्ट्रे लक्ष घालू शकत नाहीत.

मी मसुरीत होतो त्या दरम्यान न्यायतज्ज्ञांच्य आंतरराष्ट्रीय मंडळानं या शतकाच्या सुरुवातील केल्या गेलेल्या करारांचं, तहाचं परीक्षण केलं. त्याबद्दल मी पूर्वी सांगितलं आहेच. त्यांनीही निष्कर्ष काढला, की चिनी अंमलाशिवाय आम्ही पूर्णपणे स्वायत्त राज्य होतो.

त्या निष्कर्षापासून मग या मंडळानं सतरा-कलमी कराराचा अभ्यास केला. वर वर पाहता, प्रथमदर्शनी आम्ही आमच्या स्वायत्ततेचा त्याग केला असं दिसत होतं. आम्ही

म्हणू शकत होतो, की आमच्या प्रतिनिधींनी, व्यक्तिगत पातळीवर हिंसाचाराची आणि तिबेटमध्ये आणखी लष्करी कारवाई केली जाण्याची दहशत दाखवल्यामुळं, त्यावर सह्या केल्या; परंतु आमच्याविरुद्ध विधान केलं जाऊ शकत होतं, की जरी करारावर धाकदपटशा दाखवून सह्या घेतल्या गेल्या असतील तरी करार काही निरर्थक ठरत नाही. उदाहरणार्थ, युद्धाच्या शेवटी तहांवर, करारांवर जे पराजित असतात ते धाकाखालीच सह्या करतात.

परंतु जर एका पक्षाकडून कराराचा भंग झाला तर दुसरा पक्ष तो करार कायदेशीररित्या नाकारू शकतो आणि तो करार फारसा व्यवहार्य राहत नाही. चिन्यांनी निश्चितपणे सतरा-कलमी कराराचा भंग केला होता आणि ते सिद्ध करायची आमची इच्छा होती. आता मी तो करार नाकारला तर होताच, त्यामुळं तो काही आम्हांला बंधनकारक होत नव्हता. करार होण्याच्या आधीपासून आमचा स्वायत्ततेसाठी जो दावा होता, तो तर कायम तसाच राहिला होता.

संयुक्त राष्ट्रांकडे आमचं प्रकरण नेण्यामध्ये आणखी एक अडचण अशी होती, की या वादात गुंतलेला कुठलाच पक्ष त्याचा सदस्य नव्हता. आम्ही सदस्य नव्हतो कारण आम्ही आमचं 'दूरपण' जपत राहिलो होतो आणि चीन हा तिथला सदस्य नव्हता कारण फोर्मोसातील चेङ् काई शेकच्या राजवटीकडून चीनचं प्रतिनिधीत्व केलं जात होतं. तरीही, आमच्या खटल्याकडे संयुक्त राष्ट्रांतील सदस्य राष्ट्रांचं लक्ष जावं म्हणून मी प्रयत्न करू लागलो.

'इंटरनॅशनल कमिशन ऑफ ज्युरिस्टस्' म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञांचं मंडळ हे माझ्यासाठी किंवा तिबेटसाठी काम करत नव्हतं - किंवा सरकारसाठी किंवा राष्ट्रासाठीही काम बघत नव्हतं. पन्नास देशांमधील 30,000 वकीलांचा ज्याला पाठिंबा आहे अशी ही न्यायाधीशांची, वकीलांची आणि कायद्याच्या शिक्षकांची स्वतंत्र संघटना आहे. जिथं सरळसरळ, पद्धतशीरपणे कायद्याचं उल्लंघन होतं, तिथं कायदेशीर नियमाचं पालन व्हावं आणि जागतिक पातळीवर कायद्याच्या मताला चालना मिळावी यासाठी ही संघटना काम करते. या मंडळानं उत्साहनं, तटस्थपणानं तिबेटमधील घटनांचा अभ्यास सुरू केला, कारण असं करणं हे त्यांना निखळपणे कर्तव्य वाटलं, ह्याचा मला आनंद झाला.

सर्व तपासणी करताना, या मंडळानं चीनच्या आणि तिबेटच्या प्रत्येक विधानाचा अभ्यास केला आणि शरणार्थी तिबेटी निर्वासितांकडे कसून चौकशी करायला त्यांची प्रशिक्षित माणसं पाठवली; आणि हे करताना त्यांनी अनेक निर्घृण कृत्यं उघडकीस आणली, की जी केवळ ऐकल्यावरसुद्धा मी शहारून गेलो. मला नाही वाटत, की अनेक लोकांना क्रूरतेची परिसीमा गाठणाऱ्या कृत्यांबद्दल चवीनं वाचायला आवडेल; आणि मलाही त्यांबद्दल लिहिणं नकोसं वाटतं. त्या मंडळाच्या नि:पक्षपाती चौकशीनं जी दडपणूक उघडकीस आणली, ती माझ्या लोकांची न्यायाची बाजू स्पष्ट व्हावी म्हणून मी थोडक्यात सांगतो. {आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञांच्या मंडळानं स्वीकारलेली सर्व विधानं आणि त्यांचे विश्लेषण व निष्कर्ष हे त्यांच्या वृत्तात प्रकाशित झाले आहे : 'द क्वेश्चन ऑफ तिबेट अँड द रूल ऑफ लॉ' आणि 'तिबेट अँड द चायनीज पीपल्स रिपब्लिक' (इंटरनॅशनल कमिशन ऑफ ज्युरिस्टस्, जीनीव्हा, 1959 आणि 1960)}

केवळ लष्करी कारवाईत नव्हे, तर व्यक्तिगत पातळीवर आणि जाणूनबुजून आमची

दहा-एक हजार माणसं मारली गेली. कुठल्याही चौकशीशिवाय, त्यांनी केवळ साम्यवादाला विरोध केल्याच्या किंवा पैसे साठवल्याच्या संशयावरून किंवा केवळ त्यांच्या स्थानामुळं किंवा कोणत्याही कारणाशिवायही त्यांना ठार केलं गेलं. पण मुख्य आणि मूलभूत अशा ज्या एका कारणाखातर त्यांना मारलं गेलं, ते कारण होतं 'त्यांचा धर्म सोडायला ठाम नकार'. त्यांना फक्त गोळ्या झाडून मारलं गेलं नाही, तर त्यांना मृत्यू येईपर्यंत बेदम मारहाण, भयंकर छळ करून, जिवंत जाळून, पाण्यात बुडवून, छिन्नविच्छिन्न करून, चटके देऊन, जिवंत पुरून, आतडी कापून काढून आणि शिरच्छेद करून मारून टाकलं. ही सारी कृत्यं सार्वजनिकरित्या केली गेली. जो बळी ठरला असेल त्याच्या गावकऱ्यांना, मित्रांना आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना ही निर्घृणता बघण्याची सक्ती केली जायची. प्रत्यक्ष साक्षीदारांनीच मंडळाला या घटनांची वर्णनं सांगितलं. स्त्री-पुरुषांना थंडपणे हळूहळू मारलं आणि त्यांच्या कुटुंबीयांना बघण्याची जबरदस्ती केली गेली. लहान मुलांवर त्यांच्या स्वतःच्या आई-वकीलांवर गोळ्या झाडण्याची बळजबरी करण्यात आली होती.

खास करून लामांना छळण्यात आलं. चिन्यांच्या मते 'लामा ही अनुत्पादक माणसं आहेत आणि लोकांच्या पैशांवर ते जगतात'. चिन्यांनी त्यांना अपमानित करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः वयस्कर आणि जास्त सन्माननीय असे जे लामा होते त्यांना यातना देण्याआधी नांगराला जुंपण्यात आलं, घोड्यांवर बसावं तसं त्यांच्यावर चिनी लोक स्वार झाले, त्यांना चाबकानं फटके दिले गेले. आणखीही इतर पद्धती अवलंबिल्या गेल्या; पण त्यांचं वर्णन करवत नाही इतक्या त्या क्रूर आहेत. आणि असं हाल हाल करून मृत्यूपंथाला लागले असताना, त्या लामांना त्यांच्या धर्मावरून टोमणे मारण्यात येत होते आणि वेदना तसंच मृत्यूपासून स्वतः वाचवावं म्हणून एखादी जादू करा असंही सांगण्यात आलं होतं.

या सार्वजनिक हत्याकांडाशिवाय, अनेक तिबेटी लोकांना तुरुंगात डांबण्यात आलं किंवा गुराढोरांसारखं एकत्र करून एखाद्या भलत्याच अपरिचित ठिकाणी सोडलं गेलं. त्यातले अनेकजण छळामुळं, अन्नवस्त्राचे हाल झाल्यानं, कष्टानं मरून गेले. तर काही जणांनी निराशा आणि छळ असह्य झाल्यामुळं आत्महत्या केली. घरातली पुरुष मंडळी डोंगरांमध्ये गनिमी योद्धे म्हणून हाकलली गेल्यानंतर, गावात मागे राहिलेल्या त्यांच्या बायका-मुलांना मशिनगननं उडवण्यात आलं.

पंधरा वर्षांपासून ते खालच्या वयाची अगदी दूधपित्या तान्ह्या बाळापर्यंतची कित्येक हजारांनी मुलं त्यांच्या आई-वडिलांपासूना दूर नेली गेली आणि नंतर ही मुलं पुन्हा कधीही दिसली नाहीत. ज्या पालकांनी विरोध केला त्यांना तुरुंगात टाकण्यात आलं किंवा गोळ्या घालून मारण्यात आलं. मुलं जवळ नसली की आई-वडिलांना जास्त चांगलं काम करता येईल किंवा मुलांना योग्य शिक्षण घेता यावं म्हणून चीनमध्ये पाठवलं जाईल, अशी घोषणा या प्रसंगी चिन्यांनी केली.

अनेक स्त्री-पुरुषांचं म्हणणं आहे, की चिन्यांनी त्यांचं निर्बीजीकरण केलं. आंतरराष्ट्रीय मंडळाच्या चौकशीसाठी गेलेल्यांना त्यांनी स्वतंत्रपणे त्यांच्यावर केल्या गेलेल्या वेदनादायक शस्त्रक्रियेची माहिती दिली. मंडळानं त्या लोकांचा पुरावा फारसा निर्णायक मानला नाही, कारण भारतात असलेल्या कुठल्याही वैद्यकीय प्रकारात, त्यांनी वर्णन केलेली निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया बसत नव्हती. पण दुसरं काही स्पष्टीकरण

देता येत नव्हतं. मंडळाचा वृत्तांत पूर्ण झाला तेव्हा नवीनच पुरावा समोर आला, ज्याच्यावरून मला खात्री पटली, की काही काही खेड्यांमधल्या सर्व स्त्री-पुरुषांचं चिन्यांनी निर्बीजीकरण केलेलं होतं.

दलाई लामा व त्यांचे कुटुंबीय

लोकांवर केलेल्या या अत्याचारांशिवाय आमचे शेकडो मठ चिन्यांनी नष्ट केले. एकतर त्यांची मोडतोड केली किंवा लामांना मारून टाकलं आणि भिक्षूंना वेठबिगारीला जुंपलं - त्या छळछावण्याच होत्या. या भिक्षूंना मरणयातना देऊन त्यांचं ब्रह्मचर्याचं व्रत मोडायला लावलं आणि ओस पडलेल्या मठांचा आणि मंदिरांचा बराकी आणि तबेले म्हणून वापर केला.

आंतरराष्ट्रीय मंडळानं, त्यांनी गोळा केलेल्या पुराव्यांवरून चीनला अपराधी ठरवलं. "कुठल्याही व्यक्तीला किंवा राष्ट्राला दोषी ठरवता येईल इतका भीषण गुन्हा - तोही वंशविच्छेदाचा गुन्हा चीननं केला आहे. एक राष्ट्रीय वंश, मानवजात किंवा एक धार्मिक गट अंशतः किंवा संपूर्णपणे नष्ट करण्याचा हेतू त्यात होता." चीनला तिबेटमधल्या बौद्ध धर्मीयांना नष्ट करायचं होतं, याबद्दल त्यांची खात्री पटलेली होती.

सिंहावलोकन करताना, चिनी हे गुन्हा करण्यासाठी का उद्युक्त झाले असतील त्याची कारणं कळू शकतात, असं मला वाटतं.

तिबेटचा त्यांना मोह वाटला याची सुरुवातीला तीन कारणं होती. एक म्हणजे, जरी आमचा भूभाग मोठा होता आणि त्यात फक्त 70 किंवा 80 लक्ष तिबेटी होते, तर 60 कोटींपेक्षा जास्त चिनी लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत होती. त्यांना बरेचदा दुष्काळाचा त्रास व्हायचा त्यामुळं राहण्याची अधिक जागा म्हणून त्यांना तिबेट हवा होता. वस्तुतः तिबेटमध्ये त्यांनी चिनी शेतकऱ्यांना स्थिरस्थावर केलेलं होतं आणि मला पूर्णपणे खात्री आहे, की तिबेटी लोक म्हणजे नगण्य अल्पसंख्यांक कधी होतायत याचीच ते वाट पाहत होते. दरम्यानच्या काळात तिबेटी शेतकरी मात्र त्यांच्यावर विजय मिळवणाऱ्या लोकांपेक्षा दुर्दशेला पोहोचायला लागले होते. ज्ञात इतिहासात तिबेटमध्ये कधी उपासमारीची, दुष्काळाची नोंद नव्हती; पण आता दुष्काळ पडायला लागला होता.

दुसरं म्हणजे, आमचा देश खनिजांच्या बाबतीत समृद्ध होता. आम्ही त्या समृद्धीची कधीच लुबाडणूक केली नाही, कारण आम्हाला ऐहिक सुखांमध्ये फारसं गम्य नव्हतं.

तिबेटमध्ये मोठ्या प्रगतीचा चीन दावा करतो आहे. मला स्पष्टपणे सांगायचं आहे, त्यांच्या हा दावा खरा आहे, पण ही प्रगती तिबेटच्या कल्याणासाठी नाही, ती आहे फक्त चीनच्या समृद्धीत भर घालण्यासाठी.

तिसरं म्हणजे, विश्वावर नाही पण आशियावर वर्चस्व गाजवायची चीनची इच्छा आहे. तसं उघडपणे बोललंही जातं आणि त्या प्रक्रियेतील पहिली पायरी म्हणजे तिबेटवर मिळवलेला विजय. मी काही लष्करी तज्ज्ञ नाही, पण कुणाच्याही सर्वसामान्य बुद्धीला लक्षात येईल, की डावपेचांच्या दृष्टीनं आशियातील इतर कुठल्याही देशाला तिबेटइतकं महत्त्व नाही. जवळ आधुनिक शस्त्र असतील तर इथले डोंगर म्हणजे अभेद्य बालेकिल्ल्यासारखे आहेत. इथून भारत, म्यानमार, पाकिस्तान आणि आग्नेय दिशेची आशियाई राज्यं यांच्यावर हल्ला चढवता येऊ शकतो. त्यांच्यावर वर्चस्व मिळवण्यासाठी, जसा आमचा धर्म नष्ट केला जात आहे त्या पद्धतीनं त्यांना धर्म नष्ट करता येईल आणि निरिश्वरवादी तत्त्वांचा आणखी प्रसार करता येईल. चिन्यांनी तिबेटमध्ये अठरा विमानतळ बांधले आहेत आणि देशभर लष्करी रस्त्यांचं जाळं पसरलेलं आहे. कारण त्यांना पक्कं ठाऊक आहे, की त्यांच्यावर हल्ला करायचा भारताचा इरादा नाही, त्यामुळं या लष्करी तयारीचा उपयोग पुढच्या काळातील साम्राज्य विस्ताराचा पाया म्हणून त्यांना होऊ शकतो.



दलाई लामा त्यांच्या आईसह.

आता तर माझी खात्री पटली आहे, की चिन्यांनी पहिल्यांदा जेव्हा दोन वर्षांपूर्वी

आमच्यावर आक्रमण केलं तेव्हा हेच आडाखे कमी-जास्त स्पष्टपणे त्यांच्या मनात असणार. नंतर त्यांच्या लक्षात आलं, की कायद्याचा थोडा कांगावखोरपणा केला आणि लष्करी कारवाईची दहशत दाखवली तर त्यांना तिबेट सहजी जिंकता येऊ शकतं. त्यामुळं ह्या तीन ध्येयांसाठी, खास शेवटच्या ध्येयाचा जो उल्लेख केला, त्यामुळं चिन्यांना जरी कितीही साधनसामुग्री आणि सैनिक गमवावे लागले, अपराध करायला लागले तरी तिबेट जिंकण्यासाठी प्रयत्न चालूच ठेवले पाहिजेत.

माझ्या लोकांचा जो विध्वंस झाला तो पाहता आणि ते कशासाठी जगतात ते लक्षात घेऊन, मला करता येण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत त्या करण्यासाठी मी स्वत: देशत्याग करत आहे : तिबेटमध्ये काय घडलं आणि घडत आहे त्याची संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून आणि आता या पुस्तकाच्या द्वारे आठवण करून देत राहणं; स्वातंत्र्यासाठी माझ्याबरोबर जे निसटले त्या तिबेटी लोकांची काळजी घेणं आणि भविष्यासाठी योजना तयार करणं; ह्या त्या गोष्टी.

मी माझा देश सोडल्यानंतर, जवळ जवळ साठ हजार तिबेटी माझ्यानंतर परागंदा झाले. हिमालय ओलांडताना आलेल्या अडचणींना तोंड देऊन आणि चिनी पहारेकऱ्यांना गुंगारा देत ते आले. ही माणसं काही एका विशिष्ट गटातली होती असं नव्हे. ते सारे माझे प्रतिनिधी होते. त्यामध्ये आमच्या देशात देशाचे अतिशय सन्माननीय मानले गेलेले लामा होते, निष्णात पंडित होते, पाच हजारच्या वर भिक्षू होते, काही सरकारी अधिकारी, तर काही व्यापारी आणि सैनिक, मोठ्या संख्येनं साधे-भाळे शेतकरी, भटके लोक आणि कारागीर होते. मी ज्या रस्त्यानं आलो त्याहीपेक्षा कितीतरी अवघड आणि धोकादायक रस्त्यांनी यातले अनेकजण निसटून, प्रवास करून आले. काहीजण आपली कुटुंबं बरोबर घेऊन आले. डोंगर ओलांडताना झालेल्या कष्टांमुळं काही मुलं रस्त्यातच मृत्युमुखी पडली; असंख्य माणसं लढताना कुटुंबापासून दुरावली आणि आपली बायकामुलं चिन्यांच्या तावडीत सापडली हे कळल्यावर त्यांना दुप्पट यातना झाल्या.

हे निर्वासित आता भारत, भूतान, सिक्कीम आणि नेपाळ इथल्या समाजांमध्ये विखरून गेले आहेत. भारतातील वेगवेगळ्या मतांच्या प्रतिष्ठित नागरिकांनी तिबेटी निर्वासितांसाठी एक 'मध्यवर्ती सहाय्य समिती' (सेंट्रल रिलीफ कमिटी) स्थापन केली आहे आणि आमच्या लोकांना मदत करण्यासाठी ते भारत सरकारच्या मदतीनं काम करत आहेत. इतरही अनेक देशांमधील स्वयंसेवी सहाय्य संघटनांनी पैसा, अन्न, कपडे किंवा औषधे यांच्या रूपानं मदत केलेली आहे. ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथील सरकारनं आमच्या मुलांना शिकवता यावं म्हणून भेटवस्तू पाठवल्या तर दक्षिण व्हिएतनामनं आम्हाला भेटरूपात तांदूळ पाठवला. या सर्व दयाळू मदतीबद्दल आम्ही खरोखर कृतज्ञ आहोत; आम्हांला स्थिरस्थावर होण्याची सुरुवात करताना या सर्व भेटी फार मौल्यवान ठरल्या आहेत. पण गरजेपेक्षा विनाकारण दानधर्मावर जगत राहणं आम्हांला नको आहे; जितकं लवकर शक्य आहे तितकं आम्हांला आमच्या पायावर उभं राहायचं आहे.

हे साध्य व्हावं म्हणून म्हणून भारत सरकारनं आमच्यातील बऱ्याचशा धडधाकट माणसांसाठी कामं शोधण्यात मदत केली. सध्या बरेचजण, त्यात मोठ्या संख्येनं भिक्षूही आहेत, हे रस्तेबांधणीच्या कामावर आहेत. पण भारतातल्या उष्ण हवामानात पठारावर करावी लागणारी अंगमेहनत ही डोंगराळ मुलखात राहणाऱ्या लोकांसाठी तब्येतीच्या

दृष्टीनं त्रासदायक ठरत आहे. जिथलं हवामान आमच्या देशातल्या हवामानापेक्षा फार वेगळं नसेल अशा ठिकाणी आमच्या सर्व लोकांचं पुनर्वसन व्हावं म्हणून आम्ही सरकारच्या सहानुभूतीनं आटोकाट धडपडतो आहोत. आजपावेतो दार्जिलिंग आणि डलहौसी इथं आम्ही हस्तकला केंद्र चालू केली आहेत. या दोन्ही जागा हिमालयाच्या पायथ्याच्या टेकड्यांमध्ये आहेत. इथं सुमारे सहाशे लोक उपयुक्त व्यवसायाचं शिक्षण घेत आहेत. म्हैसूर आणि आसाम इथं चार हजार लोकांना ग्रामीण वसाहतींमध्ये वसवलेलं आहे आणि इतरही योग्य जागा शोधण्याचं काम चालू आहे. उरलेल्यांपैकी त्यामानानं वयस्कर लोक शेतकरी म्हणून किंवा जंगल सफाईवर किंवा दुग्ध व्यवसायात हळूहळू काम शोधत आहेत; सोळा ते पंचवीस या वयोगटातील जास्तीत जास्त तरुणांना आम्ही तांत्रिक शिक्षण देत आहोत. जुन्या काळात आमच्याकडे याच शिक्षणाचा पूर्णपणे अभाव होता.

लहान मुलं हा माझ्या विशेष चिंतेचा विषय होता. सोळा वर्षाखालची सुमारे पाच हजारच्या वर मुलं होती. मोठ्या माणसांपेक्षा मुलांना नव्या, पूर्णपणे वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेणं आणखी अवघड होतं. त्यांच्या पहिल्या जगातून जणू त्यांना उखडून काढलं गेलं होतं. अन्न आणि हवा बदलल्यामुळं सुरुवातीच्या काही दिवसांत त्यातली कितीतरी मुलं दगावली. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीनं काहीतरी झपाट्यानं करणं आम्हांला फार गरजेचं होतं. त्याचप्रमाणं त्यांचं शिक्षण ही सुद्धा मोठी महत्त्वाची बाब होती. आम्हांला माहीत आहे, की तिबेटमधून आमची मुलं त्यांच्या पालकांपासून तोडून नेली जात आहेत आणि त्यांना तिबेटी बौद्ध म्हणून नव्हे, तर चिनी साम्यवादी म्हणून वाढवलं जात आहे. मी आधी सांगितलं आहेच, की तिबेटी मुलांनी कशाप्रकारे चिनी पंथ स्वीकारायला नकार दिला ते; पण जी मुलं अगदी तान्ही असताना नेली गेली आहेत ती मुलं - जर चिनी साम्यवाद टिकलाच तर - साम्यवादी म्हणूनच मोठी होणार हे स्पष्टच आहे. म्हणून पुढची पिढी, भारतात वाढणारी मुलं ही महत्त्वाची माणसं ठरतील. जे शांततापूर्ण धार्मिक जीवन आम्हांला परत मिळवायचं आहे त्याचा केंद्रबिंदू गाभा म्हणजे ही मुलं आहेत. त्यासाठी पायथ्याच्या टेकड्यांवर आम्ही हजार मुलांसाठी निवासी शाळा स्थापन केल्या आहेत आणि अजून आम्ही सार्‍यांच्यासाठी पुरेशा शाळा असाव्यात म्हणून तयारी करतो आहोत. सर्व निर्वासित पालक या शाळांमध्ये मुलांना पाठवायला उत्सुक आहेत. इथं ती मुलं आरोग्यपूर्ण वातावरणात आणि खरी तिबेटी म्हणूनच मोठी होतील. त्यांना तिबेटी भाषा, धार्मिक ज्ञान आणि तिबेटचा इतिहास हे मुख्य विषय म्हणून; आणि इंग्रजी, हिंदी, गणित, भूगोल, जागतिक इतिहास आणि शास्त्र हे विषयदेखील शिकवले जातात.

शाळेत जाण्याच्या वयाच्या खालची छोटी छोटी मुलं ही दुसरी एक समस्या होती. भारतातल्या हवामानाचा आणि तिबेटमध्ये क्वचितच आढळणार्‍या संसर्गजन्य आजारांचा या मुलांना सगळ्यात जास्त त्रास झाला. या मुलांना योग्य पद्धतीनं वाढवता येत नाही हे त्यांच्या पालकांना चांगलंच ठाऊक झालं होतं, म्हणून मी व्यक्तीगत पातळीवर या मुलांना संरक्षण दिलं. मी एक शिशुशाला उघडायची असं ठरवलं आणि शाळेची व्यवस्था पाहण्याचं काम माझ्या मोठ्या बहिणीच्या हातात द्यायचं ठरवलं. धरमशाला इथल्या माझ्या सध्याच्या घराजवळचे वापरात नसलेले दोन बंगले भारत सरकारनं या कामासाठी उसने दिले. या प्रयत्नाला मिळालेला प्रतिसाद

आश्चर्यकारक होता. आम्ही नक्की कुठं आहोत हे कळण्याआधीच 800 छोटी छोटी मुलं आमच्या ताब्यात काळजी घेण्यासाठी म्हणून दाखल केली गेली. माझ्या बहिणीला आणि तिच्या स्वयंसेवी मदतनिसांना या अवाढव्य कुटुंबासाठी किमान, तुटपुंज्या गरजा आयत्यावेळी जुळवाव्या लागल्या. या लहान मुलांना अजूनही आम्हांला किमान सुखसुविधाही देणं परवडत नाही, पण एक गोष्ट आम्ही निश्चित करू शकतो. या मुलांवर आमचं जिवापाड प्रेम आहे आणि निर्वासितांची मुलं जितपत आनंदी राहू शकतील तितकं आम्ही त्यांना निरोगी आणि आनंदी ठेवू शकण्यासाठी धडपडत आहोत. भारत सरकार त्यांच्यासाठी आम्हांला शिधा देत आहे आणि इतर लोक आणि स्वयंसेवी सहाय्य संघटना इतर अनेक मार्गांनी मदत करत आहेत. हळूहळू मोठ्या झालेल्या मुलांना आम्ही इतर ठिकाणच्या शाळांमध्ये पाठवून दिलेलं आहे आणि आता धरमशाला इथं आमच्याकडे सात वर्षांच्या खालची तीनशे मुलं आहेत.

धरमशाला येथील कार्यक्रमात दलाई लामा.

या प्रकारच्या कामासाठी आणि सरकारचा छोटासा केंद्रबिंदू सांभाळण्यासाठी मी 1950 मध्ये सिक्कीममध्ये साठवलेले सुवर्ण कण आणि चांदीच्या लगडी खूप उपयोगी पडल्या. मी रोख रकमेच्या बदल्यात ते विकून टाकलं. पण मला आणि माझ्या सरकारला आमच्या निर्वासितांसाठी आणि तिबेटच्या भविष्याकरिता जे काही करायचं होतं आणि करणं गरजेचं होतं, त्यासाठी ही रक्कम अजिबातच पुरणारी नव्हती.

अपरिचित अशा जगात लौकिक आयुष्याच्या गरजांची तोंडमिळवणी करताना मला आणि सर्व शरणार्थींना धर्माचा अभ्यासदेखील तितकाच महत्त्वाचा आहे. तिबेटप्रमाणंच आम्ही आमचे उत्सव, समारंभ साजरे करतो; पण अर्थात त्याला ती पूर्वीची रंगत आणि दिमाख आम्ही देऊ शकत नाही. कदाचित पूर्वीच्या काळात ते दिवस फारच भपकेदार असतील आणि आता ते कडकडीतपणे पाळणं, तितकंसं काही वावगं नाही. मी माझा धार्मिक अभ्यास चालू ठेवलेला आहे. शिवाय आधुनिक जगाच्या संपर्कात मला राहता यावं म्हणून मी इंग्रजी शिकतो आहे आणि शक्य तितकं जास्त वाचन करत आहे. माझ्या पूर्वीच्या भेटीच्या वेळी राजकारणामुळं माझा दौरा अर्धवट सोडावा लागला होता, तेव्हा भारतात बघायच्या राहिलेल्या तीर्थस्थळांची यात्रा मी केली. ख्रिश्चन, हिंदू

आणि जैन यांच्या इतरही काही पवित्र स्थळांना मी भेट दिली आणि इतर धर्माच्या लोकांशी मी चर्चा केली; आम्हा सर्वांच्यातच किती साधर्म्य आहे हे कळल्यामुळं मला फार आनंद झाला. बुद्धगया आणि बनारसच्या तीर्थयात्रेच्या वेळी मी 162 तिबेटी भिक्षूंना, भिक्षू होण्याची म्हणजे मठपद्धतीनं जीवन व्यतीत करणारे सदस्य होण्यासाठी दीक्षा दिली. मी हा पहिलाच दीक्षा समारंभ केला होता आणि मला असं जाणवलं, की जिथं भगवान बुद्धानं शिकवलं, त्याच जागी हा कार्यक्रम झाला हे किती मोठं भाग्य. आता याच बुद्धाच्या शिकवणीचा तिबेटमध्ये केवढा छळ केला जात होता.

अशा पद्धतीनं, अनेक मित्रांच्या मदतीनं, जे माझ्याबरोबर निसटून आले त्यांचं आयुष्य सुसह्य करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण अर्थात, असंख्य तिबेटी योग्य वेळेवर निसटू शकले नाहीत आणि आता ते बाहेर पडू शकत नाहीत. हिमालयाच्या पल्याड तिबेट हा अवाढव्य तुरुंगासारख्या छावणीचा आहे. तिथे राहिलेल्यांसाठी मी एकच गोष्ट करू शकतो, ती म्हणजे त्यांचा विसर पडू न देण्याची दक्षता घेणं. तिबेट फार दूर आहे आणि इतर देशांनाही त्यांची स्वत:ची काही भयं आणि संकटं आहेत. आपण जाणतोच, की तिबेटमध्ये घडलेल्या घटना इतिहासात गडप होऊन जातील, अशी मनोवृत्ती असू शकते. अजूनही, या - याच पृथ्वीवर तिबेट आहे; तिबेटी ही सुद्धा माणसंच आहेत; त्यांच्या पद्धतीनं ती सुसंस्कृत आहेत; वेदनांची त्यांनाही निश्चितच जाणीव आहे. मी असं म्हणण्याचं धाडस करू शकतो, की दुसऱ्या महायुद्धानंतर कुठल्याच लोकांना एवढं सोसावं लागलं नसेल; आणि त्यांच्या हालअपेष्टा संपत नाहीत, त्या रोजच्या रोज भोगाव्या लागत आहेत. आणि चिनी आमचा देश सोडून जात नाहीत तोवर ते हाल चालूच राहणार किंवा फार तर तिबेटी हा वंश किंवा एक धार्मिक समूह जिवंत आहे तोवर ही दु:खं राहणारच. म्हणूनच मी जगाला सातत्यानं आमच्या नशिबाबद्दल आठवण करून देतो आहे. त्यासाठी संयुक्त राष्ट्रांपुढं आमचं प्रकरण आणत आहे.

हे काम कसं करावं ते मला किंवा तिबेटी सल्लागारांना उमगलं नसतं; आणि अगदी पहिल्यांदा भारत सरकारनंही मला समजावण्याचा प्रयत्न केला होता, की मी असलं काही करू नये. पण मी दिल्लीला गेलो आणि सरकार तसंच इतर अनेक देशांच्या राजदूतांबरोबर चर्चा केली. आयर्लंड आणि मलेशिया या संयुक्त राष्ट्रांतील दोन सदस्य देशांनी आमची कळकळीची विनंती किंवा अपील प्रायोजित करून पाठिंबा देऊन पाठवलं आणि 1959 मध्ये सर्वसाधारण सभेच्या चौदाव्या सत्रात 'विषय नियामक समिती'पुढे त्यावर चर्चा झाली. सर्वसाधारण सभेनं तिबेटचा प्रश्न घ्यावा की नाही यावर मतं आजमावली गेली. त्यात अकरा जणांनी आमच्या बाजूनं आणि पाच जणांनी विरोधात मतदान केलं, तर चारजण अलिप्त राहिले. पण सोव्हिएत प्रतिनिधी मंडळानं बैठकीच्या कामकाजाबद्दल आक्षेप घेतले आणि नवीन मतदान घ्यावं अशी झेकोस्लोव्हाकियानं मागणी केली. त्यावेळी बारा जणांनी आमच्या बाजूनं आणि विरोधात शून्य मतदान राहिलं, तसंच सहाजण अलिप्त, असं मतदान झालं.

अशाप्रकारे सर्वसाधारण सभेपुढं तिबेटचा प्रश्न उठवला गेला आणि शेवटी पुढील ठराव मंजूर करण्यात आला :

सर्वसाधारण सभेचा ठराव

संयुक्त राष्ट्रांच्या सनदीमधील आणि सर्वसाधारण सभेने ***10*** डिसेंबर ***1948*** रोजी स्वीकारलेल्या 'मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा' यातील, मानवाचे हक्क आणि स्वातंत्र्य

याबद्दलच्या मूलभूत तत्त्वांची आठवण करून देणे.

इतर सर्वांप्रमाणे, मूलभूत मानवी हक्क आणि स्वातंत्र्य यांचा अधिकार तिबेटी लोकांना आहे आणि त्यात सर्वांना भेदभावाशिवाय नागरी हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्य अंतर्भूत आहे याची दखल घेणे.

तिबेटच्या लोकांची वेगळी आणि वैशिष्टपूर्ण परंपरा आहे आणि परंपरेनं त्यांनी उपभोगलेली स्वायत्तता याची जाणीव ठेवणे.

तिबेटमधील लोकांचे मूलभूत मानवी हक्क आणि आणि स्वातंत्र्य यांची जबरदस्तीने पायमल्ली होत आहे, ह्या हिज होलीनेस द दलाई लामा यांच्या अधिकृत विधानाची गंभीर दखल घेणे.

या घटनांनी आंतरराष्ट्रीय ताणतणाव वाढतो आहे आणि लोकांच्या नात्यात कटुता येते आहे. हे परिणाम शोचनीय आहेत. अशा वेळी जबाबदार नेत्यांनी जबाबदारीने, तळमळीने आणि सकारात्मक पद्धतीनं हा ताण कमी करण्याचा आणि आंतरराष्ट्रीय नाते सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1. संयुक्त राष्ट्रांची सनद आणि मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा यातील तत्त्वे, कायद्याच्या नियमावर आधारित शांततापूर्ण जगाची निर्मिती होण्यासाठी उपयुक्त आहेत यावरचा विश्वास दृढ करणे;

2. तिबेटी लोकांसाठी मूलभूत मानवी हक्क मिळण्याकरिता आणि त्यांचे स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक आणि धार्मिक आयुष्य याला आदर मिळण्याकरिता आवाहन करणे.

आमसभेची ***834*** वी बैठक
21 ऑक्टोबर ***1959***

या ठरावाला 45 जणांनी अनुमोदन दिलं, नऊ जणांनी विरोधी मतदान केलं आणि 26 जण अलिप्त राहिले.

मला अशी अपेक्षा होती, की आंतरराष्ट्रीय मताची चिनी काहीतरी दखल घेतील; पण त्यांच्यावर तसा काही लक्षणीय परिणाम झाला नाही. काहीही असलं तरी कायम अन्यायाविरुद्ध निषेध व्यक्त करणंच योग्य असतं, मग त्या निषेधानं अन्याय थांबो किंवा न थांबो; परंतु आमच्या विनंतीला अनेक देशांच्या प्रतिनिधींनी मोठ्या प्रमाणात जो पाठिंबा दिला त्यानं आम्हाला प्रोत्साहन मिळालं. एक मात्र दुःखद होतं, की आमची बाब म्हणजे शीतयुद्धाचा एक भाग म्हणून गणली गेली. जगात सध्या जी परिस्थिती आहे त्यात हे होणं अटळ होतं, पण असं व्हायला मात्र नको होतं. तिबेटवरचं आक्रमण हे मूलभूतरित्या साम्यवादी कारवाई नव्हती. सुरुवातीला चीन सरकारनं आमच्यावर आक्रमण केलं किंवा तसं करण्याचा प्रयत्न केला; काउमिंगतांग सरकारनं 1930 मध्ये निष्फळ प्रयत्न केला. चीन हा देश साम्यवादी झाल्यामुळं ही आक्रमणं तिबेटी लोकांच्या बाबतीत आणखी तीव्र, आणखी कठोर झाली; परंतु संयुक्त राष्ट्रांमध्ये इतर साम्यवादी शक्तींना चीनच्या बाजूनं मत देणं भाग पडलं. असं असलं तरी त्या सर्वांना चीनची कृती मान्य असेलच, यावर माझा विश्वास बसू शकत नाही.

या ठरावाला मिळालेल्या पाठिंब्यानं मला मोठं समाधान मिळालं, पण यावरच थांबावं असं मात्र वाटलं नाही. जेव्हा ठराव संमत झाला, तेव्हा कायदेतज्ज्ञांच्या आंतरराष्ट्रीय मंडळाचा दुसरा वृत्तांत आलेला नव्हता, आणि सर्वसाधारण सभेच्या

सदस्यांना, चीनच्या दुष्कृत्यांबद्दल तसंच तिबेटमध्ये घडलेल्या वंशविच्छेदाच्या गुन्ह्याबद्दल, तज्ज्ञ मंडळाने काढलेल्या निष्कर्षाचा संपूर्ण भाग सांगितला गेलेला नव्हता. म्हणून मग 1960 मध्ये 'अॅफ्रो एशियन कौन्सिल'च्या महत्त्वपूर्ण मदतीनं हा विषय पुन्हा सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमापुढं मांडण्यात आला. याला यावेळी थायलंड आणि तेव्हाच्या मलायानं प्रायोजित केलं आणि आयर्लंडनं सह-प्रायोजक म्हणून काम केलं. सॅन साल्हाडोर यालाही सह-प्रायोजक म्हणून काम करण्याची इच्छा होती; परंतु त्या सत्रात, आफ्रिकेतील घटनांना प्राधान्य मिळालं आणि तिबेटचा मुद्दा रोज पुढं ढकलला गेला. आणि आमच्या वादासाठी वेळ काढण्याआधी सभा तहकूब झाली.



नोबेल पारितोषिक विजेते दलाई लामा.

संयुक्त राष्ट्रांमध्ये आमचा प्रश्न जागवत ठेवण्याचा प्रयत्न मी करतच राहणार कारण आमच्यासारख्या छोट्या अन् अन्यायग्रस्त देशांसाठी आणि खरोखर जगासाठी संयुक्त राष्ट्रे हे आशेचं एकमेव स्थान आहे. कारण परदेशात आम्हांला असा समज होऊ द्यायचा नाही, की तिबेट हा चिनी साम्यवादाचं वर्चस्व कधीतरी मान्य करून टाकेल; कारण मला माहित आहे, की तसं कधीच होणार नाही.

हे खरंच आहे, की तिबेट पुन्हा पूर्वीसारखा राहणार नाही, पण आम्हालाही तसं व्हायला नको आहे. जगापासून तिबेट अलिप्त राहू शकणार नाही आणि पुन्हा तो पूर्वीच्या, प्राचीन थोड्याशा सरंजामी पद्धतीकडे वळू शकणार नाही. चिन्यांनी मला थांबवण्याच्या अगोदरपासून मी ज्या सुधारणा घडवून आणायला सुरुवात केली होती त्याबद्दल मी आधीच सांगितलं आहे. आता मी हद्दपार असताना त्याच सुधारणा तर्कशुद्ध निष्कर्षापर्यंत नेतो आहे; त्यासाठी भगवान बुद्धाची तत्त्व आणि मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनाम्याच्या तत्त्वांवर आधारित अशी नवीन, उदार आणि लोकशाही

घटना तिबेटसाठी घडवण्याचं काम चालू आहे. तिचा मसुदा तयार करण्यासाठी घटनेच्या कायद्याच्या जाणकारांची मदत घेतो आहोत. हे काम अजूनही संपलेलं नाही. जेव्हा ते होईल, तेव्हा ते मी तज्ज्ञांच्या आंतरराष्ट्रीय समितीपुढं ठेवीन, नंतर हद्दपार असलेल्या माझ्या लोकांसमोर मांडीन; आणि तिबेटमधल्या जितक्या लोकांपर्यंत पोहोचवणं मला शक्य होईल तितक्या लोकांपर्यंत मी तो मसुदा पोहोचवेन. मग मला अशी आशा आहे, की लोक प्रतिनिधीक सभा निवडतील आणि जो मुक्त देश पाहायची आम्हा सर्वांना आस आहे त्यासाठी लोकच त्यांच्यासाठी हंगामी घटना तयार करतील.

एका लोकप्रतिनिधी गृहासाठी माझा प्रस्ताव असेल. या गृहात लोकांना पूर्ण प्रतिनिधीत्व आणि विशेष महत्त्वाच्या बाबींना पुरेसं प्रतिनिधीत्व मिळालं पाहिजे. नवीन कायद्यांना या गृहाकडून बहुमतानं मान्यता मिळाली पाहिजे आणि घटनात्मक दुरुस्तीसाठी तीन-चतुर्थांश बहुमत मिळालं पाहिजे. जागतिक, प्रौढ मतदान पद्धतीनं निवडणुका व्हायला पाहिजेत, यात भिक्षूदेखील अंतर्भूत आहेत. तिबेटमध्ये याला कुठलीच अडचण येणार नाही. आमची लोकसंख्या कमी आहे आणि लोक बुद्धिमान आहेत. आणि जरी पूर्वी आमच्या लोकांना राजकारणात रस नव्हता, तरी गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांना त्यांचं स्वत:चं मत तयार करावं लागलं आहे.

प्राचीन काळापासून तिबेट हा अविभक्त राज्य म्हणून होता, आणि आता लोकांना आणि तिबेट सरकारला ज्या परिस्थितीला तोंड द्यावं लागेल त्यात सत्तेचं केंद्रीकरण जास्त महत्त्वाचं ठरेल. ज्यामुळं आमच्या लोकांच्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कलह निर्माण होतील किंवा विभागीय किंवा स्थानिक पातळीवर फायदा साधण्यासाठी कल निर्माण होईल आणि ज्याचा राष्ट्रहितावर परिणाम होईल अशा कुठल्याही संस्थेची स्थापना करण्याच्या मी विरुद्ध आहे. आम्ही लोकांनी एकसंध राहणं, संघटित राहणं हाच आमचा प्राथमिक हेतू असला पाहिजे.

मला असा सल्ला मिळाला, की लोकप्रतिनिधी गृहासारखी पद्धती नको तर अध्यक्षीय पद्धती स्वीकारावी. यामध्ये मंत्रिमंडळ नेमलं जाईल. त्यात काही गोष्टी संरक्षित असतील आणि दलाई लामा हा राज्यप्रमुख असेल. म्हणून मी असा प्रस्ताव मांडतो, की दलाई लामा त्याच्या मंत्र्यांची नेमणूक करेल, जे लोकप्रतिनिधीगृहात मुक्तपणे विचार मांडतील पण मतदान करणार नाहीत; एखाद्या मंत्र्याला हलवायचं असेल तर लोकप्रतिनिधीगृह तशी विनंती करू शकतं; जर या प्रश्नावर लोकप्रतिनिधीगृहाचं मत दलाई लामाला मान्य नसेल तर सर्वोच्च न्यायालयाचा आदेश दोघांवरही बांधील राहील.

मंत्रिमंडळाप्रमाणेच काही बाबींची काळजी घेऊन सर्वोच्च न्यायालयाची नेमणूक व्हावी. राज्याच्या हितासाठी गरज असेल तर दलाई लामाला सुद्धा त्याच्या सत्तेला मुकावं लागलं तरी हरकत नाही. त्यासाठी घटनेतील कायद्याच्या आणि न्यायालयीन प्रक्रिया असतील.

जेव्हा दलाई लामा अल्प मतात असेल किंवा मृत्यू म्हणा, विकलांगता म्हणा किंवा सत्ता गमावली जाणं अशा काही कारणांमुळं दलाई लामा सत्तेचा वापर करू शकत नसेल, तर त्याची जागा दोन-तृतीयांश मतांनी लोकप्रतिनिधी मंडळानं निवडून दिलेल्या, तीन किंवा पाच सदस्यांच्या राजप्रतिनिधी मंडळानं घ्यावी.

ही घटना आणि त्याच्याशी निगडित प्रश्नांची काही प्रमाणात आता सविस्तर

मांडणी झाली आहे, पण अजून त्याला अंतिम रूप यायचं आहे आणि मी ही जी रूपरेखा सांगितली आहे, त्यातही बदल होऊ शकतो. खूप काम व्हायचं आहे आणि तिबेटच्या लोकांनी ते मान्य करणं किंवा त्यांचं स्वत:चं मत व्यक्त करणं बाकी आहे. पण माझा स्वत:चा दृढ विश्वास आहे, की सरकार हे नेहमी लोकांच्या मतानं आणि सहकार्यानं स्थापन व्हायला पाहिजे. लोक मला जी जी कामं करायला सांगतील ती करायला मी तयार आहे, पण मला व्यक्तिगत सत्ता किंवा संपत्तीची अजिबात अभिलाषा नाही. मला नि:संशय असं वाटतं, की या उत्साहानं, धर्माच्या मार्गदर्शनानं, आमचे जे काही प्रश्न आहेत ते परस्पर सहकार्यानं सोडवू. जसा आलिप्त तिबेट आनंदी होता, तसा नव्या जगातल्या आनंदी तिबेट आम्ही घडवू.

आता जे काही करायचं आहे ते सारं काही भविष्याकरिता. भूतकाळाकडे मी जेव्हा वळून पाहतो तेव्हा मी शेवटपर्यंत अहिंसेचं धोरण पाळलं याचा मला अजिबात खेद वाटत नाही. आमच्या धर्मातील सर्व काही महत्त्वाचे दृष्टिकोन विचारात घेता, हे एवढंच धोरण अंगिकारणं काय ते शक्य होतं. अजून मला असं वाटतं, की माझ्याप्रमाणेच माझ्या लोकांना त्याचं अनुसरण करता आलं असतं, तर आता आहे त्यापेक्षा तिबेटची परिस्थिती जरा बरी राहिली असती. एखाद्या माणसानं कोणताही गुन्हा केलेला नाही परंतु त्याला पोलिसांनी अटक केलेली आहे - अशा उदाहरणाशी आमच्या परिस्थितीची तुलना केली जाऊ शकते. संघर्ष करावा ही त्याची मूलभूत प्रेरणा असू शकते, पण तो निसटून जाऊ शकत नाही; एका मोठ्या सत्तेशी तो टक्कर घेतो आहे; अखेरीस त्यानं शांतपणानं निघून जाणं आणि न्यायाच्या अंतिम सत्तेवर विश्वास ठेवून जगणं, हेच अधिक श्रेयस्कर ठरतं. पण तिबेटमध्ये हे अजिबात होऊ शकत नाही. माझे लोक चिन्यांना किंवा त्यांच्या सिद्धांतांना अजिबातच स्वीकारू शकत नाहीत आणि संघर्षाची त्यांची मूलभूत प्रेरणा दबून राहू शकत नाही.

माझ्या देशात चिन्यांनी जी दुष्कृत्य केली आहेत, त्यामुळे माझ्या मनात चिनी लोकांबद्दल घृणा नाही. सध्याच्या जगाला हा एक मोठा शाप आहे किंवा धोका आहे, की व्यक्तींनी केलेल्या गुन्ह्यांबद्दल सरसकट त्यांच्या देशांनाच दोष देणं. मला खरंच वाटतं, की निवडक चिन्यांसारखी आकर्षक आणि सुसंस्कृत माणसं आणि दुष्टातल्या दुष्ट, अतिशय क्रूर आणि दुष्ट चिनी माणसांसारखी माणसं जगात क्वचितच आढळतील. तिबेटमध्ये केली गेलेली दुष्कृत्यं ही अत्यंत हीन दर्जाच्या सैनिकांकडून आणि साम्यवादी अधिकाऱ्यांकडून घडली आहेत. 'जीवन-मृत्यूवर त्यांची सत्ता आहे' एवढ्याच ज्ञानानं ते भ्रष्ट बनले होते. त्यांनी जी कृत्य केली ती कळली तर बहुतेक चिनी माणसांना शरम वाटेल; पण अर्थात, त्यांना त्यांची अजून काहीच कल्पना नाही. ज्यांनी आमच्याबाबत अपराध केले त्यांचा आपण सूड घेणं किंवा त्यांच्या बाबतीत आणखी अपराध करून उत्तर देणं योग्य नाही. आपण कर्मसिद्धांतानं त्यांचा विचार करूया, कारण पुढच्या जन्मात अतिशय हीन दर्जाचं हालअपेष्टांचं आयुष्य मिळण्याचा त्यांना धोका आहे. प्रत्येक जीवमात्राच्या बाबतीत आपलं जे कर्तव्य आहे, तेच आपण केलं पाहिजे. त्यांना निर्वाणाच्या दिशेनं वर उठण्यासाठी मदत केली पाहिजे, पुनर्जन्माच्या कनिष्ठ पातळ्यांवर जाऊन बुडण्यासाठी नव्हे! चिनी साम्यवाद बारा वर्ष टिकलेला आहे; पण आमची श्रद्धा 2,500 वर्ष टिकलेली आहे. भगवान बुद्धाचं अभिवचन आहे, की दुसरा बुद्ध येऊन पुनर्मांडणी होईपर्यंत ही श्रद्धा टिकणारच.

सध्याच्या लष्करी सत्तांच्या प्रचंड प्रभावाच्या दिवसात जनता केवळ आशेवर जगते आहे. जर शांतीमय, समाधानी घर आणि कुटुंबाचं वरदान मिळालं तर हे निरोगी वातावरण तसंच राहवं, आपली मुलं आनंदात मोठी व्हावी अशी त्यांना आशा वाटते आणि जर आमच्याप्रमाणं त्यांची घरं हरवली तर आशा, श्रद्धा यांची, त्यांना वाटणारी गरज अधिक वाढते. शेवटचं सांगायचं तर, सर्व माणसं कशाची आशा करतात तर केवळ 'मनाची शांती' राहवी म्हणून. तिबेटी लोकांचं धैर्य आणि अजूनही मानवजातीत शिल्लक असलेलं सत्य आणि न्यायाबद्दलचं प्रेम - यांच्यामध्ये माझी आशा सामावलेली आहे; आणि माझी श्रद्धा आहे भगवान बुद्धाच्या करुणेत.

परिशिष्ट - 1
तिबेटमधल्या बौद्ध धर्माची रूपरेखा

आपल्या वर्तमान जीवनात धर्माची गरज

फक्त ऐहिक प्रगतीमुळं चिरकाल टिकणारं सुख किंवा समाधान मिळू शकत नाही, हे धर्माचा अभ्यास करण्यामागचं एक कारण आहे. खरंच, असं दिसतंय की जितकी ऐहिक प्रगती जास्त होत जाईल, तितकं जास्त आपल्याला भीतीच्या छायेत जगावं लागेल. शास्त्रीय तांत्रिकतेनं प्रगतीचे उत्कृष्ट टप्पे गाठले आहेत आणि नि:संशय त्याची प्रगती, सुधारणा होत राहील. माणूस चंद्रावर पोहोचेल आणि मानवासाठी तिथल्या साधनसामग्रीचा फायदा करून घेण्याचा प्रयत्न करेल. हा चंद्र जुन्या पिढीतल्या काहीजणांसाठी त्यांच्या देवाची जागा म्हणून श्रद्धेचा विषय होता; आणि ग्रहांवरसुद्धा विजय मिळवला जाईल. कदाचित शेवटी, या प्रगतीमुळं आपल्या परग्रहावरचे संभाव्य शत्रू उघड होतील. पण कोणत्याही परिस्थितीत, त्यामुळं निर्णायक अन् चिरस्थायी सुख हे काही मानवासाठी आणलं जाणार नाही; कारण ऐहिक प्रगतीमुळं नेहमीच आणखी पुढच्या प्रगतीला चालना मिळते, त्यामुळं तिच्यामुळं जे सुख येतं ते क्षणिक असतं. परंतु उलट पाहिलं तर, जेव्हा सुख आणि समाधानाचा आनंद मन घेतं तेव्हा लौकिक कष्ट हे सहन करायला सोपे जातात; जर हे सुख निखळपणे मानसिक असेल, तर ते खरं आणि चिरकाल टिकणारं सुख ठरतं.

आध्यात्मिक आचरणामुळं मिळणाऱ्या आनंदाची बरोबरी दुसऱ्या कशाच्याच बरोबर होऊ शकत नाही. हा आनंद सर्वात मोठा आनंद असतो आणि तो स्वभावत: अंतिम असतो. निर्णायक असतो. हा आनंद मिळवायचा मार्ग वेगवेगळ्या धर्मांनी आपापल्या पद्धतीनं दाखवून दिला आहे.

धर्माचा अभ्यास करण्याचं दुसरं कारण असं आहे, की आपण ऐहिक सुखाचा जाणवण्याइतका आनंदा घेण्यासाठीही धर्मावर अवलंबून असतो. सुख आणि दु:ख, सर्वसाधारण अर्थानं, फक्त बाह्य घटकांमुळं निर्माण होतं असं नाही, तर आंतरिक घटकांमुळंसुद्धा ते निर्माण होऊ शकतं. जर आतून प्रतिसाद मिळाला नाही, तर सुख-दु:खांवर बाह्य घटकांचा कोणताही परिणाम होत नाही. हे आंतरिक घटक म्हणजे आपल्या पूर्वीच्या कर्मांचे परिणाम किंवा आपल्या मनावर राहिलेले ठसे असतात; जेव्हा जेव्हा आपण बाह्य घटकांच्या संपर्कात येतो, तेव्हा तेव्हा आपण पुन्हा सुख-दु:खाचा आनंद घेतो. अशिक्षित किंवा बेशिस्त मन हे वाईट कृतींबद्दल दृष्ट विचार व्यक्त करतं आणि त्या कृत्यांचे दृष्ट परिणाम मनावर राहून जातात; ज्याक्षणी बाह्य जगाकडून चालना मिळते, तेव्हा पूर्वीच्या कृत्यांचे आनुषंगिक परिणाम मनाला भोगायला लागतात. म्हणून, जर आपल्याला दु:खं भोगावी लागत असतील, तर भूतकाळात दूरवर त्यांची कारणं असतात. सर्व सुखं आणि दु:खं यांचं उगमस्थान मन असतं, कारण धर्माशिवाय या मनाला संयमित करता येत नाही, म्हणून तर धर्माची गरज भासते.

आपल्या भविष्यातील जीवनासाठी धर्माची गरज

मृत्यूनंतरही जीवन असतं हे आपल्याला कसं कळतं? बौद्ध तत्त्वज्ञानानुसार जरी कारण आणि कार्य यांचं स्वरूप वेगळं असलं तरी त्यांच्यात समान, आवश्यक गुण असणं

गरजेचं असतं, त्यांच्यात निश्चित असं नातं लागतं; अन्यथा त्याच त्या कारणाचा परिणाम तसाच होणार नाही. उदाहरणार्थ, माणसाच्या शरीराचा बोध होऊ शकतो - त्याला आकार आणि रंग असतो - आणि म्हणून, त्याचा जो तत्संबंधी स्रोत किंवा कारण असेल त्यामध्येही तसेच गुण असावे लागतात; परंतु मन निराकार असतं आणि म्हणून त्याचा स्रोत किंवा कारण हे सुद्धा निराकारच असणार. तुलना करून दाखवायची तर असं म्हणता येईल, की औषधी वनस्पतीच्या बियांमध्ये औषध करता येण्याचे गुण असतात आणि विषारी वनस्पतीच्या बियांमध्ये विष तयार करण्याचे गुण असतात.

बऱ्याचशा जीवांना जड शरीर असतं. (काही पातळ्यांवर अस्तित्व हे फक्त मानसिक असतं.) गर्भाची उत्पत्ती होते तेव्हा या जीवनात शरीर आणि मन यांची सुरुवात होते. जड शरीर मिळण्यामागचं दृश्य कारण असतं त्याचे पालक. पण जड घटकद्रव्यांपासून मन तयार होऊ शकत नाही किंवा मनापासून जड द्रव्य तयार होऊ शकत नाही. त्यामुळं मनाच्या निर्मितीमागचा स्रोत म्हणजे एक मनच असलं पाहिजे आणि ते गर्भधारणेच्याही आधी अस्तित्वात असलं पाहिजे. पूर्वीच्या मनाचं सातत्य हे मनाच्या ठिकाणी असलं पाहिजे. पूर्वजन्माचं अस्तित्व दाखवायला आमच्या मते हा पुरावा ठरतो. अनेक प्रौढ माणसं आणि मुलं यांना त्यांच्या गतजन्माच्या स्मृती असतात, हे दृष्टीत्पत्तीस आलेलं आहे. ही घटना काही ऐतिहासिक नोंदीमध्ये आढळते असं नाही, तर आजही दिसून येते. या आधारावर आपण निष्कर्ष काढू शकतो, की गतजन्म असतो आणि म्हणून भविष्यकाळातही जीवन असणारच. जर मृत्यूनंतरच्या जीवनावर विश्वास स्वीकारला तर धार्मिक आचरण हे गरजेचं ठरतं, कारण भविष्यातील जन्माच्या तयारीसाठी धर्माची जागा दुसरं काहीही घेऊ शकत नाही.

जगातील अनेक धर्मांपैकी एक :
बौद्ध धर्म आणि त्याचा संस्थापक

जसं एखाद्या विशिष्ट रोगावर, जगात विविध पद्धतींनी औषधोपचार होऊ शकतो, तसंच माणसाला आणि इतरांना आनंद मिळावा म्हणून अनेक धर्म असतात. वेगवेगळ्या प्रतिपादकांनी, विविध काळांमध्ये आणि विविध मार्गांनी, वेगवेगळ्या सिद्धातांचा परिचय करून दिलेला आहे. पण माझा असा ठाम विश्वास आहे, की मूलत: सारयांचं उदार ध्येय हेच असतं, की मन, शरीर आणि वाणी यांच्या व्यवहाराला वळण लागावं म्हणून नैतिक तत्त्वांची शिकवण देणं. ते सारे धर्म आपल्याला शिकवतात, की खोटं बोलू नये किंवा खोटी साक्ष देऊ नये किंवा चोरी करू नये किंवा दुसऱ्यांचा प्राण घेऊ नये आणि साधारणपणे याच पद्धतीचं जीवन असतं. म्हणून विभिन्न धर्मांच्या अनुयायांमधील दुफळी कमी झाली तर फार बरं होईल. अनेक धर्मांमधील एकता ही काही अशक्य कल्पना नाही. ती शक्य आहे. जगाच्या सध्याच्या परिस्थितीत तर ती विशेष महत्त्वाची आहे. सर्व प्रकारच्या श्रद्धावान माणसांना परस्परांबद्दलचा आदर हा उपकारक ठरेल; आणि जे अश्रद्ध आहेत त्यांनाही या एकतेचा उपयोग होईल, कारण या मतैक्यांचा प्रकाशाचा ओघ त्यांना त्यांच्या अज्ञानातून वाट दाखवेल. सर्व धर्मांमधल्या निर्दोष अशा एकतेच्या अत्यावश्यकतेवर म्हणूनच मी ठासून भर देतो. यामुळं काय होईल, की एका धर्माच्या अनुयायांना दुसऱ्या धर्माबद्दल काहीतरी माहिती होईल आणि म्हणूनच

तिबेटमधल्या बौद्ध धर्माबद्दल मी जरा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणार आहे.

मला सुरुवातीला सांगितलं पाहिजे, की आम्ही तिबेटमध्ये बौद्ध धर्माच्या ज्या तात्त्विक संकल्पना - त्यांचे शब्द वापरतो, त्यांच्यासाठी चपखल असे इंग्रजी शब्द मिळणं फार अवघड आहे. आताच्या घडीला असा विद्वान सापडणं फार कठीण आहे, की ज्याला इंग्रजीचं आणि तिबेटी बौद्ध तत्त्वज्ञान तसंच धर्म या दोहोंचं अचूक ज्ञान असेल. ज्यांच्यावर विसंबून राहता येईल असे सप्रमाण अनुवादही कमी आहेत. पूर्वी जी पुस्तकं लिहिली गेली किंवा जे अनुवाद झाले त्यांच्यामुळे बौद्ध धर्माची मोठी सेवा झाली; पण त्यांच्यापैकी काही पुस्तकं हे स्वैर अनुवाद आहेत आणि त्यांच्यामुळे वरवरचा अर्थ काय तो कळतो. मला अशी आशा, की भविष्यात ही समस्या हळूहळू सोडवली जाईल, त्यामुळं आमच्या धर्माचे सारगर्भ पैलू हे इंग्रजीत मांडता येऊ शकतील. त्यामुळं, या परिशिष्टात काहीसं मुक्त भाषांतर वापरलं जात आहे. इंग्रजीतून केलेली मांडणी जास्तीत जास्त साधी-सरळ व्हावी हा त्या मागचा उद्देश आहे. मी स्वत: तिबेटी भाषेत जास्त आत्मविश्वासानं या गोष्टी लिहू शकतो आणि इंग्रजी भाषेतील सुयोग्य शब्दांच्या निवडीसाठी मला इतरांवर अवलंबून राहवं लागतं.

माझ्या कथेत मी आधीच स्पष्ट केलं आहे, की आम्ही बौद्ध यावर विश्वास ठेवतो, की सर्व जीव पुनर्जन्म घेतात; जीवनांच्या मालिकांमधून झगडत, बुद्धत्त्वाच्या पूर्ततेकडे जातात. हे पूर्णत्व एका जन्माच्या कालावधीत मिळवता येतं हे आम्ही गृहीत धरत नाही, पण ते शक्य असू शकतं.

माणसाच्या मन आणि शरीरामध्ये आम्ही मनाला श्रेष्ठ मानतो; वाचा आणि शरीर हे दोन्हीही त्याच्या अधीन असतं. मनाचं जे स्वाभाविक स्वरूप असतं त्यावर पापांचा परिणाम होत नाही. तात्त्विकदृष्ट्या मन हे शुद्ध असतं. पापं म्हणजे बाह्य किंवा दुय्यम मनाचे दोष असतात. आत्मसाक्षात्काराचा, ज्ञानाचा शोध घेताना बाह्य मनांचे हे दोष एकेक करत दूर होत जातात आणि जेव्हा एकही दोष त्यांच्यात शिल्लक राहत नाही, तेव्हा सत्य असं पूर्णत्व किंवा बुद्धत्व याची प्राप्ती होते.

आमचा असा विश्वास आहे, की सध्याच्या कल्पात श्रेष्ठ बुद्धाचे हजारो अवतार या जगात येतील. पूर्णत्व मिळण्याआधी हे बुद्ध म्हणजे आपल्यासारखीच जिवंत माणसं होती. त्यांना त्यांच्या मनाचे, शरीराचे आणि वाचेचे पुनरावतार (किंवा रूपांतर) एका क्षणार्धात अनेक रूपांमध्ये प्रक्षेपित करता येण्याची शक्ती असते. आपल्यासारख्याच कोट्यवधी जगांमधल्या सर्व जिवंत प्राणिमात्रांना त्यामुळं फायदा होऊ शकतो. यापैकी प्रत्येक श्रेष्ठ दर्जाचा असा अवतार त्याच्या स्वत:च्या सिद्धांताची शिकवण देईल आणि सर्वांच्या मुक्तीसाठी चिरंतन प्रयत्न करत राहील.

भगवान बुद्ध किंवा ज्याला गौतम बुद्ध म्हटलं जातं तो या हजारो बुद्धांपैकी एक आहे असं आम्ही मानतो. भारतात 2,500 वर्षांपूर्वीच्याही काळात तो राजघराण्यात जन्माला आला. आयुष्यातील पहिली काही वर्षे तो राजपुत्रासारखा राहिला; पण त्याला दु:खाच्या घटनांचा परिचय झाला अन् माणसाच्या अस्तित्वाची अस्थिरचा त्याला जाणवली. त्यामुळं त्यानं त्याचं राज्य सोडलं आणि संन्यस्त आयुष्याकडे तो वळला. सर्वसामान्य जीवाच्या मर्यादित दृष्टिकोनातून पाहिलं तर त्याच्या आयुष्यात बारा मुख्य घटना दिसतात : तुषित स्वर्गातून त्याचं येणं, जन्म, शिक्षण, विवाह, सर्वसंगपरित्याग, तपश्चर्या, बोधी या ज्ञानवृक्षाखाली ध्यानधारणा, मार या प्रलोभकाचा पराजय,

बुद्धत्वाची प्राप्ती, ज्ञानदान आणि संसारातून निवृत्ती (अस्तित्वाचं चक्र म्हणजे संसार).

इतर बुद्धांपेक्षा त्याची शिकवण वेगळी ठरते. कारण बहुतेकांनी सूत्र (म्हणजे तत्त्वांचे ग्रंथ) शिकवली, पण त्यानं तंत्रंदेखील शिकवली. (तंत्र म्हणजे आध्यात्मिक पद्धतीसाठीचे आदेश किंवा सूचना.)

बुद्धगया या ठिकाणी त्याला आत्मसाक्षात्कार किंवा पूर्ण बुद्धत्व प्राप्त झाल्यानंतर त्यानं तीन प्रवचनं दिली. भारतातील बिहारमध्ये तीन वेगवेगळ्या जागी ही प्रवचनं दिली. पहिलं होतं वाराणसीला (आधुनिक बनारस). ते होतं चार आर्यसत्यांवर. त्यांच्याबद्दल मी अधिक सांगणार आहे. ते मुख्यत्वे श्रावकांसाठी होतं. श्रावक म्हणजे श्रोता. श्रोते म्हणजे असे लोक, की ज्यांना काही आध्यात्मिक देणगी आहे पण दृष्टिकोन मर्यादित आहे. दुसरं प्रवचन झालं गृध्रकूट येथे. ते होतं शून्यतेवर. निर्णायक स्व-भावाचं नास्तित्व म्हणजे 'न असणं' यावर. याचा मी पुन्हा उल्लेख करेन. महायानी लोकांना उद्देशून हे प्रवचन होतं. महायानी हे अत्यंत विद्वान लोक होते. तिसरं प्रवचन झालं वैशाली इथं. हे प्रवचन काहीशा कमी आकलनाच्या महायानी लोकांना उद्देशून होतं.

अशाप्रकारे त्यानं महायानी आणि हीनयानी लोकांना (महायान आणि हीनयान हे बौद्धांचे दोन प्रमुख पंथ आहेत.) फक्त सूत्रांचा उपदेश दिला नाही तर वज्रधर या स्थानावर पोहोचूनसुद्धा त्यानं महायान्यांना अनेक तंत्रांचा उपदेशही दिला. तिबेटी भाषेत क-ग्युर या शीर्षकाखाली जी महान ग्रंथांची भाषांतरं झाली ती सर्व भगवान बुद्धाची शिकवण आहे.

सूत्र आणि तंत्र या दोन्हीत 'क-ग्युर'ची विभागणी झालेली आहे. सूत्राची पुन्हा तीन गटात विभागणी होते : विनय म्हणजे नैतिक आचरणाची शिकवण; सुतंत्र आहे ध्यानावर आधारित; आणि अभिधर्म आहे भावातीत ज्ञानासंबंधित तत्त्वज्ञान. या तिहेरी विभागणीला त्रिपिटक म्हणतात, आणि संस्कृतमध्ये त्यांच्या मूलभूत तत्त्वांना शील, समाधी आणि प्रज्ञा म्हटलं जातं 'क-ग्युर'च्या तांत्रिक भागाचे चार उपविभाग पडतात. तंत्राचे हे उपविभाग तिबेटमध्ये सूत्रांच्या किंवा त्रिपिटकाच्या सुतंत्र या गटात सामावले जातात.

तिबेटमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार

भारतातून बौद्ध धर्म तिबेटमध्ये यायच्या आधी आमच्या देशात बोन हा धर्म मोठ्या प्रमाणात पसरलेला होता. जवळच्या शङ्-शुङ् या देशात त्याचा उगम होता आणि अगदी अलीकडच्या काळापर्यंत बोनच्या अनुयायांची तिबेटमध्ये केंद्रं होती. सखोल अभ्यास आणि ध्यानधारणेत हे अनुयायी गढलेले असत. मला वाटतं, सुरुवातीच्या काळात हा काही फारसा उपयुक्त धर्म नसावा. पण तिबेटमध्ये जेव्हा बौद्ध धर्म तरारू लागला, तेव्हा बोनलाही धार्मिक तत्त्वज्ञान आणि ध्यानाचे मार्ग यांनी स्वतःला संपन्न करून घ्यायची संधी मिळाली.

सुमारे हजार वर्षांपूर्वी 'ल्ह-थो-थोरि ञनचन' या तिबेटच्या राजानं आमच्या देशाला बौद्ध धर्माची ओळख करून दिली. धीम्या गतीने त्याचा प्रसार झाला. काळाच्या ओघात भारतातून अनेक ख्यातनाम पंडित तिबेटमध्ये आले आणि त्यांना सूत्रग्रंथ तसंच तंत्रग्रंथ यांची टीकेसह भाषांतरं केली.

या कामाला इसवी सनाच्या दहाव्या शतकात 'लङ् दरमा' या निधर्मी राजाच्या राजवटीत खीळ बसली. पण तात्पुरतं लागलेलं हे ग्रहण लवकरच सुटलं आणि बौद्ध धर्म ताज्या दमानं पुन्हा पसरला. पूर्व आणि पश्चिमेकडच्या तिबेटमधल्या भागांपासून त्याची सुरुवात झाली. लवकरच पुन्हा भारतीय आणि तिबेटी विद्वान धार्मिक भाषांतरांमध्ये गुंग झाले आणि त्या कामासाठी आमच्या देशाला ख्यातकीर्त पंडीत भेटी देऊ लागले. पण तिबेटमध्येच इथलेच विद्वान तयार होऊ लागले तसतसं भारत आणि नेपाळमधून तिबेटमध्ये येणाऱ्या विद्वानांची संख्या हळूहळू कमी होऊ लागली.

तिबेटमधल्या बौद्ध धर्माच्या नंतरच्या काळात, नंतरच्या भारतीय बौद्ध धर्माच्या शाखेपेक्षा आमचा धर्म स्वतंत्ररित्या वाढला; पण मूलतः तो भगवान बुद्धाच्या शिकवणीवर आधारित असाच राहिला. त्याच्या मुळातल्या सारतत्त्वांमध्ये तिबेटी लामांकडून कधीही बदल झाले नाहीत किंवा भर पडली नाही. त्यांच्या टीका, भाष्ये हे 'टीका' म्हणूनच वेगळ्या राहिल्या आणि त्यांना सातत्यानं भगवान बुद्धाच्या मुख्य शिकवणीचे किंवा भारतीय पंडितांचे संदर्भ देत आपले काम केले.

या कारणाखातर भारतात शिकवल्या जाणाऱ्या मुळातल्या बौद्ध धर्मापासून, तिबेटी बौद्ध धर्माला वेगळं काढणं किंवा काही लोक म्हणतात तसं त्याला 'लामाइझम' म्हणणं मला बरोबर वाटत नाही. हे खरंय, की स्थानिक परिस्थितीमुळं दुय्यम गोष्टींमध्ये फरक पडले; उदाहरणार्थ, वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी आमच्या वस्त्रप्रावरणात बदल झाला. पण मला असं वाटतं, की ज्याला भगवान बुद्धाची सूत्र आणि तंत्रांसहीत संपूर्ण शिकवण समजून घ्यायची आहे, त्याला तिबेटी भाषा आणि तिबेटी ग्रंथांचा सर्वांगीण अभ्यास करणं गरजेचं आहे.

तिबेटमध्ये बौद्ध धर्म काही एकदम आणला गेला नाही, हे आपण पाहिलं आहे. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या विद्वानांनी धर्मग्रंथांची ओळख करून दिली. त्या काळात भारतामध्ये नालंदा आणि विक्रमशीला विद्यापीठांसारख्या महान बौद्ध संस्था होत्या. तिथं शिकवण्याच्या पद्धतीनं थोडासा फरक होता, पण अर्थात, मूलभूत धर्म आणि तत्त्वज्ञान सारखेच होते. कालांतराने, विभिन्न संस्था किंवा पंथांमध्ये स्वतंत्र गट निर्माण झाले, त्या सर्वांमध्ये मूलतत्त्व समानच होती. त्यातले ठळक तिबेटी संप्रदाय होते - ञिङ्मा क-ग्युद, शाक्य आणि गेलगु. यांपैकी प्रत्येक पंथ हीनयान आणि महायान तसंच तंत्रयानाच्या शिकवणुकीच्या आधाराने तयार झाला आहे. कारण तिबेटी बौद्ध या साऱ्यांच्या शिकवणी स्वतंत्र करीत नाहीत आणि त्या साऱ्यांना समानच आदर देतात. नैतिक मार्गदर्शनासाठी, हीनयानी ज्याचा अवलंब करतात त्या विनय नियमांना ते धरून चालतात. काही गुप्त पद्धतींसाठी, पूर्ण गांभीर्यासाठी ते महायान आणि तंत्रयान संप्रदायाच्या पद्धतींचे अनुसरण करतात.

छोस् किंवा धर्म याचा अर्थ

छोस् हा तिबेटी शब्द म्हणजे संस्कृतमधला 'धर्म' हा शब्द आणि त्याचा अर्थ आहे 'धारण करणे'. या जगातील वस्तू- ज्यांना निश्चित काही ओळख आहे, त्यांच्या गुणांना 'धर्म' असं म्हटलं जातं. धर्माचा आणखी एक अर्थ आहे आणि या अर्थानुसार 'धर्म' म्हणजे ज्याला 'रिलीजन' म्हटलं जातं तसा होऊ शकतो. 'धर्म' हा 'निधर्मी'च्या विरुद्ध म्हणता येईल. ढोबळपणे म्हणायचं तर मन, शरीर आणि वाचा यांची कोणतीही उच्च,

उदात्त कृती म्हणजे 'धर्म' किंवा 'रिलीजन' होय, ज्याच्यामुळं आपला संकटापासून बचाव होतो किंवा आपल्याला संकटापासून दूर ठेवलं जातं. जो अशा कृतींचा अवलंब करतो तो धर्माचे आचरण करीत आहे, असं म्हटलं जातं.

चार आर्यसत्य

भगवान बुद्धानं म्हटलं आहे : "दु:खम् (या संसारातील जीवन दु:खानं परिपूर्ण आहे); समुदय: (या दु:खाचं कारण विद्यमान असतं); निरोध: (या दु:खापासून वास्तविक मुक्ती मिळू शकते); निरोधगामिनी प्रतिपद (दु:खांचा नाश होण्यासाठी वास्तव मार्ग). त्यानं असंही म्हटलं : "दु:ख जाणून घ्या; त्यांच्या कारणांचा त्याग करा; दु:खापासून मुक्ती मिळवा; सत्य मार्गाचं अनुसरण करा." पुढं तो म्हणतो : "जरी जाणून घेण्यासारखं काही नसतं तरी दु:ख जाणून घ्या; त्याग करावा असं काही नसतं तरी हालअपेष्टा यांच्या कारणांचा त्याग करा; मुक्त होण्यासारखं काही नसतं तरी विराम देण्यात प्रामाणिक राहा; सराव करावा असं काही नसतं तरी त्याग करण्याच्या मार्गांचा सराव करा." हे तीन दृष्टिकोन म्हणजे, चार आर्यसत्यांचा तीन प्रकारे अंगभूत स्व-भाव, कृती आणि अंतिम परिणाम आहे.

माध्यामिक मत (इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील नागार्जुन या विद्वानानं हे मत मांडलं), ही वेगवेगळ्या बौद्ध संप्रदायातील श्रेष्ठ अशी मतपद्धती आहे, तिच्यानुसार या सत्याचं स्पष्टीकरण असं आहे : खरं दु:ख म्हणजे संसार (जन्म-मृत्यूच्या संपूर्ण चक्राचं अस्तित्व) हा कर्म (क्रिया आणि प्रतिक्रिया) आणि भ्रांतीमुळं उत्पन्न होतो. खरं कारण हे कर्म आणि भ्रांती आहे. दु:खाची कारणं हीच आहेत. खरी मुक्ती म्हणजे पहिल्या दोन सत्यांचा निरास होय. ज्या मार्गामुळं खरा निरास साधता येतो, तो सत्य मार्ग होय.

दु:खाच्या सत्यामुळं दु:खाकडे नेलं जातं, पण सत्य मार्ग अनुसरल्यामुळं खरी मुक्ती मिळते. हा नैसर्गिक क्रम आहे. तरी भगवान बुद्धानं, परिणाम आधी आणि कारणं नंतर अशी मांडणी करून शिकवलं. त्याचं कारण असं, की जर दु:ख कळलं तर त्याचं कारण अनुमानानं काढता येतं; आणि जेव्हा दु:खाचं कारण टाकून देण्याची तीव्र इच्छा होईल तेव्हा त्याग करण्याची माध्यमं, मार्ग हेही सापडतात.

संसार आणि जीव

हालअपेष्टा आणि दु:ख हे सत्य यांसहित अस्तित्वाचं चक्र म्हणजे संसार. ज्याला ज्याला स्वत:ची अशी पुरेशी कारणं नसतात, अशा गोष्टी कारणांच्या शृंखलेमुळं होणारी प्रत्येक गोष्ट - हे सारं संसाराशी जोडलेलं असतं, आणि त्यामुळं कर्म आणि भ्रांती यात अडकायला होतं. दु:ख हाच त्याचा मूल स्वभाव आहे. दु:ख निर्माण होण्यासाठी पाया तयार करणं आणि भविष्यासाठी दु:खाला आकर्षित करून ठेवणं हे त्याचं कार्य आहे.

अवकाशाच्या दृष्टीनं संसार हा तीन जगांमध्ये विभागलेला आहे - इंद्रियजन्य जग, साकार जग आणि निराकार जग. पहिल्या विश्वातील जीव हे बाह्य, इंद्रियजन्य सुखांचा उपभोग घेतात. दुसऱ्या प्रकारचं जे विश्व आहे, त्याचे दोन प्रकार पडतात. त्यातल्या खालच्या पातळीवरचे जीव हे बाह्य ऐंद्रियसुखाचा आनंद घेऊ शकत नाहीत, पण ते अखंडीत असा आंतरिक चिंतनाचा आनंद घेऊ शकतात. निराकार विश्वात पाच

प्रकारचे इंद्रियजन्य विषय असत नाहीत कारण त्यांचा उपभोग घेणारी पाच इंद्रियेही नसतात; फक्त मन असतं, त्यात कुठलेही विभ्रम नसतात, खळबळ नसते; सदैव समत्वाच्या वृत्तीतच ते असतं आणि राहतं.

संसारात जे जे जीव असतात त्यांच्या स्वरूपानुसार विभागणी करता येते आणि त्या दृष्टीनं पाहता सहा विभाग पडतात.

- देव - यामध्ये दिव्य रूपाचे आणि निराकार चैतन्य असलेले जीव अंतर्भूत होतात. ऐंद्रिय जगात सहा प्रकारचे देव असतात.
- उपदेवता किंवा दैत्य - उपदेवता बऱ्याचशा देवांसारख्याच असतात पण त्या खोडसाळ असतात.
- मानव
- यि-दग किंवा प्रेत - या प्रकारचे जीव म्हणजे जिवंत चैतन्यरूपी असतात आणि ते सातत्यानं क्षुधा आणि तृष्णा यांच्या दुःखांनी गांजलेले असतात.
- पशु-पक्षी
- नरक - नरकाचेही वेगवेगळे स्तर असतात. त्यांच्यातील जिवंत जीवही, त्यांच्या त्यांच्या गत कर्मानुसार वेगवेगळ्या आकारांचे असतात.

संसारातील दुःखांची कारणे

दुःखाची खरी कारणं कर्म आणि भ्रांती ही आहेत. 'क्रिया-प्रतिक्रिया यांचा मेळ' अशी कर्माची व्याख्या केली गेली आहे. बौद्ध धर्माच्या श्रेष्ठ संप्रदायांनुसार त्याचे दोन विभाग पडतात. त्यांना तिबेटी भाषेत सेमपई-लस् आणि समपई-लस् असं म्हणतात. 'सेमपई-लस्' ही कर्माची प्राथमिक अवस्था होय. तिच्यात शारीरिक कृती अजून घडायची असते. कृतीसाठी अबोध पातळीवर विकार इथं असतात. 'समपई-लस्' ही पुढची अवस्था. हिच्यात कायिक आणि वाचिक कृती घडते. त्याच्या परिणामांचा विचार केला असता, कर्माचे तीन प्रकार होतात. पुण्यशील कर्मांमुळं जीवाला देव, उपदेवता आणि माणसं यापैकी एका पातळीवर पुनर्जन्म मिळतो. पापकर्मांमुळं प्राणी, प्रेत आणि नरक यांच्या कनिष्ठ राज्यात पुनर्जन्म घ्यावा लागतो. तिसरं आहे अचल कर्म म्हणजे स्थिर कर्म. याच्यामुळं रूप आणि अरूप धातू - साकार विश्व किंवा निराकार विश्व यांच्यामध्ये पुनर्जन्म घ्यावा लागतो. कर्माचा परिणाम या वर्तमान जीवनात किंवा पुढच्या आयुष्यात किंवा नंतर येणाऱ्या आयुष्यात भोगावाच लागतो.

भ्रांती हा शुद्ध किंवा मध्यवर्ती मनाचा भाग नव्हे. कारण मी आधी सांगितलं आहे, की मन तर स्वभावतः शुद्ध असतं, तर भ्रांती हा वरवरच्या किंवा दुय्यम मनांचा दोष आहे. जेव्हा ह्या दुय्यम मनाला उत्तेजना मिळते तेव्हा भ्रांती प्रभावी ठरते. मनाच्या गाभ्यावर भ्रांती वर्चस्व गाजवते आणि त्यामुळं पाप घडतं.

भ्रांतीचे अनेक प्रकार आहेत : क्षोभ, राग, अहंकार, द्वेष, वैरभाव वगैरे मनाचा क्षोभ आणि वैरभार या मुख्य भ्रांती आहेत. मनोविकार म्हणजे माणसं किंवा वस्तूंशी असलेली तीव्र जवळीक. या मनोविकाराचं रूपांतर स्वतः त्या माणसांशी-वस्तूशी गुंतवणं किंवा अहंकार याच्यात होतं आणि त्यामुळं स्वतःच्या श्रेष्ठतेचा गंड निर्माण होतो. काहीवेळा आत्मद्वेषामुळे माणूस प्रत्येक गोष्टीकडे शत्रुत्वाच्या भावनेनं पाहू लागते. पुन्हा

अज्ञान आणि समजुतीचा अभाव यामुळं सत्याला नाकारण्याकडे प्रवृत्ती होते. सनातन काळापासून हा 'अहंकार' - 'अहं'ची जाणीव ही अनादिकालापासून संसारातील सर्व जीवांत अस्तित्वात आहे. त्यांना त्या जाणीवेची इतकी सवय होऊन गेलेली असते, की स्वप्नात देखील त्यांना त्याचा अनुभव येतो.

खरं तर, ज्ञेय, बुद्धिगम्य अशा सर्व वस्तू त्यांच्या मूळ स्वरूपानं रित्या असतात, पण भ्रांतीमुळं त्या स्वयंभू आणि स्वयंपूर्ण अस्तित्वरूपी वाटतात, भासतात. उलट, ही वेडीवाकडी समजूतच सर्व प्रकारच्या भ्रांतीच्या मुळाशी आहे.

निर्वाणाचं तत्त्व

आणखी एका अर्थानं, संसार म्हणजे बंधन होय. या बंधनापासून मुक्तता म्हणजे निर्वाण : खरी मुक्ती; आर्यसत्यांमधलं तिसरं सत्य. कर्म आणि भ्रांती ही दोन संसाराची कारणं आहेत, हे मी स्पष्ट केलं आहे. जर भ्रांतीची मुळं पार उखडून टाकली तर संसारात पुनर्जन्माला कारणीभूत होणारी नवीन कर्माची उत्पत्ती संपते. जर पूर्वजन्मात कर्माची बीजं पेरणारी आणखी भ्रांती राहिली नाही तर सतत होणारी दु:खाची उत्पत्ती देखील संपू शकते. पण असा जीव अस्तित्त्वातून मुक्त होऊ शकत नाही. मर्त्य अवशेषांच्या शरीरात तो राहतो. पूर्वीच्या कर्म आणि भ्रांतीमुळं हे शरीर जन्माला आलेलं असतं. पण पुनर्जन्म थांबल्यानंतर संसारातून मुक्ती मिळाल्यानंतर आणि निर्वाणाची प्राप्ती झाल्यानंतरही, त्याच्या ठायी चैतन्य राहील आणि भ्रांतीपासून मुक्त असा आध्यात्मिक देह राहील. दु:खापासून खऱ्या मुक्तीचा हा अर्थ आहे.

निर्वाणाची कनिष्ठ अवस्था असू शकते, की जिथं अजिबात दु:ख नसतं आणि त्याची दुसरी श्रेष्ठ अवस्था असू शकते, जिला महापरिनिर्वाण असं म्हटलं जातं. ही सर्वात श्रेष्ठ अशा ज्ञानसाक्षात्काराची अवस्था असते. परिपूर्ण आणि निर्गुण, सर्व नैतिक आणि मानसिक अपवित्रतेपासून मुक्त विवेकविचाराची मिसळण झाल्यामुळं आलेली अवस्था : बुद्धत्वाची स्थिती.

हीनयान

वर वर्णन केलेल्यापैकी : सत्य मार्ग, जे चौथं आर्यसत्य आहे; त्यापैकी निर्वाणाची कोणतीही अवस्था प्राप्त करण्यासाठी निर्देशित केलेला मार्ग चोखाळला पाहिजे. या मार्गाबद्दल विचार करणारे दोन वैचारिक संप्रदाय आहेत हीनयान आणि महायान. हीनयानी हे कनिष्ठ मार्ग पत्करतात, म्हणजे स्वत:साठी व्यक्तिगत पातळीवर ते निर्वाण मिळवण्याचा प्रयत्न करतात. या संप्रदायाच्या मते, संसारातून मुक्त व्हावं अशी प्रबळ इच्छा मनात निर्माण व्हायला पाहिजे; धार्मिक नीतीचा म्हणजे शीलाचा अवलंब केला पाहिजे; तर एका बाजूला एकाग्रतेचा (समाधीचा) सराव पाहिजे आणि ध्यानधारणा (विपा-सना किंवा विपश्यना, तिबेटीमध्ये : ल्हग थोङ्) हवी, म्हणजे मग भ्रांती आणि भ्रांतीची बीजं काढून टाकली जातात आणि त्यांची पुन्हा वाढ होत नाही. अशाप्रकारे निर्वाणाची प्राप्ती होते. या मार्गांमध्ये तयारी, व्यासंग, पाहणे, सराव आणि पूर्णता या मार्गांचा अंतर्भाव होतो.

महायान

महायानी निर्वाणाची जी सर्वश्रेष्ठ अवस्था बुद्धत्व, ती प्राप्त करण्याचा प्रयत्न

करतात. हे ध्येय काही केवळ स्वत:साठी नव्हे, तर सार्‍या सजीवांसाठी त्यांना बुद्धत्वाची आस असते. ज्ञान किंवा आत्मसाक्षात्काराचा विचार (बोधिचित्त) आणि करुणा यांनी प्रेरित होऊन, ते हीनयान्यांचे असतात, साधारणपणे तशाच मार्गांचं अनुसरण करतात; पण त्या मार्गांच्या जोडीला ते इतरही उपायांचा म्हणजे सहा पारमितांचा अभ्यास करतात. सहा पारमिता म्हणजे श्रेष्ठ नीती. यांच्या सहायानं ते भ्रांती आणि पापाचरणामुळं झालेली अपवित्रता नष्ट करून बुद्धत्त्वाची प्राप्ती करून घेतात. महायान्यांचे पाच मार्ग हे हीनयान्यांच्या तयारी, निष्ठा, दृष्टी, सराव आणि प्राप्ती असेच असतात.

पण जरी या मार्गांची नावं, हीनयान्यांच्या मार्गासारखीच असली तरी त्यांच्यात गुणात्मक फरक आहे. महायान्यांची मूलभूत प्रेरणा वेगळी असते, एकंदरीत ते वेगळ्या मार्गाचं अनुसरण करतात आणि वेगळ्या पद्धतींचा सराव करतात, त्यामुळं जे अंतिम ध्येय गाठलं जातं तेही वेगळं असतं.

एक प्रश्न कधी कधी विचारला जातो, की निर्वाण गाठल्यानंतर, त्याच अवस्थेत हीनयानी राहू शकतात काय? की ते नंतर महायानाच्या मार्गानं जातात? याचं उत्तर असं आहे, की निर्वाणाची अवस्था हेच अंतिम ध्येय असं ते समजणार नाहीत, पण निश्चितच बुद्धत्वाच्या प्राप्तीसाठीचे मार्ग ते आपलेसे करतील.

तंत्रयान

मी उल्लेख केलेले मार्ग हे सैद्धांतिक मार्ग आहेत आणि तंत्रयानाचा (योगमार्गाचा) सराव करण्याआधी या मार्गांचा अवलंब केलाच पाहिजे. त्यामुळं विश्वसनीय, योग्य असा पाया तयार होतो. तांत्रिक सिद्धातांची ओळख करून देण्याआधी तिबेटमध्ये पुरेपूर काळजी घेतली जाते. भगवान बुद्धानं सांगितलेल्या पैकीच हा सिद्धांत आहे का? याचा आध्यात्मिक शिक्षकांनी नेहमी शोध घेतला. प्रकांड पंडीतांकडून त्यावर तर्कनिष्ठ विवेचना केली गेली, अनुभवाच्या प्रकाशात त्याच्या परिणामांची परीक्षा केली. त्याच्या विश्वासार्हतेची खात्री करण्याआधी आणि त्याचा स्वीकार करण्याआधी त्यांनी हे सारं केलं. हे करणं फार गरजेचं होतं, कारण बौद्ध नसलेले असे अनेक तांत्रिक सिद्धांत होते; आणि वरवरच्या समान गोष्टींमुळे अशा सिद्धातांची मिसळण बौद्ध सिद्धातांमध्ये सहजी होऊ शकली असती.

तंत्रयानाची चार गटात विभागणी होते आणि त्यावर आधारित ग्रंथांची संख्या अपरिचित असल्यानं ती इथं नमूद करणं शक्य नाही. अगदी साध्या शब्दात सांगायचं तर याची एकूण पद्धती अशी आहे : पूर्वी सांगितल्याप्रमाणं आपल्याला जे दु:ख भोगावं लागतं त्याला अनेक प्रकारची दुष्कर्म कारणीभूत असतात. भ्रांतीमुळं ही वाईट कर्म निर्माण होतात. ज्या मनाला अजिबात वळण, शिस्त नसते अशा मनामुळं भ्रांती निर्माण होते. दुष्ट विचारांचा ओघ थांबवून मनाला शिस्त लावणं आणि प्रशिक्षण देणं गरजेचं असतं. हा ओघ थांबवता येतो, आणि भटकणारं अन् कल्पना घडवत-रचत राहणारं मन शांत करता येतं, कशामुळं? तर आपल्या स्वत:च्या शरीराच्या भौतिक घडणीवर आणि मनाच्या आंतर्घडणीवर लक्ष केंद्रित करून.

बाह्य अशा एखाद्या वस्तूवर लक्ष केंद्रित करून मनाची एकाग्रता होऊ शकते. यासाठी प्रखर अशी चिंतनक्षमता लागते आणि त्यासाठी सगळ्यात सोयीच्या म्हणून

देवतांच्या मूर्ती असतात. या कारणासाठी, तंत्रयानात अनेक देवतांच्या मूर्ती असतात. त्यांची निर्मिती काही मनाला येईल तशी केलेली नसते. शरीर, मन आणि जाणिवा शुद्ध करण्यासाठी, चिंतनाचा एक विषय म्हणून उग्र आणि शांत भाव असणाऱ्या मूर्ती निर्माण कराव्या लागतात. मग कधी कधी त्यांना अनेक डोकी व हात असतात. वेगवेगळ्या माणसांच्या शारीरिक, मानसिक आणि वृत्तीच्या पैलूंशी मिळतं-जुळतं घेऊन त्यांना त्यांच्या अंतिम ध्येयापर्यंत जाण्यासाठी असं केलेलं असतं.

काहींच्या बाबतीत प्रखर विश्वास आणि भक्ती याच्यामुळं ईप्सित ध्येयाकडे प्रगती होते, पण सर्वसाधारणपणे तर्क-बुद्धीच्या शक्तीच्या सहायानं ही प्रगती साधली जाते. आणि जर आध्यात्मिक मार्ग पद्धतशीरपणे अनुसरला, तर हृदयाला जाणवलेल्या विश्वासाला तर्काकडून अनेक कारणांचं बळ मिळतं.

दुहेरी सत्य

प्रत्येक धार्मिक मार्गात प्रज्ञा आणि पद्धती (उपाय) असतात.

प्रज्ञा ही पूर्ण अशा सत्य तत्त्वाशी (परमार्थसत्य) निगडित असते आणि पद्धती ही सापेक्ष सत्याशी (संवृतिसत्य) निगडित असते. नागार्जुनानं म्हटलं आहे : "बुद्धाला उलगडलेला धर्म हा नेहमीच पूर्णपणे दुहेरी सत्यांशी म्हणजे पूर्ण आणि सापेक्ष सत्याशी जुळणारा आहे."

जेव्हा अंतिम अवस्था म्हणजे बुद्धत्व मिळतं, तेव्हा व्यक्तीला बुद्धकायेची किंवा शरीराची दोन रूपं मिळतात. सिद्धांताच्या मार्गाचं अनुसरण करतानाच्या त्याच्या प्रज्ञा आणि पद्धतीच्या अभ्यासाचा परिणाम म्हणून या दोन काया असतात; त्याने अनुसरलेल्या प्रज्ञा आणि पद्धती या दोन मार्गांचा हा परिणाम असतो. त्याचं ज्ञान आणि पद्धती या वापरण्याच्या मार्गानुसार त्यांना एक वैश्विक पाया मिळतो. दुहेरी सत्यांचं आकलन होणं फार महत्त्वाचं आहे, पण त्यात काही अडचणीही आहेत. या सत्यांबद्दल विविध बौद्ध संप्रदायांची विविध मतं आहेत. 'उ-मा थल-ग्युर-पा'च्या मते (बौद्ध तत्त्वज्ञानाच्या प्रासंगिक संप्रदायानं मानलेली ही एक माध्यमिक तत्त्वपद्धती आहे) आपल्या इंद्रियांनी ज्या वस्तूचं ज्ञान होतं, त्यांना दोन पैलू असतात - इंद्रियगोचर (पाहण्याजोग्या वस्तू) आणि अगोचर (अव्यक्त). सर्वसाधारणपणे बोलायचं तर, सापेक्ष सत्य हे वस्तूंच्या ज्ञानाशी आणि त्यांच्या दृश्य पैलूंबद्दलच्या मानसिक संकल्पनांशी निगडित असतं; आणि पूर्णसत्य हे त्यांच्या अव्यक्त पैलूंच्या ज्ञानाशी संबद्ध असतं.

'वैश्विक शून्यता' आणि 'सत्य विराम' ही पूर्ण सत्य आहेत; बाकी सारं काही सापेक्ष असतं.

बौद्ध धर्माचं अनुसरण करण्याच्या पद्धतीची रूपरेखा

बौद्ध धर्माचा अचूक अभ्यास फक्त वरवरच्या बदलांनी होत नसतो. म्हणजे उदाहरणार्थ, संन्यस्त आयुष्य जगणं किंवा धर्मग्रंथांचं पारायण करणं. मुळात या प्रकारच्या कृतींनाच धार्मिक म्हणावं की नाही, हा प्रश्न पडू शकतो; कारण धर्माचा मानसिक पातळीवर सराव व्हायला पाहिजे. जर एखाद्याकडे अचूक मानसिक दृष्टिकोन, कल असेल, तर शरीर आणि मनाच्या सर्वच कृती धार्मिक होतात; पण जर योग्य दृष्टिकोनाचा अभाव असेल, जर योग्य विचार कसा करावा हे कळत नसेल, तर अशा

माणसानं अख्खं आयुष्य मठात काढलं आणि धर्मग्रंथ वाचण्यात व्यतीत केलं, तरी काहीही साध्य होणार नाही. म्हणून मनाची यथायोग्य ठेवण ही पहिली आवश्यक गोष्ट आहे. बुद्ध, धर्म आणि संघ या त्रिरत्नांना शरण गेलं पाहिजे; कर्माचा सिद्धांत आणि कर्मफल यांच्यावर लक्ष ठेवलं पाहिजे; सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाचे विचार करण्याची सवय जडवून घ्यायला पाहिजे.

जर जगाचा त्याग करून खऱ्या तळमळीनं धर्माचं अनुसरण केलं तर अनुयायाला विलक्षण मोठा आनंद मिळतो. अशा पद्धतीनं जगापासून संन्यास घेतलेली अनेक माणसं तिबेटमध्ये आहेत, आणि त्यांना अवर्णनीय असं मानसिक आणि शारीरिक समाधान मिळतं. या जगात, स्वार्थासाठी मिळवलेलं सुख आणि स्वार्थासाठीच केलेली सर्व धडपड याची तुलना त्या आध्यात्मिक आनंदाच्या एखाद्या कुणाशीही करता येत नाही, इतकं ऐहिक सुख निकृष्ट असतं. अशी आध्यात्मिक माणसं इतरांसाठी सर्वात जास्त उपकारक ठरतात. त्यांची अवस्था तर अंतर्मुखी असते. तिच्यामुळं ते मानवजातीतल्या दोषांची नुसती कारणं नव्हे, तर त्यावरच्या उपायांचाही विचार करू शकतात. परंतु जगापासून संन्यास घेणं हे काही प्रत्येकाला शक्य होत नाही, कारण त्यासाठी जो त्याग करावा लागतो तो फार मोठा असतो.

सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या लोकांसाठी कुठल्या प्रकारचा धर्म, कुठल्या प्रकारची जीवनपद्धती सांगितली पाहिजे? अर्थात, त्यासाठी या जगातील अनैतिक कामं वगळली पाहिजेत. या कृती कुठल्याच धर्मात बसणार नाहीत; पण नैतिकदृष्ट्या ज्यांचं समर्थन करता येईल अशी कामं म्हणजे, देश चालवण्यात शासनाला मदत करणं किंवा जे काही उपयुक्त आणि उत्पादक आहे ते करणं, इतरांचं सुख आणि आनंद ज्यानं समृद्ध होईल अशी पावलं उचलणं, हे सारं करणं धर्माचा अभ्यास करण्यामध्ये अंतर्भूत होतं. भारत आणि तिबेटमधील राजांनी आणि मंत्र्यांनी धर्माला प्रोत्साहन दिलं. अगदी सांसारिक आयुष्य जगतानाही जर प्रामाणिकपणे शोध घेतला तर मुक्ती मिळू शकते; पण एक म्हण आहे : 'माणसं जर डोंगरांमधल्या गुहांमध्ये, बिळांमध्ये शीतकाळात स्वस्थ राहणाऱ्या प्राण्यांप्रमाणं राहिली, त्यांनी कुठलेच मानसिक कष्ट घेतलेच नाहीत, तर त्यांच्याकडे नरकात जाण्यासाठीच्या कारणांची साठवणूक फक्त होते.'

एक जुनी तिबेटी गोष्ट सांगून मी समारोप करतो:

फार फार वर्षांपूर्वी ड्रोम नावाचा एक प्रसिद्ध लामा होता. त्याला एके दिवशी स्तूपाभोवती प्रदक्षिणा घालणारा एक माणूस दिसला. "हे पाहा" तो म्हणाला, "स्तूपाला प्रदक्षिणा घालणं चांगलं आहे; पण धर्माचा अभ्यास करणं हे जास्त चांगलं आहे."

हे ऐकल्यावर तो माणूस स्वत:शी म्हणाला, "ठीक आहे. असं असेल तर मग एखादा धर्मग्रंथ वाचणं चांगलं." मग तो अगदी जीव तोडून पुस्तक वाचू लागला. नंतर पुन्हा एकदा ड्रोम त्याला भेटायला गेला.

ड्रोम म्हणाला, "धर्मग्रंथातलं वाचन करणं कधीही चांगलंच; पण तरी तू धर्माचा अभ्यास केलास तर केव्हाही जास्त चांगलं."

यावर तो माणूस विचार करू लागला, "मंत्रपठणही जर ठीक नाही, तर मग ध्यानाबद्दल कसं काय?"

काही दिवसांनी त्याला ध्यान करताना ड्रोमनं पाहिलं आणि तो म्हणाला, "ध्यान

करणं नि:संशय फार चांगलं आहे; पण तू धर्माचा अभ्यास, सराव करशील तर जास्त चांगलं.”

तो माणूस पार गोंधळून गेला आणि म्हणाला, “धर्माचा अभ्यास! यातून तुम्हाला म्हणायचंय तरी काय?”

ड्रोमनं त्याला सांगितलं, “या ऐहिक जीवनातल्या रूपांपासून तुझं मन दूर फिरव आणि धर्माच्या बाजूला तुझं मन वळव.”

परिशिष्ट - 2
तिबेटच्या परम पावन दलाई लामांनी
संयुक्त राष्ट्रांना केलेले विनंती अर्ज

11 नोव्हेंबर 1950
कालिंगपाँग

दस्तऐवज ए/1549

सारया जगाचं लक्ष कोरियावर खिळलेलं आहे. तिथं आंतरराष्ट्रीय सैन्याकडून आगळिकीला प्रतिकार केला जात आहे. दूरवरच्या तिबेटमध्ये अशाच प्रकारच्या घटना घडत आहेत, पण त्याची दखलही घेतली जात नाही. जगामधलं कुठलंही आक्रमण तपासलं गेलं नाही आणि स्वातंत्र्याची पाठराखण केली गेली नाही, असं होणारं नाही या विश्वासानं. तुमच्यातर्फे तिबेटच्या सरहद्दीवर नुकत्याच घडणारया घटनांचे वृत्त संयुक्त राष्ट्रांना देण्याची जबाबदारी आम्ही मानली आहे.

तुम्हाला कल्पना असेलच, की तिबेटचा प्रश्न सध्याच्या काळात धोकादायक बनलेला आहे. हा प्रश्न तिबेटमुळे उत्पन्न झालेला नाही तर दुबळ्या राष्ट्रांना वेढून आपल्या अधिपत्याखाली आणायची जी चीनची अनिर्बंध महत्त्वाकांक्षा आहे, तिचा हा परिणाम आहे. मनात रास्त भीती निर्माण होऊ लागली, की त्यांच्या स्वतंत्र दर्जावर चीनच्या खेळीमुळे घाला पडणार आहे.

1910 मध्ये चीनने जी स्वारी केली, त्यावेळच्या त्यांच्या वर्तनामुळे दोन्ही देशांमधील संबंध पूर्णपणे बिघडले. तेराव्या दलाई लामाच्या नेतृत्वाखाली 1911-1912 मध्ये तिबेटने त्यांचे संपूर्ण स्वातंत्र्य जाहीर केले, त्याचवेळी, 1911 मधील चिनी राज्यक्रांतीच्या वेळी, नेपाळही त्यांच्या चीनशी असलेल्या निष्ठेपासून वेगळा झाला. या क्रांतीच्या वेळी मांचुरियाचा सम्राट पदच्युत झाला आणि तिबेट व चीनमधील उरलेल्या भावनिक आणि धार्मिक नात्याला फटका बसला. त्यानंतर तिबेट पूर्णपणे त्याच्या अलिप्तपणाच्या भरवशावर, भगवान बुद्धाच्या ज्ञानावरची श्रद्धा आणि कधी कधी प्रसंगापरत्वे भारतातील ब्रिटिशांच्या सहकार्यावर संरक्षणासाठी अवलंबून राहिला. या परिस्थितीत तिबेटवर ब्रिटिशांचे अधिपत्य असल्याचा दावा केला जाऊ शकतो, यात संशय नाही. वेळोवेळी अँग्लो-चिनी प्रभाव असूनसुद्धा तिबेटने आपले स्वतंत्र अस्तित्व राखले. देशात अंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था राखता आली होती तसेच जगाबरोबर शांततापूर्ण संबंध राखता आले, याकडे निर्देश करता येईल. चीनच्या लोकांशी सदिच्छा आणि मैत्रीचे असे शेजारसंबंध चालू राहिले; पण 1914 मध्ये चीनने त्यांच्या अधिपत्याचा जो दावा केला त्याला अजिबात कबुली दिली नाही.

ब्रिटिशांच्या मनधरणीमुळे तिबेटला अशा करारावर सही करावी लागली, की ज्यामुळे त्यांच्यावर नाममात्र (ढवळाढवळ करणारी नव्हे) अशी चीनची सत्ता लादली गेली. या करारानुसार चीनला ल्हासामध्ये एक कुमक ठेवण्याचा हक्क होता, पण तिबेटच्या अंतर्गत व्यवहारांमध्ये हस्तक्षेप करायला कटाक्षाने बंदी केली गेली होती. वस्तुस्थिती अशी असूनही, तिबेटने जरी चीनला नाममात्र सत्तेची कबुली दिली, तरी ही सत्ता जबरदस्तीने लादता येत नाही, कारण 1914 मध्ये चिन्यांनी करारावर सही केली

नव्हती. भारत आणि नेपाळ या शेजारी देशांशी तिबेटने स्वतंत्ररित्या संबंध जोपासले होते हे पाहता येईल. आणखी सांगायचं तर, ब्रिटिशांनी मैत्रीपूर्ण सूचना केलेल्या असूनसुद्धा दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी चीनच्या बाजूने सैन्य पाठवून त्याने तडजोड केली नाही. अशा रीतिने तिबेटने आपली स्वतंत्रता सूचित केली आहे आणि राखलेली आहे. 1914 चा करार अजूनही तिबेट आणि भारतातल्या नात्याला मार्गदर्शक आहे आणि चीनने त्यात भाग न घेतल्यामुळे त्या करारानुसार जे फायदे मिळू शकले असते ते त्याला मिळाले नाहीत. त्यानुसार तिबेटचे स्वातंत्र न्याय्यपणे पुन्हा परत मिळाले होते.

1911 नंतर तिबेटने चीनबरोबर जे क्षीण संबंध राखले होते ते आता असमर्थनीय ठरू लागले. कारण चीनमध्ये आणखी क्रांती झाली आणि त्याचे पूर्णपणे साम्यवादी राज्यात रूपांतर झाले. चीन आणि तिबेटने स्वीकारलेल्या भिन्न पंथांमध्ये आत्मीयता किंवा सहानुभूती असणे शक्य नव्हते. भविष्यातील अडचणींचा अंदाज आल्याने तिबेटी सरकारने चीनबरोबरचे राजनैतिक संबंध थांबवले आणि ल्हासातील चिनी प्रतिनिधींना जुलै 1949 मध्ये तिबेटमधून जायला सांगितले. तेव्हापासून तिबेटने चीन सरकार आणि लोक यांच्याशी औपचारिक संबंधही ठेवलेले नाहीत. त्याला स्वतंत्र राहायचे आहे. मोठ्या प्रमाणात उपभोगवादी पंथाच्या जंतूची लागण होऊन दूषित होण्याची त्याची इच्छा नाही; पण तिबेटला शांतपणे राहू द्यायचे नाही, अशा पद्धतीने चीनचे धोरण आहे. चीनमध्ये साम्यवादी गणराज्य स्थापन झाल्यापासून चीनने तिबेटला मुक्त करायच्या धमक्यांचा सपाटा लावला आणि तिबेट सरकारला घाबरवण्यासाठी आणि त्याचे अवमूल्यन करण्यासाठी आडवळणी पद्धती वापरल्या आहेत. तिबेटला ठाऊक आहे, की तो प्रतिकार करू शकण्याच्या अवस्थेत नाही. म्हणून चीन सरकारशी मैत्रीपूर्ण संबंध राखून बोलाचाली करायला त्याने मान्यता दाखवली.

चीनमध्ये निघालेल्या तिबेटी मंडळाला, त्यांची काहीही चूक नसताना भारत सोडता आला नाही हे दुर्दैव आहे. त्यांना हाँगकाँगमधून जाण्यासाठी ब्रिटिश पारपत्राची गरज होती. भारत सरकारच्या दयाळू मध्यस्थीमुळे चिनी गणराज्याने सप्टेंबरमध्येच भारतात, नवी दिल्लीत आलेल्या चिनी राजदूताशी प्राथमिक वाटाघाटी करण्याची परवानगी देण्याचा अनुग्रह केला. दिल्लीत या वाटाघाटी चालू असताना, कुठलीही सूचना नसताना किंवा कुठलाही अपमान नसताना, चिनी पथकाने डी-छून नदी 7 ऑक्टोबर 1950 रोजी ओलांडली. ही नदी म्हणजे दीर्घकाळापासून तिबेटच्या भूभागाची सरहद्द होती. नंतर झपाट्याने, दे-मर, कम-तो, तुङ्-ग, छु-मे, रिमोछे गोत्सु, यक-लो आणि मरखम - या महत्त्वाच्या मोक्याच्या जागा चिन्यांनी बळकावल्या. खम् येथील तिबेटी सैन्याच्या तुकड्यांकडे कोणतीही आक्रमणाची योजना नव्हती, त्यांना केवळ नाममात्र संरक्षणासाठी म्हणून तिथं ठेवलेलं होतं, त्या पार नामशेष झाल्या. छमदो या खमच्या राजधानीभोवती पाच दिशांनी साम्यवादी पथकांनी प्रचंड बळाने ताकद एकवटली आणि ही राजधानी लवकरच पडली. तिथे तिबेटी सरकारने नेमलेल्या मंत्र्याचे नेमके काय झाले हे कधीच कळू शकले नाही.

या भ्याड हल्ल्याबद्दल बाहेरच्या जगाला फारशी माहिती नाही. आक्रमण होऊन बराच काळ लोटल्यावर, चीनने जगात जाहीर केले, की त्यांनी तिबेटमध्ये लष्कराला कूच करायला सांगितले. अनाहूतपणे केलेल्या या हल्ल्याच्या कृतीमुळे तिबेटची शांतताच फक्त ढवळली गेली असे नव्हे, तर भारत सरकारला चीनने जी गंभीर हमी दिली होती

तिचाही पूर्ण अवमान झाला होता; तिबेटमध्ये बिकट परिस्थिती निर्माण झाली आणि यथावकाश तिबेट त्याच्या दीर्घकाळच्या स्वातंत्र्यापासून वंचित झाला.

9 सप्टेंबर 1959
नवी दिल्ली

मा. महासचिव
संयुक्त राष्ट्रसंघ, न्यूयॉर्क

श्री. सेक्रेटरी - जनरल, आम्ही तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, की युद्धाशिवाय तिबेट खाली जाणार नाही. पण जे राष्ट्र शांती-सलोख्याला स्वत:ला वाहून घेते त्याला युद्धाचे प्रशिक्षण मिळालेल्या माणसांच्या निष्ठुर प्रयत्नांपुढे कितपत टिकाव धरता येईल याबद्दल फारशी आशा नाही; पण जिथे कुठे आक्रमण होते ते थांबवण्याचे संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेले आहे, असे आम्हाला वाटते.

साम्यवादी चीनमध्ये तिबेटचा अंतर्भाव व्हावा म्हणून तिबेटवर झालेले सशस्त्र आक्रमण, बळाचा वापर ही स्पष्टपणे आक्रमणाची घटना आहे. जोपर्यंत तिबेटी लोकांच्या इच्छा आणि संमतीविरुद्ध चीनचा भाग होण्यासाठी त्यांच्यावर जबरदस्ती केली जात आहे, तोपर्यंत तिबेटवरचे सध्याचे आक्रमण म्हणजे सबलाकडून दुर्बल घटकाचा नाश होण्याचे, हिंसाचार होण्याचे भयंकर उदाहरण आहे. म्हणून तुमच्या माध्यमातून आम्ही जगातील राष्ट्रांना विनंती करतो, की आमच्या वतीने त्यांनी मध्यस्थी करावी आणि चिनी आक्रमणावर निर्बंध घालावा.

प्रश्न तसा सोपा आहे. तिबेट हा चीनचा भाग आहे असा चीनचा दावा आहे. तिबेटी लोकांना वाटते, की वांशिकदृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या आणि भौगोलिकदृष्ट्या ते चिनी लोकांपेक्षा फार वेगळे आहेत. तिबेटी लोकांच्या या प्रतिक्रिया चिन्यांना त्यांच्या अनैसर्गिक अशा दाव्याच्या बाबतीत स्वीकारता येत नसतील, तर तिबेटच्या लोकांची मते समजून घेण्यासाठी इतर सभ्य पद्धती आहेत; किंवा जर हा प्रश्न पूर्णपणे न्यायालयीन असेल तर आंतरराष्ट्रीय न्यायालयात दाद मागण्यासाठी ते मुक्त आहेत. तिबेटवरच्या चीनच्या विजयाने केवळ संघर्षाचे क्षेत्र वाढेल आणि इतर आशियाई देशांच्या स्वातंत्र्याला आणि स्थैर्याला दहशत वाढेल.

परम पावन दलाई लामांच्या संमतीने आम्ही मंत्री, तिबेटचा हा प्रश्न निकडीने संयुक्त राष्ट्रांच्या अंतिम निर्णयासाठी सोपवत आहोत. आम्हाला अशी आशा आहे, की जगाची सदसद्विवेकबुद्धी, जंगलाच्या पद्धतींची आठवण करून देणाऱ्या चीनच्या धोरणांमुळे आमच्या राज्याचा विध्वंस होऊ दिला जाणार नाही.

द क-शग (मंत्रिमंडळ) आणि तिबेटची राष्ट्रीय सभा, तिबेटी प्रतिनिधी मंडळ, शकब-पा भवन, कालिंगपाँग.

ल्हासा, दिनांक आयर्न टायगर वर्षाच्या नवव्या तिबेटी महिन्याचा सत्ताविसावा दिवस (7 नोव्हेंबर 1950).

नवी दिल्ली
9 सप्टेंबर, 1959

आदरणीय महासचिव
संयुक्त राष्ट्रसंघ,
न्यू यॉर्क :

आदरणीय महाशय,

शुक्रवार, 24 नोव्हेंबर 1950 रोजी झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या साधारण सभेच्या सर्वसाधारण समितीने घेतलेल्या कामाकाजांच्या नोंदींचा कृपया संदर्भ पाहावा. एल साल्व्हादोरने 'तिबेटवरील परक्या शक्तीच्या आक्रमणाविरुद्ध' जी तक्रार दाखल केली होती, त्याबद्दल निर्णय करण्यात आला होता. तिची दखल घेऊन, दोन्ही पक्षांना शांततापूर्ण समेट करण्यासाठी संधी देता यावी म्हणून तहकुबी देण्यात आली होती. मला हे सांगायला अत्यंत खेद वाटतो, की आक्रमणाची कृती भक्कमपणे पसरलेली आहे. ज्याचा परिणाम म्हणून वस्तुत: संपूर्ण तिबेट चीनच्या लष्कराने व्यापून टाकलेला आहे. मी आणि माझ्या सरकारने शांतीपूर्व आणि मैत्रीपूर्ण तहासाठी अनेक विनंत्या केल्या, परंतु या सर्व विनंत्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे. या परिस्थितीखाली; आणि तिबेटच्या लोकांवर जी अमानुषण वर्तणूक दिली जात आहे, मानवता आणि धर्माच्या विरुद्ध जे गुन्हे घडत आहेत ते लक्षात घेता, मी कळकळीची विनंती करतो, की संयुक्त राष्ट्र संघ आणि तहकुबी दिलेल्या तिबेटच्या प्रश्नात सर्वसाधारण समितीने स्वत: पुढाकार घेऊन लक्ष घालावे.

या संदर्भात मला आणि माझ्या सरकारला ठासून सांगायचे आहे, की 1950 मध्ये चिनी लष्कराने आक्रमण करून जेव्हा भौगोलिक अखंडतत्त्वाचा भंग केला तेव्हा तिबेटा हे स्वतंत्र, स्वायत्त राज्य होते. या वादाचा पुरावा म्हणून तिबेट सरकार खालील गोष्टी निकडीने सांगत आहे.

पहिले - 1912 मध्ये तेराव्या दलाई लामाने केलेल्या स्वातंत्र्याच्या घोषणेनंतर चीन सरकारने तिबेटच्या अंतर्गत किंवा तिबेटवर कोणतीही अधिकृत सत्ता गाजवलेली नाही.

दुसरे - या काळातील तिबेटचे स्वायत्त स्थान लक्षात घेतले असता, पुरावा मिळतो, की तिबेट सरकारने या काळाच्या नुकतेच आधी आणि नंतर पाच आंतरराष्ट्रीय करार केले आहेत.

तिसरे - तिबेट सरकार 1914 च्या अँग्लो-तिबेट कराराचा आधार घेते. त्या करारानुसार तिबेटचे स्वतंत्र स्थान मान्य करण्यात आले होते आणि तिबेटी अधिकाऱ्याला, ग्रेट ब्रिटन आणि चीनच्या प्रतिनिधींप्रमाणेच समान दर्जा देण्यात आला होता. हे खरे आहे, की या करारामुळे तिबेटच्या बाह्य स्वातंत्र्यावर विशिष्ट बंधने आली, पण त्यामुळे तिच्या अंतर्गत स्थानावर गदा आली नाही. तसंच भारतातील सत्ताबदलावर या बंधनांचा काही परिणाम झाला नाही.

चौथे - तिबेटने किंवा इतर सत्तेने चिनी अधिराज्य मान्य करावे असा कुठलाही साधार, बळकट आणि अस्तित्वात असलेला करार नाही.

पाचवे - दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी तिबेटने त्याचे अलिप्तपण राखले आणि तिबेटमधून, भारतातून चीनकडे फक्त बिनलष्करी मालाची वाहतूक करायला परवानगी दिली होती. या वस्तुस्थितीवरून तिबेटचे स्वतंत्र स्थान स्पष्ट होते. तिबेटची भूमिका ग्रेट ब्रिटन आणि चीन देशांच्या सरकारने मान्य केली होती.

सहावे - तिबेटचे स्वतंत्र स्थान इतर सत्तांनीही मानले होते. 1948 मध्ये तिबेट सरकारच्या वतीने एका व्यापारी मंडळाने भारत, फ्रान्स, इटली द युनायटेड किंगडम आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका यांचा दौरा केला, तेव्हा तिबेट सरकारने दिलेली पारपत्रे या देशांच्या सरकारने स्वीकारलेली होती.

महाशय, मी आणि माझे सरकार मानवतावादी कारणांखातर संयुक्त राष्ट्रांनी तातडीने लक्ष घालावे यासाठी विनंती करतो आहोत. तिबेटच्या भूभागावर आक्रमण केल्यापासून, सारया विश्वाने जे सभ्य वर्तणुकीचे नियम म्हणून मानले आहेत, त्याविरुद्ध चिनी लष्कर गुन्हे करत आहे.

पहिले म्हणजे, हजारो तिबेटी लोकांना त्यांच्या मालमत्तेपासून वंचित केले गेले आहे आणि उपजीविकेचा प्रत्येक मार्ग त्यांच्यापासून हिरावून घेऊन त्यांना मृत्यूच्या कवेत आणि हलाखीच्या छायेत ढकलले आहे.

दुसरे म्हणजे, पुरुष, स्त्रिया आणि मुले यांना जबरदस्तीने मजुरीला लावले गेले असून पगाराशिवाय किंवा अगदी नाममात्र पगारावर लष्कराच्या बांधकामावर राबवले जात आहे.

तिसरे म्हणजे, तिबेटी वंशाचा पूर्णपणे विच्छेद करण्याच्या हेतूने, त्यांनी स्त्री-पुरुषांचे निर्बीजीकरण करण्याच्या हेतूने क्रूर आणि अमानुष पद्धतींचा अवलंब केला.

चौथे म्हणजे, तिबेटच्या हजारो निष्पाप लोकांची निर्घृण हत्या केली गेली.

पाचवे म्हणजे, कुठल्याही कारणाशिवाय तिबेटच्या मान्यवर नागरिकांचे खून होण्याच्या असंख्य घटना घडल्या आहेत.

सहावे म्हणजे, आमचा धर्म आणि संस्कृती नष्ट करण्याचा हरेक प्रयत्न केला गेला. हजारो मठ जमिनीवरून पार उखडून टाकण्यात आले आणि पवित्र मूर्ती तसेच धार्मिक वस्तू पूर्णपणे नष्ट केल्या गेल्या. जीवित आणि मालमत्ता दोन्ही सुरक्षित नाहीत आणि राज्याची राजधानी, ल्हासा, आता मृत शहर आहे. माझे लोक जे दु:ख भोगत आहेत ते वर्णनापलीकडचे आहे आणि माझ्या लोकांची अनिर्बंध आणि क्रूर हत्या तातडीने थांबवली जाणे फार गरजेचे आहे. या परिस्थितीखाली मी, आपल्याला आणि संयुक्त राष्ट्रसंघाला मोठ्या निश्चित आशेने विनंती करतो, की आमच्या विनंतीकडे आवश्यक असलेले लक्ष पुरवले जाईल.

- दलाई लामा

स्वर्गाश्रम
धरमशाला, कँटोन्मेंट (छावणी)
पूर्व पंजाब, भारत
2 सप्टेंबर, 1960

आदरणीय
दॅग हॅमरशुल्ड
महासचिव, संयुक्त राष्ट्रसंघ,
न्यूयॉर्क.

आदरणीय महाशय,

गेल्या वर्षी, तिबेटच्या लोकांच्या वतीने आपण लक्ष घालावे यासाठी मी औपचारिक विनंती केली होती, तेव्हा आपण कृपाळूपणे माझ्या प्रतिनिधींना आपला अमूल्य सल्ला आणि महत्त्वाची मदत दिली होती. म्हणून, तिबेटच्या लोकांच्या वतीने मी पुन्हा संपर्क साधत आहे, कारण तिबेटचे लोक आज असह्य अशा दहशतीच्या आणि जुलमाच्या दडपणाखाली कण्हत आहेत.

नि: संशयपणे आपल्याला कल्पना आहेच, की तिबेटमधील परिस्थिती म्हणजे आता कठोर शोकांतिका बनलेली आहे. निष्ठूर गांजणूक आणि अमानुष वर्तणूक यातून सुटका करून घेण्यासाठी हजारो तिबेटी लोक भारत आणि नेपाळमध्ये येत आहेत. पण अजूनही हजारो लोक असे आहेत, की ज्यांना शेजारी देशांमध्ये आश्रय घेणे अशक्य आहे; आणि त्यामुळेच, त्यांना लगेचच मृत्यू आणि विनाश यांचा धोका आहे. या निष्पाप पुरुष, स्त्रिया आणि मुले यांचे प्राण वाचावेत यासाठी ठोस काहीतरी केले गेले पाहिजे असे मला तीव्रतेने वाटते, म्हणून त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघातील इतर देशांचे सहकार्य आणि मदत मिळावी म्हणून प्रयत्न केला. मलाया संघराज्याचे माननीय पंतप्रधान आणि थायलंडचे सरकार यांनी माझ्या विनंतीला प्रामाणिक प्रतिसाद दिला आहे आणि संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या पुढच्या सत्रात तिबेटचा प्रश्न उभा करण्याचा त्यांचा विचार जाहीर केला आहे. या संदर्भात मी पुन्हा एकदा आपल्याशी संपर्क साधण्याचे धाडस करीत आहे. पूर्वीच्या प्रसंगाप्रमाणे, मला विश्वास आहे, की आपल्याला आपली उत्तम यंत्रणा आणि प्रभाव यांचा वापर करून तिबेटच्या दुर्दैवी प्रश्नाबाबत काही वास्तविक उत्तर शोधता येऊ शकते. मला अशी आशा आहे, की महाशय मला या बाबतीतील माझ्या खऱ्या भावना व्यक्त करू देण्याची परवानगी देतील. माझा असा ठाम विश्वास आहे, की तिबेटच्या दुर्दैवी लोकांना मदत करण्यासाठी चर्चा-चिंतन हाच फक्त प्रभावी आणि वेगवान मार्ग आहे. हे एकतर सर्वसाधारण सभेने काही हेतूने नेमलेल्या विशिष्ट समितीच्या माध्यमातून किंवा आपल्या चांगल्या, कार्यक्षम कार्यालयाकरवी शक्य आहे असे मला वाटते; आणि हा विचार मी आदरणीय टुंकु अब्दुल रहमान आणि आदरणीय मार्शल सरित थानारात यांच्याकडेही व्यक्त केला आहे. अर्थात, माझी ही फक्त सूचना आहे. त्यावर आपण विचार करावा; आणि मला आपण व्यक्तिगत सल्ला देऊन उपकृत करावे अशी विनंती. याबद्दल मी आपला कृतज्ञ राहीन.

आदरपूर्वक आणि सहानुभूतीच्या अपेक्षेत.

आपला
दलाई लामा

स्वर्गाश्रम
धरमशाला, कँटोन्मेंट
पूर्व पंजाब, भारत
29 सप्टेंबर, 1960

आदरणीय
दॅग हॅमरशुल्ड

महासचिव, संयुक्त राष्ट्रसंघ,
न्यूयॉर्क.

आदरणीय महाशय,

संयुक्त राष्ट्रसंघाच्या कृपेने काँगो येथे जे महान काम झाले आणि होत आहे, त्याबद्दल मी संयुक्त राष्ट्रसंघ आणि आपणाबद्दल मन:पूर्वक कौतुक, कृतज्ञता व्यक्त करतो.

2. आपणाकडून टिपण क्र. 2033 म्हणून फिरलेले, माझे 9 सप्टेंबर, 1959 चे पत्र आणि त्याचबरोबर 2 सप्टेंबर, 1960 रोजी आपणास लिहिलेले पत्र यांचा कृपा करून संदर्भ पाहावा.

3. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेच्या कार्यक्रमात तिबेटचा प्रश्न नोंदवला गेला आहे हे कळल्याने मला आनंद वाटतो. मलाया आणि थायलंड यांनी यासाठी प्रयत्न केले त्याकरिता मी त्यांचा मनापासून ऋणी आहे. मला अशी आशा आहे, की सर्व शांतताप्रेमी राष्ट्रे माझ्या लोकांच्या आवाजाकडे लक्ष देतील; आणि सध्या ज्या पराजय आणि जुलूमरूपी रात्रीतून जे जात आहेत त्यातून त्यांना प्रकाशाचा किरण दाखवतील.

4. 24 सप्टेंबर, 1960 च्या सभेतील भाषणात एच.इ.एन. ख्रुश्चेव्ह यांनी सर्व वसाहतीतील लोकांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, हे म्हटले आहे, त्या मुद्याची नोंद घ्यायला मला आनंद वाटतो. दुर्दैवाने माझ्या देशाला वसाहतीच्या देशाचे स्थान आले आहे; आणि मी अशी अपेक्षा करतो, की इतर देशांबरोबर साम्यवादी रशिया माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळण्यात सहाय्य होण्यासाठी त्याचा बुलंद आवाज उठवेल.

5. मला हे ठासून सांगायचे आहे, की तिबेटवर चिनी अधिपत्याचा, 1911-12 च्या आधी मागमूसही नव्हता. परंतु आता या विनंती अर्जात या प्रश्नाचा ऐतिहासिक ऊहापोह मांडण्याची मला आवश्यकता नाही.

6. 1911-12 च्या तिबेटचे स्थान कोणतेही असले तरी, कोणत्याही परिस्थितीत, जेव्हा आक्रमण करू पाहणाऱ्या चिनी लष्कराला तिबेटबाहेर हाकलून देण्यात आले, तेराव्या दलाई लामाने ज्या दिवशी स्वतंत्र तिबेटची घोषणा केली, त्या दिवसापासून तिबेटचे स्वातंत्र्य हे वस्तुस्थितीच नव्हे तर न्याय्य होते.

7. 1913 मध्ये तिबेट सरकारने मंगोलियाच्या सरकारबरोबर करार केला. ही विनंती दलाई लामाच्या अखत्यारीत केली गेली होती. या करारानुसार तिबेट आणि मंगोलियाने जाहीर केले होते, की ते एकमेकांचे, स्वतंत्र देश म्हणून स्थान मान्य करीत आहेत.

8. काही महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी, 1913 मध्ये सिमला येथे सुरू झालेल्या त्रिदलीय चर्चेमध्ये तिबेटने भाग घेतला. या चर्चेतील तीन पक्ष होते ब्रिटीश सरकार, चीन सरकार आणि तिबेटचे सरकार. प्रत्येक सरकारचा प्रतिनिधी हा, त्याच्या सरकारचा पूर्णाधिकारी म्हणूनच होता. सर्व पक्षांच्या प्रतिनिधींनी सह्या केलेला जो कराराचा मसुदा आहे, त्यावरून हेच दिसते.

9. भारत सरकारने (पृष्ठ क्र. 38) जारी केलेल्या श्वेतपत्रिका क्र. 11, ज्याचे शीर्षक आहे - 'टिपणे, निवेदने आणि भारत आणि चीन देशांमधील पत्रव्यवहार, सप्टेंबर-नोव्हेंबर 1959,' यातून हीच वस्तुस्थिती ठासून सांगितली जाते. तसेच भारत सरकारची

12 फेब्रुवारी, 1960ची श्वेतपत्रिकाची क्र. खखख ची नोंद आहे, ती भारत सरकारने जारी केलेली आहे व त्यातही हाच मुद्दा ठळकपणे पुढे येतो.

10. जरी कराराचा मसुदा चीन सरकारच्या प्रतिनिधीने सुरू केला होता, तरी चीन सरकारने माघार घेतली आणि शेवटी 3 जुलै, 1914 रोजी दलाई लामाच्या वतीने - तिबेट राज्याचा प्रमुख म्हणून त्याच्या वतीने व ब्रिटीश अधिकाऱ्याने केलेल्या सह्या जोडल्या गेल्या. त्याचवेळी, चीन सरकारने नकार दिल्यामुळे ग्रेट ब्रिटन आणि तिबेट यांच्या अधिकाऱ्यांनी खालील जाहीरनाम्यावर सह्या केल्या :

11. आम्ही, ग्रेट ब्रिटन आणि तिबेटचे अधिकारी खालील जाहीरनामा नोंदवतो. आणि आम्ही याची नोंद घेतो, की हा जोडलेला करार ग्रेट ब्रिटन आणि तिबेटच्या सरकारांवर बांधील राहील; आणि जोपर्यंत चीनचे सरकार या उल्लेखिलेल्या जाहीरनाम्यावर सही करीत नाही, तोवरा या करारानुसार मिळणाऱ्या सवलती घेण्यापासून चीन बाद राहील.

12. खूण म्हणून आम्ही सही केलेला आणि शिक्के मारलेला हा जाहीरनामा इंग्रजीत दोन प्रतीत आणि तिबेटीत दोन प्रतीत आहे.

13. 3 जुलै, 1914 आणि तिबेटी कालगणनेनुसार वूड टायगर वर्षातील पाचव्या महिन्याचा दहावा दिवस - या दिवशी सिमला येथे हा करार झाला.

ए. हेन्री मॅकमोहन
ब्रिटिश प्रतिनिधी-अधिकारी

(ब्रिटिश पूर्णाधिकाऱ्याचा शिक्का)
(दलाई लामाचा शिक्का)
('लोङ्छेन शे-ड्रा'चा शिक्का) ('लोङ्छेन शे-ड्रा ची सही)
(डेपुङ मठाचा शिक्का)
(सेरा मठाचा शिक्का)
(गा-दन मठाचा शिक्का)
(राष्ट्रीय सभेचा शिक्का)

14. कराराच्या मुद्दे अटींना चीन सरकार चिकटून न राहिल्याने कराराच्या मुद्यांपासून मिळणाऱ्या फायद्यांपासून चीन वंचित राहिला आहे.

15. 1926 मध्ये निलंग येथे भेटलेल्या 'सीमा आयोग'मध्ये तिबेटने प्रतिनिधीत्व केले होते. यात तिबेट, तेहरी आणि ग्रेट ब्रिटनचे प्रतिनिधी सामील होते.

16. 1912 ते 1950 या काळात तिबेटवर चीनच्या सत्तेचा आभासही नव्हता. तेराव्या दलाई लामाच्या मृत्यूनंतर दुखवटा व्यक्त करण्यासाठी 1934 मध्ये तिबेटात चीनचे मंडळ आले. नेपाळ आणि भारत सरकारची पथके ज्या प्रमाणे तिबेटमध्ये होती, त्याच आधारावर या पथकाला तिबेटमध्ये येण्याची परवानगी देण्यात आली.

17. 1936 नंतर ल्हासातील चिनी पथकातील अधिकारी विविध कारणांखातर भारतमार्गे तिबेटमध्ये प्रवास करत होते. त्या त्या प्रत्येक प्रसंगी, तिबेट सरकारच्या मतानुसार भारत सरकार प्रवासाच्या परवानगीचे पारपत्र देत राहिले किंवा नाकारत राहिले होते.

18. 1949 मध्ये या पथकालाही तिबेटबाहेर घालवून देण्यात आले.

19. चिनी-जपानी युद्धात तिबेट सामील नव्हता आणि दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेसही

तिबेटने आपली तटस्थ भूमिका आग्रहाने स्वतंत्र राखली होती. तसेच भारतातून चीनमध्ये जाणाऱ्या युद्धविषयक दळणवळणाला परवानगी दिली नव्हती.

20. चीनचा असा दावा आहे, की तिबेटी प्रतिनिधींनी 1946 मध्ये लोकप्रतिनिधीगृहात आणि 1948 मधील चिनी राष्ट्रीय सभेत भाग घेतला होता. हा दावा पूर्णपणे खोटा आहे. ज़सग खे-मे सोनम वाङ्दु हा चीनला गेलेल्या पथकाचा नेता होता. तो सांगतो, "ज़सग रोङ्पेल ल्हुन, थुबतेन समफेल आणि मी स्वत: ज़सग खे-मे सोनम वाङ्दु यांच्या नेतृत्वाखाली, तिबेट सरकारने 1946 मध्ये सदिच्छा भेटीसाठी पथक पाठवले होते. बरोबर काही सहकारीही होते. ब्रिटन, अमेरिका आणि काउमिंगतांग सरकारला विजयाच्या शुभेच्या देण्यासाठी गेलो होतो; आम्ही कलकत्तामार्गे नवी दिल्लीला गेलो; आणि ब्रिटन आणि अमेरिका यांच्या राजदूतांकरवी शुभेच्छा पाठवल्या; तिथून हवाईमार्गाने आम्ही नानकिंगला गेलो आणि शुभेच्छा दिल्या. आजारपणामुळे आणि वैद्यकीय उपचारांसाठी आम्ही काही महिने तिथे राहिलो. नंतर आम्ही अनेक भागांचा दौरा केला. आम्ही नानकिंगला परत आलो तेव्हा तिथे मोठी सभा होती. खांपा आणि इतर तिबेटी, जे तिथे जाऊन राहिले होते आणि स्वत:ला तिबेटचे प्रतिनिधी म्हणवून घेत होते, त्यांच्या वर्तणुकीचा अंदाज घ्यायला आम्ही त्या सभेला उपस्थित राहिलो; परंतु आम्हांला काही कळले नाही किंवा त्यावेळी झालेल्या कुठल्याही नवीन घटनात्मक नियमावर (शेन-फा) आम्ही सही केली नाही.

1948 बद्दल सांगायचे तर, खानदोन लोसुम या नावाने आमचे जे पथक नानकिंगमध्ये होते, ते चीनच्या सभेत पाहुणे म्हणून उपस्थित राहिले; पण ल्हासा येथून कोणीही विशेष प्रतिनिधी म्हणून नेमला गेलेला नव्हता आणि त्यांनी सभेच्या कोणत्याही ठरावाची दखल घेतली नाही किंवा त्यांनी ठरावावर सही केली नाही.

21. 1947 मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर तिबेट सरकारच्या संपर्काला उत्तर देताना, भारत सरकारने असे म्हटले होते :

"तिबेट सरकारबरोबर सध्या असलेल्या पायावर संबंध चालू राहण्याची हमी मिळाल्यास भारत सरकारला आनंद वाटेल. दोन्ही पक्षांना आवश्यक वाटेल त्या बाबतीत नवीन करार होईपर्यंत हे संबंध अशाच पद्धतीने चालू राहतील. इतर देशांबरोबर ब्रिटिश सरकारने केलेले तह याचप्रमाणे भारत सरकारने स्वीकारले आहेत.

22. 1912 ते 23 मे 1951 पर्यंतच्या काळात सतरा-कलमी करारावर सही करेपर्यंत, बाहेरील कुठल्याही सत्तेचा संदर्भ न घेता तिबेटने आपले परकीय व्यवहार चालू ठेवले होते. 1946 आणि 1948 मध्ये तिबेटी पारपत्रांवर, तिबेटच्या पथकाने दीर्घ दौरा केलेला होता.

23. श्री. एच.इ.रिचर्डसन हे ब्रिटीशांचे तसेच नंतर ल्हासातील भारतीय प्रतिनिधी मंडळाचे प्रमुख होते, त्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायतज्ज्ञांच्या समितीने नेमलेल्या कायदेशीर न्यायसंमत समितीपुढे "ब्रिटीश आणि नंतर ल्हासातील भारतीय मंडळाच्या अधिकाऱ्यांचे मुख्य कर्तव्य, या दोन्ही सरकारचे राजनैतिक मुत्सदेगिरीचे संबंध पूर्ववत ठेवावेत हे आहे." ('तिबेट आणि चीनच्या लोकांचे प्रजासत्ताक' या नावाच्या वृत्तातील पृष्ठ क्रमांक 146.)

24. मागील वस्तूस्थितीवरून तिबेट हे पूर्णपणे स्वतंत्र होते हे पुरेसे दिसून येते. तरीही गेल्या वर्षी माझ्या देशाच्या स्थानाबद्दल शंका घेतल्या गेल्या होत्या, त्यासाठी

खालील वस्तुस्थिती स्पष्ट होणे बरे होईल :

25. सर एरिक टाइशमान यांनी 'अफेअर्स ऑफ चायना' मध्ये लिहिले होते : (1912) पासून ल्हासाच्या अंमलाखालच्या तिबेटवर चीनच्या अधिपत्याचा मागमूस टिकलेला नाही किंवा तो पुन्हा दिसलेलाही नाही. वीस वर्षांपेक्षा जास्त काळ त्याने (तेराव्या दलाई लामाने) स्वतंत्र तिबेटचा निर्विवादपणे मुख्य म्हणून राज्य केले. अंतर्गत शांती आणि सुव्यवस्था राखली. त्याचप्रमाणे भारत सरकारबरोबर जवळचे आणि घनिष्ठ संबंध ठेवले.

26. 1928 मध्ये सर चार्लस् बेल याने 'द पीपल ऑफ तिबेट'मध्ये तिबेटमधील चीनची सत्ता संपली, असे निर्देशित केले आहे.

27. 1947 मध्ये तिबेट येथे एम्. अमॉरी डी राइनकोर्ट होता. त्याने म्हटले आहे, "तिबेट एखाद्या स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे सर्व बाबतीत स्वत:चेच राज्य चालवीत होता." तो पुढे म्हणतो, की "सर्वत्र शासनाचा हुकूम चालतो."

28. त्सुंग लिएन-शेन आणि शेन चि-लिउ हे दोघ ल्हासातील चिनी मंडळातील सदस्य होते. हे म्हणतात, "1911 पासून ल्हासाने सर्व बाबतीतले वास्तविक स्वातंत्र्य उपभोगलेले आहे." याला दुजोरा देताना ते याचा उल्लेख करतात, की तिबेटला त्याचे स्वत:चे चलन आणि चालीरीती आहेत, स्वतंत्र तार आणि डाक यंत्रणा आहे, आणि त्याची दिवाणी सेवा चीनपेक्षा वेगळी आहे, तसेच तिबेटचे स्वत:चे लष्कर आहे.

29. 1950 मध्ये जेव्हा तिबेटवरील आक्रमणाच्या प्रश्नाचा प्रस्ताव एल साल्व्हाडोरने दिला होता आणि सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रम पत्रिकेत त्यावर विचार करण्याचे होते, तेव्हा भारताचे प्रतिनिधी नवानगरचे जाम साहेब यांनी म्हटले, की तिबेटवरच्या परकीय सत्तेच्या आक्रमणाचा प्रश्न घेऊन एल साल्व्हाडोरने दिलेल्या प्रस्तावावर, त्यांच्या सरकारने काळजीपूर्वक अभ्यास केला आहे. चीन आणि भारतासाठी ती महत्त्वाची बाब होती. समितीला जाणीव होती, की भारत हा चीन आणि तिबेटचा शेजारी आहे, त्यांचे दोन्ही देशांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत आणि या देशाला या प्रश्नावर तोडगा निघावा यात सर्वात जास्त रस आहे. त्याकरिताच हा प्रश्न शांततापूर्ण रीतीने सोडवला जावा यासाठी भारत सरकार खास करून काळजीत आहे. (ए/ बी यू आर/ एस्.आर. 73, पृष्ठ 19)

30. तिबेटवरील चीनचा अधिपत्याचा दावा हा ग्रेट ब्रिटन आणि रशिया यांच्यात झालेल्या 1907 मधील करारावर आधारित आहे. तिबेट या करारातील संबंधित पक्ष नव्हता याची नोंद घेतली गेली पाहिजे. त्यामुळे हा करार त्याच्यावर कुठल्याही रीतीने बंधनकारक नाही.

31. तिबेट सरकारचा प्रमुख या नात्याने मी हे सांगतो, की 7 ऑक्टोबर, 1950 रोजी जे काही घडले, ती माझ्या देशाविरुद्ध केलेली चीनची आक्रमणाची कृती लाजिरवाणी होती.

32. तिबेट सरकारने संयुक्त राष्ट्रसंघाकडे मदतीसाठी विनंती केली. तिबेटी लष्कराचा पराभव झाला आणि संयुक्त राष्ट्रसंघाची मदत मिळण्यात तिबेट सरकारला अपयश आले, तेव्हा आम्हाला पेकिंग येथे प्रतिनिधी मंडळ पाठवणे भाग पडले. या मंडळाला 'सतरा-कलमी करार' म्हणून जो करार ओळखला जातो, त्यावर 23 मे, 1951 रोजी जबरदस्तीने सही करणे भाग पाडले गेले.

33. त्यानंतरच्या तसेच मार्च, 1959 मध्ये मी तिबेटमधून निघून जायच्या घटना आता

पुन्हा आढावा घ्यायची गरज नाही, इतक्या सुपरिचीत आहेत. अजूनही अगदी दररोज नेपाळ, भूतान, सिक्कीम आणि भारत या ठिकाणी शरणार्थी निर्वासित येत आहेत. या निर्वासितांनी दिलेल्या जुलूम आणि संपूर्ण दहशतीच्या वृत्तांवरून असे दिसते, की त्यांचा संदर्भ देऊन मी गेल्या वर्षी आणि पुन्हा या वर्षीही माझ्या पत्रात दिला होता, ते छळ कुठल्याही बाबतीत कमी झालेले नाहीत.

34. या संदर्भात मी संयुक्त राष्ट्रांचे लक्ष, तिबेटच्या प्रश्नावर न्यायतज्ज्ञांच्या आंतरराष्ट्रीय समितीचा जो वृत्तांत प्रसिद्ध आहे, त्याकडे वेधू इच्छितो. दुसऱ्या वृत्तात, या मान्यवरांच्या समितीने प्रश्नाचा काळजीपूर्वक अभ्यास करून निष्कर्ष काढला, की इतर बाबतींमध्येही, वंशविच्छेदाच्या व्याख्येनुसार चिनी सत्ता ही वंशविच्छेदाच्या गुन्ह्याखाली दोषी आहे. मला असा विश्वास आहे, की संयुक्त राष्ट्रसंघ, ज्या वस्तुस्थितींवर हा निष्कर्ष आधारित आहे त्यांचे काळजीपूर्वक परीक्षण करील आणि या बाबतीत आवश्यक ती कृती करेल. वंशविच्छेदविषयक समितीच्या आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार वंशविच्छेद हा गुन्हा म्हणून ओळखला जातो.

35. सतरा-कलमी करारातील सर्व महत्त्वाच्या शर्तींचा भंग झाल्याचा परिणाम म्हणून, सर्वसाधारण सभेने (ज्यात अधिकारी आणि जनता, मुख्यत्वे सार्वजनिक होते) हा करार नाकारला. असे होणे साहजिक होते. आणि 10 मार्च 1959 रोजी तिबेटच्या स्वातंत्र्याचा पुनरुच्चार करण्यात आला.

36. जे बळाने येऊन राहिले आहेत आणि जुलूम करणारे आहेत त्यांविरुद्ध तिबेटचा लढा अजूनही चालू आहे. मी गेल्या वर्षी संयुक्त राष्ट्रसंघांना विनंती केली होती आणि मी पुन्हा या आशेने ही विनंती करत आहे, की चीनने आपले आक्रमण मागे घ्यावे यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ योग्य ती पावले उचलेल. माझ्या मते, याशिवाय कुठल्याही गोष्टीची माझ्या देशाला मदत होणार नाही, कारण साम्यवादी रूपाचा वाफेचा रूळ दररोज माझ्या लोकांचे स्वातंत्र्य चिरडून टाकत आहे.

37. आदरणीय महाशय, संयुक्त राष्ट्रांपुढे हा विनंती अर्ज आपण सादर करावा अशी मी आपणास विनंती करतो.

- दलाई लामा

सर्वसाधारण सभा

सयुक्त राष्ट्रांच्या सनदीमधील आणि सर्वसाधारण सभेने 10 डिसेंबर 1948 रोजी स्वीकारलेल्या 'मानवी हक्कांचा जाहीरनामा' यातील, मानवाचे हक्क आणि स्वातंत्र्य यांबद्दलच्या मूलभूत तत्त्वांची आठवण करून देणे.

इतर सर्वांप्रमाणे, मूलभूत मानवी हक्क आणि स्वातंत्र्य यांचा अधिकार तिबेटी लोकांना आहे आणि त्यात सर्वांना, भेदभावाशिवाय, नागरी हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्य अंतर्भूत आहे, याची दखल घेणे.

तिबेटच्या लोकांची वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे आणि परंपरेनं त्यांनी उपभोगलेली स्वायत्तता याची जाणीव ठेवणे.

हिज होलीनेस द दलाई लामा यांची अधिकृत विधाने, ज्यातून सूचित होते की तिबेटमधील लोकांचे मूलभूत मानवी हक्क आणि स्वातंत्र्य यांची जबरदस्तीने पायमल्ली होत आहे, या वृत्तांची गंभीर दखल घेणे.

या घटनांनी आंतरराष्ट्रीय ताणतणाव वाढतो आहे आणि लोकांच्या नात्यात कटुता येते आहे, हे परिणाम शोचनीय आहेत. अशावेळी जबाबदार नेत्यांनी जबाबदारीने, तळमळीने आणि सकारात्मक पद्धतीनं हा ताण कमी करण्याचा आणि आंतरराष्ट्रीय नातं सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1. संयुक्त राष्ट्रांची सनद आणि मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा यातील तत्त्वे, कायद्याच्या नियमावर आधारित शांततापूर्ण जगाची निर्मिती होण्यासाठी उपयुक्त आहेत यावरचा विश्वास दृढ करणे;

2. तिबेटी लोकांसाठी मूलभूत मानवी हक्क मिळण्याकरिता आणि त्यांचे स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक आणि धार्मिक आयुष्य याला आदर मिळर्याकरिता आवाहन करणे.

834 वी पूर्ण बैठक
21 ऑक्टोबर 1959

तिबेटचा प्रश्न

सर्वसाधारण सभेतील ठराव- सोळावे सत्र *(1961)*

तिबेटच्या प्रश्नावरील ठरावाची, 1353 (एक्स.आय्.व्ही), दिनांक 21 ऑक्टोबर 1959 - याची पुर्नदखल घेणे.

तिबेटमधील लोकांच्या मूलभूत मानवाधिकारांची पायमल्ली होत आहे, या लोकांच्या परंपरेने चालत आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाला दडपून टाकणे, अशा घटना सातत्याने तिबेटमध्ये घडत आहेत, याबद्दल गंभीर चिंता व्यक्त करणे.

या घटनांमुळे तिबेटी लोकांना जी शिक्षा झाली त्याचा परिणाम म्हणून शेजारच्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर तिबेटी शरणार्थींचे निर्गमन होते आहे, याची खेदाने नोंद घेणे.

संयुक्त राष्ट्रे आणि मानव अधिकारांचा जागतिक जाहीरनामा यांच्या सनदीप्रमाणे आणि लोक आणि राष्ट्र यांचे जे स्वयंसिद्धतेचे, निर्णयाचे तत्त्व असते त्यानुसार विचार केला तर अशा घटनांमुळे मूलभूत मानव अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा भंग होतो आहे; आणि त्याच्या शोचनीय परिणामांमुळे आंतरराष्ट्रीय तणाव आणि लोकांच्या आपापसातील नात्यांची कटुता वाढते, याचा विचार करणे.

1. सनद व मानव अधिकारांचा जागतिक जाहीरनामा यातील तत्त्वांचा आदर करणे हे कायद्यावर आधारित शांतीमय जगाच्या उत्क्रांतीसाठी गरजेचे आहे, यावर दृढ विश्वासाचा पुनरुच्चार करणे;

2. तिबेटी लोक, ज्यामुळे त्यांच्या मूलभूत मानव अधिकार तसेच स्वयंनिर्णयाचा अधिकार यांपासून वंचित झाले आहेत, अशा सर्व पद्धती थांबाव्यात यासाठी कळकळीने पुन्हा आवाहन करणे;

3. या ठरावातील हेतूंसाठी सुयोग्य पावले उचलली जावीत यासाठी सर्व सदस्य राष्ट्रे शक्य ते सर्व प्रयत्न करतील अशी आशा व्यक्त करणे.